दीपावली २०१८

# मेहता मराठी ग्रंथजगत

पृष्ठे : १६० । किंमत : ₹ १००






अ मिडसमर नाइट्स ड्रीम
ऑल इज वेल दॅट एन्ड्स वेल
अँटोनी आणि क्लिओपात्रा
अॅज यू लाइक इट
सिंबलिन, किंग ऑफ ब्रिटन
हॅम्लेट, प्रिन्स ऑफ डेन्मार्क
हेन्री फाइव्ह
ज्यूलियस सीझर
किंग लिअर
मच अॅडो अबाउट नथिंग
ऑथेल्लो, द मूर ऑफ व्हेनिस
रिचर्ड ३रा
रोमियो अँड ज्युलिएट
द कॉमेडी ऑफ एरर्स
द मर्चंट ऑफ व्हेनिस
द टेमिंग ऑफ द श्रू
द टेम्पेस्ट
द ट्रॅजेडी ऑफ मॅकबेथ
द टू जंटलमेन ऑफ व्हेरोना
द विंटर्स टेल
टिमॉन ऑफ अथेन्स
ट्वेल्थ नाइट

विल्यम शेक्सपिअर



# मेहता मराठी ग्रंथजगत

## दीपावली २०१८

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१८ जोडअंक

वर्ष अठरावे

किंमत ₹ १००


संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

संपादन साहाय्य
**अंजली पटवर्धन**

मुखपृष्ठ
**चंद्रमोहन कुलकर्णी**

मांडणी
**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२



या अंकातील लेखांतील मते त्या त्या लेखकाची असून संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

**संपादकीय** /६

**पत्रं... मर्मबंधातली ठेव...**
डॉ. उमा कुलकर्णी / १०

**पत्रलेखन : एक अकृत्रिम संवाद**
प्रा. दादासाहेब मोरे / १८

**प्रिय दादांस...**
मधुमती शिंदे / २४

**निरोप्या...**
स्वाती चांदोरकर / ३२

**जगप्रसिद्ध व्यक्तींची प्रेमपत्रे**
डॉ. सुनीलकुमार लवटे / ४०

**आठवणींच्या बेटावरून**
यशोधरा काटकर / ४८

**सावंत साहेबांचा पत्रव्यवहार**
मृणालिनी सावंत / ५४



**संवादाचा संहार**
विश्वास पाटील / ६२

**पत्रे... आनंदाच्या पासबुकातील नोंदी!**
श्याम भुर्के / ६६

**शिवाजी महाराजांची पत्रे**
शशिकांत काळे / ७०

**नीरज की पाती**
प्रा. ए.व्ही. देशपांडे / ७४

**झाकोळ**
मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर / ८०

**साहित्य विश्वातला पत्रव्यवहार**
वामन देशपांडे / ८८

**पोस्टमन**
समीर वेंगुर्लेकर / ९२

## पुस्तकाच्या पानांतून

**आत्मबळ**
गिरिजा कीर / ९६

**प्लेझर बॉक्स - भाग १**
व.पु. काळे / १०४

**जे.आर.डी. टाटा यांची पत्रे**
संपादन : अरविंद माम्ब्रो / ११०

**स्पीडपोस्ट**
शोभा डे / ११६



**प्रवास एका लेखकाचा**
व्यंकटेश माडगूळकर / १२२

**अमृतवेल**
वि.स. खांडेकर / १३०

**राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे**
डॉ. जयसिंगराव पवार / १३४

**'नाथ हा माझा'**
कांचन घाणेकर / १४२

**तुरुंगातील पत्रे**
अर्न्स्ट टोलर / १५०

## मान्यवरांची पत्रे

किशोर कुमार / १७
स्मिता पाटील / २३
शान्ता शेळके / २८
फ्रिडा कोहलो / ३१
महात्मा गांधी / ३९
अमिताभ बच्चन / ४७
पाब्लो नरुदा / ७३



# संपादकीय

**स.न.वि.वि.**

प्रिय वाचक,

स.न.वि.वि.

आमचा हा पत्र विशेषांक आम्ही सानंद आपल्या हातात देत आहोत. 'पत्र' ही दोन अक्षरं काही वर्षांपूर्वीपर्यंत सर्वसामान्य आणि मान्यवर माणसांच्याही भावजीवनाशी जिव्हाळ्यानं जोडलेली होती. पोस्टमन हा केवळ पोस्टाचा कर्मचारी नव्हता, तर बहुतांश कुटुंबांशी त्याचं एक आपुलकीचं नातं होतं. सुख-दु:खांची देवाण-घेवाण करणारा तो निरोप्या होता. लग्न, मुंज, बाळाचा जन्म, शाळा-कॉलेजचा रिझल्ट, आजारपण, मृत्यू, एकमेकांची खुशाली, शुभेच्छा, अभिनंदन, सांत्वन...कारण कोणतंही असो; पत्र लिहिलं जायचं. वाचलं जायचं. त्याचं परत उत्तर पाठवलं जायचं. असा हा पत्ररूपी संवाद चालू असायचा आणि तोही अतिशय अकृत्रिमतेनं. सीमेवरच्या जवानांसाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी तर 'पत्र' हा त्यांना जोडणारा एकमेव दुवा होता. सातासमुद्रापार असलेल्या प्रियजनांना संदेश पोचवण्याचं काम पत्रंच करत होती.

पत्र ज्या व्यक्तीला लिहायचं असेल त्यावर त्याचा मायना ठरलेला असे. बरोबरीची किंवा जिच्याशी आपलं मित्रत्वाचं नातं आहे, अशा व्यक्तीला 'प्रिय', आई-वडिलांना लिहिताना ती. किंवा ती.स्व. (तीर्थरूप किंवा तीर्थस्वरूप), मुलाला पत्र लिहिताना चि.(चिरंजीव), मुलीला लिहिताना कु. (कुमारी), लग्न झालेल्या स्त्रीस सौ.(सौभाग्यवती), वयाने ज्येष्ठ असलेल्या विधवा स्त्रीला गं.भा. (गंगा भागीरथी) असं लिहिण्याची एक पद्धत होती. मायन्यातूनच सदर व्यक्तीबद्दलचा आदर, प्रेम व्यक्त होत असे. लहान व्यक्तीला पत्र लिहिताना नावाचा उल्लेख करून अ.उ.आ. (अनेक उत्तम आशीर्वाद) असं लिहिलं जायचं, मोठी व्यक्ती असेल तर नाव किंवा संबोधन (उदा. काका, मामा, बाबा इ.) लिहून शि.सा.न. (शिरसाष्टांग नमस्कार) असं लिहिलं जायचं. त्यानंतर सर्वसाधारणपणे पत्र लिहिण्यास कारण की...अशी सुरुवात केली जायची आणि मग काय असेल तो मजकूर लिहिला जायचा. पत्र नेहमीची खुशाली कळवणारं असेल तर 'इकडील सर्व क्षेम' असं एक वाक्य लिहून घरातील लहान-थोरांची नावं लिहून त्यांना वयाप्रमाणे आशीर्वाद-नमस्कार लिहिले जायचे आणि शेवटी आपला/आपली असं लिहून पत्र लिहिणारा स्वतःचं नाव लिहायचा. सगळा मजकूर लिहून झाल्यावर जर काही आठवलं तर ता. क. (ताजा कलम) असं लिहून त्याच्यापुढे मजकूर लिहिला जायचा.

मजकुरानुसार पोस्टकार्ड, आन्तर्देशीय पत्र, पाकीट याची निवड केली जायची. मुलगी लग्नाची असेल आणि एखाद्या विवाहयोग्य मुलाचं स्थळ वधूपित्याला कुणी सुचवलं तर वधूपिता वरपित्याला आपल्या मुलीची माहिती आणि तिची जन्मकुंडली पत्राद्वारा (पोस्टकार्ड) पाठवत असे आणि वरपित्याकडून त्वरित उत्तराची अपेक्षा असल्यामुळे त्या पत्राला स्वतःचा पत्ता असलेलं एक कोरं पोस्टकार्ड जोडलेलं असे. त्यामुळे त्याला जोडकार्ड म्हणत. विवाहाचं निमंत्रण करणाऱ्या पत्रावर हळदी-कुंकवाची बोटं उमटवलेली असत. कुणाच्या मृत्यूची वार्ता देणारं पत्र आलं तर ते वाचून झाल्यावर लगेच फाडून टाकलं जायचं. केवळ मृत्यूची बातमी असल्यामुळे पोस्टकार्ड अर्धंच भरलेलं असे. त्यामुळे इतर वेळी (खुशालीचे पत्र असले तरी) पत्रात लिहिण्यासाठी फार काही मजकूर नसला आणि अर्धंच पोस्टकार्ड लिहिण्याची वेळ आली तर पोस्टकार्डाच्या मागच्या बाजूला 'शुभं भवतु' असे लिहिण्याची पद्धत होती. तर असे हे पत्रलेखनाच्या बाबतीतले सर्वसाधारण संकेत होते. (आजच्या काळात गंमत वाटेल असाही एक संकेत होता. एखाद्या व्यक्तीला जर कावळ्याने स्पर्श केला तर ते अशुभ मानले जाई. मग त्या अशुभाचं निवारण करण्यासाठी ती व्यक्ती मृत झाल्याची बातमी पोस्टकार्डाद्वारा नातेवाइकांना कळवली जाई.) काही वेळेला मृत्यूची बातमी तारेनं कळवली जायची. काही वेळेला परीक्षेचा रिझल्ट/ नोकरीवर रुजू होण्याचा आदेशही तारेद्वारा मिळायचा. एखाद्या व्यक्तीच्या लग्नाला जाणं शक्य नसेल तर त्याला विवाहाच्या दिवशी शुभेच्छा तारेनं पाठवल्या जायच्या. तर अनेक कुटुंबांशी या टपालाचा असा स्नेहबंध होता.

तर हा झाला सर्वसामान्य स्तरावरचा पत्रव्यवहार; पण ऐतिहासिक पत्रव्यवहार, राजकीय पत्रव्यवहार, साहित्यिकांचा पत्रव्यवहार, नामवंतांचा पत्रव्यवहार यावर नजर टाकली तर पत्र या माध्यमाची ताकद लक्षात येते. मग ती शाहू महाराजांची पत्रं असतील, तुरुंगातून अर्न्स्ट टोलरने लिहिलेली पत्रं असतील, जे.आर.डी. टाटांची

पत्रं असतील, ‘वपुं’नी वाचकांना लिहिलेली पत्रं असतील किंवा वाचकांनी त्यांना लिहिलेली पत्रं असतील, इंदिरा गांधींचं पत्र असेल, महात्मा गांधींनी हिटलरला लिहिलेलं पत्र असेल...ही यादी बरीच लांबू शकते. पत्रं ही ऐतिहासिक दस्तावेज असतात... एखाद्या द्रष्ट्याची राजकीय, सामाजिक, औद्योगिक क्षेत्राविषयीची मतं असतात... विविध विषयांवर मार्गदर्शन करणारी असतात...जीवनाला भिडणारी असतात... रसपरिपोष करणारी असतात...अंतःकरणाचे आरसे असतात...

किंबहुना, उत्तम भाषेतल्या, उत्तम आशय असलेल्या ‘पत्रां’ना एक वाङ्मयीन आकृतिबंध म्हटलं तर ते वावगं ठरू नये. या निमित्तानं आठवण झाली ‘चांगदेव पासष्टी’ची. हटयोगी चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना पत्र लिहायचं ठरवलं. ज्ञानेश्वर चांगदेवांपेक्षा वयाने लहान होते; पण ज्ञानानं मोठे होते, त्यामुळे चांगदेवांना कळेना की ज्ञानेश्वरांना आशीर्वाद लिहावा की नमस्कार. या दुविधेत त्यांनी ज्ञानेश्वरांना कोरंच पत्र पाठवलं आणि त्यावर ज्ञानेश्वरांनी त्यांना पासष्ट ओव्या लिहून पाठवल्या, ज्या नंतर ‘चांगदेव पासष्टी’ या नावानं ग्रथित झाल्या.

तेव्हा पत्रांचा महिमा हा असा आहे; पण ‘गुलाबी पत्रां’च्या अर्थात प्रेमपत्रांच्या उल्लेखाशिवाय तो कसा पूर्ण होणार? रुक्मिणीनं कृष्णाला प्रेमपत्र लिहिल्याचा उल्लेख ‘रुक्मिणी स्वयंवर’ या ग्रंथात आहे. सलीम-अनारकलीच्या प्रेमकहाणीत पत्रं आहेतच, कबूतराकरवी पाठवलेली. आणि पत्राचा उल्लेख करणारी गीतं? या गीतांमुळे प्रेमभावनेतील मोहकतेचं एक वेगळंच दर्शन घडतं आणि ही गीतं लिहिणाऱ्या गीतकारांना सलाम करावासा वाटतो. ‘पत्र’ या विषयाची अभिव्यक्ती त्यांनी किती हळुवारपणे आणि विविधतेने केली आहे. ‘तेरा ख़त लेके सनम पाव कही रखते है हम...’ या ‘अर्धांगिनी’मधील गीतात प्रियकराचं पत्र मिळाल्यावर नायिकेला झालेल्या आनंदाचं अतिशय सुंदर वर्णन मजरुह सुलतानपुरींनी केलंय, तर ‘फूल तुम्हे भेजा है ख़त में, फूल नही मेरा दिल है...’ या गीतातून इन्दिवर यांनी नायक-नायिकेला एकमेकांच्या भेटीची लागलेली ओढ फार सुंदर शब्दांत व्यक्त केलीय, ‘ख़त लिख दे सावरिया के नाम बाबू’, ‘ये मेरा प्रेमपत्र पढकर के तुम नाराज न होना...’, ‘लिखे जो ख़त तुझे...’ ‘डाकिया डाक लाया...’.... गाणी खूप आहेत (तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे). मराठी भावगीतांतून, चित्रपट गीतांतूनही पत्राला स्थान मिळालंच आहे. त्या संदर्भात आठवलं ‘सप्रेम नमस्कार विनंती विशेष...’ हे वसंतराव देशपांडे आणि मधुबाला चावला-जव्हेरी यांच्या आवाजातील ‘वैजयन्ता’ चित्रपटातील गीत. त्याच अनुषंगानं मधुबाला चावला-जव्हेरी यांनी गायलेलं ‘काय हो चमत्कार’ या चित्रपटातील गीत आठवलं ‘सांगू कुणाला, नको कुणाला, भुलल्यावाणी झालंय मला, आज गुलाबी पत्र आलंय मला...’ , ‘मज सांग सखे तू सांग मला, पत्रात लिहू मी काय तुला...’ आणि ‘पत्र तुझे ते येता अवचित, लाली गाली फुलते नकळत’सारखी भावगीतं आहेतच. तेव्हा पत्रांमुळे गीतांचा नॉस्टॅल्जिया मनात जागा झाला. शिवाय या अंकात सुनीलकुमार लवटे यांचा ‘जगप्रसिद्ध व्यक्तींची प्रेमपत्रे’ हा लेख आम्ही समाविष्ट केलाच आहे.

पत्र या माध्यमाचं सामर्थ्य दर्शविणारी वैविध्यपूर्ण पत्रं आमच्या अंकात समाविष्ट आहेतच. शिवाय महात्मा गांधी, इंदिरा गांधी, किशोर कुमार, अमिताभ बच्चन, स्मिता पाटील इ. नामवंतांच्या पत्रांचाही समावेश केला आहे. पत्र या विषयावरचे जे लेख आम्ही अंतर्भूत केले आहेत, त्यांतील विश्वास पाटील, दादासाहेब मोरे यांच्या लेखांमधून पत्रसंवाद दुरापास्त झाल्याची भावना तर व्यक्त झालीच आहे; पण एक लेखक म्हणून त्यांना घडविण्यात पत्रांचं किती महत्त्वाचं योगदान होतं, हेही त्यांनी सांगितलं आहे. मृणालिनी सावंत, उमा कुलकर्णी, यशोधरा काटकर, नेहा पुरव, श्याम भुर्के यांनी पत्रस्मृती जागवताना पत्रांचं महत्त्व अधोरेखित केलं आहे, तर मधुमती शिंदे यांनी त्यांच्या वडिलांना म्हणजे रणजित देसाईंना भावपूर्ण पत्र लिहिलं आहे. स्वाती चांदोरकर यांनी टपालाचं आत्मवृत्त लिहिताना पत्राचा प्रवास सांगितला आहे आणि त्याच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत. वामन देशपांडे यांनी साहित्यिकांच्या आणि साहित्यातील पत्रव्यवहाराबद्दल लिहिलं आहे. तर मोहना जागळेकर यांची ‘झाकोळ’, समीर वेंगुर्लेकर यांची ‘पोस्टमन’ या कथांमधून माणसाच्या भावजीवनातील पत्राचं स्थान विशेषत्वानं जाणवतं.

तर १८५४मध्ये भारतात ब्रिटिशांनी सुरू केलेल्या अधिकृत पोस्ट सेवेनं भारतीयांच्या मनावर शंभर वर्षांपेक्षाही जास्त काळ अधिराज्य गाजवलं; पण काळाच्या ओघात, विशेषतः संगणक, मोबाईलचा सर्वदूर प्रचार झाल्यानंतर पत्र या माध्यमाला फारशी किंमत उरली नाही. व्हॉट्स ॲप, फेसबुक, ई-मेल यामुळे त्वरित संपर्क होऊ लागला. त्यामुळे पत्राची वाट पाहण्यातली आतुरता संपली. संवाद मोजक्या (आणि भाषेच्या शुद्धतेचा आग्रह न धरता) शब्दांत होऊ लागला. या आधुनिक साधनांचा वापरही सजगतेनं, संवेद्यतेनं आणि भाषेविषयीच्या आत्मीयतेनं केला तर ही साधनंही एक भावनाशील समाज घडवू शकतात. आजच्या काळातही आकाशवाणीला स्वहस्ताक्षरात पत्र (पोस्टकार्ड, आन्तर्देशीय) लिहिणारी माणसं आहेत. दिवाळीची शुभेच्छापत्रं (ग्रीटिंग कार्ड्स) आजही पोस्टानं पाठवणारी माणसं आहेत.

आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर सकाळी ‘चिंतन’ नावाचा कार्यक्रम लागतो. पाच मिनिटांचा हा कार्यक्रम बरंच विचारधन देऊन जातो. आकाशवाणीचे एक श्रोते हे चिंतन लिहून घेत आणि त्याच दिवशी लगेच पत्रानं त्यांच्या मुलाला पाठवत. अशी अनेक पत्रं त्यांच्या मुलाकडे साठली आणि त्याचं एक पुस्तक करायचं त्यानं ठरवलं. तर असा हा पत्रमहिमा! काळ बदलणार, साधनं-माध्यमं बदलणार, पण माणसाची भावनाशीलता कायम राहिली पाहिजे, नाही का?

‘पुलं’च्या ‘पोस्ट ऑफिस’चं स्मरण करून थांबू यात!

हीं दीपावली आणि नूतन वर्ष
आपणा सर्वांना सुखसमृद्धीचे जावो, ही कामना !





# पुरस्कार



उमा कुलकर्णी लिखित
'संवादु अनुवादु' या आत्मकथनास
महाराष्ट्र साहित्य परिषद, मंगळवेढा तर्फे
'सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१७', अखिल
भारतीय मराठी साहित्य परिषद, बडोदा
तर्फे 'उत्कृष्ट आत्मकथन २०१७',
अश्वमेध ग्रंथालय व वाचनालय, सातारा
तर्फे कै. भास्करराव ग. माने स्मृत्यर्थ
'अक्षरगौरव साहित्य पुरस्कार २०१७'

संवादु अनुवादु
आत्मकथन



योजना यादव लिखित
'मरी मरी जाय सरीर' या काव्यसंग्रहास
महाराष्ट्र साहित्य परिषद, मंगळवेढा तर्फे
'सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१७',
अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद,
बडोदा तर्फे 'उत्कृष्ट काव्यसंग्रह २०१७',
आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी
साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या वतीने
'उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार २०१७'

मरी मरी जाय सरीर



मंजुश्री गोखले लिखित
'हेचि दान देगा देवा' या कादंबरीस
पुणे नगर वाचन मंदिर तर्फे
'संत वाङ्मय विषयक ग्रंथ पुरस्कार'
कवी ह.स. गोखले पुरस्कार २०१७

॥ हेचि दान देगा देवा ! ॥

राम प्रधान लिखित 'माझी वाटचाल :
मेटकॉफ हाउस ते राजभवन'
या आत्मकथनास
श्रीमंत गंगाबाई वाचन मंदिर, आजरा तर्फे
'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लक्षणीय गद्य
साहित्यकृती पुरस्कार २०१७'



माझी वाटचाल
मेटकॉफ हाउस ते राजभवन

डॉ. अनिल गांधी लिखित
'अफलातून मेंदू' या पुस्तकास
स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे
'डॉ. प्र.न. जोशी 'विज्ञानमित्र'
ग्रंथ श्रेष्ठता पुरस्कार',
अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे
'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २०१८'



अफलातून मेंदू

रा.वा. शेवडे गुरुजी लिखित
'जाणता राजा श्री शिवछत्रपती'
या पुस्तकास
द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स,
न्यू दिल्ली तर्फे बालसाहित्यातील
'उत्कृष्ट पुस्तक निर्मिती पुरस्कार २०१८'



जाणता राजा
श्री शिवछत्रपती


चंद तस्वीर-ए-बुताँ
चंद हसीनों के खुतूत
बाद मरने के
मिरे घर से ये सामाँ निकला
-बज़्म अकबराबादी

# पत्रं...
# मर्मबंधातली ठेव...

डॉ. उमा वि. कुलकर्णी



आज जवळजवळ नामशेष होत चाललेला एक ‘संवादा’चा प्रकार म्हणजे पत्रव्यवहार. मोबाईलचं युग सुरू होईपर्यंत पत्रव्यवहाराला सर्वसामान्य जीवनात महत्त्वाचं स्थान होतं. फोन आले तरी याचं महत्त्व कायम होतं. चेष्टेनं म्हटलं जायचं, बायका नवऱ्यापेक्षा पोस्टमनची फार मनापासून वाट बघतात. ते अगदीच काही खोटंही नव्हतं! माझं लग्न झालं, तेव्हा म्हणजे सुमारे ४५-४८ वर्षांपूर्वीचं वातावरण तर असंच होतं. सुमारे दहा वर्षांपूर्वीपर्यंतही ते थोडंफार टिकलं होतं. पोस्टमन येऊन गेला की धावत जाऊन पत्राची पेटी उघडून पाहणं, हा आजही दिनक्रमाचा भाग असला तरी त्यात अलीकडे मात्र हातानं लिहिलेलं काहीच आढळत नाही.

एकोणिसाव्या वर्षी मी लग्न होऊन पुण्याला आले. बेळगावला, माहेरी घरात आई-वडील आणि आम्ही सहा भावंडं (थोरल्या बहिणीचं लग्न झालेलं). शिवाय सतत नातेवाइकांचं जाणं-येणं. घरात कुणा ना कुणा नातेवाइकांचा मुक्काम असायचा. रोजचा स्वयंपाकही थोडा चढाच केलेला असायचा; आयत्या वेळी कुणीतरी येईल म्हणून. वेणी घालताना हातातून कंगवा पडला तर ‘आज कुणीतरी पाहुणा येणार!’ असं उत्सुकतेनं म्हटलं जायचं. कधी कधी ‘आज कुणाचं तरी पत्र येईल..’ असंही म्हटलं जायचं.



त्यामुळे बऱ्याच दिवसांत कुणाचं पत्र आलं नसेल तर आम्ही मुद्दाम हातातला कंगवा खाली टाकून मोठ्या उत्साहानं तेच वाक्य म्हणत असू, एवढा मान होता तेव्हा पाहुण्यांना आणि पत्रांना!

पुण्याच्या घरात आम्ही दोघंच. शेजारीपाजारी अजून ओळखी व्हायच्या होत्या. विरुपाक्ष सकाळी सात वाजता डबा घेऊन फॅक्टरीला निघून जायचे. त्यामुळे स्वयंपाकही सातच्या आत झालेला असायचा. त्यानंतरचा संपूर्ण दिवस अंगावर चाल करून यायचा. पुस्तक-रेडिओची सोबत असायची ती काही वेळापुरतीच. एवढ्या लांबवर पाहुणा तरी कोण येणार? गावातही कुणी फारसं ओळखीचं नसायचं. त्यामुळे घरी येणारी पत्रं हा फार मोठा आधार असायचा.

घर मॉडेल कॉलनीच्या पोस्टाच्या शेजारी असल्यामुळे तेव्हा तर तीन-तीन वेळा पोस्टमनची फेरी व्हायची. घराला पत्रासाठी पेटी नव्हती. तळमजल्यावरचं घर असल्यामुळे साडेनऊ वाजता, साडेबाराच्या सुमारास आणि दुपारी तीन-साडेतीन वाजता बेडरूमच्या खिडकीतून किंवा व्हरांड्याच्या खिडकीतून पत्रं टाकली जायची. या ठरलेल्या वेळी सगळे प्राण कानाशी एकवटलेले असायचे. पत्र पडल्याचा आवाज एखाद्या पडघमासारखा ऐकू येऊन मी बाहेरच्या खिडकीपाशी धाव घ्यायची आणि पत्रांचा कब्जा घ्यायची.

पत्रं एकदा वाचून झाली की त्यांचा ठिय्या माजघरातल्या खिडकीत असायचा. ही जागा अशी होती की कुठल्याही खोलीतून घरात कुठंही गेलं तरी ही खिडकी लागायचीच. मग जाता-येता ते पत्र पुन्हा वाचायचं. जर ते अक्काचं, म्हणजे माझ्या आईचं किंवा मोठ्या बहिणीचं- मीनाचं असलं तर बघायलाच नको! पुढचं पत्र आल्यानंतरच ते पत्र तिथून हलवलं जायचं. तेव्हा पत्रंही आठ-दहा दिवसांत यायचीच.

या पत्रांमध्ये ‘साहित्यिक’ असं काहीच नसायचं. साधी खुशाली सांगणारी पत्रं अघळपघळ असायची. घरी कोण कोण येऊन गेलं, धाकट्या भावंडांचं काय काय चाललंय, शेजारपाजारी काही महत्त्वाचं घडलंय, असंच काहीतरी लिहिलेलं असे. या पत्रांचा प्रभाव मात्र ती व्यक्ती खरोखरच भेटल्यासारखा बरेच दिवस टिकत असे. वडिलांचं- अण्णांचं पत्र मात्र जावयाशी खास संवाद साधायचा असेल तरच येत असे! विशेषकरून घरात ठरलेल्या लग्नकार्याची माहिती देणारी आणि त्याची निमंत्रणं. ही पत्रं मात्र सुंदर अक्षरातली आणि अत्यंत नेटकी असत. कधी धाकट्या भावंडांची पत्रंही येत.

याच बरोबरीनं सासरची पत्रंही येत. शाळा-कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दोन नणंदा, दीर काही कारणानं लिहीत; सासरे अण्णा मात्र नियमितपणे लिहीत. ही सारी पत्रं अर्थातच कन्नडमध्ये असत. माझ्यासाठी कन्नड लिपी वाचून दाखवायची जबाबदारी विरुपाक्षांची. त्यासाठी हे फॅक्टरीतून यायची वाट बघावी लागे. चहा,

खाणं झाल्यावर ते निवांतपणे पत्र वाचून दाखवत. तेव्हापासूनच कन्नड लिपी वाचून दाखवायची जबाबदारी विरुपाक्षांनी घेतली, ती कायमचीच!

अनुवादाची सरुवात झाली, त्यानंतर या पत्रांमध्ये कन्नड साहित्यिकांची भर पडत गेली.

यात पहिला पत्रव्यवहार झाला तो ज्ञानपीठपुरस्कार विजेते डॉ. शिवराम कारंत यांच्याबरोबर. सुरुवातीला माझ्या नावानं, प्रत्यक्ष ओळख झाल्यानंतर विरुपाक्षांबरोबर. लिहिलेल्या पत्राचं आठ दिवसांत उत्तर यायचं. (फक्त एकदाच आलं नव्हतं, - कारण त्या काळात त्यांच्या पत्नी वारल्या होत्या- तर पुढच्या पत्रात त्यांनी त्याबद्दल क्षमा मागितली होती! (वेळच्या वेळी पत्राला उत्तर लिहिणं हा आपल्या 'नैतिकते'चा भाग आहे, त्यात खंड पडल्यामुळे त्यांनी क्षमा मागितली होती!)


DR. K. SHIVARAMA KARANTH
P. O. SALIGRAMA,

पहिल्या कादंबरीच्या परवानगीचं पत्र आलं तेव्हा आम्हा दोघांनाही इतका आनंद झाला की आम्ही सेलिब्रेशनसाठी ताबडतोब 'वैशाली' गाठलं! त्यानंतर आमची ती सेलिब्रेशनची प्रथाच पडली. पत्रातून काही चांगली बातमी समजली की 'वैशाली'त जायचं.

अनुवादासाठी येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी आम्ही त्यांना पत्र लिहायचो. ते पत्रातून खुलासा करत. कधी पर्यायी इंग्लिश शब्द कळवत. त्यांनी स्वतः तयार केलेला प्रादेशिक शब्दांचा कोशही त्यांनी सुचवला. 'कुडीय' ही त्यांची आदिवासी जीवनावरची कादंबरी. या कादंबरीतल्या वन्य प्राण्यांच्या आणि वृक्षराजींच्या संदर्भात त्यांच्याशी पत्रव्यवहार झाला. तेव्हा त्यांनी इंग्लिश शब्दांबरोबर चित्रकलेचाही आधार घेत खुलासा केला. ग्रांथिक इंग्लिश शब्दांचा कादंबरीच्या दृष्टीनं काहीच उपयोग नव्हता. ते शब्द आम्ही सुप्रसिद्ध लेखक मारुती चितमपल्ली यांना कळवले. त्यांच्याकडून बोली भाषेतले शब्द मिळाल्यावरच मी त्यांचा कादंबरीत वापर करू शकले.

कारंतांना एकदा पु.ल. देशपांडेंच्या 'पार्किन्सन' या आजाराविषयी कळवण्याचा प्रसंग आला होता. तेव्हा या ज्येष्ठ लेखकानं लिहिलं होतं, 'मन-बुद्धी शाबूत असताना अशा प्रकारची शारीरिक व्याधी किती दुःखदायक ठरू शकते, याची मी कल्पना करू शकतो...'



डॉ. एस. एल. भैरप्पांशी सुरुवातीला पत्रव्यवहार होता. मोठमोठ्या आकाराच्या आणि आशयाच्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या भैरप्पांची पत्रं मात्र अल्पाक्षरी असायची. केवळ दोन-तीन मुद्द्यांच्या ओळीच तेवढ्या असायच्या. प्रत्यक्ष भेटी आणि फोन सुरू झाल्यावर तेही अगदी नगण्य झालं. तसंच काहीसं यू. आर. अनंतमूर्तींच्या बाबतीतही झालं. अनुवादाचं काम सुरू असताना मुद्द्याचीच काही पत्रं यायची.


GIRISH KARNAD

How are you?

With Warmest Regards

त्या तुलनेनं गिरीश कार्नाडांशी झालेला पत्रव्यवहार बराच मोठा होता. 'नागमंडल' या नाटकाचा अनुवाद हैदराबादच्या 'पंचधारे'साठी करायचं काम द. पं. जोशी यांनी माझ्याकडे सोपवलं होतं. एका अंकात कार्नाडांचं एक भाषण आणि या नाटकाचा एक अंक प्रकाशित करायचा त्यांचा मानस होता. त्यासाठी त्यांनी नाटक माझ्याकडे पाठवलं होतं. मी अनुवाद सुरू करण्याआधी कार्नाडांचं रुबाबदार पत्र आलं. त्यात त्यांनी लिहिलं होतं, 'तुम्ही अनुवाद करताय हे समजलं. मला मराठी येत असल्यामुळे अनुवाद माझ्याकडे पाठवावा...मी पाहून देईन...'

तेव्हा ते चित्रपट व्यवसायात अभिनय-दिग्दर्शन अशा अनेक कामांमध्ये व्यस्त असायचे. त्यामुळे अनेकदा ते गावाबाहेर असायचे. त्या सर्व घाईतही त्यांचं आपल्या कलाकृतीच्या होणाऱ्या अनुवादाकडे काटेकोरपणे लक्ष असायचं. बारीक-बारीक सूचना असायच्या; पण त्या सूचनाच. आपण आपला मुद्दा पटवून देऊ शकलो तर ते माघार घ्यायला तयार असायचे. या सगळ्या व्यापामुळे भरपूर पत्रव्यवहार झाला.

आमच्या अनुवादाची पद्धत ठाऊक असल्यामुळे एक-दोन अपवाद वगळता पत्रं आम्हा दोघांच्या नावानं असत. त्यातला मथळा 'उमावहिनी आणि विरुपाक्षजी' असा असे. त्यामुळे तेव्हा माझ्याकडे राहायला असलेली माझी एक छोटी मामेनणंद कुठल्याही सिनेमात कार्नाड दिसले की 'वैनी, तुमचे भाऊजी आले!...' म्हणत माझी थट्टा करायची!

कालांतरानं हा मथळा गेला आणि साक्षं नावानं संबोधन सुरू झालं. पत्रासाठी वापरलेला कागद उत्तम प्रतीचा असल्याचं पाहता क्षणी लक्षात येत होतं. त्यात पाल्हाळ किंवा त्रोटकता नसायची. विषय पूर्णपणे व्यवस्थित मांडलेला असे. अनुवादाविषयीच्या सूचनाही थोडक्यात, पण स्पष्टपणे मांडलेल्या असत; पण हट्टीपणा नाही. त्यांनीही अनुवाद केले असल्यामुळे अनुवाद प्रक्रियेची पुरेपूर जाण असल्यामुळे हे घडलं असावं.

त्यांच्या एका पत्रानं माझा उत्साह वाढायला मदत झाली होती. एका भेटीत त्यांना मी अनुवादित केलेला के.पी.पूर्णचंद्र तेजस्वींच्या कथांचा संग्रह आणि एक कादंबरी दिली होती. त्यानंतर त्यांनी पत्र लिहून कळवलं होतं, 'तुम्हाला पूचंते (नावाचं लघुरूप)ची स्टाइल पकडण्यात यश मिळालं आहे!...'

हळूहळू आमचा मराठी साहित्यिकांशीही परिचय होत गेला. त्यातल्या अनेकांशीही माझा काही ना काही कारणानं पत्रव्यवहार होत राहिला.

शिवराम कारंतांच्या कादंबरीचा 'डोंगराएवढा' हा अनुवाद तयार झाल्यावर मी मोठं धाडस करून पु.ल.देशपांडेंना प्रस्तावना लिहिण्यासाठी पत्र लिहिलं होतं. त्यांनी नकार देताना लिहिलं होतं, 'एवढ्या मोठ्या लेखकाच्या कादंबरीला प्रस्तावनेची काय गरज?...'

पुढे वेगवेगळ्या कारणांनी त्यांच्याशी संपर्क येत राहिला. घरीही



जाणं-येणं होत होतं. त्यामुळे पत्र लिहिण्याचा प्रसंग आला नाही. तेव्हा पोस्टातून फोन करायचा सिलसिला सुरू झाला; कारण आमच्याकडे फोन नव्हता. पुढे सुनीताताईंच्या ‘आहे मनोहर तरी...’चा विरुपाक्षांनी कन्नड अनुवाद करायचं ठरवलं. त्यानंतर सुनीताताईंशीही पत्रव्यवहार झाला. तो सगळा पुस्तकातल्या काही संदर्भांसाठीचा होता. एका पत्रात सुरंगीच्या फुलाच्या संदर्भात काय शब्द वापरता येईल, याची चर्चा झालेली आठवते.

९२ साली आमच्या ‘मराठी-कन्नड स्नेहवर्धन केंद्रा’नं कर्नाटकात बंगळुरूमध्ये मराठी ज्ञानपीठविजेत्या लेखकांचा परिचय करून द्यायचा घाट घातला. त्या संदर्भात कुसुमाग्रजांशी संपर्क साधायची जबाबदारी आमच्याकडे होती. कमल पाध्येंच्या मध्यस्थीनं आम्ही त्यांना भेटून आलो. त्यांना प्रकृतिअस्वास्थ्यामुळे बंगळुरूला येणं शक्य नव्हतं. आम्ही त्यांच्या भाषणाची टेप मागितली. तेही शक्य नसेल तर त्यांच्या आवाजात काही कविता ऐकवायचा मानस होता. तशी त्यांनी टेप पाठवली; पण प्रत्यक्षात त्यातही वेगळीच गाणी निघाली! हे कळवल्यावर त्यांनीही एक खेळीमेळीचं पत्र पाठवलं आणि आमची मनं जिंकली.

अनुवाद कार्याला सुरुवात केली आणि एक-दोन वर्षांतच मराठीचे गाढे विद्वान समीक्षक डॉ. द. दि. पुंडे आणि त्यांच्या पत्नी सौ.शकुंतला पुंडे (मी तिला शका म्हणते) यांच्याशी छान मैत्रीच झाली. त्यांनी सुरुवातीलाच गंभीर साहित्याविषयीचं भान दिलं. बरेच एकत्र प्रवास झाले, भेटी वरचेवर व्हायच्या; पण कधी कधी गॅपही पडायची. अशा वेळी पत्रव्यवहारही व्हायचा.

या दोघांचीही पत्रं अत्यंत देखणी. सुरेख अक्षर. सरांच्या पत्रांमध्ये प्रत्येक मुद्दा नोंदवून, विस्तारानं लिहिलेला असे. शकाची पत्रं म्हणजे जिवंतपणाची पर्वणीच! त्यातला टवटवीतपणा इतका की आजही ती पत्रं वाचताना ती समोर बसून काहीतरी विणत, हसतहसत गप्पा मारतेय असं वाटतं. शिवाय हिची पत्रं लांब-रुंद. इनलॅन्डचा कणभरही भाग रिकामा सापडणार नाही. सगळं लेखन इतकं सुवाच्य, की प्रत्येक शब्द नीट पोचलाच पाहिजे!







मारुती चितमपल्ली यांना माझ्या भावाकडून तेजस्वी यांच्या पश्चिम घाटाच्या पार्श्वभूमीवरच्या कथा-कादंबऱ्यांची माहिती झाली. त्यातही ‘कर्वालो’ आणि ‘गूढ माणसं’ वाचल्यावर त्यांनी आपण होऊन पत्र लिहून या साहित्याविषयी आस्था दाखवली. अनुवादाच्या कामात मदत केली आणि त्यांच्या कोशाच्या कामात आमचं सहकार्यही घेतलं.

इथं ज्या थोरल्या भावाचा उल्लेख झालाय, त्याचे आणि त्याच्या कुटुंबाचे आमच्या इतर कुटुंबाशी मतभेद झाले आणि पुढे काहीच संबंध राहिले नाहीत. तो भाऊही काही वर्षांपूर्वी वारला; पण नुकतंच त्याचं एक पत्र हाती लागलं. त्या पत्रात त्यानंही ‘कर्वालो’ आणि ‘गूढ माणसं’ या दोन कलाकृतींचं मनापासून रसग्रहण केलं होतं. ते पत्र वाचताच मधली अनेक वर्षं आणि भले-बुरे अनुभव, मनातली कटुता क्षणार्धात नाहीशी झाली. मन स्वच्छ झालं. ते पत्र हाती लागलं नसतं तर हे घडलं नसतं!

शान्ता शेळके, विजया राजाध्यक्ष, संजीवनी मराठे, कमल पाध्ये, कमल देसाई, माधवी देसाई, श्री.बा.जोशी, शंकर रामाणी यांचीही वेगवेगळ्या संदर्भातली पत्रं आली होती. माधवी देसाईंशी काहीशी मैत्रीच होती. त्या गोव्याला गेल्यावर पत्रं लिहिली जायची. भारती आमटे, प्रकाश-मंदा आमटे यांच्याशीही आनंदवन, हेमलकसा येथे जाऊन आल्यावर पत्रव्यवहार झाला होता. जाई निंबकर, श्रीरंग संगोराम यांनीही अनुवाद कार्याची दखल घेऊन पत्रं लिहिली होती.

आदरणीय रा. चिं. ढेरेंची पत्रं हा माझ्या दृष्टीनं एक महत्त्वाचा ठेवा आहे. ‘लज्जागौरी’ वाचून प्रभावित झालेल्या अनेक मराठी वाचकांपैकी मीही एक होते. ‘श्रीविठ्ठल- एक महासमन्वय’ हा ग्रंथ मी कुणाकडून तरी भेट म्हणून मागून घेतला होता. महाराष्ट्र गौरव पुरस्काराच्या वेळी



त्यांच्याशी ओझरती भेटही झाली होती. पुढच्या काळात डॉ. एम. एम. कलबुर्गी पुण्यात येऊ लागले आणि त्यांच्याशी आमचा स्नेह निर्माण झाला. गप्पांच्या ओघात ढेरेंच्या संशोधनकार्याचा विषय निघाला. तो मुद्दा कलबुर्गींनी उचलून धरला आणि पुढाकार घेऊन ढेरेंच्या सुमारे बारा-तेरा ग्रंथांचे कन्नड अनुवाद करवून घेऊन प्रकाशित होतील असं केलं. या सगळ्या प्रकारात आमची भूमिका फांदीवर बसणाऱ्या कावळ्याएवढीच होती! पण ऋजू स्वभावाच्या अण्णांना (नंतर आम्हीही त्यांना अण्णाच म्हणू लागलो) त्याचं महत्त्व वाटल्यामुळे ती भावना त्यांनी अनेकदा पत्रांतून व्यक्त केली!

मराठी साहित्याची आवड, मराठी साहित्याचं मनमुराद वाचन आणि काही कलाकृतींविषयी अपरिमित प्रेम असलं तरी मी स्वतःहोऊन पत्र लिहिलं ते फक्त एकाच लेखकाला- ते म्हणजे प्रकाश संत. त्यांची चारही पुस्तकं वाचून मी अक्षरशः पागल झाले होते. त्याला कारण म्हणजे यातलं प्रमुख पात्र 'लंपन' ज्या पार्श्वभूमीवर वावरतं, त्या गावाला लेखकानं नाव दिलं नसलं तरी मला त्यातल्या 'बेळगाव'ची पटकन ओळख पटली होती. त्यातली काँग्रेस विहीर ही माझ्याही बालपणाची सखी. इथलं प्रत्येक वर्णन मला माझ्या माहेरच्या घरी घेऊन जात होतं. जेव्हा मी 'संगीत शारदा' वाचलं तेव्हा न राहवून माझ्या पार्श्वभूमीसह बेळगाव, त्यातही ठळकवाडीशी असलेल्या विशेष नात्याविषयी लिहिलं असावं. त्याला त्यांचं उत्तर आलं आणि मी हुरळून गेले! त्यात त्यांनी माझे अंदाज बरोबर असल्याचं लिहून कळवलं होतं ना! त्यातही 'संगीत शारदा'च्या जागेविषयी!

अनिल अवचट हे आमच्या जवळच्या मित्र परिवारातले. गेली काही वर्षं आम्ही तिघं (खरं तर पाच जणं. डॉ. विलास बापट आणि डॉ. अलका बापट हेही आमच्या या परिवाराचे महत्त्वाचे सदस्य आहेत.) सगळ्यांचे वाढदिवस गमतीनं साजरे करतो. सुरुवातीपासूनच 'काही द्यायचं-घ्यायचं नाही...फक्त खाएंगे-पिएंगे...ऐश करेंगे..' एवढंच ठरलं आहे. तरीही अवचट त्या दिवशी छान छान फोटो काढतात आणि (त्यांच्या घरच्या







पद्धतीप्रमाणे) पत्र देतात. अर्थात पत्रापेक्षा चिठ्ठी. कारण ते पोस्टानं येत नाही. ही पत्रं ते इतक्या मनापासून लिहितात की खरोखरच वाढदिवस साजरा झाल्यासारखं वाटतं!

एका न लिहिलेल्या पत्राविषयी माझ्या मनात सतत चुटपुट राहिली आहे. तेव्हा धैर्य करून जी. ए. कुलकर्णींना पत्र लिहायला पाहिजे होतं...म्हणजे माझ्या पत्रांच्या संग्रहात त्यांचंही एखादं पत्र राहिलं असतं. (अर्थात त्यांनी उत्तर पाठवलं असतं, असं गृहीत धरून!)

तसंच एका हरवलेल्या पत्राविषयी मनात सतत खंत राहील.

८३-८४ सालची गोष्ट. सुधा मूर्ती मॉडेल कॉलनीत राहत होत्या तेव्हा त्यांच्याशी ओळख झाली होती आणि तिचं रूपांतर थोड्याफार मैत्रीत झालं होतं. मी तेव्हा आर्ट ॲन्ड पेन्टिंगमध्ये एम. ए. करत होते. बोलताना

कधीतरी हा विषय निघाला. तेव्हा समजलं, थोर चित्रकार के. के. हेब्बार हे श्री. नारायण मूर्तींचे नातेवाईक होते. या दोघांच्या लग्नाच्या वेळी त्यांनी पत्राच्या वर, श्रीकाराच्या जागी पेननं, एकमेकांत गुंतलेल्या स्त्री-पुरुषाचे चेहरे काढून शुभेच्छा लिहिल्या होत्या. ते पत्र सुधाताईंनी मला दिलं. हेब्बारांच्या हस्ताक्षरामुळे आणि रेखाटनामुळे मला द्यावंसं सुधाताईंना वाटलं असेल. ते पत्र मी कितीतरी वर्षं जपून ठेवलं होतं. आता तर त्या पत्राचं महत्त्व अनंत पटीनं वाढलंय! पण दोन-तीनदा घरं बदलायच्या प्रकारात ते पत्र माझ्याकडून गहाळ झालं!

आता अगदी खासगी पत्राच्या संदर्भातलं काहीतरी.

आमचं लग्न झालं तेव्हा मला कन्नड येत नव्हतं; पण विरूपाक्षांना मराठी येत होतं. पहिलं वर्षभर माझी बी.ए.ची परीक्षा, इतर सणवार, मंगळागौर, दिवाळीसण अशा विविध कारणांनी माझा बेळगावला मुक्काम असे. त्यामुळे लग्नाच्या आधी पत्र लिहायची संधी मिळाली नसली तरी त्या वर्षभरात तशी संधी मिळत गेली. हा सगळा पत्रव्यवहार मराठीतच होत होता. पुढे काही महिन्यांत मी घरात कन्नड बोलू लागले आणि तीच आमची संवादाची भाषा बनली. याचा परिणाम असा झाला की आज ती पत्रं वाचताना मला दुसऱ्याच कुणाचीतरी पत्रं वाचत असल्यासारखं वाटत राहतं!


स.न.वि.वि. मुंबई ९८ ३१ [illegible] ०८
तुम्ही पाठवलेली मित्रवर्य अनंत मूर्ती यांच्या [illegible] मिळाले. त्याबद्दल तुमचा मी मनापासून आभारी आहे.
हे तुम्ही कठीण काम केले आहे. अनंतमूर्तींना मराठीत वाचकवर्ग लाभला पाहिजे, त्यासाठी तुम्ही उत्तम काम केले आहे. तुमचे मनापासून अभिनंदन. कळावे. आपला [illegible]

या सगळ्या पत्रांमध्ये वाचकांची पत्रं हाही तेव्हा ‘आनंद ठेवा’च होता. पुस्तक प्रकाशित झालं की तिच्याशी असलेली नाळ तुटल्यासारखी भावना मनात असताना एखादं पत्र येई आणि पुन्हा त्या कलाकृतीची आठवण ताजी होऊन जाई. कलाकृतीविषयी भरभरून लिहिताना पत्रलेखक मनापासून अनुवादकाविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त करे आणि मनात धन्यतेची भावना भरून राही. मराठीतल्या अनेक उत्तम लेखकांनी अशी भावना व्यक्त केल्यावर पुढचा अनुवाद करायला आणखी उत्साह येत असे.

नुकतीच घडलेली एक घटना मला इथं सांगितलीच पाहिजे. ९२-९३च्या सुमारास एका कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलीची ओळख झाली. अतिशय बुद्धिमती. दहावी-बारावीला नंबरात येऊन आर्ट्सला जाणारी. एक परदेशी भाषा शिकून त्यातली गाढी विदुषी म्हणून ओळखली जाणारी. ती पहिल्यांदा परदेशी गेली तेव्हा तिनं उत्साहानं आम्हालाही पत्र लिहिलं होतं. नंतरच्या काळात तिच्या आयुष्यात बऱ्याच घटना घडल्या. तीही तिकडच्या जीवनात पुरेपूर बुडून गेली, इतकी की स्वतःचाही विसर पडावा! याच महिन्यात मी व्हॉट्सॲपवर तिला तिचं ते पत्र पाठवलं. ती हरखून गेली. तिनं लगेच लिहिलं, (अर्थात व्हॉट्सॲपवर) ‘किती छान आठवण आहे ही...हे लिहू शकणारी व्यक्ती मी आहे यावर विश्वासच बसत नाही. मी स्वतःचा तो भाग गमावूनच बसले आहे. थँक यू सो...मच!’

म्हणजे पत्रानं तिला तिच्या गमावलेल्या भागाची आठवण करून दिली! तीही वीस-पंचवीस वर्षांनंतर!



virupaxuma@gmail.com



# मान्यवरांची पत्रे



किशोर कुमारच्या स्वभावातला अवखळपणा त्याच्या पत्रातही प्रतिबिंबित होतो. त्यानं लतादीदींना एका गाण्याच्या रेकॉर्डिंगची वेळ बदलून मागण्यासाठी लिहिलेलं हे पत्र. खुमासदार लेखनशैलीसोबतच त्याच्या पत्रांमध्ये त्याची चित्रशैलीही डोकावते. त्याचं हे पत्र म्हणजे जणू त्याच्या जादुई आवाजातली सादच वाटते.

किशोरकुमार आणि लता मंगेशकर या दोघांनी एकत्रित गायलेल्या गीतांनी हिंदी चित्रपटसृष्टीत रोमँटिक गीतांचं एक नवीन युग निर्माण केलं... या दोघांचं नातं प्रत्यक्षात कसं होतं त्याची ही एक पत्ररूपी झलक...



KISHORE FILMS



# पत्रलेखन : एक अकृत्रिम संवाद

**प्रा. दादासाहेब मोरे**



संवाद साधण्याच्या माध्यमांमध्ये सध्या आमूलाग्र बदल झालेले आहेत. वस्तुतः बदल हा तसा निसर्गाचा स्थायीभाव आहे. काही बदल नैसर्गिक स्वरूपाचे तर बरेचसे बदल मानवनिर्मित आहेत. नैसर्गिक बदल संथ गतीने, तर मानवनिर्मित बदल शीघ्र गतीने होत असतात. या बदलांचा मानवी समाजजीवनावर बरा-वाईट परिणाम होत असतो. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या कालखंडात बदलाचे हे वारे अतिशय वेगाने वाहताना दिसत आहेत. बदलांची ही गती इतकी तीव्र झाली आहे की, काही थोड्या कालावधीपूर्वी प्रचलित असलेली माध्यमं, कार्यपद्धती, जीवनपद्धती सध्या कालबाह्य झाल्यासारखी वाटू लागली आहे. मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या या विविध माध्यमांचा, कार्यप्रणालींचा स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची, त्याचे विश्लेषण करण्याची आणि त्याचा अन्वयार्थ लावण्याची गरज निर्माण झालेली आहे.

अवघ्या काही वर्षांपूर्वी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम म्हणून पत्रलेखनाकडे पाहिले जात होते. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्रांतीने आणि संकेत स्थळांवरील मायाजालाच्या विळख्याने हे माध्यम सध्या कालबाह्य बनले आहे की काय अशी शंका यावी, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. आजच्या काळात पत्रलेखन हे संवादाचे माध्यम फक्त शालेय पातळीवर परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या पाच-दहा गुणांसाठी शिकविले जात आहे. आजच्या शालेय मुलांना पोस्टकार्ड, अंतर्देशीय पत्र, पाकीट यांसंबंधीची ऐतिहासिक माहिती शिक्षकांना सांगावी लागत आहे, तार (टेलिग्राम) हे माध्यम तर संपुष्टातच आलेले आहे. तार आली म्हटले की बहुधा काही अनुचित, विपरीत घडल्याचे संकेतच मिळत होते. पत्रांमधून व्यक्त होणाऱ्या मानवी भावना, त्याचा वाचणाऱ्यांच्या मनावर होणारा परिणाम, पत्रलेखनावरून व्यक्त होणारा वडीलधाऱ्या माणसांविषयीचा आदर, त्यातून मुलांवर, तरुणांवर होणारे संस्कार यासंबंधीची माहिती शिक्षक देताना दिसत नाहीत. परीक्षेत गुण कसे मिळविता येतील या दृष्टीने पत्रलेखनाचे तंत्र सांगितले जात आहे.

पत्रलेखन हे केवळ एक संवादाचे माध्यम नाही, तर मानवी भावभावना व्यक्त करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. आपल्या जवळच्या माणसांना, मित्र-मैत्रिणींना, नातलगांना पत्रे लिहिली जात होती. त्या पत्रांतून लिहिणारा आपले मन मोकळे करीत होता. वाचणारादेखील तितक्याच भावनाशील वृत्तीने ते पत्र वाचत होता. परस्परांच्या सुख-दुःखांची देवाणघेवाण होत होती. अडीअडचणी उघडपणे लिहिल्या जात होत्या. लिहिणाऱ्यांच्या मनावरचे ओझे थोडेफार हलके झाल्यासारखे वाटायचे. आपल्या अडीअडचणी समजून घेणारे कोणीतरी आहे, असा दिलासा देणारी जाणीव निर्माण होण्यात या पत्रलेखनाचा महत्त्वाचा वाटा होता. व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवरील आनंद व्यक्त करण्यासाठी आणि त्या आनंदामध्ये इतरांना सहभागी करून घेण्यासाठीदेखील पत्रलेखनाचा उपयोग होत होता. मानवी मन व्यक्त करण्यासाठी पत्रलेखन एक उपयुक्त माध्यम गणले जात होते.

याशिवाय एखाद्याच्या कार्याचे, यशाचे कौतुक करणारी पत्रे येत होती. अशा पत्रांमधून संबंधितांनी प्रतिकूल परिस्थिती असतानाही केलेल्या कार्याचा आढावा घेतला जात असे. त्यातून असे कार्य करणाऱ्या किंवा यश मिळविणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहन मिळत होते. नवे काही करण्यासाठी ऊर्जा निर्माण होत होती. अशा प्रोत्साहनपर पत्रांनी, संदेशांनी अनेक यशस्वी लेखकांना, उद्योजकांना, खेळाडूंना, कलावंतांना बळ मिळवून दिले असल्याची अनेक उदाहरणे आहेत. काही नामवंत लेखक, कलावंत, खेळाडू, उद्योजक यांनी अशा प्रोत्साहनपर पत्रांचे संग्रहही प्रकाशित केलेले आहेत. अशी पत्रे संग्रही ठेवलेली आहेत.

मुलांवर संस्कार करणाऱ्या, त्यांच्या संस्कारक्षम मनावर ठसा उमटविणाऱ्या पत्रलेखनाची मोठी परंपरा मराठी साहित्यात आहे. साने गुरुजी, विनोबा भावे यांसारख्या महान लेखकांची नावं याबाबत सांगता येतील. याशिवाय अब्राहम लिंकन यांचे 'प्रिय बाईंस' हे पत्र जागतिक स्तरावर चर्चेचा विषय बनले. यावरून पत्रलेखनाचे महत्त्व अधोरेखित होते. पत्रलेखन संस्कार करण्याचे, नैतिक शिक्षण देण्याचे आणि समाजमन घडविण्याचे उपयुक्त साधन म्हणूनही गौरविण्यात आले आहे.

आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या काळात संवाद माध्यमांची संकल्पना पूर्णपणे बदललेली आहे. भ्रमणध्वनीवरून संदेश पाठविणे, फेसबुक, व्हॉट्स-ॲप, इन्स्टाग्राम, ट्विटर, लिंकडिंक्ड, ऑनलाईन चॅटिंग, व्हीएलसी, यू ट्यूब यांसारखी आधुनिक तंत्रज्ञानाची माध्यमं मोठ्या प्रमाणावर उपयोगात आणली जात आहेत. संदेश देण्याची आणि घेण्याची गतिमान साधने म्हणून या माध्यमांकडे पाहिले जात आहे. संवाद साधण्याच्या प्रक्रियेमध्ये या साधनांचा मुबलक वापर सध्या सुरू आहे. शालेय स्तरांवरील विद्यार्थ्यांपासून सुशिक्षित प्रौढांपर्यंत असे सर्व जण या माध्यमांचा दैनंदिन जीवनात भरपूर वापर करताना दिसून येत आहेत. आजच्या तरुण पिढीच्या दैनंदिन जीवनाची ही माध्यमे अविभाज्य अंग बनली आहेत. असे असले तरी या माध्यमांतून खऱ्या अर्थाने मानवी भावभावना व्यक्त करणारा संवाद साधला जातो का, हा संशोधनाचा विषय बनला आहे. या मायाजालाच्या साहाय्याने सुरू असलेल्या माध्यमातून अल्पाक्षरी प्रतिसाद दिला जात आहे. उदाहरणार्थ, शुभेच्छा! 'छान', 'ठीक', 'वाईट', 'चांगले' या व यांसारख्या अल्पाक्षरी शब्दांचा उपयोग होऊ लागला आहे. त्यातून संवाद साधण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. संवादाला लघुस्वरूप येऊ लागले आहे. पत्रलेखनातून ज्याप्रमाणे मुक्तपणे भावभावना, आशा-आकांक्षा, राग-द्वेष व्यक्त होत असे, तसे या माध्यमांद्वारा व्यक्त होताना दिसत नाही. त्यामुळे आजची

तरुण पिढी स्वयंकोषात गुरफटते की काय, अशी शंका येऊ लागली आहे. ही स्थिती सामाजिक चिंतेचा आणि चिंतनाचा विषय बनली आहे. निकोप समाजासाठी ते हितावह होणार नाही. आजची तरुण पिढी यांसारख्या माध्यमांच्या 'विळख्यात' अडकत चालली आहे. त्यातून समूह भावना, सामाजिक संवेदना कमी कमी होत चालल्याचे दिसून येत आहे. सामाजिक बांधिलकीचे भान लोप पावत आहे. समूहात असूनही आजचा तरुण एकाकी बनत आहे. अशा माध्यमांच्या आहारी जाताना दिसत आहे. आज शासकीय किंवा कार्यालयीन पत्रव्यवहार ई-मेलद्वारा होतो आहे. क्वचित शासकीय पत्र टपालद्वारा येतात. खासगी आणि व्यक्तिगत पातळीवरील पत्रव्यवहार जवळ जवळ बंद झाला आहे.

माझ्या व्यक्तिगत जीवनात पत्रांना अतिशय महत्त्व आहे. माझ्या साहित्यिक म्हणून जडणघडणीत मला प्रोत्साहन देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या मान्यवरांच्या पत्रांचा मोलाचा वाटा आहे. विविध स्तरांवरील वाचकांच्या पत्रांनीच मला लेखनाची प्रेरणा व बळ दिले. माझ्या लेखनाचे जसे वाचकांनी पत्राद्वारा कौतुक केले, तसे माझ्या लेखक म्हणून असलेल्या उणिवांची, कमतरतेची जाणीवही करून दिली, त्याचा मला लेखनासाठी निश्चितच उपयोग झाला. जिव्हाळ्यानं, आत्मीयतेनं लिहिलेल्या वाचकांच्या पत्रांचा अनमोल ठेवा मी जपून ठेवलेला आहे. 'गबाळ' या आत्मकथनासंबंधी महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील वाचकांनी पत्रं लिहिली. माझ्या आणि भटक्या-विमुक्त जमातींच्या दुःखाविषयी, दैन्याविषयी, अगतिकतेविषयी या पत्रांतून सहानुभूती व्यक्त केली. त्यामुळे मला जगण्याची उमेद मिळाली. आपल्या लेखनाची समाज दखल घेतो आहे, आपण भटक्या-विमुक्तांचे प्रश्न, त्यांची हलाखीची परिस्थिती समाजापर्यंत पोहोचवू शकतो, याबाबतचा आत्मविश्वास माझ्यामध्ये निर्माण झाला. त्यातूनच नवीन लेखनाला सुरुवात करीत गेलो. माझ्या व्यक्तिगत बाबतीत पत्रलेखन केवळ संवादाचे माध्यम राहिले नाही, तर माझ्या कार्यकर्तृत्वाला आकार देणारे महत्त्वाचे साधन बनले. ज्येष्ठ समीक्षक गुरुवर्य म. द. हातकणंगलेकर सर यांचे, 'गबाळ' हे आत्मकथन श्री विद्या प्रकाशन, पुणे या प्रकाशनामार्फत प्रकाशित करण्यात येणार आहे, या आशयाचे पत्र ज्या वेळी मला मिळाले, त्या वेळी मला झालेला आनंद शब्दांत व्यक्त करण्यापलीकडचा होता. त्यापूर्वी माझे नाव फक्त विद्यालयाच्या गुणपत्रिकेवर टाईप झालेले होते. आपण लेखक होणार, आपल्या नावाने पुस्तक येणार या कल्पनेनेच मी भारावून गेलो होतो. ती अनुभूती नंतरच्या माझ्या साहित्यिक जीवनात परत आलेली नाही. अनुभूतीचा तो ठेवा मला त्या पत्रामुळेच मिळाला. तो अद्यापही माझ्या मनावर बिंबलेला आहे.

कौटुंबिक पातळीवर पत्रलेखनाचा फार मोठा परिणाम होत होता. कुटुंबातील एखाद्याचे पत्र येणार असेल तर संपूर्ण कुटुंब त्या पत्राची प्रतीक्षा करीत असे. या प्रतीक्षेमध्ये परस्परांविषयी ओढ, आत्मीयता, संबंधितांविषयी जाणून घेण्याची उत्सुकता या साऱ्या भावभावनांची सरमिसळ असायची. नातलगाच्या आलेल्या पत्राचे संपूर्ण कुटुंबासमोर जाहीर वाचन होत होते. पत्रलेखकाच्या आनंदात आणि दुःखात कुटुंबातील सर्व जण सहभागी असल्याची भावना व्यक्त केली जात होती. त्याच्या हलाखीविषयी सहानुभूती दर्शविली जात होती. त्यातून नात्यातील बंध अधिक दृढहोत होते. कुटुंब संस्थेचा पाया अधिक बळकट होण्यास अशा पत्रांचा उपयोग होत असे. आजच्या या तंत्रविज्ञानाधिष्ठित माध्यमांमुळे याच्या विरुद्ध घडताना दिसून येऊ लागले आहे. कुटुंब संस्थेला तडे जाऊ लागले आहेत. 'माणूस' स्वकेंद्रित होऊ लागल्यामुळे समूहमनाची संकल्पनाच धोक्यात येऊ लागली आहे.

जागतिकीकरणाच्या रेट्यात तंत्रज्ञानाचा विकास व वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. वास्तविक, कार्यप्रणालीस आणि संवादास अधिक गती देण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उदय झाला. मानवाने तंत्रज्ञानाच्या निर्मितीमध्ये, प्रगतीमध्ये भरपूर वाढकेली. त्यामुळे सध्याची तरुण पिढी आणि मुले तंत्रस्नेही बनली. तंत्रस्नेही बनता बनता ही पिढी तंत्रमाध्यमांच्या आहारी जाऊ लागली आहे. याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. मानवी गरज सहजपणे पूर्ण करण्यासाठी



या तंत्रज्ञानाधिष्ठित माध्यमांचा उपयोग व वापर होण्याऐवजी ही माध्यमेच आजच्या पिढीवर स्वार होऊ लागली आहेत. पत्रलेखन करणारी व्यक्ती आपल्या परिचयाच्या, जिव्हाळ्याच्या लोकांना पत्रे लिहीत होती. त्यांना ती जवळून ओळखत होती. त्यामध्ये ओढ, आत्मीयता होती. या तंत्रज्ञानाधिष्ठित माध्यमांतून मात्र अनोळखी आभासी व्यक्तींशी तो गप्पा मारताना दिसतो आहे. त्यामुळे एक प्रकारचा कोरडेपणा, अलिप्तपणा या तरुणांमध्ये वाढू लागला आहे. संवेदना बोथट होऊ लागल्या आहेत. या तंत्रमाध्यमांच्या अतिरेकी वापराने आजचा तरुण सुटा, एकलकोंडा होण्याचा धोका निर्माण झाला आहे. मानवाच्या विकासासाठी, उन्नतीसाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे. सध्या मात्र या माध्यमांमुळे निर्माण झालेल्या वातावरणात तसे दिसून येत नाही.

माझ्या व्यक्तिगत अनुभवाच्या पार्श्वभूमीवर पत्रलेखन या संवाद माध्यमाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. काळाच्या ओघात ते मागे पडत असले तरी या माध्यमांद्वाराच संवाद अधिक परिणामकारकपणे, अधिक जिव्हाळ्याने साधणे शक्य होणार आहे. त्यामुळेच माणसामाणसांमधील नाते अधिक दृढ होणार आहे. परस्परांमधील संबंध निकोप व आत्मीयतेचे राहणार आहेत. सामाजिक जाणीव विकसित होण्यासाठी या माध्यमाचा सकारात्मक उपयोग होणार आहे. मानवी मनाला, माणसांच्या संवेदना विकसित करण्यासाठी या पत्रलेखन माध्यमाचे योगदान मोलाचे ठरणार आहे. त्यामुळे हे माध्यम भविष्यकाळातही टिकून राहील. तसे ते टिकून राहण्यासाठी, त्याच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.



more_dm@ycmou.digitaluniversity.ac

नवं कोरं







प्रियजनांना
भेट द्या विचारधन
अनोखी **गिफ्ट बुक्स**
मराठीत प्रथमच...







**आयुष्याची अलवार वाट**
पृष्ठसंख्या : ९६ । किंमत : ₹६०

**चिरंतन यशाचा मार्ग**
पृष्ठसंख्या : ९६ । किंमत : ₹६०

**रुजू द्या विश्वास**
पृष्ठसंख्या : ९६ । किंमत : ₹६०

**उमेदीची रुजवात**
पृष्ठसंख्या : ९६ । किंमत : ₹६०


टाक्यातून झिरपे ऊब...
जशी हुबेहूब आईची माया...
मूर्तिमंत सुखाचा सूर...
आळवते 'लडिवाळ सुधा'...
सुधा मूर्ती
तीन हजार टाके
सर्पाचा सूड
गरुडजन्माची कथा
बकुळा
गोष्टी माणसांच्या
वाइज अँड अदरवाइज
हरवलेल्या मंदिराचे रहस्य
महाश्वेता
डॉलर बहू
सामान्यांतले असामान्य
परीघ
अस्तित्व
पुण्यभूमी भारत
आजीच्या पोतडीतल्या गोष्टी
सुकेशिनी
थैलीभर गोष्टी
स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...
पितृऋण
आयुष्याचे धडे गिरवताना

# मान्यवरांची पत्रे



स्मिता पाटील, भारतीय सिनेसृष्टीला पडलेलं एक गोड स्वप्न. तिच्या अकाली जाण्यानं तिच्या व्यक्तिमत्त्वाभोवतीच एक गूढ वलय निर्माण झालंय. ही धीरगंभीर आणि गुणी अभिनेत्री तितकीच अवखळ आणि मनमिळाऊ होती. तिच्या रूपाइतकंच तिचं अक्षरही देखणं होतं. आपल्या प्रिय स्मितानं तिच्या प्रिय प्रिय झेलमला लिहिलेलं हे पत्र...



प्रिय प्रिय झेलम, 17th sep. 77.

खूप दिवसांपासून तुला पत्र लिहायचं होतं पण नेहमीसारखी टाळाटाळ केली. पण आज मात्र मनापासून लिहावसंच वाटतंय. तू कशी आहेस? अभ्यास करतेस का? परिक्षा केव्हा आहे all these three questions you can read in a most flat & monotonous tone. This was just a formality. मग इकडे आल्यापासून १० दिवस मी जाम आजारी. नंतर जरा आता बरी झाले तर आपल्या जन्मांतरीच्या सोबतीणी तोंडावर [illegible]. I think it may be due to the cheese the only thing I truly enjoy eating. So I'm starving etc.

मग very strange पण मी आजारी पडल्या-पासून आणि even operation-च्या वेळेस I've been constantly dreaming about दौरा. [illegible] रोज. [illegible] आनंद स्वप्नात आले परवा. इतकी धमाल वाटते. आणि आई आणि मी एकत्र [illegible] फिरत असलो की हमखास दौरा आणि [illegible]. मी [illegible] (सकाळी चहा-पोळी-ची आवडता खुराक चालत होता.) [illegible] दोघातली आपली धमाल सांगत होते. [illegible] होती. मग ३ [illegible] आणि [illegible] फक्त [illegible] तोंडी [illegible]. काम धमाल यायची ना? आई कशी आहे? ताई [illegible] आहे. [illegible] आठवण काढत असतो. The thing is we happen to be in love with you so it's a lil embarrassing isn't it?

[illegible] म्हणून [illegible] नाही. ती म्हणते की मी आनंद-

# प्रिय दादांस...

मधुमती शिंदे



प्रिय दादा,

तुम्ही जाऊन बरीच वर्षं लोटली; पण आजही क्षणोक्षणी व पावलोपावली तुमची आठवण येतेच, म्हणून आज मनातलं सर्व काही कागदावर उतरवावंसं वाटलं. वाड्यात गेले की तुमचं अस्तित्व जाणवतं. आपल्या वाड्यात रंगणाऱ्या गप्पा-गाण्यांच्या मैफली, आप्तस्वकीय, मित्रपरिवाराची गजबज... सगळं शांत झालंय आता. जसं मंदिरातून देवाची मूर्ती कुणी गायब करतं व ते मंदिर, मंदिर राहतच नाही. जिथे देव नाही तिथे आता कुणी भक्तगण येत नाहीत.


P. K. ATRE

DAILY MARATHA

तुमच्या दूरदृष्टीमुळे वाड्यातल्या व गावातल्या मुलांना शिक्षणाचं महत्त्व तुम्ही पटवून दिलं व उच्च शिक्षणासाठी मदत पण केली. तसंच तुम्ही आम्हाला शिक्षणासाठी बडोद्याला ठेवलं. आम्ही शिकून सामर्थ्यवान व्हावं, ही तुमची इच्छा होती. तेवढ्यासाठी तुम्ही आमचा दुरावाही सहन केलात.


MINISTER OF STATE
INFORMATION & BROADCASTING
INDIA

New Delhi-110001.
April 27, 1985.

Dear Shri

I am sending herewith a representation by the telephone users of Kolhapur Dr. Kowad, Tal. Chandgad, regarding faulty working of the telephone system at Kowad.

I request you to instruct the officers concerned to look into the same.

Yours sincerely,

Sd/-
(V.N. Gadgil)

Shri Ram Nivas Mirdha,
Minister of State for Communications,
New Delhi.

Copy to:

(Dinkar V. Lule)
Addl. PS to Minister

गुजरातमध्ये इंग्लिश मीडियममध्ये शिक्षण झाल्यामुळे मराठी जरा कच्चंच राहिलं. तुमचं साहित्याच्या क्षेत्रातलं मोठेपण अजाणतेपणी कळलंच नाही; कारण तुम्ही गर्वानं कधी मोठेपणा मिरवला नाही. शिवरायांच्या निःस्पृह, सदाचारी, पराक्रमी, स्वाभिमानी व्यक्तित्वाचं दर्शन घडविणारी 'श्रीमान योगी' आणि कर्तव्यकठोर माधवराव पेशवे यांच्यावरील 'स्वामी' या दोन्ही ऐतिहासिक कादंबऱ्यांनी तुम्हाला महाराष्ट्रातील घराघरात पाहोचवलं; कारण या ऐतिहासिक व्यक्तिरेखांच्या उदात्ततेला असलेली व्यथा-वेदनांची झालर तुमच्या संवेदनशील लेखणीतून आविष्कृत झाली.

तुम्ही गावासाठी व शेतकऱ्यांसाठी एक देवदूत होतात. तुमच्या एका शब्दाखातर सरकारनं गावात फिल्टर पाण्याची सोय, टेलिफोन व रस्ते केले. राजकारणाशी तुमचा कोणताही संबंध नसतानाही या सर्व सोयी गावात आल्या. त्यानंतर गावाला निःस्वार्थीपणे काम करणारा वाली

मिळाला नाही. तुम्ही अनेक गरीब, होतकरू मुलांना एका चिठ्ठीनं नोकऱ्या मिळवून दिल्या. तुम्ही उंच शिखरावर असूनही तुमचे डोळे जमिनीकडे होते. सर्वांच्या हिताचाच विचार तुम्ही सदैव केला. तुम्हाला अहंकाराचा वारा कधीच लागला नाही.

दादा, आपण कादंबरी-कथा-नाटक-ललित अशा विविध साहित्य प्रकारांत प्रशंसनीय कार्य करून गेलात आणि निर्मितीची आश्चर्यकारक उंची गाठली. घरात वाङ्मयीन वातावरण नसलेला एक मुलगा मराठी साहित्यात इतकं असामान्य कार्य करू शकतो. केवढी आश्चर्यकारक घटना आहे! तुमच्या लोकप्रियतेमुळे छोट्याशा कोवाड गावाला लोक ओळखू लागले. या गावाला सर्व क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींच्या भेटी तुमच्या लाघवी स्वभावामुळे घडू लागल्या.

कोवाडच्या वास्तूला हसवणारं, खानदानीपणानं जगणारं, कोणत्याही माणसाच्या सुख-दुःखाशी समरस होणारं आणि त्याच्या काळजाचा ठाव घेणारं, गोष्टीवेल्हाळ व्यक्तिमत्त्व होतं तुमचं. तुमच्या नजरेतील जरब, प्रेम, राग, लोभ या सगळ्याला आम्ही पारखे झालो आहोत. आता तुमचं लिखाण कितीही वेळा वाचलं तरी मन भरत नाही. त्यातले शब्द आमच्यासाठीच आहेत, असं कधी कधी वाटतं.

तुम्ही आज शरीरानं आमच्यात नसलात, तरीही वाङ्मयात गेलं की तुमचा भास होतो. तुमचं असलेपण अजूनही जाणवतं. आजही तुमची कृपादृष्टी, अडचणीच्या वेळी मला अचूक मार्ग दाखवते.


Raja Dinkar Kelkar Museum
Government of Maharashtra
Kamalkunj Raja Kelkar Museum Street
1378 Shukrawar, Natu Bag, Pune 411002
Phone 444488
Dr. D. G. Kelkar D.Litt.
Founder-Director
Secretary
Board of Management and Advisory Council

दिनांक - ५/६/१९८५.

प्रति,

[illegible]

स. न. वि. वि.

[illegible]

कळावे लोभ असावा,

आपला

(डॉ. दि. गं. केळकर)
मा. संचालक,
राजा केळकर संग्रहालय, पुणे.

प्रति
श्री. रणजित देसाई.
मु. पो. कोवाड, ता. चंदगड,
जि. कोल्हापूर.



दादा, तुम्ही मला नेहमीच सांगत होता, ''मनू, प्रपंच कधी कुणाचा थांबत नाही. आपली कामं चोख करा. कर्म व समर्पणानंच सुख मिळतं.'' तुमच्या शब्दाबाहेर गेले नाही म्हणूनच मी आयुष्यात सुखी व समाधानी आहे. तुम्ही म्हणायचात ''मनू, मी गेल्यावरच तुम्हाला माझी किंमत कळेल. माझं लिखाणच माझं अस्तित्व, वाचकांच्याद्वारा चिरंतन राहील.'' खरंच, तुमचे चाहते आजही तुमच्या पुस्तकांची पारायणं करतात. त्यातल्या प्रत्येक शब्दाच्या सामर्थ्याचा हुंकार जाणवतो. 'स्वामी' मधले माधवरावांचे उद्गार हे तुमच्या मनीचे बोल आहेत, याची मला खात्री वाटते. ''रमा, मृत्यूचं भय एवढं वाटतं? मृत्यू हा अटळ आहे. त्याचं भय बाळगणाऱ्याला समृद्ध जीवन जगता येत नाही. जीवन किती जगला यापेक्षा कसं जगला याला महत्त्व आहे.'' एक साहित्यिक म्हणून आणि एक माणूस म्हणून तुम्ही समृद्ध जीवन जगलात. तुमच्या साहित्याच्या रूपानं तुम्ही अजरामर आहात.

आता संध्याकाळच्या सावल्या पायात घोटाळू लागल्या आहेत. तुमच्याबरोबर घालवलेले आनंदाचे क्षण डोळ्यांपुढे अजूनही उभे राहतात. कंठ दाटून येतो व डोळे भरून येतात. परमेश्वराजवळ एकच प्रार्थना करते, 'मला तो धुंद, हसरा, प्रेमळ लोभस पक्षी परत वडिलांच्या रूपानं पाहायला मिळेल का? त्याचा सहवास परत देशील का?'

दादा, अजूनही खूप काही लिहायचं आहे; पण आता थांबते.

तुमचीच
मधू



madumatishinde21@gmail.com

Sahitya Akademi
National Academy of Letters
Rabindra Bhavan New Delhi
telegram Sahityakar 'phone 43381

*President* S. Radhakrishnan *Vice-President* Zakir Husain

SA.1/ 15667 1 February 1965

Dear Friend,

Thank you very much for the particulars of your career and a copy of your photograph. We are happy to learn that you will be able to come to Delhi to receive the Award in person and look forward to the pleasure of welcoming you on the occasion.

You will be interested to know that on the same day, the 15th of February 1965, we are organising an informal Writers Meet in Rabindra Bhavan, New Delhi at 10 a.m. to honour the memory of three distinguished writers, all pioneers in their field, who have recently passed away, namely, Sri Maithilisharan Gupta, the distinguished Hindi poet, Mama (B.V.) Warerkar, the veteran Marathi dramatist, and T. S. Eliot, who initiated and led the modern movement in Anglo-American poetry which has had a vital impact on modern poetry in many other languages, including Indian. We shall be happy if you kindly make it convenient to attend the Writers Meet also.

The Award presentation ceremony will now be held at 6 p.m. at Rashtrapati Bhavan and not at Rabindra Bhavan, as intimated earlier. You are requested to kindly make a note of it and reach Rashtrapati Bhavan at 5.15 p.m. and give the pleasure of your company to the members of the General Council over a cup of tea. Since admission at Rashtrapati Bhavan will be limited to the invitees only, kindly let us know the names and addresses of person or persons who are likely to accompany you or whom you will like to be invited for the Awards Presentation Ceremony, so that we may issue them invitation cards. This information is required by us urgently.

With kind regards,

Yours sincerely,
(K.R. Kripalani)
Secretary

Sri Ranjit Desai,
C/o Deshmukh & Co.,
739, Budhwar, Poona.

मंत्री (उद्योग) पत्र क्र. .........

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
उद्योग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १०. ३. ९२.

विख्यात साहित्यीक "स्वामी"कार रणजितजी यांचे निधन झाल्याचे वृत्त ऐकून मला तीव्र धक्का बसला. त्यांच्या निधनाने एक व्यासंगी, सिध्दहस्त साहित्यीक हरपला आहे. एक सहृदय, मनमिळावू आणि संवेदनाशील व्यक्तीमत्व असे एकाकी निघून गेल्यामुळे आपल्यावर कोसळलेल्या या दुर्धर आपत्तीची मी कल्पना सुध्दा करु शकत नाही. आपल्या व आपल्या कुटुंबियांचे दुःखात मी सहभागी आहे.

परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती व शांती देवो हीच प्रार्थना.

[विलासराव देशमुख.]

Find us on: facebook
https://www.facebook.com/mehta.publishinghouse

# शान्ताबाई आणि रणजित देसाई यांच्यातील स्नेहबंध

शान्ता शेळके आणि रणजित देसाई...मराठी सारस्वतातील दोन अग्रगण्य नावं... शान्ताबाईंनी रणजित देसाईंना लिहिलेली ही पत्रे... देसाईंविषयीचा त्यांचा स्नेहभाव दर्शविणारी... काहीशी मिश्कील छटा असणारी आणि लेखक म्हणून देसाईंचं शान्ताबाईंच्या मनातील स्थान अधोरेखित करणारी...













नवं कोरं







माणसाच्या मनातील झाकोळलेल्या
सकारात्मकतेला साद घातली तर
त्याची कार्यक्षमता वाढते आणि
तो समरसतेने जीवन जगायला लागतो,
असा संदेश देणारी चार पुस्तकांची मालिका

# फिश!

मूळ लेखक -
स्टीफन सी.लन्डिन,
जॉन क्रिस्टेन्सेन, हॅरी पॉल
अनुवाद -
डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

**फिश!**
पृष्ठसंख्या : १०४ । किंमत : ₹१४०

**फिश! स्टिक्स**
पृष्ठसंख्या : ११६ । किंमत : ₹१४०

**फिश! फॉर लाइफ**
पृष्ठसंख्या : १४० । किंमत : ₹१९०

**फिश! टेल्स**
पृष्ठसंख्या : १७६ । किंमत : ₹२००







वयात येतानाचे नाजूक प्रश्न
हळुवारपणे सोडवणारे,
किशोरींशी हितगुज करणारे पुस्तक.




# थिंक युवरसेल्फ गॉर्जियस

मूळ लेखक - अनिता नायक । अनुवाद - मंजूषा मुळे

पृष्ठसंख्या : १९६ । किंमत : ₹२४०

मित्र, ग्राहक, सहकारी व जोडीदार
यांची मने कशी जिंकावीत आणि
संबंध कसे चांगले ठेवावेत
याविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन.




# द माईंड जिम
## रिलेशनशिप्स

अनुवाद - श्याम भुर्के

पृष्ठसंख्या : २६४ । किंमत : ₹३००

# मान्यवरांची पत्रे



Sealed by
Frida Kahlo
Depositor

In Presence of

Witness

Received in Main Office by

TEAR OFF HERE

Diego, mi amor,
No se te olvide que en cuanto acabes el fresco nos juntaremos ya para siempre, sin pleitos ni nada — solamente para querernos mucho.
No te portes mal y haz todo lo que Emmy Lou te diga.
Te adoro mas que nunca. tu niña
Frida
(Escribeme)

Instructions for using this envelope on other side. Please follow strictly when receiving valuables for patients.



फ्रिडा कोहलो म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वाधातली मेक्सिकोची क्रांतिकारी चित्रकार. जिनं आपल्या सेल्फ पोर्ट्रेटमधून स्त्रीमुक्तीची नवी परिभाषा दिली. मेक्सिकन संस्कृती आणि लोककलेचं प्रतीक मानल्या जाणाऱ्या फ्रिडाची वेगळीच छटा तिच्या पत्रात उमटते. आपल्या नवऱ्याला लिहिलेलं तिचं हे छोटेखानी पत्र. ज्यात ती त्याला दटावतेही आणि प्रेमाचं प्रतीकही पाठवते.

# निरोप्या...

**स्वाती चांदोरकर**



म्हणूनच मी आता असंच काठावर उभं राहायला हवं.
तुझ्यावर आमचा अधिकार संपला, हे ध्यानात ठेवायला हवं.
‘आई वडिलांनी मुलांच्या मार्गात आडवं पडायचं ते सावलीच्या मार्गानं.’
असं मी लिहलं होतं.
तसा प्रयत्नही होता.
पण उन्हाची व्याप्ती केवढी....
आणि मी केवढास्सा?
तुला उन्हाचे चटके बसले असतील.
आणि पावसाचा माराही सहन करावा लागला असेल.
तरीही एकच इच्छा.
झाड छोटं होतं म्हणालीस, तर खेद नाही.
पण क्षुद्र होतं. एवढंच म्हणू नकोस.

‘जन्मदाता बाप’
असे भारदस्त शब्द वापरायचे.
कारण ते स्वतःच्या संदर्भातले म्हणून.
..खरं म्हणशील, तर मी साधासुधा गार्डच.
प्रवाशांचा प्रवास सुखमय करण्यासाठी तळमळणारा. धडपडणारा.
बस इतकंच.
म्हणून मला जंक्शन येताच थांबावं लागतं.
परकं आणि पोरकं होऊन.
‘मी तुला मुक्कामापर्यंत नेतो’ असं म्हणून कसं चालेल?

शाळेत असताना निबंध लिहायला लागायचा. त्यात हमखास पेनाचं अथवा कागदाचं अथवा कुठल्या प्राण्याचं आत्मचरित्र लिहा म्हणून असायचं. आणि मग चक्र सुरू व्हायचं विचारांचं. पेन काय विचार करू शकेल, कागद अथवा कुठला प्राणी काय विचार करू शकेल, ज्यांना बोलता येत नाही अशा गोष्टी काय कथन करणार? मग आपण व्हायचं ती गोष्ट. आणि आपल्या मनातले विचार त्यांच्या मुक्या मुखी घालायचे. त्या क्षणी मी तत्सम वस्तू व्हायचे आणि त्या वस्तूचं दुःख अनुभवायचे.

आज मी टपाल होणार आहे. पत्रं. हाती लिहिलेली पत्रं. आणि हातांनी पोहोचवली जाणारी पत्रं. पुढच्या पिढीला पोस्टमन नावाचा माणूस कदाचित ओळखता येणार नाही. स्वहस्ते लिहिलेल्या आणि पोहचवलेल्या पत्रांची गंमत त्यांना घेता येणार नाही. वाट बघणं म्हणजे काय हे त्यांना समजणार नाही. त्यातली हुरहूर, अस्वस्थता, ओढ त्यांच्या नशिबी नाही.

आता वेगळ्या प्रकारचे पोस्टमन आहेत. ऑनलाईन मागवलेल्या वस्तू कधी येणार, याची ओढ आहे; पण फक्त वस्तूच पोहोचतात, त्याही स्वतःने मागवलेल्या. त्यात काही चार्म नाही. काय मिळणार आहे, हे आधीच माहीत आहे.

पत्रांचं तसं नाही. आपल्या नावानं कुणा दुसऱ्यानं पाठवलेला लिफाफा, लिफाफा.. हिंदी आणि मराठीत वापरला जाणारा शब्द. तर त्या लिफाफ्यावर आपलं नाव आणि पत्ता, तो लिफाफा उघडेपर्यंत आत काय मजकूर असेल याची उत्सुकता... आता हा तसा मोठा आनंद; पण कुणासाठी छोटा आनंद अथवा कुठलीच भावना नाही... असा तो लिफाफा गायब होतो आहे.

काय असू शकेल टपालाच्या आत्मचरित्रात?

मी टपाल..

तुम्ही मला आता ओळखणार नाही कदाचित. मरणासन्न झालो आहे. थोडी धुगधुगी उरली आहे. जोपर्यंत काही गावं अशिक्षित आहेत, त्यांच्या गावांतून नवे वारे वाहत नाहीयेत अशा गावांतून मी थोडा थोडा जगतो आहे. मला माहीत आहे की देश समद्ध व्हायला हवा आहे आणि त्यासाठी मला माझा बळी द्यावा लागणार आहे. ही माझी आत्महत्या नाही; मला फाशी दिली जात आहे. मान्य करण्यावाचून माझ्याकडे गत्यंतर नाही. मस्त जगलो मी. अगदी मस्तीत जगलो. फार महत्त्व होतं मला. राजाच मी.

हो! मी राजा!

फार मोठं आयुष्य लाभलं मला. युगानुयुगं मी जगलो आहे. अनेक तऱ्हेची माणसं मी बघितली आहेत. कधी घृणा आली, कधी अभिमानानं मान ताठ झाली. कधी प्रेमाने ओथंबून गेलो, तर कधी दुःखानं वेडापिसा झालो. या माझ्या भावना, मला माणसांनी दिलेल्या. खरं तर या भावना माणसांच्याच; पण उमटल्या माझ्या अंगावर. आणि त्या उमटतच राहिल्या, अगदी आत्ताआत्तापर्यंत.

आता मी म्हातारा झालो आहे. विस्मरण होत चाललं आहे. काही आठवतात गोष्टी.. अंधूक.

कधी झाला माझा जन्म हे मला माहीत नाही. जन्म झाला, हे सांगण्यासाठी कुणी तरी हवं ना. मला कुणीच नाही. मला तसं स्वतःचं अस्तित्व नाही. कुणी काही लिहिणार तेव्हा मी तेवढ्यापुरता जन्म घेणार. आणि कुणी मग मला चुरगळून टाकणार किंवा फाडून टाकणार, की लगेच मृत्यू. कुणी जपून पण ठेवत असत; पण तो मी नाही. मी फक्त एका हातातून दुसऱ्या हातात जाणारा. जिवंत राहिला तर राहिला... तर तो कागद, मेला तर मेला.. तर तोही कागद. मी अव्याहत अनेकांच्या स्पर्शातून जिवंत राहणारा. आणि मुक्कामी पोचलो की त्या क्षणी माझा मृत्यू. एकाच वेळेस एकाच क्षणी अनेक जन्म आणि अनेक मृत्यू अनुभवणारा मी एकमेव.

माझा प्रवास अनेक मार्गांनी होणार.

कधी घोड्यावरून, कधी उंटावरून, कधी पायी तर कधी कबूतरांच्या चोचीतून.



बहार होती.

राजे महाराजे म्हणायचे, 'खलिता फार महत्त्वाचा आणि गोपनीय आहे.. भिस्त तुझ्यावर आहे दूता..' आणि मग दूत म्हणायचा, 'स्वामी, चिंता नसावी. प्राणांची पर्वा करणार नाही. खलिता योग्य हाती पोचेल याची खात्री बाळगावी...'

आणि मग मी निघायचो... भरधाव... घोडा सुसाट असायचा आणि दूताने कंबरेला बांधलेल्या शेल्यात मी गुरफटलेला असायचो. वारा सूं सूं करत मला स्पर्श करायचा आणि त्या वर-खाली होणाऱ्या शेल्यात मला गाढ निद्रा यायची. दूत घामानं निथळलेला असायचा; पण कुठे विश्रांती म्हणून घ्यायचा नाही. पहाटेच्या प्रहरी निघालेली आमची स्वारी सूर्य कलता कलता मुक्कामी पोचायची आणि मग मी एका खात्रीच्या हातातून दुसऱ्या खात्रीच्या हातात पोचायचो. मी पण जपायचो त्यातला मजकूर.

घामानं, पावसाच्या पाण्यानं माझ्या आतलं अक्षरन्‌अक्षर मी पुसट होऊ द्यायचो नाही. मला माहीत असायचं माझ्यावर काय उमटलं आहे. आणि त्याचं महत्त्व मला राजांच्या बोलण्यातून कळून यायचं. एकदा का ती अक्षरं पोहोचली, की मी शांत व्हायचो. त्यापुढे तो कागद आणि त्याचं नशीब. जाळून टाकला जावो की जतन केला जावो. माझं काही देणं-घेणं नाही.



आणि त्याही आधी? पक्षी माझी काळजी घेत. कबूतराला आता तुम्ही कितीही रागवा, नाही आवडत ती अनेकांना. माहीत आहे मला; पण एके काळी हीच कबूतरं फार मोलाची कामं करायची. न चुकता त्याच व्यक्तीच्या समोर जाऊन उभी राहायची आणि चोचीला डकवलेल्या मला त्या व्यक्तीच्या हवाली करायची. जोपर्यंत ती योग्य व्यक्ती दिसत नाही तोपर्यंत मला जपणं हे त्याचं ध्येय असायचं. क्वचित असंही व्हायचं, त्याला प्राण गमवावे लागायचे. कुठून तरी एक बाण सरसर करत यायचा आणि त्याचा मर्मभेद करायचा. तडफड तडफड व्हायची त्याची; पण शेवटच्या श्‍वासापर्यंत त्याची चोच उघडायची नाही. अशी इमानदारी मी बघितली नाही. माणसंसुद्धा बेईमान व्हायची- अगदी काही कवड्यांसाठी; पण कबूतरं? नाहीच. एकदा का माझी जबाबदारी घेतली की घेतली...

रम्य सफर असायची ती. मोकळं आभाळ, निळंशार... आणि माझी आभाळाकडे झेप. फडफड फडफड... आणि मग काही क्षण स्थिर, तरंगत राहणं, पुन्हा फडफड..! त्या कबूतराला कसला अभिमान वाटायचा! इतर कबूतरांकडे तो तुच्छ नजर टाकायचा. मनातल्या मनात म्हणायचा, कसलं हे तुमचं आयुष्य? फक्त जगायचं, गुटर गुटर करायचं, घाण करत राहायची.. संपलं. मला बघा, राजाचं काम करतो आहे. प्रेमानं हात फिरवतो तो माझ्या अंगावरून. खायला देतो, पाणी पाजतो, आणि हो, लाडका आहे मी त्याचा. निघालो आहे त्याची कामगिरी बजावायला...

मी त्याचे डोळे बघत राहायचो. कमालीचा आत्मविश्‍वास असायचा त्यांच्यात. त्याला दिशा कशी कळायची हे मात्र मला कधीही समजलं नाही. कुणाकडे मला सुपूर्त करायचं हे त्याला कसं समजायचं? तो मस्तवाल होता आणि मी पण. मी तरी दुसरं काय करत होतो? जे काही माझ्यावर लिहिलं गेलं आहे ते पोचवून द्यायचं योग्य व्यक्तीच्या हातात. त्या व्यक्तीलाच ते वाचता यायचं. आत्ताच्या भाषेत कोड लँग्वेज. आणि जर कधी गनिमाच्या हातात पडलो मी, तर मात्र तगमग व्हायची माझी. त्या क्षणी वाटायचं, का नाही मला ती अक्षरं पुसून टाकता येत? मी इतका असहाय का?

जग बदलत होतं. महत्त्वाचे निरोप पायी अथवा घोड्यावरून जाऊन पोचवायला बराच काळ लागायचा. शोध सुरू होते एकेक. आणि त्याचंच फलित म्हणून कबूतरं गेली, घोडे गेले, दूत गेले आणि वाहनं आली.

माझा प्रवास बदलत होता. मी बदलत होतो. कापडावरून कागदावर उतरत होतो. बोरू जाऊन लेखणी आली होती. वाळूची आता गरज भासत नव्हती. एका क्षणात वाळणारी शाई माणसांचं काम सोपं करत होती.

प्रेम, द्वेष, मत्सर, आपुलकी, वेदना... सर्व काही मी अनुभवत होतो. माणसं बघत होतो. माणुसकी बघत होतो.

पहिल्यांदा जेव्हा मी उड्डाण केलं, बिलकूल गंमत वाटली नाही. उड्डाण मला काही नवीन नाही; पण तेव्हा मस्त गार वारा लागायचा. खाली बघितलं तर जग दिसायचं. आताचं हे उड्डाण बंद खोक्यात. गुदमरून जावं असं. मैल मैल प्रवास पण काळ किती? क्षणिक वाटावा असा. निघालो की पोचलो.

अर्थात हे फार नंतर झालं. मध्ये अनेक प्रवास झाले. पाण्यावर तरंगत गेलो. वाटलं एक काव्य आहे. सुळसुळ लाटा, हिंदोळे. कधी आभाळ बघितलं तर कधी पाताळ. माणसाच्या स्वभावाप्रमाणेच निसर्ग आहे की काय? की निसर्ग आधी आणि मग स्वभाव? की दोन्ही एकमेकांना पूरक?

एकच माहीत होतं की कुठून तरी निघायचं आणि कुठे तरी पोचायचं.

काळ जात होता तसं माझं रूप बदलत होतं. आता मला एक रीत होती. काही पद्धत होती. मला आखलं गेलं. टपाल हे नाव मला मिळालं. पूर्वी खलिता म्हणायचे, निरोप म्हणायचे, दस्तऐवज, कुणी चिठ्ठी म्हणू लागले, कुणी तुझ्या नावाचा कागद आला आहे, असं म्हणू लागले. पत्र म्हणू लागले. पत्र हा 'परत'चा अपभ्रंश असेल का? म्हणजे जो निरोप पाठवला आहे त्याला परतून उत्तर द्या.. परत.. पर्त, पत्र.. असं काही? पत्र म्हणू लागले कारण मला तर झाडाच्या पानावर लिहिलं जायचं. तेही झाडाच्या चिकानं. पीस हातात घेऊन.. मोरपीस. पत्रीचं झालं पत्रं. पानं सुकायची. अक्षरं तुटायची. मग आला खलिता. कापडावर अक्षरं.. शाईची. ओली शाई, सुकवायला वाळू... खलिता... मी समजू शकतो. खल.. इति... !! खलि झालं असेल आणि इति चा ता.. !! असेल असेल. मी शब्दात का गुंतायचं? पण इतके शब्द अंगावर उमटले आहेत की कधी कधी त्यात डोकवावं असं वाटतं. दस्तऐवज, हातानं लिहिलेला ऐवज... वस्तू... गोष्ट... बाब.

हातानं लिहिलेलं. याला खरं महत्त्व. मग त्याला खलिता म्हणा, पत्र म्हणा की लखोटा म्हणा, की थैली म्हणा. शब्द भिन्न असले तरी अर्थ तोच.. हस्तलिखित..!!

सहज आठवलं. कुणाकडून पत्रं येतं तर ते पूर्ण वाचून झाल्याशिवाय त्यातली बातमी सुखद की दुःखद हे समजायचं नाही. माणूस तसा हुशारच. सुरुवातीलाच वरच्या कोनात दोन आडव्या रेषा मारून त्यात क्षेम असं लिहू लागला. पत्र वाचणाऱ्याला धीर मिळू लागला. जिथे क्षेम लिहिलेलं नसेल त्यानं समजून जावं की बातमी चांगली नाही. आणि मग मी नेहमी हीच प्रार्थना करू लागलो की माझ्या प्रत्येक पानावर वरच्या

बाजूला क्षेम लिहिलं जावं. निव्वळ कविकल्पना होती ती. जाणतो मी; पण वाईट बातमी द्यायला कुणाला आवडेल? मी पण तसाच होतो. कधी इच्छा पूर्ण व्हायची, कधी नाही. यालाच आयुष्य म्हणायचं; कारण मला तरी कुठे माहीत होतं की मीसुद्धा कधी तरी असा मरणासन्न होणार आहे. मला तर कायम वाटायचं की मी अजरामर आहे. भ्रम असतात, भ्रम; पण जो काही काळ होता तो सुरेख होता. काळ बदलला तसा मीसुद्धा बदललो.

हातानं लिहिलेला हा कागद धाडायची नवी पद्धत सुरू झाली. आणि मला पहिल्यांदा पद्धतशीर पाठवण्यात आलं. ही पद्धत शोधून काढली बेन्जामिन फ्रॅन्कलीननं. जुलै १७७६. माझे पहिले मास्तर. पोस्टमास्टर. मी जगाच्या या कोपऱ्यातून त्या कोपऱ्यात पोचू लागलो. किती ठप्पे आणि गोंद. चिकटून जायचो मलाच मी. कधी उघडताना फाटायचो. कधी हरवून जायचो. हे हरवणं माणसाच्या आत्म्यावर हल्ला करायचं. जंग जंग पछाडलं जायचं आणि मी सापडायचो नाही. काही दुर्गुण आणि काही सद्‌गुण. हे तर प्रत्येक बाबतीत असतंच. सद्‌गुण एकटा कधीच येत नाही. जसं जिथे सत्य आहे तिथे असत्य असणारच. दिवस आहे तर रात्र असणारच.

दिवस-रात्र काम चालायचं. कित्येकांचं पोट माझ्यावर अवलंबून राहू लागलं. एकट्या भारतात एक लाख चोपन्न हजार आठशे ब्याऐंशी पोस्ट ऑफिस आहेत. आणि तिथे काम करणारी माणसं? या लाखो लोकांचं पुढे काय होणार? जर मीच उरलो नाही तर ही माणसं कशी जगणार?

जग धावायला लागलं आहे. या क्षणी मनात विचार आला, मग तो चूक की बरोबर असा विचार न करता त्या क्षणी पुढे पाठवून द्यायचा. एका क्षणात या मनातला विचार त्या मनात. आणि मग? जर विचार अयोग्य असेल तर मग पश्चात्ताप. इलाज नाही. पाठवून झाला आहे. तो खोडून पण टाकता येत नाही.

जेव्हा हाती लिखाण व्हायचं, तेव्हा जरा विचार करायला वेळ मिळायचा. काय लिहितो आहोत हे पुन्हा एकदा वाचून बघितलं जायचं. खोडता यायचं. पुन्हा नव्यानं सुरुवात करता यायची. विचार आणि लिखाण यात विचार फार जोरात धावायचे आणि हात हळू चालायचे. हे फार छान होतं. त्या देवानं मुद्दाम तशी योजना केली आहे. विचार करा कितीही जलद, पण लिहिताना मात्र दोन-तीन सेकंद अंतर ... हे अंतर पुन्हा विचार करायला भाग पाडायचं. शब्दरचना बदलायची त्यामुळे. कधी मसुदाच बदलला जायचा. आणि कधी कधी लिखाणच रद्द केलं जायचं.

हाती लिखाण... त्या व्यक्तीचा स्पर्श झालेला कागद... मी फक्त विचार नाही तर स्पर्शसुद्धा पोचता करायचो. क्वचित मला सुगंधसुद्धा यायचा. प्रत्येक प्राण्याला त्याचा असा एक वेगळा सुगंध असतो. तो सुगंध मला चिटकायचा. मला उघडताना कुणी कुणी तो सुगंध श्वास भरून घ्यायचा. मी हसायचो. त्या हातात सामावून जायचो. प्रत्येकाचं हस्ताक्षर म्हणजे त्या व्यक्तीचा स्वभाव, आणि भाव. किरटं, स्पष्ट, दाणेदार, मोत्यासारखं टप्पोरं, मुंगीच्या पावलांसारखं... असे अनेक सन्मान माझ्यावर उमटलेल्या अक्षरांना मिळायचे. काव्यं लिहिली जायची, अग्रलेख लिहिले जायचे, कथा लिहिल्या जायच्या, आणि पोस्टात पडायचं ते पाकीट. मग मीच काव्य, मीच लेख, मीच कथा... मीच गाणी, सिनेमाच्या पडद्यावर मीच गायलो गेलो.

आता ते काव्य हरवत चाललं आहे. फिंगर टीप झालो आहे. तो मी नाहीच आहे खरं तर. रस्त्यारस्त्यावर खांबाला अडकवलेलं माझं घर हरवलं आहे. त्या घरावर माझ्या मास्तरांच्या येण्याची वेळ लिहून ठेवलेली असायची. सायकलच्या घंटीचा आवाज ऐकण्यासाठी मी आतुरलेलो असायचो. तो यायचा आणि मला त्या लाल घरातून बाहेर काढायचा. त्याच्या पिशवीत ठेवायचा आणि माझा प्रवास सुरू व्हायचा. मीसुद्धा घाईत असायचो. लवकरात लवकर पोचण्यासाठी. गंमत होती सगळी.

आता थोडी धुगधुगी उरली आहे. त्या रे टॉमलीन्सनला ई-मेलचा शोध लावण्याची काय गरज होती? काय घाई होती अशी? माणसाला तरी अशी घाई का असते? जग जवळ येत चाललं आहे आणि माणसं दूर होत चालली आहेत.

मी मात्र...

आता कोण मला जपून ठेवणार? दस्तऐवज कसे तयार होणार? इतिहास कसा शोधणार? मशिन बंद पडलं की जे काही पाठवलं गेलं आहे ते सर्व पुसून जाणार. मजकूर राहणार नाही. स्पर्श उरणार नाही, हुरहूर निर्माण होणार नाही. धाव माणसा धाव. तुझ्या या धावणाऱ्या पावलांखाली मी मात्र चिरडला जातो आह, याचं तुला भान नाही.

ठीकच आहे. हे कधीच्या काळी सुरू झालेलं सत्र आता संपुष्टात येऊ घातलं आहे. शेवटचे काही श्वास बाकी आहेत. मला पूर्ण मारून टाकायचं की जिवंत ठेवायचं, हे आता तुमच्या हातात आहे. मी आता त्रयस्थ झालो आहे. मी आता तटस्थ होतो आहे. दुरून बघत राहणार आहे. तुमच्याकडे आणि माझ्याकडेसुद्धा.



आत्मचरित्र... टपालाचं.

मी अस्वस्थ झाले. माझं कपाट मी उघडलं, त्यातला एक खण. पत्रांनी भरलेला. कधीच्या काळी कुणी पाठवलेली पत्रं. मी जपून ठेवलेली. कागद घडीवर विरत आलेले. हळुवार हातांनी एक एक घडी उलगडत गेले. आणि वाचू लागले...

लाडक्या स्वातीस...

---

तुझाच
बापू...



डोळे पाणावले होते. अक्षरं धूसर झाली होती. मी आभार मानले संगणकाचे... त्या वेळी तो अस्तित्वात नव्हता म्हणून. आभार मानले टपालाचे. पोस्टमनचे...

आणि मग ती संध्याकाळ एक एक पान अलगद उघडण्यात गेली.

ती रपेट गेली, ते हिंदकळणं गेलं, ते मोकळेपणी उडणं गेलं.

आता आली शिस्त. चांगलंच झालं म्हणा; पण लोक फुकट मिळणाऱ्या गोष्टींना फार सहजतेने घेतात. त्यांना मोल मोजावं लागलं की महत्त्व समजतं. माझ्या अंगावर एक चौकोनी कागद चिकटला तो १८४०मध्ये. शिक्का. पैसे मोजा तर तुमचं पत्र पोचवलं जाईल. लोकांना हळूहळू सवय होऊ लागली. पत्राचं महत्त्व समजू लागलं. ख्यालीखुशाली कळू लागली एकमेकांची एकमेकांना. आणि असं बरंच काही होऊ लागलं.

माझं महत्त्व अजून वाढलं. लोक माझी वाट बघू लागले. त्यांना मी म्हणजे अगदी देवदूत वाटू लागलो. मला घेऊन जाणारा माझा सहचरी त्यांचा मित्र झाला. मैल मैल चालायचं. घरोघरी जायचं. आणि एक छोटासा कागदाचा तुकडा हवाली करायचा. कधी कुणाला वाचून दाखवायचा आणि कधी त्यांच्या वतीने त्या कागदाला उत्तर पण त्यानंच लिहायचं. पाकीट महाग आणि कार्ड स्वस्त म्हणून कार्ड लिहायचं. अगदी कार्डाच्या कोनापासून सुरुवात करून कार्डाच्या शेवटच्या कोनापर्यंत लिहायचं.

या जगजाहीर भावना! बाप मेला, मुलाचा जन्म झाला, शेत वाहून गेलं, घर बांधलं, काहीही असो... सर्व भावना खुल्या. मोकळ्या. एकाच तराजूत तोललेल्या. त्यात आईचा आशीर्वाद आणि लहानांचा नमस्कार... एकाच ठिकाणी, एकाच पातळीवर.

शाळेतल्या मुलांच्या वहीत मी पत्रलेखन म्हणून पण मिरवलो आहे. अगदी ठरावीक रीत...

उजवीकडे वर तारीख, मग डावीकडे मायना, जर कुणाला अगदी वर मध्यावर श्री वगैरे लिहायचं असेल तर त्यानं लिहावं. तारीख, मग खाली स्वतःचा पत्ता, मग पुढे ज्याला पत्र लिहीत आहोत त्याचं नाव... जर पत्र घरगुती असेल तर असं, जर ते पत्र म्हणजे एखादा अर्ज असेल तर मग मायना लिहून झाला की विषय... मग त्याच्या खाली... महोदया, आणि पुढे औपचारिक भाषा आणि मग शेवटी पत्र लिहिणारा, त्याचं नाव आणि सर्वात खाली ज्याला पत्र पाठवायचं आहे त्याचा पत्ता. त्या पत्त्याला एक चौकट आखायची. कोपऱ्यात स्टॅम्पचं चित्र काढायचं.

हा सराव होता. पुढे नोकरी लागल्यावर असंच काहीसं लिहावं लागणार आहे हे त्या काळच्या शिक्षकांना माहीत होतं. मी तिथे पण रमलो आणि मी प्रेमपत्रात पण रमलो.

प्रेमपत्र.. ! फार वाईट. कधी कुणाच्या हाती लागायचो आणि मग जे काही माझे धिंडवडे निघायचे की...

पण किती कोमल भावना असायच्या त्या. अगदी भरभरून लिहिलेलं असायचं. विरह... मग मिलन. मी सर्वाला साक्षी. एकाच वेळेस मी प्रेम व्यक्त करायचो आणि त्याच वेळेस मी प्रेमभंग पण करायचो. विचार करतो तेव्हा नवल वाटतं, की जगात एकाच वेळेस कित्येक कोटी लोक मला लिहीत असायचे आणि माझी वाट बघत असायचे. कित्येक कोटी लोक...! अब्ज असतील का? असतीलच. मला गणित कुठे येतं? हिशोब कुठे ठेवता येतो? ते काम रुक्ष माणसांचं. मी तर एक काव्य आहे, लेख आहे, अग्रलेख आहे, बखर आहे. मी इतिहास आहे. माझा शोध घेतला जातो. त्यावरून तो काळ शोधला जातो. आणि मी त्यांना पोचवतो तिथे; कारण मी दस्तऐवज आहे. मी हस्ताक्षर आहे. मी पुरावा आहे. मी आहे म्हणून आज...



swatichandorkar21@gmail.com

अपना ख़त आप दिया उन को मगर ये कह कर
ख़त तो पहचानिए ये ख़त मुझे गुमनाम मिला
-कैफ़ी हैदराबादी




# आठवणींचा वपुर्झा



**नेहा पुरव**

बापूंच्या म्हणजे 'वपुं'च्या शब्दांत सांगायचं तर आठवणींचं एक वेगळं विश्व असतं. आपल्या जीवनात असंख्य रंगांच्या आठवणी असतात. जितक्या तुम्ही विसरू म्हणाल तितक्या आठवणी येत राहतात. माझ्या या आठवणींमध्ये आहे साहित्य सहवासमधल्या 'झपूर्झा''मधलं ते घर...त्या घरातील ती आरामखुर्ची. 'This is author's chair and you are not authorised to sit' असा टॅग असलेली बापूंची ती खास खुर्ची. वाचकांच्या प्रत्येक पत्राला उत्तर द्यायचंच आणि तेही स्वतःच्या हस्ताक्षरात, हा त्यांचा नेहमी आग्रह असायचा. 'अगं याच पत्रांमधून मला मानवी मनाचे कंगोरे सापडतात. याच पत्रांमधून मला माझ्या कथांची बीजं सापडतात. माझ्या कथेतले नायक किंवा नायिका वेगळ्या नसतात गं! माझ्या वाचकांच्या पत्रांमधून माझ्यापर्यंत पोचलेल्याच या व्यक्ती असतात.' त्यांचे शब्द कानी येतात.

दुपारच्या जेवणानंतर जिभेखाली सॉरबिटॉलची गोळी ठेवून बापू अगदी बारीक आवाज ठेवून ओशोंच्या कॅसेट्स ऐकायचे. त्या वेळी त्यांची लेखनिक किंवा मी घरात असलो तर वाचकांच्या पत्रांचा तो खजिना उघडायचो. त्या पत्रांमध्ये नक्कीच एक सच्चेपणा असायचा आणि ती वाचल्यावर बापूंना या पत्रांना उत्तरं द्यायची इतकी तळमळ का असते, तेही जाणवायचं.

बापूंच्या एका कथेतल्या शानबागसारख्या आपण दिसतो, आपणही कोकिळाच आहोत, आपल्याला रंगरूप नाही, पण आवाजात ताकद आहे, शानबाग म्हणजे आपणच की काय, असं म्हणत मी एकदा 'झपूर्झा'मधला फोननंबर फिरवला होता. त्या काळात मला घेरून राहिलेल्या निराशेच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी मला पलीकडून आलेला 'वपुं'चा आवाज पुरेसा ठरला. तिथून पुढे बापूंनी माझे कन्यादान करेपर्यंत त्यांच्याबरोबर मीही त्यांना आलेली वाचकांची अगणित पत्रं अनुभवली. त्यात कधी तरी 'तुमची ही व्यक्तिरेखा म्हणजे मीच, तुम्हाला कसं कळलं माझ्याबद्दल?' इथपासून 'नेमका मलाही या नायकासारखाच प्रश्न पडला होता; पण त्याचं आता उत्तर मिळालंय बरं का' अशीही पत्रं असायची.

'मी आज जे लिहितो ना, त्याची प्रेरणा हीच तर आहे,' असं म्हणत बापू ते पत्र व्यवस्थित जपून ठेवायचे. पुढे मी चॅनेलच्या दुनियेत गेले. माझ्यासारखी प्रचंड इन्फिरियॉरिटी कॉम्प्लेक्स घऊन जगणारी मुलगी त्यातून बाहेर पडली. त्यापाठी नेमकं काय होतं? बापूंसारख्या मनस्वी लेखकाच्या सहवासातून मिळालेला आत्मविश्वास, की त्या काळी वाचलेली वाचकांची असंख्य पत्रं, त्यातून आपण अशा एकट्याच नाही, असं जाणवून मिळालेलं बळ? ती पत्रं आठवतात; त्यांचा स्वतःच्या हस्ताक्षरात उत्तर द्यायचा अट्टहास का होता हे आजही जाणवतं. कदाचित माझ्यासारख्या हजारो शानबाग बापूंच्या केवळ एका उत्तरामुळे निराशेच्या गर्तेमधून बाहेर आल्या असतील, हेही लक्षात येतं.







स्वतःचं बालपण त्रयस्थपणे
ठलगडून दाखवत
आयरिश-अमेरिकन कुटुंबाची
वाताहत मांडणारं
फ्रॅन्क मॅक्कोर्ट यांचं
हेलावून सोडणारं आत्मचरित्र.

मूळ लेखक - फ्रॅन्क मॅक्कोर्ट
अनुवाद - गीतांजली वैशंपायन

अँजेलाज अॅशेस
-ए मेमॉइर

नवं कोरं

पृष्ठसंख्या : ३३६ । किंमत : ₹३८०

नवं कोरं

अवकाशाला गवसणी घालणाऱ्या
वैज्ञानिक शोधांचा जॉर्जचा कल्पनारम्य प्रवास.
ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग यांच्या
अफलातून मेंदूतून साकारलेलं विलक्षण कथानक.

## जॉर्ज ॲन्ड द बिग बँग

पृष्ठसंख्या : २७२ । किंमत : ₹४९५

## जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट

पृष्ठसंख्या : २८० । किंमत : ₹४९५

## जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स

पृष्ठसंख्या : २८४ । किंमत : ₹४९५

मूळ लेखक
ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग
अनुवाद
डॉ. प्रमोद जोगळेकर










'धर्म' शब्दाचे नानाविध अर्थ
उलगडत असतानाच वेगळ्या दृष्टिकोनातून
महाभारताची ओळख करून देणारा ग्रंथ



## द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड

मूळ लेखक - गुरुचरण दास । अनुवाद - सुदर्शन आठवले

पृष्ठसंख्या : ५३६ । किंमत : ₹६५०

मृत्युरूपी मृगजळामागील गूढ उकलण्याचा
अद्भुत प्रयोग करणारे रंगतदार पुस्तक...
विस्मित करणाऱ्या अनुभवांची गाथा.




## सीक्रेट्स ऑफ द लाइट

मूळ लेखक - डॅनियन ब्रिंकली आणि कॅथरिन ब्रिंकली
अनुवाद - सचिन रायलवार

पृष्ठसंख्या : १६८ । किंमत : ₹२००

# मान्यवरांची पत्रे

हिटलरनं मानवी संहाराची परिसीमा गाठून माणुसकीला काळिमा फासला. तर महात्मा गांधींनी अहिंसेच्या तत्त्वानं त्या जखमांना मलम लावलं. हिटलरच्या अमानवी कृत्यांना आवर घालण्याची विनंती करणारं महात्मा गांधींचं १९३९मध्ये वर्ध्याहून लिहिलेलं हे पत्र. या पत्रातूनही महात्मा गांधींच्या संयमी आणि कनवाळू स्वभावाचं दर्शन घडतं...







As at Wardha
C.P.
India.
23.7.'39.

Dear friend,

Friends have been urging me to write to you for the sake of humanity. But I have resisted their request, because of the feeling that any letter from me would be an impertinence. Something tells me that I must not calculate and that I must make my appeal for whatever it may be worth.

It is quite clear that you are today the one person in the world who can prevent a war which may reduce humanity to the savage state. Must you pay that price for an object however worthy it may appear to you to be ? Will you listen to the appeal of one who has seliberately shunned the method of war not without considerable success? Any way I anticipate your forgiveneas, if I have erred in writing to you.

I remain,
Your sincere friend
M.K.Gandhi

Herr Hitler
Berlin
Germany.

# जगप्रसिद्ध व्यक्तींची प्रेमपत्रे

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

जर आपली ही
प्रेमपत्रे कुणी वाचली
तर... दोस्तोवस्की

तू माझ्याशिवाय
कशाचाच विचार करू
नकोस - कीट्स

कोणत्याही स्त्रीने कोणत्याही
पुरुषाशी माझ्याइतकं प्रेम
केलं नसेल. - सोफिया

मी तुला माझी अगणित
चुंबनं पाठवतेय... इतकी की
तुझ्या नि माझ्या ओठांमध्ये
छानसा पूल तयार होऊ
शकेल - ज्युलिएट

आता आपणास कोणीही
वेगळे करू शकणार नाही
- कवयित्री बॅरेट

तू माझ्याशिवाय
कशाचाच विचार करू
नकोस - कीट्स

मी घातलेली हाताची प्रत्येक
घडी म्हणजे तुला दिलेलं
आवेगी आलिंगनच असतं
- डॅश मीलेन

प्रेमाचे सप्तरंग उधळणारी ही वाक्यं. प्रत्येक प्रेमपत्र अशा अनिवार ओढीतून लिहिलं जातं. प्रेमपत्र लिहिलं नाही त्यानं प्रेम केलं यावर कोणी विश्वासच नाही ठेवणार. वर्तमान पिढी मात्र प्रेमपत्रांच्या खजिन्यास मुकलेलीच म्हणायची. व्हॉट्सॲप, फेसबुक, एसएमएसच्या चतकोर चौकटीत आकाशाला गवसणी घालणारं प्रेम कसं काय मावणार? म्हणून इमोजीवरच सारं भागवलं जातं; पण प्रेमपत्रांचा इतिहास इतका जुना की कमलपत्रावर आपल्या प्रियकर, प्रेयसीचं नाव लिहून ते पाण्यात सोडलं जायचं. नंतर कबूतरं मदतीला येऊ लागली. ती मेघदूताचं काम करू लागली. माणूस गुंफेत राहू लागल्यानंतर चित्रे काढू लागला, त्यातील कितीतरी चित्रे मौन प्रेमपत्रंच होती. 'डोळ्यांत वाच माझ्या तू गीत भावनांचे', 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात', 'मलमली तारुण्य माझे, तू पहाटे पांघरावे, मोकळ्या केसांत माझ्या तू जिवाला गुंतवावे', 'मालवून टाक दीप चेतवून अंग अंग, राजसा किती दिसांत लाभला निवांत संग' या नि अशा अगणित ओळी, गीते, गझला, विराण्या म्हणजे काव्यात्मक प्रेमपत्रेच ना? प्रेम हा उद्‌गार, वृत्ती, विकार, रोग, राग काय आहे याचा निर्णय इतक्या पिढ्या गुजरल्या तरी होऊ न शकणे, हे खरं प्रेमाचं गूढनि गारूडही! ॲडम-ईव्ह पासून 'खाये तो पछताये, न खाये तो भी...'चा जो सिलसिला सुरू झालाय तो रोमिओ-ज्युलिएट, हिर-रांझा, नल-दमयंती, शिरी-फरिहाद अशी किती आख्यानं झाली तरी त्यांचे अध्याय अद्याप अपूर्णच!

प्रेमपत्र लिहायचा मोह भल्याभल्यांना आवरला नाही. असं म्हटलं जातं की प्रेम करत नाही तो जिवंत कसा म्हणायचा? प्रेम केलं नाही असा जीव... स्त्री-पुरुष सापडणे विरळा! या प्रेमाचं एक असतं... ही असते न संपणारी तहान. माणूस सभ्यतेच्या चौकटीत लग्न एकाशी करत असला तरी त्यानं किंवा तिनं एकाशीच प्रेम केलं... सती सावित्री, रामाचं एकबाणी, एकवचनी रूप... खरं तर या आदर्श कविकल्पनाच! राम स्वप्न तर कृष्ण सत्य असाच सारा मामला ना? त्यामुळे प्रेमपत्रं लिहिणारी माणसं सर्वसामान्य असतात, हा भ्रम अब्राहम लिंकन, डार्विन, नेपोलियन, लेनिन, कीट्स, बायरन, चेकॉव्ह, चार्ल्स डिकन्स, वर्डस्वर्थ, टॉलस्टॉय, बर्नार्ड शॉ... अशा जगप्रसिद्ध माणसांची प्रेमपत्रं जशी उपलब्ध आहेत, तशीच स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, गोपाळ कृष्ण गोखले, सरोजिनी नायडू, अमृता प्रीतम, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, प्रेमचंद अशा कितीतरी प्रसिद्ध भारतीयांचीसुद्धा!

अब्राहम लिंकननी विवाहापूर्वी मेरी ओवेन्स यांना १८३७मध्ये पत्र लिहून मागणी घातली होती; पण ती मेरी ओवेन्सनी धुडकावून लावली; कारण स्पष्ट होतं की अब्राहम तिच्या स्वप्नांची पूर्तता करण्यास पात्र नव्हता. एक तर तो गरीब होता. शिवाय कुरूपही. तिला काय माहीत, हा पुढे अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होईल? पण पुढे झालं असं की मेरी ओवेन्सनी ज्या गृहस्थाशी लग्न केलं तो पुढं अब्राहम लिंकनचा आजन्म कट्टर विरोधक म्हणून प्रसिद्धीस आला... कारण एकच होतं... त्यानं आपल्या बायकोवर प्रेम केलं होतं! मेरी ओवेन्सला स्प्रिंगफिल्डहून लिहिलेलं पत्र एका प्रेमिकाची प्रांजळ कबुली नि करारनामाच होता. लिंकननी मेरीच्या पत्रात स्पष्ट केलं होतं, की जी कोणी स्त्री आपली जीवनधारा माझ्या जीवनधारेत विसर्जित करेल, तिला मी सदैव प्रसन्न नि सुखी ठेवण्यात कोणतीही कसूर करणार नाही. मी जर असं करू शकलो नाही, तर ते माझ्या जीवनातलं सर्वांत मोठं अपयश नि दुःख असेल. तुझ्याबरोबर मी राहू शकेन, तर आजच्यापेक्षा अधिक सुखी होईन. माझ्या संगतीतील दिवसांत मी तुला एक क्षण जरी दुःखी अनुभवले तर तो माझ्या प्रेमाचा पराभव असेल.

------

लिओ टॉलस्टॉय हा एकोणिसाव्या शतकातला प्रसिद्ध रशियन विचारवंत. महात्मा गांधींवर टॉलस्टॉयच्या साहित्य नि विचारांचा प्रभाव होता. त्या टॉलस्टॉयचं सोनियावर प्रेम होतं. सोनियाची मोठी बहीण होती एलिझाबेथ. टॉलस्टॉयचं या बहिणीशी सूत जमलं तसं त्याचं त्यांच्या घरी येणं-जाणं वाढलं. त्या वेळी सोनियाचा साखरपुडा पोलीवनोव यांच्याशी झालेला होता. त्यामुळे या मुलींच्या घरच्यांना वाटायचं की टॉलस्टॉयच्या येरझाऱ्या एलिझाबेथसाठीच आहेत; पण रहस्य वेगळंच होतं. सोनिया कथा लिहायची नि त्या टॉलस्टॉयला आवडायच्या. प्रेमाचं खरं कारण सौंदर्यापेक्षा साहित्यप्रतिभा होती. तिच्या कथेतलं 'डुब्लीटस्की' नामक मुलीचं पात्र टॉलस्टॉयला इतकं आवडलं की तो



सोनियालाच डुब्लीट म्हणून हाक मारू लागला. तीन आठवड्यांच्या घालमेलीनंतर त्यानं सोनियाला शेवटी प्रेमपत्र लिहून स्वतःला मोकळं केलं. त्यात त्यानं सुरुवातीस लिहिलं होतं, *'आता खरंच असह्य झालंय. गेल्या तीन आठवड्यांतील प्रत्येक दिवशी मी दृढनिश्चय करून यायचो... आज मनातलं सारं तुला सांगून टाकायचं... पण कसलं काय... रोज मी मन खट्टू करून हात चोळत परतायचो. वाटायचं तिला तर मी न बोलता सगळं सांगून टाकल्यातच जमा होतं. मी स्वतःवरच चिडायचो, खेकसायचो... मनातल्या मनात...'* पुढं त्यानं लिहिलं होतं, *'तुझ्या घरातल्यांचा माझ्याबद्दल गैरसमज आहे... मी एलिझाबेथवर लट्टू आहे. खरं सांगायचं तर तू एक प्रामाणिक मुलगी आहेस. मला एकदा खरं खरं सांगून टाक, तू माझी पत्नी होण्यास तयार आहेस? अंतर्मनात डोकावून सांग. तुझ्या मनात माझ्याबद्दल तिळमात्र जरी शंका असेल तर स्पष्ट नाकार मला. माझ्या मनाची तयारी आहे; पण उत्तर तुझं अंतर्मनातलं असलं पाहिजे. तुझा नकार मी पचवू नाही शकणार हे खरं आहे. जर मी तुझा पती झालो तर एक अट असेल. तू माझ्यावर तेवढंच नाही प्रेम करायचं जेवढं मी तुझ्यावर करतो.'* सोनियाचं लग्न टॉलस्टॉयबरोबर झालं. दोघांनी अनेक वर्षं संसार केला; पण त्याला सुखी संसार म्हणणं अतिशयोक्ती ठरेल. अठ्ठेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ संसारानंतर वयाच्या ८०व्या वर्षी त्यांना घर सोडावं लागलं. टॉलस्टॉयनी मृत्यूपूर्वी लिहिलेलं शेवटचं पत्र होतं, सोनियाला लिहिलेलं. सोनियानी उतारवयात एकत्र राहण्याची इच्छा व्यक्त करणारं पत्र टॉलस्टॉयला लिहिलेलं होतं. त्यात आत्महत्येची इच्छा व्यक्त करण्यात आली होती; पण दोघांत इतकी कटुता आलेली की पुनर्मिलन अशक्य होतं. पत्रात शेवटी टॉलस्टॉयनं लिहिलं होतं, *'प्यारी सोनिया, ईश्वर तुझे कल्याण करो. आपलं जीवन समाप्त करण्याचा आपल्याला अधिकार नाही आणि जीवनाला काळाच्या मोजपट्टीनं मोजणंही योग्य नव्हे. उरलेला काळ आपण अलिप्तपणे पण आनंदात घालवू या!'*

इंग्रजी कवी रॉबर्ट ब्राऊनिंगच्या काव्यावर बैरट नावाची तरुणी फिदा होती. तीपण कविता करायची. ती आपल्या कविता रॉबर्ट ब्राऊनिंगना पाठवत असे, अभिप्रायार्थ. रॉबर्ट ब्राऊनिंगही इमानेइतबारे कविता दुरुस्त करून परत पाठवत असे. शेवटी बैरटनी कवितांऐवजी पत्रच लिहून आपली खरी कविता... कवितेचा खरा आशय एकदाचा प्रकट केला. खजील झालेल्या ब्राऊनिंगनी मग आपली आंतरिक तगमग, ओढशब्दबद्ध करत लिहिलं, *'प्रिय बै (बैरट), शब्दांना कसंही नटवा, बदला, कायापालट करा त्यांचा... पण ते नाही सांगू शकत की तू मला किती प्रिय आहेस! माझं हृदय, माझा आत्मा काय म्हणतो ते कसं सांगू? तू मला आपल्या प्रेमाची अशी खात्री करून दिलीस की त्याला आता कोणत्याच पुराव्याची गरज उरली नाही. मी किती भाग्यवान आहे म्हणून सांगू? मला अभिमान आहे की तू माझं जीवन झंकृत, अलंकृत करून टाकलंस! माझं जीवन तुझ्या कोवळ्या हाती सोपवताना मी किती कृतकृत्य झालोय म्हणून सांगू? प्रिये, शेवटचं, मन चंचल नको... स्थिर, दृढ, असू दे. फक्त माझ्या नि माझ्याच- साठी- ब्राऊनिंग.'*





सन १८४०मध्ये राणी व्हिक्टोरियाने आपल्या होणाऱ्या पतिराज अल्बर्टना विवाहाच्या दिवशी उठल्या उठल्या एक छोटंसं पत्र धाडलं होतं. त्यात लिहिलं होतं–

प्रियतम,

आज तू कसा आहेस? रात्री झोप लागली? मला तर खरंच गाढ झोप लागली होती. तुला खरं नाही वाटत? मी किती प्रसन्न आहे म्हणून सांगू! आज हवा पण किती छान आहे नाही! मला खात्री आहे, आज पाऊस थांबणार म्हणजे थांबणार! प्रियकरा, तू तयार होशील; पण त्यापूर्वी एक ओळीचं का असेना पत्र पाठव.

तुझी सदैव दासी,  
व्हिक्टोरिया

सिग्मंड फ्रॉइड. जगातले सर्व व्यवहार लैंगिक भावनेवर आधारित असतात, असा सिद्धान्त मांडणारा मानसशास्त्रज्ञ. त्याची प्रेयसी होती मार्था. व्हिएन्नाहून (ऑस्ट्रिया) त्यानं मार्थाला १५ जून १८८२ रोजी एक प्रेमपत्र पाठवलं होतं.

प्रिय मधुराणी,

मला हे कळत नव्हतं की या ओळी माझ्या मधुराणीस कशा पोहोचतील... पोहोचवाव्यात. एकदा मनात यायचं की बहिणीकडून पाठवावं हे पत्र. एलीला सांगावं की तुझी काही

करून एकदा भेट घालून दे म्हणून आणि मग मी हळूच हे पत्र तुझ्या हाती कुणाच्याही नकळत देणार होतो. शिवाय भेटलो तरी सारं सांगू शकेन याची खात्री नव्हती. प्रिय मार्था, तू माझं सारं जीवनच बदलून टाकलंस. आज मी तुझ्या घरी आलो होतो... किती अद्‌भुत वाटत होतं म्हणून सांगू! एलीनं काही वेळ आपल्याला एकांत दिला खरा; पण पाप होईल असं वाटलं अन्... स्वतःला सावरलं.

तू जाणार आहेस असं कळलं. मग तुला तर माझी पत्रं सहन करावीच लागणार. मी एक गरीब, निष्पाप माणूस आहे. माझी मलाच लाज वाटते; पण याशिवाय काय करू शकतो? माझं हे पत्र अपूर्ण आहे... तू उत्तर पाठवून पूर्ण करशील अशी आशा बाळगतो.

**-डॉ. सिग्मंड फ्रॉइड**

पुढे मार्था नि फ्रॉइडचं लग्न झालं तेव्हा त्यांचे खायचे वांदे होते. लग्नपत्रिकेत लिहिण्यात आलं होतं, की आप्त, इष्टमित्र, नातेवाइकांनी लग्नात वस्तूंचा आहेर न देता रोख रक्कम द्यावी.

इंग्रजी काव्यात वर्डस्वर्थनंतर नाव घेतलं जातं ते टेनिसनचं. तो राष्ट्रकवी म्हणून ओळखला जायचा. त्याचं घराणं खानदानी. तो उमराव (लॉर्ड) म्हणून सन्मानित होता. त्याच्या कविता म्हणजे 'गुलाबाचा ताटवा', म्हणून त्यांचा सुगंध, दरवळ जगभर पसरलेला. एमिली त्याची प्रेयसी. तिला त्यानं अनेक 'भावुक' पत्रं लिहिली खरी; पण आपल्या मृत्युपत्रात त्यानं लिहून ठेवलं होतं, की माझी ही पत्रं मी माझ्या व्यक्तिगत जीवनाचा अमूल्य ठेवा म्हणून जपलीत. ती माझ्या पश्चात न वाचता जाळण्यात यावीत. असं लिहून ठेवणारा टेनिसन या अमर प्रेमपत्रांना धक्का नाही लावू शकला. प्रेम असं हळवं, मुलायम मोरपीस असतं. मला



मोरपिसावरून आठवलं... मी पहिलीत असताना एका मैत्रिणीनं मला अभावितपणे एक छोटं मोरपीस दिलं होतं. ती कुठे, कशी, कोण काहीच माहीत नाही; पण सत्तरी गाठत आलेला मी! त्या मोरपिसानं मला पहिल्या प्रेमाच्या झुळकीनं अबोध अवस्थेत गारठून ठेवलंय! इतके उन्हाळे सरलेत; पण त्या प्रेमपिसाचा पिसाळ, गोठणबिंदू आहे तसा! माझ्या संग्रही माझं आवडतं एक पुस्तक आहे अमृता प्रीतमचं. त्याचं नावच आहे मुळी 'अमृता के प्रेमपत्र'. त्या पुस्तकात त्या अनाम माझ्या मना-कानात बनून राहिलेल्या पहिल्या मैत्रिणीची स्मृती– मोरपीस 'More Peace' मी जपून ठेवलंय. बहुधा टेनिसनी अशाच भावुकतेनं, गुंतलेपणानं ती पत्रं जाळली नसावीत. प्रेम गुंता की गोफ नाही सांगता येणार; पण ते आयुष्यभराचं गारूड असतं खरं. तुम्ही लग्न, संसार कुणाशीही करून जगत राहता. भौतिक, सामाजिक जीवन असतो देखावा, दिखावा. मर्मबंधातील ती पहिली हळुवार झुळूकच खऱ्या ऑक्सिजननी भरलेली असते. बाकी मग ऑक्सिजन सिलिंडर्सच! पुढे ती पत्रं आगीच्या भक्षस्थानी पडली; पण जाळणाऱ्यालाही त्यातलं एक ठेवावंसं वाटलं. ते जगातलं दुर्मिळ प्रेमपत्र म्हणून अमर झालंय. त्यात टेनिसन लिहितो–

प्रिये,

तुला लक्षात आहे... मी नुकताच लंडनहून आलो होतो. आपण एका बागेत एका लोखंडी खुर्चीवर दोघं रेलून बसून होतो. नववर्षाचे ते सुरुवातीचे दिवस होते. मला आजही तीन वर्षांपूर्वीचा असाच दिवस जसाच्या तसा लक्षात आहे. किती प्रसन्न नि आनंददायी. स्वर्गसुखी सकाळ होती ती. तू रेशमी वस्त्र परिधान करून आली होतीस नि मी माझं एक आवडतं पुस्तक तुला वाचून दाखवलं होतं, तुला मी अधिक आवडावा म्हणून.

टेनिसन

वुल्फगांग गटे. जर्मन कवी. नाटककार. विचारवंत. तोही टेनिसनसारखा दरबारी मंत्री होता. लॉर्डच म्हणा ना. त्याचं अनेक मैत्रिणींशी प्रेम होतं. तो सर्वांशी समान तन्मयतेनं प्रेम करायचा म्हणे. अनेक प्रेयसींना लिहिलेली अनेक पत्रं आजही उपलब्ध आहेत. हा गटे म्हणजे कालिदासाचं 'अभिज्ञान शाकुन्तलम्' नाटक वाचून झाल्यावर ते डोक्यावर घेऊन नाचला होता म्हणे. त्यानं जगाला 'विश्व साहित्य' (Welt literature) ही संकल्पना बहाल केली होती. त्याच्याकडून प्रेरणा घेऊन कवींद्र रवींद्रनाथ टागोर यांनी 'विश्वभारती विद्यापीठ' स्थापले. साने गुरुजींची 'आंतरभारती' संकल्पना... तिची मुळं गटेच्या विचारातच गुंतलेली आहेत.

वल्पचुअस त्याची अशीच एक प्रेयसी. तिनं विवाहापूर्वी अनेक वर्षे गटेची साथसंगत निभावली. विवाहापूर्वी त्यांना अनेक मुलं झाली. ती अनौरस गणली जाऊ नयेत म्हणून मग नंतर कर्तव्यभावनेनं गटेनी वल्पचुअसशी औपचारिक विवाह केला. विवाहास त्यांची मुलं उपस्थित होती... आई-बाबांच्या प्रेमाचं प्रतीक. साक्षीदार म्हणून! तिला लिहिलेल्या

एका पत्रात गटे म्हणतो–

प्रिये,

मी तुझ्याशी मनःपूर्वक प्रेम करतो. (हे जगातलं प्रेमपत्रात वापरलं जाणारं वैश्विक वाक्य होय. ते एका वेळी जितकं खरं तितकंच भ्रामक असतं; कारण प्रेम मुळातच चंचल वारू, शीड! कितीही वारं या शिडात भरा... ते रितं ते रितंच!) तुला सांगू... मिलनाच्या क्षणासारखा सुखद क्षण नाही! तू माझ्या मनात कायम राहत जा ना! माझं तुझ्याकडे एकच एक मागणं आहे... तू माझी नि माझीच असावी... 'Not only my, but mine only' त्याचं कारण सांगू... माझं मन मोठं ईर्षाळू आहे. मला माहीत आहे की जगात माझ्यापेक्षा सुंदर युवक आहेत... माझ्यापेक्षा ते तुझ्यासारखीला अधिक रिझवू, खूष करू शकतात हेही मी जाणतो... मला त्याची अधिक भीती वाटते.

-गटे

गटेची आणखी एक प्रेयसी होती. शारलॉट बफ तिचं नाव. ती त्याच्या एका मित्राची वाग्दत्त वधू होती. (साखरपुडा झालेली). तिला लिहिलेल्या पत्रात गटे साशंकता व्यक्त करत लिहितो,

प्रिये,

मी परत केव्हा येईन नाही सांगता येणार. देव जाणे (God Knows) ! तुझ्या मनाला 'त्या' दिवशी काय वाटलं मला माहीत नाही. तू माझ्याशी, भरभरून बोलत राहिलीस खरी आणि तू जाणूनही होतीस (अन् ते मीही ओळखून होतो.)... ते आपलं पहिलं नि शेवटचं मिलन आहे. तो गेला आहे. मीही जाणार आहेच. कालच जेव्हा मी अंगठी घातलेल्या तुझ्या हाताचं चुंबन घेतलं... आतून-बाहेरून शहारलो. तुझ्यात ही प्रेरणा, हा प्रवाह येतो कुठून? त्या खोलीत (शयनगृहात) मला परत येता येणार नाही, ही जाणीव किती दुःखद! तुझे बाबा मला दरवाजापर्यंत सोडायला आले होते... त्यांच्या जागी माझ्या लेखी तूच होतीस... ते तुझा अंश, वंश बनून निरोप द्यायला आलेले... तूच होती ते... तुझं घर सोडताना मी आतल्या आत हमसून हंबरडा फोडत होतो. ते तुला नि त्यांना कसे कळणार होते? तू आनंदात राहा. मी कायम तुझ्या हृदयात असेन नि तू माझ्या. त्याला सांग... मी निघून गेलोय. पण कायमचा नक्कीच नाही हं!

-गटे

कीट्स... जगप्रसिद्ध इंग्रजी कवी. त्याची कविता दुःख, दर्द, निराशेनं भरलेली असायची. भावविकल कवी म्हणून त्याची ख्याती. जगप्रसिद्ध व्यक्तींनी लिहिलेल्या पत्रांमध्ये भावविवश पत्र म्हणून क्रम लावायचा तर तो कीट्सचाच लागणार. तो सतत काळजीत असायचा. अर्थात् काळजी एकच होती. प्रेयसी फेनीनं त्याला स्वीकारावं. काळजीनं झुरत राहून तो क्षयी झाला. टी.बी. सॅनेटोरियममधून लिहिलेलं त्याचं हे पत्र जगप्रसिद्ध विकल पत्र म्हणून ओळखलं जातं. सारांशानं त्याचे भाव सांगायचे तर इतकंच म्हणता येईल.

प्रिय प्रियतमा,

मी तुला यापूर्वी पत्र लिहिलं होतं. वाटलं होतं मला तुझ्या आईला भेटावं लागेल. अर्थात् मागणी घालण्यासाठी... मला वाटतं तू मला समजून घ्यावं. माझं प्रेम स्वीकारावं. तुझ्या प्रेमानं मी किती विकल झालोय म्हणून सांगू... तू माझ्याकडे आकर्षित व्हावं म्हणून मी काय नाही केलं. मला वाटतं तू माझ्यावर भरभरून प्रेम करावं. तुला माहीत नसावं... माणूस प्रेमासाठीच जन्मत असतो. तू इकडे-तिकडे झाली तरी माझं हृदय हेलकावतं. तू अशा आविर्भावात जगतेस की जणू मी कोणीच नाही. अशी इतकी क्रूर होऊ नकोस. क्षणासाठी पण मला विसरू नकोस; पण मला असं सांगायचा अधिकार कुठाय? तो तू द्यावा असं किती वाटतं ते कसं सांगू? कालपासून तू मला किती छळत राहिलीस म्हणून सांगू? मी एक लाकूड विकणारी बाई पाहिली. तूच होतीस असा भास होत राहिला. काल माझ्या शरीराचं अंगप्रत्यंग परेशान, बेजार होत राहिलं प्रिये! त्या तुझ्या रूपावर मी किती भाळून आहे म्हणून सांगू! डोळे दिवसभर नुसते वाहत होते काल. माझी खात्री झालीय की आपलं प्रेम जितकं विशाल, व्यापक आहे... हृदय त्या मानानं किती छोटं, संकुचित! मी बरा होईपर्यंत तू कोणताही अन्य निर्णय घेऊ नको. तू मोकळेपणानं तुझ्या हृदयातलं सगळं का नाही सांगून टाकत? हा तुझा प्राणपक्षी या पिंजऱ्यातून उडून गेला तर तुला नुसतं पाहतच बसावं लागेल... अस्तंगत, अदृश्य होईपर्यंत. मी गायब होऊनच तुला चैन मिळणार असेल तर तसं सांगून टाक. मी तुझ्यासाठी गायबपण होणं पसंत करीन... तुझ्यासाठी काहीपण!



तू लिहिलयस की 'मला कामक्रीडा पसंत नाही.' हा तुझा विचार किती स्वार्थी नि क्रूर आहे हे कसं समजावू? जर तू माझ्याशी प्रेम करत असशील तर तेवढी तसदी घे. तो त्रास नको मानू. तू पार्टीत जातेस. सर्वांना रिझवतेस. मग मीच काय पाप केलंय? माझ्या मधुरे, फक्त एकदाच तुझं प्रेम मला कळू दे. तू जर असं केलं नाहीस, तर मी मरून जाईन. मला इतर स्त्री-पुरुषांसारखं फॅशनेबल, चकचकीत, दिखाव्याचं प्रेम नकोय. तू फक्त माझ्याशी प्रेम करावं. तुझ्या प्रेमासाठी मी फासावर जायलाही तयार आहे. माझ्या यापूर्वीच्या पत्रांतून तुला मी नाही का समजलो? मी असं किती दिवस झुरत काढायचे? मी बरा होऊन तरी काय उपयोग? 'तुम नहीं तो जिंदगी नहीं।'

-जॉन कीट्स

शेवटी व्हायचं तेच झालं. इतक्या आर्जवानंतरही फेनीनं कीट्सला नाकारलं. तो त्या धक्क्याने मेला. अवघ्या सव्विसाव्या वर्षी.

जगप्रसिद्ध व्यक्तींच्या प्रेमाच्या किती कथा सांगू? फ्राब्ज काफ्का यहुदी होता, तर प्रेयसी मिलेना इसाई. मुस्लिम नि ख्रिश्चन, उभय धर्मगुरूंनी त्यांना एक होऊ दिलं नाही. असं म्हटलं जातं... पृथ्वीवर ज्यांची शरीरं एक होऊ शकत नाहीत, स्वर्गात त्यांचे आत्मे एक होतात.

हिटलर, नेपोलियनला सारं जग घाबरायचं; पण दोघे आपल्या प्रेयसीपुढे लोळण घालत. सर्वांना थरकाप देणारा हिटलर, प्रेयसीपुढे थरथर कापत ढसाढसा रडायचा. नेपोलियनची प्रेयसी होती जोसफीन. जोसफीनशी त्याचं लग्न झालं; पण टिकलं नाही. त्यानं किती पत्रं लिहून जोसफीनच्या मिनतवाऱ्या केल्या; पण जोसफीन काही बधली नाही. 'माझ्या शब्दकोशात 'नाही', 'अशक्य' शब्द नसल्याची शेखी मिरवणारा नेपोलियन बोनापार्ट... जोसफीनने ते शब्द त्याच्या शब्दकोशातच नाही तर घशात गिळायला भाग पाडले... स्त्रियापण अपराजेय असतात हे सिद्ध करणारी जोसफीन... जगज्जेत्या नेपोलियनला हरवणारी अजिंक्य प्रेमसम्राज्ञी!

डार्विन जगप्रसिद्ध निसर्गप्रेमी! त्याच्या एमाला लिहिलेल्या पत्रात निसर्गच भरलेला असायचा. त्याला फक्त निसर्गच दिसायचा म्हणे! एमाला आलेल्या पत्रात फुलं, फळं, काटे, खार, पक्षी, प्राणी भरलेले असत. एमाचा संयम त्या वेळी गिनिज बुक असेल तर नक्कीच नोंदवला गेला असेल. डार्विनसारखेच शास्त्रज्ञ असलेले मेरी क्युरी नि पियरे क्युरी. दोघांच्या प्रेमपत्रांत शास्त्र, संशोधन, वाचनच भरलेलं असायचं. तेच त्यांचं पहिलं प्रेम होतं.

**पंजाबी कवयित्री**



अमृता प्रीतमनी इमरोजला लिहिलेली पत्रं म्हणजे प्रेम, प्रणय, भावतरंगांचा खजिनाच.

हिंदी प्रेमकवी हरिवंशराय बच्चन यांनी लिहिलेल्या रुबायांचे संग्रह 'मधुशाला', 'मधुबाला', मधुकलश' म्हणजे काव्यात्मक प्रेमपत्रेच. 'प्रकाशो' त्यांच्या आंतरिक प्रेयसीचं नाव. तिच्यासाठी बच्चन एकदा जमुनेत उडी मारायला गेले होते. ती 'प्रकाशो' भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील कितीतरी तरुण स्वातंत्र्ययोद्धयांच्या गळ्यातला ताईत होती. सर्व मित्रांत एकच मैत्रीण असणारी 'प्रकाशो'. तिनं वरलं मात्र हिंदी कथाकार यशपालांना. त्यांच्या घरी रुबायांची ती वही मी पाहिली होती. त्यावर लिहिलं होतं, 'प्रकाशो, तुम्हारी रूबाइयाँ, तुम्हें मुबारक' परवा मी चाळीस वर्षांनी परत यशपालांच्या घरी होतो. आता अम्मीजी... प्रकाशवती पाल नव्हत्या नि यशपालही! जगाचा निरोप घेतला त्यांनी. मी सुना, मुलं, नातवांना विचारलं... ती वही कुठाय? वाळवीनं खाल्ली म्हणे... ती पण डिजिटायझेशन, झेरॉक्स, स्कॅनिंग, फोटोग्राफीच्या काळात. प्रेम



जपायचं, जोपासायचं असतं हे वर्तमान पिढीस कळत नाही; कारण ते प्रेमपत्र लिहीत नाहीत. त्यांचं प्रेम शब्द, भाव, स्वर लवंडून, ओलांडून इमोजीवर येऊन ठेपलंय. त्यांना प्रेमपत्रं कशी कळणार?



drsklawate@gmail.com

गुस्से में बरहमी में ग़ज़ब में इताब में
खुद आ गए हैं वो मिरे ख़त के जवाब में
-दिवाकर राही

# बेस्ट सेलर्स


स्वामी


श्रीमान योगी


राधेय


पावनखिंड



ययाति



अमृतवेल


झोंबी



वपुर्झा



संभाजी


रुचिरा भाग-१


रुचिरा भाग-२


अदम्य जिद्द



डोंगरी ते दुबई



टर्निंग पॉइंट्स



द मॅजिक ऑफ थिंकींग बिग



प्लेइंग इट माय वे



मी मलाला


आवरण


संवादु अनुवादु


हाच माझा मार्ग



लज्जा



अद्वैत



बाजिंद


रेड टेप

# मान्यवरांची पत्रे

बिग बी अमिताभ बच्चन अभिनयसम्राट आहेच, पण तो तितकाच संवेदनशील माणूसही आहे. त्यानं आपल्या नातींना लिहिलेल्या पत्रातून त्याच्या विचारातली स्पष्टता व्यक्त होते. तो स्त्री सक्षमीकरणाचे निव्वळ नारे देत नाही, तर आत्मनिर्भरतेची बीजं आपल्या नातींच्या हृदयात पेरतो. त्याचे हे दिलासा आणि पाठबळ देणारे शब्द प्रत्येक मुलीला बळ देणारे आहेत. त्याचं हे अनोखं पत्र एका आजोबाचं मायाळू मन दाखवतंच पण हा समकालीन सांस्कृतिक दस्तऐवजही आहे.


AMITABH BACHCHAN

My very dearest Navya & Aaradhya

You both carry a very valuable legacy on your tender shoulders - Aaradhya, the legacy of your परदादा जी DR Harivansh Rai Bachchan ... and Navya, the legacy of your परदादा जी, Shri HP Nanda ...
Both your परदादा's gave your present surnames celebrated fame, dignity & recognition!
Both of you may be a Nanda or a Bachchan, but you are also girls ... women!
And because you are women people will force their thinking, their boundaries on you.
They will tell you how to dress, how to behave, who you can meet and where you can go.
Don't live in the shadows of peoples' judgement. Make your choices in the light of your own wisdom.
Don't let anyone make you believe that the length of your skirt is a measure of your character.
Don't let anyone's opinion of who you should be friends with, dictate who you will be friends with.





तारेतारकांचं आयुष्य सर्वसामान्य माणसांपेक्षा वेगळं असतं, असाच सर्वांचा समज असतो. पण जया बच्चन यांनी अभिषेक बच्चन यांच्या शिक्षिकेला लिहिलेली ही चिट्ठी हा समज खोडून काढते...


[illegible]th Feb 1986

Dear Mrs Saman,
My son Abhishek Bachchan is not wearing his uniform shoes to-day. Hope you will excuse him. The shoe was washed and has not dried yet.
Thank you
(Mrs) Jaya Bachchan
(Abhishek's mother)



# आठवणींच्या बेटावरून

यशोधरा काटकर



प्रिय यशोधरा

'केव्हातरी येईन' –
म्हणाली होतीस.
कधी येणार ?
माधवी वहिनींची मुलगी ह्या नात्याने
तुझ्याबद्दल वेगळी आत्मीयता.
तेव्हा भेट.
मुंबईत तू एकटी नाहीस.
हे घर आहे.

HAPPY 1987.
फोन कर.

तुझा /

२०१२१९८६

आज मी माझी पत्रांची फाईल उघडून बघते तेव्हा त्यात अनेक पत्रे लावून ठेवलेली दिसतात. यशवंतराव गडाखांसारखे धुरीण राजकारणी, म. द. हातकणंगलेकर, सोमनाथ कोमरपंत, सरोजिनी वैद्य आणि अनंत भावे अशी मराठीतली विद्वान साहित्यिक मंडळी, अरुण शेवतेसारखा साहित्यिक मित्र, बाबा कदम हे 'आमच्या' कोल्हापूरचे लोकप्रिय कादंबरीकार, किनवट-मांडवीसारख्या दुर्गम भागात शैक्षणिक प्रसाराचं कार्य आयुष्यभर अतिशय निष्ठेने करणारी उमामावशी राठोड... अशी किती नावे घ्यावीत? अमूल्य खजिनाच आहे हा मोठा. या प्रत्येक पत्रामागे एक कहाणी आहे, पूर्वपीठिका आहे आणि आठवणी? कधी हसवणाऱ्या, तर कधी डोळ्यांत पाणी आणणाऱ्यादेखील...त्या तर आहेतच. आठवणींच्या बेटावर फिरायला मला तसेही फार आवडतेच, म्हणून या पत्रखजिन्यातल्या ज्यांचे मला सर्वांत जास्त अप्रूप वाटत आले आहे, ती ही तीन पत्रे.



माझ्या लहानपणापासून अतिशय नियमित आणि विलक्षण प्रेमाने भरलेली पत्रे लिहिणारी एकच व्यक्ती होती माझ्यालेखी या जगात आणि ती होती माझी आज्जी. आईची आई. कोल्हापूरची माईआज्जी. लीलाबाई पेंढारकर.

आता मी म्हणजे पेंढारकर कुटुंबातले पहिले नातवंड. पहिली नात म्हणजे दुधावरची साय तीही (आईच्या शब्दांत) चांगली मलईदार आणि जाडजूड. शिवाय त्या काळात माझे आई-वडील होते गोव्यात, पोर्तुगिजांच्या राज्यात. तेव्हा चांगले शिक्षण मिळावे, वळण लागावे म्हणून या दांडगोबाला कोल्हापूरच्या विद्यापीठ हायस्कूलमध्ये दाखल करून लीलाआज्जीच्या स्वाधीन करण्यात आले होते. म्हणून माझ्या बालपणातली पहिली आठ वर्षे गेली ती आज्जीच्या सायसाखरेसारख्या सान्निध्यात; पण पुढे जेव्हा आई-वडील मुंबईला आले तेव्हा मी कितीही भोकाड पसरून हातपाय आपटले, आज्जीने सूं सूं करून डोळे टिपले तरी माझी रवानगी तिकडे करण्यात आली.

आणि आज्जीची पत्रे यायला सुरुवात झाली .

अर्थात ती यायची तिच्या लेकीला. आमच्या कुटुंबातल्या त्या काळच्या सगळ्याच सख्ख्या, चुलत, मावसआज्ज्या होत्या काटकसरीने जगणाऱ्या आणि टुकीने संसार करणाऱ्या. त्यातून लीलाआज्जीचा संसार होता साध्या माणसांचा. आपला आब कुठेही कमी न होऊ देता ती तो गाडा मोठ्या जबाबदारीने चालवत होती. म्हणून ती कधी पोस्टकार्ड, कधी थोडे खासगी लिहायचे असेल तर अंतर्देशीय आणि कधी फारच विस्ताराने लिहावेसे वाटले तर नातींच्या जुन्या वह्यातल्या काढून ठेवलेल्या कागदांवर लिहिलेले पत्र पाकिटातून धाडत असे. मोठ्या निबच्या पेनने लिहिलेली, मोडी लिपीचे वळण असलेल्या निळ्या शाईच्या सुंदर अक्षरांच्या ओळींनी भरलेली तिची पत्रे मला अजूनही आठवतात. दूरदेशी नशीब काढायला गेलेल्या आपल्या लेक-जावयाच्या काळजीने कातर होणाऱ्या आईची, नातीच्या काळजीने हळव्या होणाऱ्या आज्जीची ती पत्रे माझ्यासाठी मला तिच्या अंतःकरणातल्या असीम मायेशी जोडून ठेवणारा दुवा बनत गेली. शिवाय आज इतका पाऊस पडला की संध्यामठाच्या पायऱ्या पाण्यात गेल्या, सदामामाची जर्सी गाय व्याली म्हणून मामीने खरवस केलाय, सईला नोकरीसाठी दोन बसेस बदलून कसे जावे लागते, इथपर्यंत तपशील



दिलेले असायचे. ते मला कोल्हापूरचे घर, विद्यापीठ, तपोवन आश्रम, रंकाळ्याची आठवण करून द्यायचे, म्हणून मी तिच्या पत्रांची आसुसून वाट बघत असे.

पण तिचे एक खासमखास पत्र अगदी मला एकटीलाच यायचे ते माझ्या वाढदिवसादिवशी! आणि ही प्रथा तिने अगदी मी आज्जी आणि ती पणजी होईपर्यंत कायम ठेवली. पुढे मामेबहिणींच्या मागे लागून ती माझ्यासाठी ग्रीटिंग कार्ड आणायला लावी; पण त्याच्या आतही तिचे म्हणून वेगळे आशीर्वादपर पत्र असे. पत्रात सर्वांत वर 'श्री' लिहिण्याऐवजी 'श्रीकृष्ण' लिहीत असे आणि पत्राच्या शेवटी शिवप्रभूंच्या वतीने सर्वांना आशीर्वाद दिल्याशिवाय तिचे पत्र संपत नसे; कारण श्रीकृष्ण आणि शिवाजी महाराज हे दोन्ही तिच्या लेखी परमेश्वराचे अवतार, तिची अढळ श्रद्धास्थाने, त्यांचे अस्तित्व असल्याशिवाय तिचे पत्रच काय, कोणतेच काम पूर्ण झाले नसते. ते लिहून ती 'लाडक्या सौ. यशूस' पत्र लिहायला सुरुवात करे, म्हणून पहिल्याच वाक्यापासून मन सात्त्विकतेने आणि खुशीने भरून येई.

तिचे जे पत्र मी या लेखाबरोबर दिले आहे त्यातही तिचे किती साधे शब्द; पण त्यात माझ्या कुठल्याशा छोट्याशा कामगिरीबद्दल अभिमान, जाईचे कौतुक आणि पप्पांना जाऊन इतकी वर्षे लोटली तरी त्यांच्याबद्दलचा आदर, शिवाय 'मुंबईत सारखे काहीतरी होत असते म्हणून सांभाळून राहा' हा इशारा, 'सईला नववा महिना लागला, ईश्वरकृपेने आणि तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादाने सगळे व्यवस्थित व्हावे' अशी सगळी काळजीभरली माया शब्दाशब्दांतून व्यक्त होत आली आहे आणि हे पत्र तिने तिला ८० वर्षे पूर्ण झाली त्या दिवशी 'चष्मा न लावता' लिहिले आहे. एका आडगावात जन्मलेल्या माझ्या आज्जीच्या जन्माची तारीख कुठे कधी नोंदली गेली होती, कुणी कधी तिचा वाढदिवस साजरा केला होता? तिला तरी कुठे त्याची हौस होती; पण तिच्या या वाढदिवशी मात्र तिला कुणीतरी आतूनच आवाज दिला होता. फोन करता आला असता; पण पत्र लिहावेसे वाटले होते.

की पुढच्या हाका ऐकू येऊ लागल्या होत्या?

कदाचित ते फक्त तिलाच माहिती होते.

पुढे वाचनाचे वेड वाढत जात चांगला जाडजूड चष्मा लागायच्या 'टीनएज' वयात माझ्या हातात एक पुस्तक पडले,



ते होते 'श्रीमान योगी.' आता एवढा मोठा तो 'सागा' वाचून काढायचा म्हणजे शाळा, अभ्यास, गृहपाठ, चित्रकला अशा महत्त्वाच्या बाबी बाजूला ठेवून, सगळ्यांच्या नजरा बचावून एके ठिकाणी ठिय्या मारणे गरजेचे होते. शाळेतल्या लायब्ररीमधल्या वाटोळ्या लाकडी टेबलाखाली लपून बसत ते पुस्तक वाचणारी यशू मला अजूनही आठवते. पारच झपाटून टाकणारे दिवस होते ते. मला इतःपर दिसलेले शिवप्रभू ईश्वराचा अंश असलेले अवतारी, विभूतिमय व्यक्तिमत्त्व होते; पण या चरितकहाणीतून दिसणारे शिवाजी महाराजांचे हाडामांसाच्या माणसाचे, मानवी भावभावना असणारे स्वरूप मला विलक्षण खरेखुरे, थोऽडासा हात पुढे केला असता तर त्यांच्या अंगरख्याला स्पर्श करण्याइतके जवळचे वाटत होते. त्यामुळे मी इतकी झपाटून गेले की त्या तिरीमिरीतच मी त्याचे लेखक श्रीमान रणजित देसाई यांना माझे पहिले (आणि शेवटचे) 'फॅन' पत्र लिहिले. ते तेव्हा 'माझा गाव', 'स्वामी' आणि 'श्रीमान योगी'चे लेखक म्हणून प्रसिद्धीच्या ऐन शिखरावर होते. अशा सुप्रसिद्ध, वलयांकित साहित्यिकाकडून एका अनोळखी शाळकरी मुलीला उत्तर येईल ही अशक्य गोष्ट होती; पण एके दिवशी ते आले आणि पत्रापाठी असलेले त्यांचे नाव बघून घरात एकच हलकल्लोळ उडून गेला; पण आता कुणाला होती त्या ओरड्याची पर्वा? महाराणी येशूबाईंना चक्क शिवछत्रपतींच्या सहीशिक्क्याचा खलिताच आलेला होता. त्यांनी लिहिलेल्या पत्रात त्यांनी 'प्रिय यशोधरा' असा मायना लिहून मला सरळसरळ खिशातच टाकले होते. पुढचा मजकूरही अतिशय जिव्हाळ्याने, आत्मीयतेने भरलेला, भाषा अगदी साधीच पण मध्येच 'श्रीमान योगी'चे यश माझे नाही. श्री शिवप्रभूंचे चरित्रच मुळात दिव्य आहे. सूर्याचे वर्णन करू लागलो की तेथे प्रकाशच मिळणार. तेथे

अंधकार येईल काय?' अशी वि.स.खांडेकरी शैलीतली चतुराईही त्यांनी केली आहे. ते काही असो. साध्या अंतर्देशीय पत्रावर हिरव्या शाईने किरट्या अक्षरात लिहिलेले ते पत्र पाहून खूष होऊन इतकी तरंग तरंग तरंगले ना मी, की काय विचारता! खूष म्हणजे खूषच की हो अगदी ! इतके दिवस मी जगापासून विलग असलेल्या औद्योगिक वसाहतीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय चारचौघींसारखी एक सामान्य शाळकरी मुलगी होते; पण आता मात्र मी कुणीतरी खास होऊन गेले होते; कारण ज्यांच्या लिखाणावर अवघा महाराष्ट्र वेडावलेला होता त्या पद्मश्री रणजित देसाईंनी माझी दखल घेतली होती. वेळात वेळ काढून पत्र लिहिले होते. आणि तेवढ्यात 'बाबांना 'श्रीमान योगी' आवडले का, तेवढी बातमी काढून तू मला कळव' असे म्हणून त्यांनी माझे तरंगणारे विमान सुईक्कन खाली आणले होते. आता बाबा म्हणजे माझे आजोबा. प्रखर शिवभक्त चित्रपटमहर्षी भालजी पेंढारकर. त्यांना हे असे प्रश्न विचारायची हिंमत इथे कुणाच्या अंगात होती? नक्कोच ते! मी शाळेच्या दिशेने धूम ठोकली.

पुढे रणजित देसाई 'दादा'बनून आमच्या आणि आम्ही त्यांच्या कुटुंबाचा हिस्सा बनणार होतो, तेव्हा त्यांच्या आणि माझ्या कुटुंबातल्या, आमच्याशी प्रेमादराच्या धाग्यांनी जुळलेल्या अनेक माणसांना ही नव्या नात्यांची सुरुवात स्वीकारणे मुळीच सोपे गेले नाही. तो छुपा-उघड विरोध नंतरही अधूनमधून सर्वांना छळत राहिला; पण दादा मला कधी परके, सावत्र वाटले नाहीत. आमचे अगदी पहिल्या भेटीपासून जे सूत जमले ते कायमचे. त्यामागे कुठे तरी या पत्राद्वारा जोडलेल्या नात्याचा धागा होता, त्या अनुबंधाची गाठ कुणीतरी आधीच बांधून ठेवली होती. पुढे माझ्या बहिणींची एकापाठोपाठ लग्न ठरत गेली तेव्हा 'वज्रचुडेमंडित सकलसौभाग्यसंपन्न सौ. यशोधरादेवींना' बहिणींच्या लग्नाच्या तयारीसाठी 'तत्काळ डेरेदाखल व्हावे' असा भक्कम आदेश देणारे फर्मानही त्यांनी लिहिलेले मला आठवते.

तसा दादांना पत्रे लिहिण्याचा, आलेल्या पत्रांना उत्तरे देण्याचा खूपच शौक; नव्हे ती त्यांनी त्यांची जबाबदारीच मानली होती. खरे तर लिखाण, भाषणे, साहिंत्यिक कार्यक्रम,संमेलन, प्रवास अशा गोष्टींत ते अगदी व्यग्र झालेले होते. शिवाय अशा सीमाभागातल्या खेड्यात राहणारा, आपली जमीन कसणारा लेखक असतो तरी कसा ते बघायला, त्यांच्याशी संवाद साधायला आसुसलेले त्यांचे चाहते वाचक कधीही वेळकाळ न बघता सरळ घरीच येऊन टपकत. दादा सगळे शांतपणे निभावून नेत; पण रोज सकाळी लिखाणाला बसण्यापूर्वी आलेल्या पत्रांना उत्तरे लिहिण्याचा त्यांचा शिरस्ता त्यांनी कधी चुकवला नाही आणि पत्रे तरी किती आणि कुठल्या कुठल्या देशा-परदेशातून आलेली! रोज सकाळी दादांचे सहकारी-लेखनिक पांडुरंग कुंभार ऊर्फ पांडूगुरुजी त्यांच्यापुढे आलेल्या डाकेची चळत ठेवत. मग अगदी मन लावून पत्रवाचन, मग उत्तरे लिहिणे सुरू होई. सुंदर, नितळ पांढऱ्या कागदावर छापलेल्या त्यांच्या नावाच्या लेटरहेड्सवर ते बोरूसारख्या लांबुडक्या सोनेरी पेनने हिरव्या शाईत स्वतः उत्तरे लिहीत बसत. कधी गुरुजींना उत्तर 'डिक्टेट' केले जाई आणि गुरुजी ते आपल्या सुबक हस्ताक्षरात लिहून काढत, तर कधी आपल्या खानदानी आळशीपणाला स्मरून ती जबाबदारी गुरुजींवर सरळ टाकून देऊन पद्मश्री तिथून पळ काढत; पण असे क्वचित होई. त्यांचा प्रत्येक वाचक त्यांच्या लेखी लाख मोलाचा होता, वाचकाकडून आलेल्या प्रत्येक पत्राला उत्तर देणे ही त्यांच्या लेखी महत्त्वाची जबाबदारी होता. ती त्यांनी अतिशय निष्ठेने, कसोशीने पाळली.

खरे म्हणजे एखाद्याच्या अंगात लिखाणाचा 'व्हायरस' शिरला की तो माणूस अगदी एकलकोंडा, माणूसघाणा आणि आत्ममग्न होऊन जात असतो. जिथे वीज-पाणी-रस्ते अशा सुविधांची वानवा होती, अशा कोवाडमधल्या एकांतात राहणारे दादा साहित्यलेखनात खूप रमले. त्यांच्या घराच्या सगळ्या वरच्या टोकावर जिन्यावर असावी तशी त्यांची लिखाणाची खोली होती. तिथून त्यांना समोर पसरत गेलेल्या गावाची कौलारू छपरे, हिरव्यागार रंगाच्या अनेक रसरशीत छटा ल्यालेली शेते दिसत, ताम्रपर्णी नदीवरून येणारा वारा त्यांचा जीव सुखावत राही. ऋतुचक्रानुसार सतत बदलते ग्रामीण 'लॅन्डस्केप' निरखत राहणारा, त्या निसर्गसंस्कृतीशी एकरूप होत गेलेला हा लेखक होता. अभिजात रसिकता आणि कल्पक सर्जनशीलतेचा संगम त्यांच्या ठायी जन्मजातच होता. त्याला साहित्य, संस्कृती आणि इतिहासाच्या अभ्यासाची जोड त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक दिली होती. म्हणून त्यांना अशी कसदार साहित्यनिर्मिती दीर्घ काळ करता आली; पण त्यांची लोकांत मिसळण्याची भूकही तेवढीच तीव्र होती. एकांत आणि लोकांत यामध्ये संवादाचे पूल बांधण्यासाठी ते पत्रे लिहीत राहिले.

मराठीतल्या इतर ज्येष्ठ लेखक-लेखिकांनीही पत्रे लिहिली, त्यांचे संग्रह प्रकाशित होऊन त्यांनी मराठीत मोलाची भर घातली आहे; पण या साहित्यिकांना ओढ होती ती समानशील माणसांची, त्यांची 'इंटलेक्चुअल' तडफड समजून-उमजून घेणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची! दादांचे तसे नव्हते. त्यांना त्यांच्याशी संपर्क साधू इच्छिणारा प्रत्येक वाचक महत्त्वाचा होता, मग तो कुठल्याही स्तरातला, पार्श्वभूमीचा असो. शिवाय तो काळ आजच्यासारखा गूगल, ऑडिओ बुक्स, ई-बुक्स आणि किंडलचा नव्हता. मराठी साहित्याचा वाचक अजूनही सार्वजनिक वाचनालयात नंबर लावून पुस्तकं मिळवून वाचणारा, साहित्य संमेलनांसाठी गर्दी करणारा होता. त्यात जितका भाबडे प्रेम करणारा वर्ग होता, तितकाच त्यांच्या प्रतिभेची जातकुळी ओळखणारा जाणता, अभ्यासू , डोळस वाचकही होता. तो अनेक गूढप्रश्न विचारत होता, त्या प्रश्नाच्या गाभ्यापर्यंत जाण्यासाठी धडपडत होता, हे दादा पक्के जाणून होते. त्या वाचकांना दादांच्या आयुष्याबद्दल, साहित्याबद्दल अपार कुतूहल होते, म्हणून ते त्यांना आलेल्या प्रत्येक पत्राला उत्तर देत संवाद साधण्याचा प्रयत्न करत राहिले.

पुढे माझ्या आयुष्यात मला कुणीतरी ' ये गं पोरी ...' म्हणायची गरज होती तेव्हा आज्जीची कूस नव्हती आणि दादा...तेही नव्हतेच. माझ्या आयुष्यातल्या मोठ्या अस्थिर कालखंडातून जात असताना माझी प्रेमाची माणसे माझ्या आजूबाजूला नव्हती आणि ती का नाहीत या विचाराने मी आणखीनच कोसळून जाऊ लागले होते. अशा वेळी प्रसिद्ध साहित्यिक वसंत पुरुषोत्तम काळे यांच्याशी भेट होणे हा माझ्यासाठी आश्वस्त करणारा एक सुखद धक्का होता. तेव्हा वपु 'पार्टनर', 'वलय', 'ठिकरी', 'वपुर्झा'सारख्या कथा-ललितलेखसंग्रह-कादंबऱ्यांमधून घराघरात पोचले होते, कथाकथनाच्या माध्यमातून वाचकांच्या प्रत्यक्ष भेटीला अवतरत होते

आणि ऑडिओ टेप्समधून परदेशी स्थायिक झालेल्या मराठी मंडळींच्या मनात ठाण मांडून बसले होते. आर्किटेक्टचा व्यवसाय, लिखाण, कथाकथन याबरोबर कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये ते चांगलेच अडकलेले होते. माझी अशा कुणी कितीही लोकप्रिय का असेना, साहित्यिकाशी ओळख करून घेण्याची मनःस्थितीच तेव्हा नव्हती; पण जेव्हा त्यांची भेट झाली तेव्हा अतिशय अकृत्रिम जिव्हाळ्याने त्यांनी माझे स्वागत केले. कौटुंबिक-वैयक्तिक ताण कुठेही जाणवू न देता घरगुती पद्धतीने उत्तम आदरातिथ्यही केले. खूप गप्पा मारल्या, हसवले; पण त्या हसण्यामागे खूप आत कुठेतरी दुःखाची, वेदनेची एक कळ आहे, त्यांनी ती दडवण्याचा आटोकाट प्रयत्न केला तरी जाणवण्याइतकी तीव्र आहे, हे सतत जाणवत राहिले. त्यांच्या घराच्या प्रवेशद्वाराशी त्यांचा लेटर बॉक्स होत. त्याचे 'वपुं'नी केलेले नामकरण होते 'प्लेजर बॉक्स.' त्यात वाचकांच्या पत्रांचा ढीग रोज येऊन पडत होता; पण मुंबई महानगरीत अखंड वाहणाऱ्या गर्दीत राहणारा, वाचकांच्या गराड्यात रमणारा हा माणूस कुठे तरी आतमध्ये प्रचंड एकटा होता. वेळात वेळ काढून त्या प्रत्येक पत्राला स्वतः उत्तर लिहिण्याच्या हट्टातून हा लेखक अनेकांशी जोडला, जुळत गेला. ती पत्रे त्यांच्यासाठी अनेक कथा-कहाण्यांची बीजे घेऊन येत होती, त्यांच्याकडे 'वपुं'मधला संवेदनशील साहित्यिक मोठ्या आस्थेने बघत होता, त्यांच्याबद्दलच्या कणवेने झपाटून जात लिहीत होता आणि अनेकदा त्या परिघापलीकडे जाऊन त्या माणसांशी प्रत्यक्ष नाते जोडून त्यांची सुख-दुःखे वाटून घेत होता. स्वतःचे सगळे प्रश्न बाजूला सारत त्यांनी त्यांच्या घराचे दरवाजे माझ्यासाठी सतत खुले ठेवले. 'मुंबईत तू एकटी नाहीस; हे घर आहे' ही जाणीव मला करून दिली. त्यासाठी फोनवरून पिच्छा पुरवला आणि त्यांच्या त्या खास मिताक्षरी शैलीत हे पत्रही लिहिले. माझे मुंबईत इतके नातेवाईक होते, साहित्य सहवासात देखील अनेक ओळखीची मंडळी राहत होती; पण 'वपु' त्या मोजक्या मंडळींमध्ये होते, की ज्यांनी आमची पूर्वीची मुळीसुद्धा ओळख नसताना आत्मीयतेचे, जिव्हाळ्याचे नाते जोडले, ते दृढ करण्यासाठी पाठपुरावा केला, वडीलकीच्या नात्याने प्रसंगी रागावून दमही दिला. मला त्या काळात असे कुणीतरी म्हणायची फार गरज होती, ती त्यांनी पुरी केली आणि मला पाठिंब्याचे, आत्मविश्वासाचे बळ दिले. माझी खात्री आहे की ब्रह्मांडातल्या कुठल्याशा मितीवरून ते आत्तासुद्धा वाकून माझ्याकडे बघत असतील आणि म्हणत असतील, 'वेल डन यशोधरा!'



lekhikaat12a@gmail.com



नवं कोरं




मानवतेला लाजवणाऱ्या घटनेच्या
भयाण परिणामांचा लेखाजोखा...
नागासाकीतल्या विध्वंसाची
पडद्यामागची कहाणी.

# नागासाकी

मूळ लेखक - क्रेग कोली
अनुवाद - डॉ. जयश्री गोडसे

पृष्ठसंख्या : ३६०। किंमत : ₹४००

Book Available

हातपाय नसलेल्या देहाला
निधड्या मनाचं पाठबळ देणाऱ्या,
अवकाशाला गवसणी घालण्याचं
सामर्थ्य असणाऱ्या निक व्होयचिचचं
प्रेरक आत्मकथन.




# लाइफ विदाउट लिमिट्स

मूळ लेखक - निक व्होयचिच
अनुवाद - प्रसाददत्त गाडगीळ

पृष्ठसंख्या : २२०। किंमत : ₹२८०

Book Available




उद्योजकांमध्ये निग्रहानं
पाऊल उचलण्याचं
विश्वास पेरणारं
प्रेरणादायी पुस्तक..

# अराइज, अवेक

मूळ लेखक - रश्मी बन्सल
अनुवाद - सुनीति काणे

पृष्ठसंख्या : २१२। किंमत : ₹२४०

Book Available

# सावंत साहेबांचा पत्रव्यवहार

**मृणालिनी सावंत**





लेखक वाचकाला किंवा वाचक लेखकाला पत्र लिहितो हे मला माहीत नव्हतं. अनुभवानंच ते कळलं. 'मृत्युंजय' कादंबरी वाचून झपाटून गेल्यामुळे मी लेखक शिवाजी सावंत यांना पत्र लिहिलं आणि आश्चर्य म्हणजे लगेचच त्यांनी माझ्या पत्राचं उत्तरही पाठवलं. पुढे तो पत्रव्यवहार वेगळ्या वळणावर गेला, ते वेगळं! आमचं लग्न झाल्यावर माझ्या लक्षात आलं, त्यांना त्यांच्या वाचकांची अशीच भारावून गेलेली, झपाटून गेलेली अनेक पत्रं यायची आणि प्रत्येक पत्राला ते उत्तर द्यायचे– स्वहस्ते– घाटदार अक्षरात, पत्रलेखन म्हणजे त्यांच्या मते वाचकांच्या रसिकतेला दाद देणं असायचं. पत्रोत्तर पाठवलं की ते वाचकाच्या आलेल्या पत्रावर लिहून ठेवायचे– 'पत्र दिले.'

साप्ताहिकं, मासिकं, वर्तमानपत्रं यांचं सावंत साहेबांचं भरपूर वाचन असायचं. त्यांच्या लिखाणाच्या संदर्भातल्या पुस्तकांचं वाचनही भरपूर असायचं. तुलनेत कथा, कादंबऱ्या, ललित लेख अशा प्रकारचं वाचन कमी असायचं; पण एखादं पुस्तक आवडलं तर त्याच्या लेखकाला पत्र लिहून मनापासून ते त्या पुस्तकाचं कौतुक करायचे. अशी दोन-तीन पुस्तकं तर मला आठवतातच. श्री. सुधाकर गायकवाड (नाव बहुतेक बरोबर असावं) नावाच्या लेखकाचं 'शूद्र' नावाचं एक छोटंसं पुस्तक त्यांच्या वाचण्यात आलं. पुस्तक वाचून झाल्याबरोबर त्यांनी लेखकाला पुस्तक आवडल्याचं पत्र लिहिलं; दुसरं पुस्तक होतं श्री. भीमराव गस्ती यांचं 'बेरड.' ते वाचूनही लगेच पुस्तकाची प्रशंसा करणारं पत्र त्यांनी श्री. गस्तींना पाठवलं आणि गस्तींचंही त्या कौतुकानं भारावल्याचं पत्र आलं. तिसरं पुस्तक होतं कांचन घाणेकर यांचं 'नाथ हा माझा.' 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकात संभाजीच्या भूमिकेत रंगून गेलेल्या डॉ. काशिनाथ घाणेकरांविषयी सावंत साहेबांना खूप प्रेम होतं. कांचनताईंच्या लेखनातला साधा सरळपणा, पुस्तकाच्या नायकाशी असलेलं त्यांचं भावनिक नातं, हे सगळं सावंत साहेबांना आवडलं आणि तसं त्यांनी पत्रातून कांचनताईंना कळवून टाकलं. कांचनताईंच्या आलेल्या खुशीपत्रानं सावंत साहेबही खूश झाले. वाचकांच्या पत्रांना ते खुशीपत्रं म्हणायचे. वाचकाला आणि लेखकाला, दोघांनाही खुशी देणारी पत्रं.


आदरणीय श्री शिवाजी सावंत यांना,
सादर नमस्कार
[illegible]

एखादी साहित्यिक कलाकृती त्यांना मनापासून आवडली, तर त्या कृतीची आणि साहित्यिकाची स्तुती करताना त्यांनी कधी कद्रूपणा केला नाही. कवी प्रभात यांचं हिंदी खंडकाव्य त्यांनी वाचलं आणि ते वेडावून गेले. शिवाजी महाराजांवरील 'राष्ट्रपुरुष' नावाचं ते काव्य मला त्यांनी अनेक वेळा वाचून-म्हणून दाखवलं. एवढंच नव्हे, तर साप्ताहिक 'सोबत'मध्ये त्यांनी एक दणदणीत लेख लिहून कवी प्रभात यांचं काव्यसौंदर्य उलगडून दाखवलं. तेवढं करूनही त्यांचं समाधान झालं नाही, तेव्हा त्यांनी कवी प्रभात यांना पत्र लिहून त्यांच्यावर मनसोक्त स्तुतिसुमनं उधळली.

वाचक हे त्यांच्या कुटुंबाचे सदस्य असल्यासारखेच होते आणि हे सदस्य शेकडोंनी होते. त्यामुळे त्यांचा पत्रव्यवहारही मोठा होता. वाचकांच्या पत्राला सावंत साहेबांनी उत्तर दिलं नाही, असं सहसा झालं नसेल. 'मृत्युंजय' वाचून वेडेच झालेल्यांची असंख्य पत्रं असायची. त्यांना तर ते उत्तर लिहायचेच; पण पुस्तकाविषयी शंका विचारणाऱ्यांना, त्याच्या मते पुस्तकात असलेल्या चुका सांगणाऱ्या वाचकालाही ते उत्तर लिहायचे आणि मिस्कीलपणे विचारायचे, 'तेवढं सोडून, सहाशे पानांतली राहिलेली पानं फारशी वाईट नाहीत ना?' अगणित गोड स्तुतिपत्रांनी गोड झालेल्या तोंडाला रुचिपालट म्हणून काही अद्‌भुत पत्रं आलेली मला आठवतात. लक्षात राहण्यासारखी त्यांची संख्या नसली तरी त्यांच्या विचित्रपणामुळे ती लक्षात राहिली आहेत. एका वाचकानं पत्रात लिहिलं होतं, 'शेक्सपिअर हा एक फालतू लेखक होता. तुम्हाला मराठी भाषेतील शेक्सपिअर म्हटलं जातं, म्हणजे तुम्ही किती फालतू आहात, हे तुम्हाला कळलंच असेल.' या पत्राला सावंत साहेबांनी नक्कीच उत्तर लिहिलं असतं;

परंतु पत्रलेखकानं त्याचा पत्ता लिहिलेला नसल्यामुळे, सावंत साहेबांचं मनोरंजन करणारं ते पत्र अनुत्तरित राहिलं.

आणखी एक पत्र यायचं– पोस्टकार्ड– त्यावर नुसते– रिक्षाच्या नंबरसारखे नंबर लिहिलेले असायचे. या पत्राला काय उत्तर द्यावं हे मात्र सावंत साहेबांना कळलं नाही.

एका लेखकानं '...आणि कृष्णानं अर्जुनाचा रथ नरकात नेला' या नावाचं स्वलिखित पुस्तक पाठवून, 'अभिप्राय द्यावा' असं पत्रही पाठवलं. त्यांची दोन-तीन पत्रं आली; पण सावंत साहेबांनी त्या पत्रांना उत्तरं दिली नाहीत. मी त्यांना म्हटलं ''तुम्ही उत्तर का देत नाही आहात?'' त्यावर ते म्हणाले, ''कृष्णाविषयी मला काय वाटतं ते मी 'युगंधर'मध्ये लिहिलं आहे. तेच त्यांच्या पत्राचं उत्तर आहे. आता मी उत्तर पाठवलं की त्याच्यावर ते पुन्हा काहीतरी विचारणार. अशा प्रकारचा पत्रव्यवहार वाढवायची माझी इच्छा नाही.''

जे वाचून लेखकाला आपल्या लिखाणाचं सार्थक झाल्यासारखं वाटेल, अशी खूप पत्रं सावंत साहेबांना यायची. त्यातलं एक पत्र एका कॉलेज विद्यार्थ्याचं होतं. त्यानं लिहिलं होतं, 'मी अशा एका टोळीत सामील झालो होतो, की ज्यामुळे पुढे माझ्या आयुष्याचं काय झालं असतं, ते सांगता येत नाही. त्या वेळी 'मृत्युंजय' माझ्या हातात पडलं आणि माझं आयुष्य सावरलं गेलं. मी भाग्यवान होतो; पण अशा ज्या मुलांना 'मृत्युंजय' वाचायला मिळत नसेल, त्यांचं काय होत असेल!'



अशा प्रकारच्या पत्रांना सावंत साहेब प्रोत्साहन देणारी पत्र लिहायचे. या मुलाला त्यांनी काय लिहिलं, हे मात्र मला माहीत नाही.



CHANDRAKANT KHOT

MASTER OF ARTS (UNIVERSITY OF BOMBAY)





सुरेश भट

विद्या सप्रे नावाच्या लेखिकेनं दै. 'केसरी' मध्ये एक लेख लिहिला होता. त्यात सावंत साहेबांच्या लिखाणावर काही टीकाटिप्पणी होती. त्यावर सावंत साहेबांचा आणि त्यांचा काही पत्रव्यवहार झाला. सप्रेबाईंचं पत्र आलं तेव्हा सावंत साहेब परगावी गेले होते. आल्यानंतर त्यांनी सप्रेबाईंना लिहिलेल्या पत्रात, आपण परगावी गेलो असल्यामुळे तुमच्या पत्राला उत्तर द्यायला उशीर झाला, असं म्हटलं होतं. त्यावर सप्रेबाईंचं पत्र आलं. त्यांचं म्हणणं होतं, की त्यांनी कुरिअरनं पाठवलेलं पत्र सावंत साहेबांना मिळाल्याची सावंत साहेबांची सही आहे. पत्र उशिरा हातात पडल्यामुळे पत्रोत्तराला उशीर झाला, असं सावंत साहेब खोटं सांगताहेत. सप्रेबाईंच्या या आरोपामुळे सावंत साहेब बुचकळ्यात पडले. झालं असं होतं, की हे नसताना पोस्टानं आलेलं सप्रेबाईंचं पत्र मी फोडलं होतं. नेहमी मी पत्रावर पत्रलेखकाचा पत्ता असला तर एन्व्हलप फाडून टाकायची; पण या वेळेला एन्व्हलप पत्राला जोडून ठेवायची बुद्धी मला का झाली होती, कोणास ठाऊक! ते एन्व्हलप सावंत साहेबांनी पाहिलं आणि सप्रेबाईंना पत्र लिहिलं, 'तुमचं पत्र कुरिअरनं आलेलं नसून, पोस्टानं आलेलं आहे आणि ज्या तारखेला कुरिअरनं पत्र मिळाल्याची माझी सही आहे, असं तुम्ही म्हणता आहात, त्या तारखेला तुमचं पत्र पोस्टात पडल्याचा एन्व्हलपवर पोस्टाचा स्पष्ट शिक्का आहे. मग कुरिअरनं पत्र मिळाल्याची माझी सही तुम्हाला कशी मिळाली? आता खोटं कोण बोलतं आहे ते तुम्ही ठरवा.' या पत्रासोबत सावंत साहेबांनी त्या एन्व्हलपची झेरॉक्स कॉपीही त्यांना पाठवली. या पत्राला सप्रेबाईंचं पत्रोत्तर आलं नाही. फोन आला. फोनवर त्या सावंत साहेबांना 'सॉरी' म्हणाल्या.

सौ. रांगणेकर या बाई पायाला फ्रॅक्चर झाल्यामुळे हॉस्पिटलमध्ये होत्या. त्यांना 'युगंधर' वाचायचं होतं. त्यांनी विकत घेतलेल्या 'युगंधर'च्या प्रतीत काही पानं गायब होती. त्यांनी प्रकाशकाशी संपर्क साधला; पण प्रकाशकाकडून त्यांना काहीच रिस्पॉन्स मिळाला नाही, तेव्हा वैतागून त्यांनी लेखक शिवाजी सावंतांना पत्र पाठवलं. वाचकांच्या बाबतीत सावंत साहेब खूप सेन्सिटिव्ह होते. त्यांनी रांगणेकरबाईंना पाठवण्यासाठी स्वतःजवळची एक प्रत घेतली, तर तिच्यातही ती पानं नव्हती. तेव्हा सावंत साहेबांनी दुसऱ्या एका प्रतीतून ती पानं काढून घेतली आणि रांगणेकरबाईंना पाठवायच्या पुस्तकात जोडली आणि ते पुस्तक पाठवून दिलं. शिवाय यात प्रकाशकाचा काही दोष नसतो, असं पत्रही लिहिलं. आपली मागणी अशा प्रकारे पूर्ण झालेली पाहून कौतुकानं सावंत साहेबांविषयी लिहिलं– 'कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली!'

कोल्हापूरचे असल्यामुळे (कोल्हापूर जिल्ह्यातील) सावंत साहेबांना श्री. रणजित देसाई ही व्यक्ती आणि त्यांचं साहित्य दोन्हीविषयी विशेष जिव्हाळा होता. रणजित देसाई हे त्यांनी स्वीकारलेल्या कार्यक्रमाला जाऊ शकत नव्हते, अशा निदान दोन वेळा तरी त्यांची सावंत साहेबांना पत्रं आली होती, 'मी हा कार्यक्रम स्वीकारला खरा, पण काही कारणांमुळे मी त्या कार्यक्रमासाठी जाऊ शकत नाही. माझ्यासाठी, मुख्य पाहुणा म्हणून तू या कार्यक्रमाला जावंस, अशी माझी इच्छा आहे.' सावंत साहेबांनी त्या इच्छेचा आदर केला आणि त्यांना लिहिलं, 'सरकार, तुमची आज्ञा म्हणून मी या कार्यक्रमाला हजर राहतो. एरवी मी 'सेकंड प्रेफरन्स' स्वीकारत नाही.' रणजित देसाई 'सरकार' आणि सावंत साहेब 'राजे' हे नातं मोठं मजेशीर होतं.



कोल्हापुरात सावंत साहेबांचे जिव्हाळ्याचे मला माहीत असलेले स्नेही तीन. श्री. आर. के. कुलकर्णी, श्री. अशोकराव गगराणी आणि श्री. ना. वा. देशपांडे.

आर.कें.च्या पत्रव्यवहाराविषयी मला फारसं काही माहीत नाही; पण अशोकराव आणि ना. वा. देशपांडे या दोघांशी झालेल्या पत्रव्यवहारात

व्यक्तिगणिक बदलणाऱ्या सावंत साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची मला गंमत वाटायची. अशोकरावांना लिहिलेल्या पत्रात त्यांच्या दोन्ही मुलांची– भूषण आणि कविता, आणि वहिनींची चौकशी, घरगुती अडचणींचे विषय हे तर असायचेच; पण साहित्यिक, राजकीय वातावरण, सामाजिक समस्या यांची गंभीर चर्चा दोघांच्याही– म्हणजे अशोकराव आणि सावंत साहेब– पत्रात असायची. तर ना.वां.चा आणि यांचा पत्रव्यवहार अगदीच वेगळा. सौ. ना. वा. पुष्पाताईंना पत्रातूनही आपण कोल्हापूरला येत आहोत. लसणीची चटणी तयार ठेवावी, अशी ऑर्डर असायची. कवी असलेले ना. वा. आणि सावंत साहेब पत्रातून एकमेकांची चेष्टामस्करी करण्यात तरबेज होते. त्यांनी एकमेकांना लिहिलेल्या पत्रांत ग्रामीण आणि कन्नड भाषेचा भरपूर चेष्टेखोर वापर असायचा. आता ही खरीच कन्नड भाषा होती की नाटककार गडकरींनी 'भावबंधन'मध्ये वापरली तसली होती, हे मला माहीत नाही.

**सावंत साहेबांना येणाऱ्या पत्रांचा कहर म्हणजे ते गेल्यावर, ते गेले आहेत, हे माहीत असलेल्या स्त्री वाचकानं त्यांना लिहिलं होतं, 'तुम्ही गेल्याचं वाचून दुःख झालं.' ह्यावर मी तर अवाक् झालेच. सावंत साहेबही 'वर' अवाक झाले असतील.**



sawantami@yahoo.co.in



रामकृष्ण
२८।८।२०००

प्रिय शिवाजी सावंत,

तुम्ही प्रेमाने पाठवलेली युगंधरसारखी स्नेहभेट मिळाली, अतिशय आनंद झाला. सध्याच्या आजारपणाच्या अवस्थेत मला त्यामुळे थोडासा विरंगुळा मिळेल, व मनोबलही लाभेल असा विश्वास आहे.

युगंधरच्या रूपाने तुम्ही एक फार मोठे काम केले आहे. मृत्युंजय व युगंधर ह्या दोन अक्षरवाङ्मयकृतींत तुमची जीवनसाधना कृतकृत्य झाली, असे मी मानतो. त्याबद्दल तुम्हांस आत्मज्ञानपूर्वक हार्दिक अभिनंदन करतो!

पुस्तक वाचल्यानंतर पुन्हा पत्र लिहीनच.

शुभेच्छा!

स्नेहांकित







25/07/95
श्रद्धेय सावंतजी,
सादर वंदे!




आपका
"परिधान सदन"
3, राम रहीम नगर (राधागंज)
देवास (म.प्र.) 455001
A thing of beauty is a joy forever.




२८/१२/९५
प्रिय शिवाजीराव




D. B. KARNIK
द्वा. भ. कर्णिक
Founder Editor, Maharashtra Times
Chairman, The National Association of Disabled's Enterprises
Res. : 422 0304
Off. : 579 2059
Office : Kannamwar Nagar Mun. Marathi School No. 1, Kannamwar Nagar 1, Vikhroli (E), Mumbai - 400 083
Res. : A-68, Adarsha Nagar, Worli, Mumbai - 400 025
Date :

## आध्यात्मिक, ऐतिहासिक पात्रांना शेलका साज चढविणारे
# शिवाजी सावंत
## यांची विलक्षण पुस्तके






Shrikrishna
The Lord Of The Universe
Translator :
Kadambini Dharap




**मृत्युंजय**
(तीन अंकी नाटक)




**छावा**
(तीन अंकी ऐतिहासिक नाटक)




**कवडसे**




**कांचनकण**



**मोरावळा**




**अशी मने असे नमुने**



**शेलका साज**

**सर्व पुस्तके eBooks स्वरूपात उपलब्ध**

# मान्यवरांची पत्रे



असं म्हणतात 'एक चित्र हजार शब्दांचं काम करतं.' वॅन गॉगची चित्रं म्हणजे तर जणू नेणिवेतल्या खोल संवेदनांचं प्रतिबिंबच. पण रंगरेषांच्या या जादूगारानं आपल्या चित्रांनी जशी रसिकांच्या मनात एक वेदना कोरली, तीच वेदना त्याच्या पत्रात उतरलेली दिसते. त्याच्या प्रत्येक पत्रात शब्दांसोबत चित्रांची किमयाही दिसते. वॅन गॉगचा भाऊ थियो याला त्यानं असंख्य पत्रं लिहिली. ही पत्रं म्हणजे वॅन गॉगचं पत्ररूपी आत्मकथनच आहे.



# संवादाचा संहार

**विश्वास पाटील**



कराल काळाच्या दाढेत असे काही घडेल. एक दिवस पोस्ट ऑफिसच जळून खाक झाल्यासारखे बंद पडेल. एका गावावरून दुसरीकडे जलद गतीने जाणाऱ्या तारांचे खांबच उन्मळून पडतील. बटवारा करायला पत्रेच नाहीत. त्यामुळे पोस्टाच्या पायरीवर जळून खाक झालेल्या फॅक्टरीच्या मजुरासारखे पोस्टमनकाका बेकार होऊन बसले आहेत. देश आणि विश्व चालविणारे पोस्ट खातेच बंद पडले आहे, असे स्वप्न वेड्यांच्या इस्पितळातल्या कोणा मूर्खाला पडले असते, तरी ते तेव्हा सर्वांना पागलपणाचा एक भयंकर नमुनाच वाटले असते. आता तर केंद्र सरकारने अधिकृतरीत्या तार खाते बंद करून टाकले आहे. तर पोस्ट विभाग सध्या कृत्रिम श्वासोच्छ्वासावर शेवटचे आचके देत आहे.

श्रावणात रानात फुटलेल्या जिवंत झऱ्यासारखे तेव्हा पोस्ट खात्याचे काम सुरू असायचे. एक लेखक म्हणून हस्तलिखित पत्रांचे माझ्या जीवनातील योगदान खूप मोठे आहे. तेव्हा पत्र ही तर कलाकृतीसाठी दिलेली एक दाद असायची. सादही असायची. माझ्या बाराशे लोकवस्तीच्या छोट्या खेडेगावात तेव्हाही पोस्ट ऑफिस नव्हते आणि आजही नाही. मलकापूर नावाच्या शाहूवाडी तालुक्यातील पोस्टातून आठवड्यातून एकदा पत्रे व्हाया व्हाया गतीने गावात येऊन पोचायची.

मी शासनात अधिकारी म्हणून काम पाहू लागलो, तरीही वास्तव्याचे ठिकाण निश्चित नसल्यामुळे मी गावाकडचाच पत्ता दिलेला असायचा.

'पानिपत' कादंबरी प्रकाशित झाली तेव्हा पहिल्या महिन्याभरात गावच्या पत्त्यावर जी पंचवीसभर पत्रे आली, त्या पत्रकर्त्यांनीच माझे भविष्य सांगून टाकले होते. त्यातील बहुतांश जणांनी लिहिले की, यापुढे महाराष्ट्र तुम्हाला 'पानिपतकार' या नावानेच ओळखणार.

'पानिपत' कांदबरीवर मला प्राप्त झालेल्या शेकडो पत्रांच्या जवळपास वीसहून अधिक फायली माझ्या पत्नीने घरी नीट जपून ठेवल्या होत्या; पण पुढे अनेकदा बदल्या झाल्या. वारंवार घरे बदलावी लागली. पुस्तकांच्या थप्पी वाढत गेल्या. एके ठिकाणी मित्राच्या घरी पुस्तकांचे आणि पत्रांचे ढीग रचून ठेवले होते. तिथे अकारण अरिष्टे उद्भवली अन् मातीच्या ढिगाऱ्यात माझ्या हजारोंच्या ग्रंथसंग्रहासोबत ही पत्रेही बेकायदा मातीच्या आड गेली. आप्तांच्या द्वेष आणि मत्सराचा विजय झाला. ज्या मातीवर कवी कुसुमाग्रज, वसंत कानेटकर आणि अनेक दिवस कविराज ग्रेस ते केळुसकरांपर्यंत अनेकांच्या पावलांचे ठसे उमटले होते, ती मातीही काळाच्या पोटात लोपली गेली.

एक नवा लेखक म्हणून मी उभा राहत होतो. तेव्हा २३.०९.१९९०ला कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचे 'पानिपत' या कादंबरीवर एक विस्तृत आणि शाबासकी देणारे पत्र पोचले. तात्यासाहेबांनी मोठ्या कौतुकाने लिहिले होते, 'प्रथमतः एक उत्तम आणि भव्य कलाकृती मराठी वाचकांना दिल्याबद्दल मी आपल्याला मनःपूर्वक धन्यवाद देतो. विषयाचा व्याप खूप मोठा. तो सूत्रबद्ध करून व्यवस्थित मांडणं म्हणजे तुफानाला गवसणी घालण्यासारखं आहे. हा ग्रंथ लिहिण्यासाठी आपण किती अभ्यास केला असेल, चिंतन केले असेल आणि तो सर्व इतिहास कसा मनात मुरवून घेतला असेल, याची कल्पना येते. मोठा पसारा असूनही वाचनीयता कोठे कमी होत नाही. अभ्यास करताना तुम्ही त्या काळाचे रहिवासी आणि त्या घटनांचे साक्षीदार झाला आहात. विशेष कौतुक आपल्या भाषाशैलीचं आणि वर्णनशक्तीचं वाटतं... आपण जो अन्वय गृहीत धरला आहे, त्या पायावर एक संस्मरणीय कलाकृती आपण निर्माण केली आहे, यात शंकाच नाही. कलम आपल्यावर प्रसन्न आहे. खूप लिहा.'

या पत्रांमुळेच तात्यासाहेबांशी पुढे चांगला स्नेह जुळून आला. तेव्हा त्यांनी स्वतःच 'पानिपत' या विषयावर कादंबरी प्लॅन केली होती असे सांगितले. तिची लिहिलेली काही पानेही दाखवली; मग माझ्या पत्राचारामुळे नाशिक हे पुढे काही काळ माझ्यासाठी मामाचा गाव बनले. तिथला वसंत कानेटकरांचा बंगला आणि तात्यासाहेबांची मठी या दोन्ही गोष्टी मला देवालयासारख्या पवित्र वाटू लागल्या. तात्यांशी मैत्री खूप जुळून गेली. त्या उत्साहाच्या भरात एकदा तात्यासाहेबांना चक्क 'कंपनीची लावणी' मी म्हणून दाखवली होती. त्याची आठवण अलीकडेच मला संगमनेरच्या दिनकर साळवे या मित्राने करून दिली.

माझ्या 'झाडाझडती' आणि 'महानायक' या कादंबऱ्यांसाठीही वाचकांनी खूप भरभरून पत्रे लिहिली होती. त्यातील अनेक पत्रे पुनर्वसनाचे मरण सोसणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचीही असायची. मी 'झाडाझडती'मध्ये उभ्या पावसात आपल्या झोपडीत बाळंत झालेल्या महिलेचा प्रसंग चितारला आहे. फुलाच्या त्या बाळंतपणाचा प्रसंग वाचून मला बीडहून एका प्रकल्पग्रस्ताचे पत्र आले, 'आपण आमच्या भागामध्ये कधी आला नाहीत. नोकरीही केली नाहीत. तरीसुद्धा उभ्या पावसात माझ्या पत्नीने जो बाळंतपणाचा भयानक प्रसंग अनुभवला तो तुम्हाला कोणी सांगितला? तुम्ही तो जसाच्या तसा कसा लिहू शकला?' एकूणच वेदनेच्या आणि संवेदनेच्या हाकांमधील स्तोत्र हे असे जगव्यापी असते; दुसरे काय!

'झाडाझडती'ची तारीफ करणारे पत्र ज्येष्ठ कांदबरीकार श्री. ना. पेंडसे यांच्याकडूनही प्राप्त झाले होते. आनंद यादव यांनी 'झाडाझडती'चे कौतुक करताना आपल्या पत्रात लिहिले होते की, या कादंबरीतील तुमचा अनुभव अस्सल स्वरूपाचा आहे. तो अतिशय व्यापक आणि व्यामिश्रही आहे. हा अनुभव हाताळून तुम्ही साहित्य क्षेत्रात महापराक्रम केला आहे.

तुमच्या तरुण वयाला झेपणार नाही इतका अवजड अनुभव तुम्ही यशस्वीपणे हाताळलेला आहे.

सुरुवातीला गावच्या पत्त्यावर येणारी पत्रे कोणाकडून तरी महिन्याभरात माझ्या नोकरीच्या ठिकाणी पाठवली जायची. 'महानायक'ला नेताजींच्या अनेक सहकाऱ्यांनीही पत्रे लिहून प्रतिसाद दिला होता. लालकिल्ल्याच्या आझाद हिंद फौजेच्या मुख्य सेनानायकांपैकी कर्नल जी.एस. धिल्लन हे एक महत्त्वाचे सेनानी. त्यांच्याकडून येणारी आणि नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची उकल करणारी काही काही पत्रे तर खूप विस्तृत म्हणजे छापील पाच पाच पाने भरतील अशी असायची. फर्ड्या इंग्रजीतील आणि मोठ्या सुवाच्य अक्षरातील ती पत्रे मला पुढे कादंबरीचा पट मांडताना खूप उपयोगी पडली.

आमच्या गावी तेव्हा प्रत्येक घरामध्ये एक किंवा अनेक गिरणी कामगार असत. ज्यांची पत्रे आणि चिठ्ठ्या मुंबईहून गावी येत. त्यांची सर्व कुटुंबे अशिक्षितच होती. तेव्हा त्या गिरणी कामगारांसाठी त्यांच्या पत्नीला पत्र लिहून देताना आणि त्यांच्याकडून आलेली पत्रे वाचून दाखवताना मला बालपणी खूप आनंद मिळत असे. त्यांचे ते अगत्य, मुंबईच्या वाटेची ती प्रतीक्षा आणि गिरणीतल्या गड्यांना 'माझी मैना गावाकडे राहिली' या छापाच्या हुरहूर लावणाऱ्या आठवणी — हे एक वेगळे जगच या पत्राचारामुळे माझ्या डोळ्यांसमोर खुले झाले. त्यातच मी पुढे लिहिलेल्या 'लस्ट फॉर लालबाग' या कादंबरीची बीजे होती.

आता जवळ जवळ वाचकांकडूनच नव्हे तर कोणाकडूनही पत्रे येणे अजिबात बंद झाले आहे. तो स्नेह आणि ते अगत्य संपले. त्या पार्श्वभूमीवर व्हॉट्सॲप व इतर मेसेजही फक्त कारणपरत्वे वाटतात. त्या दोन-तीन तुसड्या, मतलबी ओळींमध्ये आता पूर्वीच्या पत्रांसारखे काव्य अजिबात उरलेले नाही. तेव्हा पत्रांच्या ओळींतून गाढ स्नेहाचे धागे उलगडायचे. एखाद्याचे हृदयच बोलायचे. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग खुलायचे. आता त्या सर्व प्रकाराला कोरड्या, आटलेल्या ओढ्यासारखे बकाल स्वरूप आले आहे. प्रवाहच थांबल्यासारखा वाटतो.

फार पूर्वी तर कबुतरांच्या पंखांना चिठ्ठ्या बांधून त्या पोचवल्या जायच्या म्हणे; पण दुष्ट काळाने त्या संवाद- वाहक कबुतरांचे पंखच उखडून टाकले आहेत. आधुनिकीकरणाच्या वडवानलात एक अगत्याची, मायाममतेची संवाद संस्कृतीच लोप पावली आहे.



authorvishwaspatil@gmail.com

**TBC - 27 सभासदांना निम्म्या किमतीत**

नवं कोरं

एका क्रूरकर्म्याच्या शोधासाठी
तरुण पत्रकाराने केलेल्या प्रयत्नांची
हुरहूर लावणारी कहाणी

# द ओडेसा फाइल




फ्रेडरिक फॉर्सिथ
अनुवाद
अशोक पाथरकर

पृष्ठसंख्या : ३९४ । किंमत : ₹४८०

उच्चस्तरीय राजकारणातील
एका दलालाला जन्मठेपेची शिक्षा
पूर्ण होण्याच्या आतच
जेलमधून मुक्त करण्यात येतं,
अमेरिकन गुप्तहेर संघटनेच्या एका योजनेचं
थरारक, रहस्यमय चित्रण




# द ब्रोकर

जॉन ग्रिशॅम
अनुवाद
अशोक पाध्ये

पृष्ठसंख्या : ४०० । किंमत : ₹४८०

नवं कोरं

जेव्हा गेल फलंदाजी करू लागतो,
तेव्हा क्षेत्ररक्षक प्रेक्षक बनतात आणि
प्रेक्षक होतात क्षेत्ररक्षक !




## सिक्सर मशिन

ख्रिस गेल, टॉम फोर्डायिस

अनुवाद - दीपक कुळकर्णी

पृष्ठसंख्या : ३२०

किंमत : ₹३९५

Book Available

प्रजननाच्या नावाखाली जगभरात चाललेल्या
स्त्रीशोषणावरील परखड भाष्य




## पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब

पिंकी विराणी

अनुवाद

रेश्मा कुलकर्णी-पाठारे

पृष्ठसंख्या : ३५२

किंमत : ₹३९५

Book Available

एक पहिलवान... वाघाला हाताने मारणारा...
देशसेवा आणि प्रेम यांच्या कात्रीत सापडतो...
एक उत्कंठावर्धक चित्तथरारक प्रेमकथा




## धना

पै. गणेश मानुगडे

पृष्ठसंख्या : १३६ । किंमत : ₹१७०

Book Available

मृत्युशय्येवरील
सम्राट शहाजहानची
चारही मुले
सत्ता हस्तगत करण्यासाठी
आपसात झुंजत आहेत,
त्याचे चक्षुर्वैसत्य वाटावे,
असे चित्रण

यशाच्या बदलत्या परिमाणांचं रहस्यमय, खिलाडू आणि
धास्ती वाटायला लावणारं कथन असणारी कादंबरी



## घाचर घोचर

विवेक शानभाग

अनुवाद

अपर्णा नायगांवकर

पृष्ठसंख्या : १३२

किंमत : ₹१५०

Book Available




## मुघल सत्तेचा सारिपाट

श्रीनिवास राव अडिगे

अनुवाद

उदय भिडे

पृष्ठसंख्या : १७२

किंमत : ₹२२०

Book Available

# पत्रे...
# आनंदाच्या पासबुकातील नोंदी!

श्याम भुर्के



'पत्र आलंय' हे दोन शब्द कानांवर पडताच आनंद होतो. त्यातून एखादा माणूस भेटल्याचाच आनंद होतो. सुख-दुःखांची देवाणघेवाण होते. नाती जोडली जातात. टिकवली जातात. आलेल्या पत्रांतील आपल्याला फार आवडलेली पत्रं आपण जपून ठेवतो. ती विरंगुळा म्हणून पुन्हा पुन्हा वाचतो. एकच पत्र कितीतरी काळ आनंदाची बरसात करतं.

**बोमदिला येथून पत्रे**

भारतीय एकात्मता वाढीस लागावी या उद्देशाने 'आंतरराज्य छात्र जीवनदर्शन' कार्यक्रम आखला होता. त्या योजनेत सातारा येथून माझी निवड झाली होती. महाराष्ट्रातील २४ विद्यार्थी ईशान्य भारतातील राज्यात गेले. तेथील कुटुंबांत राहिले. 'भिन्नता मे एकता, यह भारत की विशेषता', 'अलग भाषा अलग वेश, फिर भी अपना एक देश', 'मुंबई हो या गोहाट्टी, अपना देश अपनी मिट्टी' या आमच्या घोषणा होत्या. मी अरुणाचल प्रदेशातील बोमदिला येथे राहिलो. तेथील महिनाभराच्या वास्तव्यानं इतकी घट्ट मैत्री झाली की तेथील मित्र आणि माझ्यात पुढे पत्रव्यवहार सुरू राहिला. हा पत्रव्यवहार ३५ वर्षे चालू होता. त्यामुळे भारतीय एकात्मतेची बीजे आमच्या मनात रुजली. आजही अरुणाचलची काही बातमी वृत्तपत्रांत आली तर माझे तिकडे आपुलकीने लक्ष जाते. बोमदिलात जे मित्र जोडले गेले त्यात एक होता खंडू दोरजी. तो पुढे अरुणाचलचा मुख्यमंत्री झाला. या पत्रमैत्रीमुळे पुढे अरुणाचलचे विद्यार्थी महाराष्ट्रात आले. त्यांतील दोन जण माझ्या घरी राहिले. हे संबंध वृद्धिंगत व्हायचं प्रभावी माध्यम म्हणजे पत्रच होय.

**सैनिकांची पत्रे**

माझे एक ज्येष्ठ स्नेही डॅडी चांदवलकर हे भारतीय सैन्य दलात होते. व्हिएतनामला कामगिरीसाठी गेलेले. दिवाळीच्या दिवशी आपण घरापासून दूर आल्याची भावना त्यांच्या मनात आली. एकाकीपण जाणवू लागलं. त्याच मनःस्थितीत स्नानाला गेले. स्नान करून बाहेर येतात तर त्यांना टेबलावर एक पत्र व मिठाईचा पुडा दिसला. पत्रावर लिहिलं होतं–

You are not alone
We are with you
- Indira Gandhi

हे पाहताच त्यांनी आनंदाने उडी मारली. पुढे ते पुण्यास आले. 'स्नेहसेवा' संस्थेत काम करू लागले. सीमेवरील मराठी सैनिकांना पत्र आणि मिठाई पाठविण्याची योजना आखली. शाळांतील विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतलेली भेटकार्डेही जवानांना पाठविली. मी या संस्थेत गेली तीस वर्षे काम करत आहे. दर वर्षी दिवाळीत सीमेवरील मराठी जवानांना जम्मू, कारगिल, कच्छ, लेह, लडाख इ. भागांत पुण्यातून आलेलं आमचं पत्र आणि चितळ्यांच्या मिठाईचे बॉक्स मिळाले की आनंद होतो. तो आनंद ते पत्राने व्यक्त करतात. शाळेतील मुलांनी पाठविलेली भेटकार्डे मिळाल्यावर त्या मुलांना जवानांची पत्रं येतात. ती पत्रे पाहिल्यावर मुलं आनंदाने उड्या मारतात. एका जवानाने तर दरोडे-जोग शाळेतल्या मुलांसाठी पत्र आणि रु. १५१/- खाऊसाठी पाठविले.

हडपसर येथील अंधशाळेच्या मुलांनी आम्हाला या योजनेत सहभागी करून घेण्याची विनंती केली. त्यांनी भेटकार्डे तयार करून दिली. प्रत्येकी रुपये पाच फराळ पाठविण्यासाठी दिले. त्यांना जवानांची पत्रे आल्यावर झालेला आनंद अवर्णनीय होता. केवढं हे पत्रांचं सामर्थ्य!

**'ग्यान की' पत्रे**

माझे मित्र प्रदीप लोखंडे यांनी स्वयंरोजगारासाठी वेगळाच प्रयोग केला. पोस्टकार्डाच्या माध्यमातून अनेक खेड्यांतील माहिती अत्यंत चिकाटीने गोळा केली. 'आठवडी बाजार' हा केंद्रस्थानी ठेवून तेथील लोकांची मते जाणून घेतली. या माहितीचा पुरवठा त्यांनी कोलगेटसारख्या अनेक कंपन्यांना केला. राजकीय पक्षांना त्यांचे निर्णय घ्यायलाही ही माहिती उपयोगी पडते. आज पुण्यातील फातिमानगर येथील त्यांच्या कार्यालयात लक्षावधी पत्रांचा खजिना आहे. हा सुशिक्षित बेरोजगार पोस्टकार्डाच्या माध्यमातून कोट्यधीश झाला.

आपला पैसा समाजसेवेसाठी वापरावा यासाठी त्यांनी ग्रामीण भागातील शाळा व महाविद्यालये येथे 'ग्यान की' नावाने वाचनालये सुरू केली. जीवनात यशस्वी होण्याच्या दृष्टीने ५१ पुस्तकांचा संच देऊन या वाचनालयाचा प्रारंभ होतो. ही पुस्तके देणगी स्वरूपात देण्यासाठी अनेक प्रायोजक पुढे आले. या प्रत्येक पुस्तकात एक पोस्टकार्ड असते. वाचक विद्यार्थिनी ते पत्र या योजनेतील साहाय्यकर्त्याला पाठवून मी काय वाचले ते कळवते. त्या प्रत्येक पत्रावर शेवटी लिहिलेले असते- वाचा + लिहा + बोला + ज्ञान.

'विद्यार्थ्यांची पत्रे' याचा जनमानसात एवढा प्रभाव पडला आहे की, आता अशा वाचनालयांची संख्या पाच हजारांवर गेली आहे. माझ्याकडे दर महिन्याला असे एक तरी पत्र येते. पत्रामुळे चाललेल्या या अफाट ज्ञानयज्ञाला त्रिवार प्रणाम!

**आदिवासींची पत्रे**

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये धुळ्याचे चार्टर्ड अकाउंटंट श्री. पी. डी. दलाल हे संचालक होते. त्यांनी बँकेचे अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धन

यांना सांगितले, की नंदुरबार हा आदिवासी वस्तीचा भाग आहे. तेथील मुलं बँक प्रवेश परीक्षेस बसतात; परंतु पास होत नाहीत. तेव्हा त्यांना मार्गदर्शन करण्यास बँकेतील एखादा चांगला अधिकारी एक महिन्यासाठी द्या. डॉ. पटवर्धनांनी या कामासाठी माझी नेमणूक केली. मी नंदुरबारला गेलो. बँकेच्या एका पत्रानं मला वेगळ्या विश्वात नेलं होतं. स्वातंत्र्यलढ्यात शिरीषकुमारने हौतात्म्य पत्करले होते, हे मी शाळेमध्ये असताना वाचले होते. त्यामुळे प्रथम मी नंदुरबार येथील शिरीषकुमार स्मारकास भेट दिली. भारावलेल्या अवस्थेत एका शाळेच्या वर्गात गेलो. तिथे बँक स्पर्धा परीक्षेत यश कसं प्राप्त करायचे हे शिकायला आलेले युवक वर्गात बसले होते. वर्गात गेल्यावर 'व्याख्यानाची सुरुवात आकर्षक करायची' या उद्देशाने मुलांना विचारले ''मुलांनो, नंदुरबार कशासाठी प्रसिद्ध आहे?'' 'शिरीषकुमार' हे उत्तर ऐकायला मिळणार या भावनेने मी उत्साहात उभा होतो. मुलांनी सामूहिक उत्तर दिलं- ''सामूहिक कॉपी करण्याबद्दल!'' मी स्वतःला सावरले. मीच मुलांना शिरीषकुमारची माहिती देऊन परीक्षेचे विषय आत्मीयतेने शिकवू लागलो; पण मुलांकडून फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. माझे ज्येष्ठ सहकारी प्रा. गंभीर सर यांना मी तसे सांगितले. ते म्हणाले, ''या मुलांना सरळ, साधे बोललेले कळत नाही. तुम्ही त्यांच्यावर ओरडून बोला!'' दुसऱ्या दिवशी मी तसेच केले. आता मुलांना कळू लागले. त्यांना घरून प्रोत्साहन मिळावे म्हणून एक दिवस मी सर्व विद्यार्थ्यांना पोस्टकार्डे वाटली. घरच्यांना पत्र पाठवायला लावले. त्यामध्ये 'मला या वर्गाचा उपयोग होत असून, या वेळी मी बँक परीक्षेत पास होणार आहे,' असे लिहिले होते. त्यांच्यामध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी पत्रांचा वापर केला. घरचेही त्यांना अधिक माया देऊ लागले. आता माझे शिकवणे त्यांना नीट कळू लागले होते. सुरुवातीस घेतलेल्या परीक्षेत त्यांना फारच कमी गुण मिळाले होते. परंतु महिन्याभरात सर्व जण परीक्षेत उत्तीर्ण होण्याइतके तयार झाले. त्या विद्यार्थ्यांमध्ये व माझ्यामध्ये एक आपुलकीचे नाते निर्माण झाले. प्रशिक्षण संपवून मी पुण्यास येण्यास निघालो. सायंकाळी एस.टी. स्टॅन्डवर पुणे बसमध्ये बसलो होतो. बाहेर 'एवढी गर्दी कसली' या विचाराने पाहू लागलो तर सर्व मुलं त्यांच्या कुटुंबीयांसमवेत मला निरोप द्यायला जमली होती. त्या मुलांचे आणि माझेही डोळे पाणावले. नंतर त्यांतील अनेक विद्यार्थी विविध राष्ट्रीयीकृत बँकांत नोकरीस लागले. त्यांची मला येणारी पत्रे ही माझा आनंदाचा ठेवा होता. माननीय संचालक पी. डी. दलाल यांनी तर माझी भरभरून स्तुती करणारे पत्र मला पाठवले. माझ्या आनंदाच्या पासबुकात एक मोलाची नोंद झाली.

**चित्रा नाईक यांचं पत्र**

बँक ऑफ महाराष्ट्रच्या पुणे ग्रामीण विभागाचा मी क्षेत्रीय प्रबंधक होतो. बँकेच्या ७६ शाखांची सर्वांगीण प्रगती करण्याचे काम माझ्याकडे होते. ग्रामीण भागाचा विकास करण्याची वृत्ती कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी मी एक योजना आखली. सर्व अंगठेवाल्या खातेदारांना सही करायला शिकविण्याचे आवाहन सर्व कर्मचाऱ्यांना केले. सर्व शाखांतून फलक लावले– 'बचत हवी, खातं उघडा– अंगठा नको, सही करा.' गावातल्या भिंतीवरही हा संदेश लिहिला. क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रौढशिक्षण कसे द्यायचे हे शिकविण्यासाठी चित्रा नाईक यांच्या शिक्षण संस्थेत दोन दिवसांचे प्रशिक्षण दिले. चित्रा नाईक यांनी हे कार्य बँक करत आहे, हे पाहून अभिनंदनाचे पत्र दिले. मी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करणारी पत्रे लिहीत होतो.

परिणामतः, बँक कर्मचारी बँकेचे काम पूर्ण करून नंतर प्रौढसाक्षरता वर्ग घेऊ लागले. कोणी सतरंजी, पाण्याचा माठ, विजेची वायर, बल्ब याची व्यवस्था स्वखर्चाने करू लागले. त्या अशिक्षित ग्रामस्थांनी घरच्यांना पत्र पाठविण्याचा उपक्रमही केला. बँकेची युनियन जी साहेबांविरुद्ध बऱ्याच वेळा आवाज उठविते, त्यांनी या स्तुत्य कार्यक्रमासाठी माझे अभिनंदन केले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होण्यात मी लिहिलेली पत्रे, चित्रा नाईक यांनी लिहिलेले पत्र, गावकऱ्यांनी घरी लिहिलेली पत्रे याचा मोलाचा वाटा होता. पत्रांमुळेच संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रेरणा देऊ शकलो.

**दाजीकाका गाडगीळ यांचं पत्र**

बँक ऑफ महाराष्ट्रच्या ७६व्या वर्धापन दिन कार्यक्रमाला प्रसिद्ध सराफ दाजीकाका गाडगीळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी त्या निमित्ताने मला एक पत्र दिले होते. त्यात ते म्हणतात–

> 'आमचा व बँकेचा व्यापार हा एका बाबतीत सारखाच. तो म्हणजे लोकांना बचतीची सवय लावणे. महाबँक पैशाच्या स्वरूपात पैशाची बचत करायला शिकविते, तर आम्ही पैशाची बचत सोन्याच्या स्वरूपात करण्याचे शिकवतो. आजपर्यंत दोनही बचती ग्राहकांच्या फायद्याच्याच ठरल्या आहेत.'

**पत्रांचा समृद्ध खजिना**

आपल्याला मिळालेली पत्रे म्हणजे एक प्रकारे ती मानपत्रेच असतात. मी आज माझ्या पत्र खजिन्यात डोकावतो तेव्हा मला कविवर्य दत्ता हलसगीकर, महाराष्ट्र टाइम्सचे कार्यकारी संपादक अशोक जैन, माजी साहित्य संमेलनाध्यक्ष वसंत आबाजी डहाके, साहित्यिक रवींद्र पिंगे, 'कुटुंब रंगलंय काव्यात' फेम विसूभाऊ बापट, आचार्य अत्रे यांच्या कन्या व साहित्यिक शिरीष पै, निसर्गप्रेमी मारुती चित्तमपल्ली, शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथराव माशेलकर, कीर्ती कॉलेजचे प्राचार्य दा. सी. देसाई अशा मान्यवरांची पत्रे दिसतात. ती पुन्हा वाचल्यावर आपण किती श्रीमंतीत जगलो याची जाणीव होते. लिहिलेल्या पत्राची हीच तर खरी जादू आहे. ते वर्षोन्‌वर्षे प्रोत्साहन देत राहते. आनंदाची वलये निर्माण करते. पत्रे म्हणजे आपल्या जीवनाच्या आनंदाच्या पासबुकातील एंट्रीज असतात.



shyam@izeltech.com

नवं कोरं



# ती लिहू लागली अन्
# जगण्याचे सारे रंग कागदावर अवतरले...
# अशा 'ती'च्या गोष्टी...



तिचा निर्णय वैवाहिक नातं तुटण्याच्या विदारक अनुभवाला नव्या चेतनेत रूपांतरित करतो आणि ती जगभरातल्या जोडप्यांसाठी आदर्श ठरते.

'A Year By The Sea'
या इंग्रजी पुस्तकाचा
अनुवाद

## समुद्रकाठचे एक वर्ष

जोआन अँडरसन
अनुवाद
अरुंधती चितळे

पृष्ठसंख्या : १३६ । किंमत : ₹१६०

जागतिक अर्थशास्त्रज्ञ, पद्मभूषण पद्मा देसाईंचा लोकल ते ग्लोबल प्रवास...



'Breaking Out'
या इंग्रजी पुस्तकाचा
अनुवाद

## बंधमुक्त होताना...

पद्मा देसाई
अनुवाद
सुनंदा अमरापूरकर

पृष्ठसंख्या : २५२ । किंमत : ₹२९५



एका मनस्वी द्विखंडीय प्रवासातली कलंदर कलाकारी

## मॅग्नोलिया

लेखिका - अनिता कुलकर्णी

पृष्ठसंख्या : २६४ । किंमत : ₹२९५

Book Available

लेकीचं बोट पकडून भूतकाळाशी लढणारी आई आणि आईच्या सामर्थ्याला नवसंजीवनी देणारी लेक... मायलेकीची हृदयस्पर्शी गोष्ट...



## माय डॉटर माय मदर

ॲनी मरे
अनुवाद : रमा नाडगौडा

पृष्ठसंख्या : ४६४ । किंमत : ₹४९५



बर्मातील लोकशाहीच्या आग्रहास्तव सर्वस्व झोकून देणाऱ्या ब्रह्मकन्येची सत्यकथा

'Little Daughter'
या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

## ब्रह्मकन्या

झोया फन आणि डेमियन लुईस
अनुवाद : श्रद्धा भोवड

Book Available

पृष्ठसंख्या : ३२८ । किंमत : ₹३५०

# शिवाजी महाराजांची पत्रे

**शशिकांत काळे**



शिवाजी महाराजांचे ध्येय फक्त स्वराज्य स्थापणे एवढेच नव्हते, तर त्यांना त्यांचे राज्य ‘सुराज्य’ व्हायला हवे होते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना अनेक मार्गदर्शनपर पत्रे लिहिली होती. सन १६७६मध्ये त्यांनी दक्षिण कोकणच्या सुभ्यावर नेमलेल्या रामजी अनंत याच्यासंबंधी अनेक तक्रारी महाराजांकडे आल्या. त्यांची दखल घेत त्यांनी रामजी अनंत यास लिहिले.

‘आम्ही सुभेदाराची नेमणूक दर सुभ्यावर करतो. ती त्याने इमाने इतबारे काम करावे म्हणून करीत असतो. आमची खात्री झाली आहे की तू चोरी करतोस. सुभेदारीची कामे करतांना तुला प्रजेकडून काही अर्थलाभ व्हावा अशी तुझी इच्छा दिसते. आपल्या कामाबद्दल योग्य वेतन मिळत असतांना ही अभिलाषा कशाला? लोकांकडील द्रव्यच काय पण भाजीच्या देठाकडेही तुझे मन गुंतू नये व तू निर्लोभ असावेस. लोकांनी योग्य प्रकारे लावणी केली आहे का नाही, हे पाहण्यासाठी तुझी नेमणूक केलेली आहे.

राज्यात जमीन महसुलाची पद्धत आम्ही घालून दिलेली आहे. रयतेच्या उत्पन्नाचा हिस्सा तिला मिळाला पाहिजे. राजभागही योग्य प्रमाणात मिळतो की नाही, हे पाहणे तुझे कर्तव्य आहे. प्रजेवर जुलूम झाला अगर सुभेदार या नात्याने तू गैर वागलास तर आम्ही तुझ्यावर असंतुष्ट आहोत असे समज.

आपली प्रजा शेतीच्या व्यवसायात गुंतलेली आहे, हे सदैव ध्यानी बाळगून प्रजेजवळून शेतीच्या उत्पन्नाच्या स्वरूपातच राजभाग म्हणून खंड वसूल करीत जाणे योग्य होईल. त्यामुळे तुझ्याकडे धान्य जमा होईल. ते विकून पैसा उभा करण्याचे काम तुला करावे लागेल. ते तुझे कर्तव्यच आहे. योग्य वेळी योग्य जिन्नस विक्रीस काढून राज्याचा फायदा करता येईल; पण हे करीत असतांना सरकारी गोदामातील कोणतीही वस्तू सडणार नाही, किडणार नाही, सर्व जिन्नस चांगल्या स्थितीत राहतील याची खबरदारी तू घ्यायची आहेस.’

जनतेचे काम करण्यासाठी अधिकाऱ्याने द्रव्यच काय पण भाजीच्या देठाचीही अपेक्षा ठेवू नये, असे महाराजांचे सांगणे होते. तर आजच्या काळात महाराजांचा जयजयकार आणि वारसा सांगणारे राज्यकर्ते (स्वतःला जणू प्रतिशिवाजीच समजतात.) अधिकाऱ्यांना नियमबाह्य कामे करायला लावतातच, त्याचबरोबर आर्थिक मोबदलाही घरपोच करायला भाग पाडतात.

आज सरकारी गोदामांमध्ये, उघड्यावर अन्नधान्य सडून फुकट जाते आहे. ते रयतेला विकतही मिळत नाही. अशा सडणाऱ्या धान्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी महाराजांनी त्या अधिकाऱ्यांवर टाकलेली होती; पण महाराजांचे आजचे तथाकथित वारसच अशा अधिकाऱ्यांचे मिंधे झालेले आहेत. त्यामुळे ते अधिकारी वरिष्ठांनाही जुमानत नाहीत; कारण त्यांना शिक्षेचीही भीती नसते. युनियन, कोर्टकचेऱ्या, सुनावण्या यामध्ये न्याय राहतो बाजूला; पण तो गुन्हेगार अधिकारी मात्र आरामात आपले गैरवर्तन चालूच ठेवतो.

कडक शिक्षेमुळे गुन्हे कमी होत नाहीत, असे काही जण सांगतात; पण महाराजांच्या काळात कडक शिक्षेच्या भीतीने गुन्हेगार गुन्हे करायला बिचकत असत, असे मानायला वाव आहे.

**अनुदान आणि कर्जमाफी**

शेतकऱ्यांना द्यायचे कर्ज आणि त्याची वसुली याबद्दल महाराजांचे विचार असे होते-

‘सुभ्यामधील प्रत्येक गावात फिरून तेथील शेतकऱ्यांना एकत्र करावे. त्यांच्याकडे शेती किती, मनुष्यबळ, बैल, नांगर यांची नोंदणी करावी. सर्व गोष्टी योग्य प्रमाणात असल्यास ते हुरूपाने शेती करतील; पण जर एखाद्याजवळ बैल, धान्य (बियाणे) यांची कमतरता असेल, तर त्यास रोख पैसे, बैल, उदरनिर्वाहासाठी धान्य द्यावे; पण त्याला शेती करण्यास सांगावे.

अशा रीतीने दिलेली तगाई, सव्याज वसूल न करता, उसनवारी आहे असे समजून त्याच्या सवडीने, दमादमाने, पण जबरदस्ती न करता करावी. अशा कामांसाठी सरकारी खजिन्यातून लाख-दोन लाख खर्च झाला तरी चालेल; पण प्रत्येक कुणब्याची खबर घेत राहणे. त्यायोगे तो कुणबी कष्ट करण्यास तयार होईल. सरकारचे उत्पन्न वाढवण्यास मदत केल्यास आम्हाला रुचेल.

एखाद्या कुणब्याकडे मागील थकबाकी असेल व ती फेडण्यास तो समर्थ नसेल, तर त्यास माफी देण्यास हरकत नाही. एखाद्याकडे बाकी थकत चालली की ती फेडण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे राहत नाही. अशा वेळी माफी देणे, हा एकच उपाय असू शकतो. तशी माफी देऊन बाकीची वसुली करावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये कुणब्यास तुरुंगात डांबणे योग्य होणार नाही. घरातील कर्ता पुरुष तुरुंगात गेला की बाकी कुटुंबाची वाताहत होते.’

कोणत्याही राष्ट्रासाठी शेती उत्पन्न हेच प्रधान उत्पन्न मानले गेले पाहिजे. आधुनिक काळात शेतीऐवजी इतर गोष्टींनाच प्राधान्य दिले जाते आहे. घरबांधणी, औद्योगिक उत्पादन, गाड्या, फ्रिज, टीव्ही अशांच्या उत्पादनासाठी शेती आणि शेतजमिनीचाच बळी दिला जातो आहे. मोटार, टीव्हीसारख्या चैनीच्या वस्तू मिळाल्या नाहीत तरी माणूस जगू शकेल; पण अन्नधान्य, पाणी याशिवाय जगणे अशक्य होईल. जीवनावश्यक वस्तूंची मुबलक उपलब्धता हा प्रगतीचा मानदंड न मानता चैनीच्या वस्तूंचा सुकाळ म्हणजेच प्रगती, असे समजले जाते आहे.

**रेशनिंग वाटप व्यवस्था**

सन १७०४मध्ये सैन्याचा तळ चिपळूण येथे होता. त्या वेळी चारा वगैरे वाटपाबद्दल महाराजांचे आदेश असे होते-

‘गडावर दाणावैरणीचा साठा आहे. तो पावसाळा अखेरपर्यंत पुरला पाहिजे. त्या हिशोबाने गडावरील कारकून त्यांचे वाटप करतील. त्यानुसार घोड्यांना दाणावैरण घालीत जावे. कारकुनांबरोबर उगाच भांडण उकरून काढू नये. साठा आहे या धुंदीत घोड्यांना चारा घालाल, तर ऐन पावसाळ्यात उपासमारीची पाळी येईल. त्या घोड्याच्या मृत्यूला आपणच जबादार असाल. अशा वेळी काही सैनिक गावात जातील. शेतकऱ्यांच्या घरून धान्य, भाकर, गवत आणि लाकूडफाटा आणतील. अशा वेळी शेतकऱ्यांना मोगलाई बरी असे वाटू लागेल. सारी बदनामी होईल. म्हणून सैनिकांनी आपल्या जागेपासून दुसरीकडे जाण्याची आवश्यकता नाही. सरकारी तिजोरीमधून धान्य, चारा यांची व्यवस्था केलेली आहे. लाकूडफाटा, भाजी वगैरे वस्तू बाजारातून रोखीने घ्याव्यात. घाऊक प्रमाणात घेतल्यास स्वस्त पडेल; पण कोणाशी भांडणतंटा, जुलूम-जबरदस्ती करण्याचे कारण नाही.’

आधुनिक काळात सुभेदाराच नव्हे तर मंत्रीसंत्री यांचीही सोय सरकारी खजिन्यातूनच होत असते. रोख भत्ता पण मिळत असतो. तरीही अगदी दुष्काळी भागांतील दौऱ्यातही ‘रयते’लाच त्यांच्या कोंबडी, बाई, बाटलीची सोय करावी लागते. ‘यापेक्षा मोगलाई बरी’ असे जनतेस वाटू नये, असे महाराजांना वाटत होते; पण आधुनिक काळात ‘यापेक्षा इंग्रजांचे राज्य बरे होते’ असे काही जणांना नक्कीच वाटते.

आजचे पुढारी नेते शिवाजी महाराजांना आदर्श मानतात, असे सांगतात; पण त्यांचा आदर्श आचरणात मात्र आणत नाहीत.



svkale39@gmail.com



# मान्यवरांची पत्रे



पाब्लो नरुदा म्हणजे सौंदर्यवादी मांडणीचा महामेरू. त्याच्या प्रत्येक लिखाणात भाषेचं सौंदर्य ओतप्रोत भरलेलं दिसतं. याचंच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हे पत्र...



Santiago, Chile
1923, 4:53 a.m.

I like you calm, as if you were absent, and you hear me far-off, and my voice does not touch you. It seems that your eyelids have taken to flying; it seems that a kiss has sealed up your mouth. Since all these things are filled with my spirit, you come from things, filled with my spirit. You appear as my soul, as the butterfly's dreaming, and you appear as a sad word. I like you calm, as if you were distant, you are moaning, a butterfly's cooing. You hear me far-off, my voice does not reach you. Let me be calmed, then calmed by your silence, clear as a light, and pure as a ring. You are like night, calmed, constellated. Your silence is star-like, as distant, as true. I like you calm, as if you were absent: distant and saddened, as if you were dead. One word at that moment, a smile, is sufficient. And I thrill, then, I thrill: that it cannot be so.

Pablo Neruda

# नीरज की पाती

## (कवी नीरज यांची काव्यमय पत्रे)

प्रा. ए.व्ही. देशपांडे



*अलीकडेच लोकप्रिय हिंदी कवी गोपालदास सक्सेना ऊर्फ 'नीरज' यांचे निधन झाले. 'नीरज' हे जसे लोकप्रिय कवी होते, तसेच हिंदी चित्रपट गीतकार म्हणूनही त्यांची प्रसिद्धी होती. त्यांच्या या दोन्ही पैलूंवर बरेच लिहिले गेले; परंतु 'नीरज की पाती' अर्थात त्यांनी लिहिलेल्या काव्यमय पत्रांविषयी लिहिले गेले नाही. त्यासाठी हा प्रयत्न...*

पत्रलेखन हा एकूणच साहित्यात फारसा दृढमूल न झालेला प्रकार आहे. मराठीत काही पुस्तके पत्रशैलीत लिहिली गेली आहेत; पण त्यांची संख्या मर्यादित आहे. आता भ्रमणध्वनीद्वारे बोलणे व संदेशवहन होत असल्याने पत्रलेखन खूपच कमी झालेले दिसते; परंतु पत्रलेखनात आपण आपले मन मोकळे करू शकतो. संवाद साधू शकतो. तो जिव्हाळा व आपलेपणा आजच्या ई-मेल, मेसेज वा एसएमएसमध्ये येत नाही. त्यामुळे एकूणच संवादाची साधने बरीच आली; पण संवाद कमी झाला, अशी चर्चा होताना दिसून येते.

या पार्श्वभूमीवर लोकप्रिय हिंदी कवी 'नीरज' यांनी सुमारे चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी लिहिलेली काव्यमय पत्रे निश्चितच मनाला भावणारी आहेत. आजही या पत्ररूप कविता वाचताना संवेदनशील वाचक रंगून जातो. या २१ कवितांचे संकलन 'नीरज की पाती' नावाने ५० वर्षांपूर्वी हिंदी पॉकेट बुक्स, दिल्ली संस्थेने प्रसिद्ध केले आहे. (त्या वेळी या पुस्तकाची किंमत फक्त एक रुपया होती.) यातील अनेक कविता खुद्द 'नीरज' यांनी कविसंमेलनामधून सादर केल्या नि हिंदी प्रदेशात त्या अत्यंत लोकप्रिय ठरल्या. त्यातूनच नीरज यांचा पुढे चित्रपट क्षेत्रात प्रवेश झाला.

या छोट्याशा कवितासंग्रहाच्या प्रारंभीच 'नीरज'च्या त्या गाजलेल्या ओळी आहेत. 'काँपती लौ यह सियाही, यह धुआँ, यह काजल । उम्र सब अपनी इन्हे 'गीत बनाने'में कटी । कौन समझे मेरी आँखोंकी नमी का मतलब । जिंदगी वेद थी, पर जिल्द बंधाने में कटी ।'

दिव्याची थरथरणारी ज्योत, सभोवतालचा अंधार, हा धूर नि काजळी... आयुष्य सारे यांची गाणी करण्यात गेले. माझ्या डोळ्यांतील ओलाव्याचा अर्थ इथे कुणाला समजणार? आयुष्य एखाद्या थोर वेदग्रंथासारखे होते, पण तो वाचणे तर दूरच, त्याची विस्कटलेली पाने एकत्र जुळवण्यातच निघून गेले.

या पत्रात अर्थातच प्रेयसीला उद्देशून लिहिलेली काही पत्रे आहेत. नीरजची ही प्रेयसी सुंदर नि प्रभावी व्यक्तिमत्त्वाची आहे आणि ती त्यांची स्फूर्तिदेवता व प्रेरणादेखील आहे. ती चांगल्या घरंदाज घरातील सुखवस्तू जीवन जगणारी आहे आणि कवी स्वतः अत्यंत गरीब परिस्थितीतील आहे. त्यामुळे दुरूनच एखादे गुलाबाचे सुंदर फूल पाहावे, तसा कवी तिच्याकडे पाहतो. कल्पनाविश्वात तिला केंद्रस्थानी ठेवून तिच्यावर कविता करतो. आपले मनोगत कवितेत व्यक्त करतो.  ती आपल्यासाठी दुर्लभ आहे, याची त्याला जाणीव आहे. त्या काळातील उर्दू-हिंदी कवी-शायरांची बहुधा अशीच स्थिती होती. एक प्रकारची भावरम्य, कल्पनेत रमणारी व काहीशी 'प्लॅटॉनिक लव्ह' स्वरूपातली ही प्रेमभावना नीरजच्या कवितांमधूनही वारंवार व्यक्त होताना दिसते; पण आपल्या कवितांमधून नीरज या प्रेमाच्या विविध छटा उत्कटतेने मांडतात.

केवळ प्रेमिकेला लिहिलेली ही स्वगत वाटावीत अशी पत्रे नाहीत, तर त्यात आणखीही बरेच काही आहे. 'कानपूर के नाम', 'कश्मीर के नाम', 'पाकिस्तान के नाम', 'कल्पना के नाम', 'अज्ञात साथी के नाम', 'नील की बेटी के नाम' अशी अनेक पत्रे कवीने लिहिली आहेत आणि त्या अनुषंगाने आपल्या वेदना-संवेदना आणि भावभावना सुंदर, सहज, सोप्या भाषेत व्यक्त केल्या आहेत.

नीरज यांची भाषा क्लिष्ट, दुर्बोध, मुक्तछंदी स्वरूपाची नाही. अत्यंत साधी, सोपी, भावरम्य, शब्दसमृद्ध, प्रासादिक आणि गेय स्वरूपाची ही सारी कविता आहे आणि  त्यामुळे ती सहज गुणगुणताही येते. छंद अर्थात 'मीटर'मध्ये छान वाचता येते, ही या काव्यमय पत्रांची खासीयत आहे. या काव्यमय पत्रांचा आस्वाद घेऊ यात.

**प्रेम आणि युद्ध**

कवी नीरज यांनी लिहिलेल्या पत्रांविषयी बोलताना सर्वप्रथम त्यांनी आपल्या प्रेमिकेला उद्देशून लिहिलेल्या पत्रांची चर्चा करणे स्वाभाविक होईल. तरुण वयातील नैसर्गिक प्रेमभावना माणसाला अनेकदा प्रेरणा देणारी, जीवनात रस निर्माण करणारी व कर्तृत्व गाजविण्याची इच्छाशक्ती देणारी ठरते; तर कधी वियोग नि असफल प्रेमामुळे जिंदगी निराशा नि हताशेत बुडून आपला सूर हरवते.

सुमारे पन्नासएक वर्षांपूर्वी उर्दूमधील शायर किंवा हिंदीमधील कवींमध्ये असफल प्रेमाची दुःखमय व्यथा कुरवाळत बसण्याची प्रवृत्ती सर्रास दिसते. त्यातून उर्दू कवींनी उत्तमोत्तम गझला निर्माण केल्या तर हिंदी कवींनी कविता. इंग्रजीतील वचन प्रसिद्धच आहे- अवर स्वीटेस्ट साँग्ज आर दोज, दॅट टेल अस सॅडेस्ट थॉट...

नीरजदेखील त्याला अपवाद नाहीत.

त्यांनी आपल्या प्रेमिकेचे वर्णन करताना म्हटले आहे —

*जाने किस फूल की मुस्कान हँसी है तेरी*
*जाने किस चाँद के टुकडे का तार दर्पन है?*
*जाने किस रात की शबनम के तेरे आँसू है*
*जाने किन शोख गुलाबों की तेरी चितवन है?*

पण अशी ही सौंदर्यशालिनी प्रेमिका आपली होणार नाही; कारण

आपण गरीब आहोत, आपल्याजवळ फक्त उत्कट भावना आहेत आणि त्या व्यक्त करणारे काही शब्द; मात्र ... व्यवहारी जगात त्यांना किंमत नाही. हा भाव व्यक्त करताना कवी म्हणतात —

*मेरी मुमताज अगर शहाजहाँ होता मैं*
*आज एक ताजमहल तेरे लिए बनवाता*
*सब सितारों को कलाई में तेरी जड देता*
*सब बहारों को तेरी गोद में बिखरा आता*

आपल्या गरिबीचे वर्णन करताना नीरज म्हणतात-

*लाखों उम्मीदभरे चाँद गगन में चमकें*
*मेरी रातों के मगर भाग में बादल ही रहे*
*लाख रेशम के नकाबों ने लगाए मेले*
*मेरे गीतों को छिली देहपर वल्कल ही रहे...*

म्हणूनच आपल्या प्रेमिकेला देण्यासाठी आपल्यापाशी काही नसल्याची विदारक जाणीव त्यांना विव्हल करते.

*आज क्या दूँ मैं तुझे, कुछ भी नहीं दे सकता*
*गीत है कुछ कि जो अब तक न अरे रूठे है*
*भेंट में तेरी इन्हें ही मैं भेजता हूँ तुझे*
*हीरे-मोती तो दिखावे हैं कि सब झूठे हैं...*

(याच कवितेत 'काँपती लौ, यह सियाही...' या नीरजच्या प्रसिद्ध ओळी आहेत.)

अखेर या प्रेमाची समाप्ती व्हायची तशीच होते. त्या प्रेमिकेचे लग्न कुणा दुसऱ्याच (श्रीमंत) व्यक्तीशी होते आणि कवी स्वतःला, परिस्थितीला दोष देत प्रेमभंगाचे दुःख कवितेत व्यक्त करीत राहतो; पण तीही परिस्थितीपुढे मजबूर असल्याचे तो जाणतो.

— तो काळ महायुद्धाचा होता. जगावर युद्धाचे काळे ढग व्यापून राहिले होते. हिंदुस्थानही त्याला अपवाद नव्हता. अशा अशाश्वत काळात कवी पत्रात आपल्या प्रेमिकेला लिहितो —

*आज की रात तुझे आखिरी खत और लिख दूँ*
*कौन जाने यह दिया सुबह तक जले ना जले*
*बम्ब-बारूद के इस दौर में अब ऐ हमदम*
*ऐसी रंगीन हवा फिर कभी चले न चले*
----
*चूडियाँ टूटी हुई नंगी सडक की शायद*
*कल तेरे वास्ते कंगन न मुझे लाने दें*
*झुलसे बागों के धुआँ खाए हुए पात-कुसुम*
*गोरे हाथों में न मेहेंदी का रंग आने दें!*

*जिंदगी सिर्फ है खूराक टैंक-तोपों की*
*और इन्सान है एक कारतूस गोली का*
*सभ्यता घूमती लाशों की एक नुमायश है*
*नया लहू है नया रंग नई होली का!*

युद्धकालीन परिस्थितीचे असे भयावह चित्र रेखाटण्याएवढी भीषण स्थिती जगाने व भारतानेही एके काळी अनुभवली आहे. चिनी आक्रमणाचे दिवस आठवतात, इतकेच नव्हे तर आजही पाकिस्तान काश्मीरमध्ये जो दहशतवाद करीत आहे, त्यालाही या ओळी लागू पडतात. अशा स्थितीत प्रेम, कोमल भावभावना, नाती, कर्तव्ये, सण-संस्कृती सारे काही बाजूला पडते व केवळ संघर्षासाठी सिद्ध व्हावे लागते.

नीरज पुढे म्हणतात—

*इसलिए आज तुझे आखिरी ख़त और लिख दूँ*
*आज हर जुल्म की तलवार से टकराऊँगा*
*गोरी गोरी सी तेरी संदली बाहों की कसम*
*लौट आया तो तुझे चाँद नया लाऊँगा*

**नीरज की पाती कानपूर के नाम**

आपल्या ऐन उमेदीच्या काळात आपण शिक्षण, व्यवसाय, नोकरीचा शोध यासाठी एखाद्या शहरात 'स्ट्रगल' करीत असतो. स्वप्ने फार असतात; पण हालत 'खस्ताहाल' असते. पुरेसा पॉकेटमनीही नसतो. घराकडून येणाऱ्या तुटपुंज्या पैशाची प्रतीक्षा असते. अनेकदा पायी चालत, कधीमधी बसने प्रवास करीत, कटिंग चहा पीत आपले मन भविष्याची स्वप्ने रंगवीत असते.

अशा काळात आपण ज्या शहरात असतो, त्या शहराशी आपले एक भावनिक नाते जडते. या शहरातील रस्ते, चौक, कॉलेज, स्टेशन यांनी आपली ही उमेदवारी पाहिलेली असते. आपणही त्यांनाच मित्र समजून आपली मनोगते ऐकवलेली असतात. आपसूकच त्या ठिकाणांशी आपण भावनिक दृष्टीने जोडले जातो. दिवस बदलले तरी ते शहर, त्यातील ते रस्ते, चौक, रेस्टॉरंट्स, कॉलेजचा परिसर यांची आठवण मनात कायम राहते.

नीरज यांचेही असेच घट्ट नाते कानपूर शहराशी आहे. इथे त्यांच्या अनेक बऱ्या-वाईट आठवणी आहेत. हळवे कोपरे आहेत. ते त्यांनी आपल्या 'कानपूर के नाम' या पत्ररूप कवितेत मांडले आहेत.

उत्तरेकडे '... के नाम' म्हणत एखाद्या शहरालाच आपली कविता अर्पण करण्याचा प्रघात दिसतो. 'पालकी' चित्रपटात शकील बदायूनीने 'ऐ शहरे लखनौ तुझे मेरा सलाम है, तेरा ही नाम दूसरा जन्नत का नाम है...' अशी रचना केली आहे. तसे कवी नीरज यांनी स्वतःला कानपूरचा बेटा म्हणवत हे पत्र लिहिले आहे. हा स्वतःशी केलेला स्वगत संवादच आहे.

'कानपूर! आह! आज याद तेरी आई फिर
स्याह कुछ और मेरी रात हुई जाती है ।
आँख पहले भी बहुत यह रोयी थी तेरे लिए
अब तो लगता है कि बरसात हुई जाती है...'

अशी भावपूर्ण सुरुवात करून कवी कानपूर के नाम आपल्या भावना व्यक्त करू लागतो-

*आज भी मेरे बेनिशान किसी कोने में*
*मेरी गुमनाम उमीदों की बस्ती बसी है*
*आज भी तेरी किसी मिल के किसी फाटक पर*
*मेरी मजबूर ग़रीबी खडी तरसती है*

अशी तरुणपणातील आपल्या बेरोजगारीतील आठवण सांगून कवी म्हणतो—

*करता टाईप किसी आफिस की किसी टेबल पर*
*आज भी बैठी कहीं होगी थकावट मेरी,*
*खोयी खोयी सी परेशान किसी उलझन में*
*किसी फाइल पे झुकी होगी लिखावट मेरी...'*

या जमान्यातील सर्वांत महत्त्वाची आठवण असते कॉलेजची, जिथे आपण शिकलेले असतो.

*और ऋषियों के नामवाला वह नामी कालिज*
*प्यार देकर भी न्याय जो न दे सका मुझको*
*मेरी बगिया की हवा, जो तू उधर से गुजरे*
*कुछ भी कहना न, बस सीने से लगाना उसको...*

असे होते अनेकदा... शाळा-कॉलेजवर आपले प्रेम असते; पण आपली वास्तव परिस्थिती लक्षात घेऊन तेथे आपणास अनेकदा न्याय मिळाला नाही असेच शल्य मनात असते; पण तरी कटुता नसते. ती माझी शाळा, ते माझे कॉलेज हीच प्रेमाची भावना मनात असते.

'क्यों कि वह ज्ञान का एक तीर्थ है जिसके तटपर
खेलकर मेरी कलम आज सुहागिन है बनी
क्यों कि वह एक शिवाला है जिसकी देहरीपर
हो के नतशीश मेरी अर्चना हुई है धनी...'

अशी नम्र व कृतज्ञ भावना कवी व्यक्त करतो

या नवथर वयात केलेले ते पहिले पहिले प्रेम! त्याची कानपूरमधील आठवण कशी विसरेल?

*शौख मुस्कान वही और वही ढीठ नजर*
*साथ साँसों के यहाँ तक रे! चली आई है*
*तीनसौ मील की दूरी, भी कोई दूरी है,*
*प्रेम की गाँठ तो मरके भी न खुल पायी है...*

या दीर्घ कवितेत अशा आपल्या बाल-तरुणपणीच्या कानपूरशी जोडल्या गेलेल्या आठवणींची स्मृती जागवत कवी पुढे पुढे जातो.

*कानपूर! तूने मुझे इतनी उमर तो दे दी*
*किन्तु रहने को तीन गज जमीन दे न सका*
*पोंछ लूँ जिससे मैं अपने ये सुलगते आँसू*
*मेरे गीतों को एक आस्तीन दे न सका...*

कवी नीरज या गीतरूपी पत्रात पुढे म्हणतात -

*कानपूर आज जो देखे तू अपने बेटे को*
*अपने 'नीरज' की जगह लाश उसकी पायेगा*
*सस्ता कुछ इतना यहाँ मैं ने खुद को बेचा है*
*मुझको मुफलिस भी खरीदे तो सहम जाएगा..'*

— ही कविता मुळातूनच वाचली पाहिजे. हे स्वगत, हा पत्ररूप संवाद एका पिढीने जे वास्तव भोगले त्याचेच साकार चित्र आहे. कदाचित आज आपल्या 'बाईक'वरून कॉलेजला जाणाऱ्या पिढीला ते माहीत नसेल; पण गेल्या पिढीने हे अनुभवले आहे. 'कानपूर के नाम' हा त्याचाच एक दस्तऐवज आहे.

**काश्मीर के नाम**

'नीरज की पाती' मधली ही कविता सुमारे पन्नास वर्षांपूर्वी लिहिली गेलेली आहे, जेव्हा काश्मीरची समस्या आजच्याएवढी चिघळलेली नव्हती; पण तिचा जन्म झालेला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच हा प्रश्न भारतासमोर निर्माण झालेला असून, त्यावर आजही उत्तर सापडत नाही. अशा वेळी कवी 'नीरज'यांनी तेव्हा खुद्द काश्मीरलाच आवाहन केले आहे, की हे देवभूमी काश्मीर तूच उभी राहा. आत्मबळ जागे कर आणि मानवतेच्या शत्रूंविरुद्ध एल्गार कर. या कवितेची रचना एकदम वेगळ्या फॉर्ममधली आहे. तिचे धृवपद आहे —'झूम उठे खैबर-हिंदुकुश, ऐसी नयी बहार दे।'

*भँवरों की गुनगुनवाले*
*फूलों की रुनझुनवाले*
*पाटन - रूप - रतनवाले*
*ओ शरमीले काश्मीर उठ! दुष्मन को ललकार दे*
*झूम उठे खैबर-हिन्दुकुश, ऐसी नई बहार दे...*

कवी म्हणतो—

*सरहदपर बारूद लिए है आँधी खडी तलाश में*
*घुला हुआ है जहर हवा में, धुआँ घिरा आकाश में*
*लंदन से वाशिंग्टन और कराची से लाहौर तक*
*तुझे मिटाने की हर कोशिश है मज़हबी लिबास में*
*एक भवन-आंगनवाले*
*एक दिशा-दर्पनवाले*
*एक दिशा - दर्शनवाले*
*ओ भारत के द्वार! किले की भर हर एक दरार दे,*
*झूम उठे खैबर हिंदुकुश, ऐसी नई बहार दे!*

काश्मीरचा घास घेण्याचा प्रयत्न लंडनपासून वॉशिंग्टन आणि कराची -पासून लाहोरपर्यंतचे राजकारणी धर्माच्या पडद्याआड करीत आहेत, हे केवढे मोठे सत्य या कवीने ५० वर्षांपूर्वी कथन केले आहे. काश्मीरला पत्ररूपाने संबोधन करताना कवीने येथे 'ओ भारत के द्वार' म्हटले आहे. साऱ्या कवितेत अशाच प्रकारे 'ओ सर्जन के दूत', 'ओ श्रम के सैलाब' 'ओ वसन्त के पुत्र', 'ओ सुहाग सिंगार', 'ओ धरती के स्वर्ग', 'ओ प्रकाश के देश', 'ओ समदर्शी सन्त' अशी वेचक विशेषणे वापरून या देवभूमीची प्राचीनता, सुंदरता, श्रमप्रधानता, प्रकाशरूप आणि श्रेष्ठ तत्त्वज्ञान यांचा वेधक उल्लेख कवीने खुबीने केला आहे.

*उठ ओ मेरे काश्मीर! बो ऐसे बीज जहान में*
*खिले प्रेम के फूल सुर्ख हर बारूदी वीरान में*
*आजादी का अर्थ आँगनों में से भूख बुहारना*
*और बिछाना पलंग सूर्य का मन के बंद मकान में*
*प्यारभरी बोली वाले!*
*स्नेह सजी डोली वाले!*
*गीत-गुंथी झोली वाले!*
*ओ प्रकाश के देश! दियों की हर बाती को प्यार दें*
*झूम उठे खैबर-हिंदुकुश ऐसी नई बहार दे!*

— आज मोदीजी काश्मीरवर तोडगा ‘गोली से नही गले लगाने से’ म्हणाले. नीरजनी हे फार पूर्वीच सांगितलेले दिसते. अन् हे आवाहन त्यांनी खुद्द काश्मीरला केले आहे. काश्मीरने त्या वेळीच ते ऐकले असते तर...

धर्माचा खरा अर्थ प्रेम, मानवता व दुसऱ्याच्या सुखात आपला आनंद मानणे आहे. इतका साधा सरळ अर्थ कवी या कवितारूपी पत्रात स्पष्ट करतो.

‘भूल न जाना ध्येय देश का, धर्म नही निर्माण है।
मंदिर-मस्जिद तो राहे है, मंजिल तो इन्सान है।
काबे की या काशी की हो, गीता या कुरान की,
धरती सबकी माता, उसका सब पर प्यार समान है!’

काश्मीरच्या जनतेने आपण आग आणि बर्फ दोन्हीचा अनुभव घेतो ते दाखवून दिले असले तरी तिचे हित मेहनत, कष्ट, शेतीतून नवनिर्माण करणे यातच असल्याचीही जाणीव कवीने करून दिली आहे.

गर्म लहू-सीने वाले
आग-बरफ पीने वाले
मेहनत पर जीने वाले
ओ धरती के स्वर्ग! हलोंकी नोकें और उभार दे,
झूम उठे खैबर-हिंदुकुश, ऐसी नयी बहार दे!

पण कवी केवळ काश्मीरला उपदेश देत नाही; काश्मीरच्या सौंदर्याचे वर्णनही वेधकपणे करतात.

*शुभ चिनार की छाँव छलकती, झीलोंवाली गागरी,*
*बादामों के बाग, हवा की जिनमें बजती बाँसुरी,*
*पश्मीना पहने पहाडियाँ, जडी नगीना घाटियाँ,*
*फेंक रहा है दुश्मन सब पर ही जंजीरे डालरी*

कवी-लेखकांनी देशनिर्माणाची प्रेरणा जनतेला देणे गरजेचे असते, ते कार्य नीरज करतात.






## परवाना जगण्याचा

वास्तव जगात चांगल-वाईटाची बेमालूम सरमिसळ झालेली दिसते. अशात मार्ग कधी थेट नजरेसमोर असल्यासारखा वाटतो, तर कधी कोसो दूर. या सर्वांमधून नियतीने तुमच्यासाठी आखलेला मार्ग शोधून काढून तुमची आयुष्याबद्दलची स्वप्ने योग्य प्रकारे प्रत्यक्षात कशी उतरवायची याचे मार्गदर्शन

प्रिया कुमार

अनुवाद - श्यामल कुलकर्णी

पृष्ठसंख्या : २२० । किंमत : ₹२५०



## देवाजीचं ऑफिस

'God's Own Office' चा अनुवाद

प्रवासी भारतीय तंत्रज्ञ आपल्या स्वतःच्याच शहरात राहून ऑफिसचं काम करू लागले, तर ते स्वतःचं शंभर टक्के उत्पन्न आपल्या राज्यातच खर्च करतील; त्यामुळे राज्यातील इतर लोकांनाही नोकरीच्या खूप संधी उपलब्ध होतील. केरळमधील खेड्यातून जागतिक कंपनीचं काम करणाऱ्या माणसाची यशोगाथा

जेम्स जोसेफ

अनुवाद - सुनीता कट्टी

पृष्ठसंख्या : २०४ । किंमत : ₹२४० Book Available



## अँड द माउंटन्स एकोड

अफगाणी खेड्यातल्या, आईच्या मायेला पारख्या झालेल्या दोन भावंडांमधल्या हृदय हेलावणाऱ्या घट्ट भावबंधाची कथा.. तीन वर्षांची परी आणि तिचा दहा वर्षांचा थोरला भाऊ अब्दुल्ला यांच्या आयुष्यात जे जे घडतं त्याचे त्यांच्या आणि त्यांच्या भोवतालच्या अनेकांच्या आयुष्यात जे पडसाद उमटतात, त्यातून मानवी आयुष्यातली नैतिक गुंतागुंत स्पष्ट होते.

खालिद हुसैनी

अनुवाद - वैजयंती पेंडसे

पृष्ठसंख्या : ३७६ । किंमत : ₹४४०



## बीइंग मॉर्टल

आपण आता वार्धक्यावर अशा पद्धतीने उपचार करतो, जणू काही तो काही आजार आहे. या सरत्या वर्षांसाठी केवळ औषधोपचार गरजेचे नाहीत, तर या स्थितीतही आयुष्य अर्थपूर्ण, शक्य तेवढे संपन्न आणि परिपूर्ण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आयुष्याच्या अंतिम काळात, स्वतःच्या मर्जीने, प्रतिष्ठेने आणि आनंदाने जगण्यासाठी केलेले यथार्थ मार्गदर्शन

अतुल गवांदे

अनुवाद - वसु भारद्वाज

पृष्ठसंख्या : २७२ । किंमत : ₹२९५




## वर्क लेस, डू मोअर

कामाची व्यापकता, उपलब्ध वेळ आणि अपेक्षित परिणाम यांचा समतोल न साधल्यामुळे तणाव पातळ्यांमध्ये धोकादायक वाढ होत आहे. सुयोग्य वेळव्यवस्थापन व कामाचे नियोजन याद्वारे कमी कष्टात अधिक यश कसे मिळवावे हे सांगणारे पुस्तक

जॅन येगर

अनुवाद - दिलीप गोगटे

पृष्ठसंख्या : २६४ । किंमत : ₹२९५

# झाकोळ

मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर



‘‘उठून जायचं नाही. बस इथे.’’ रत्नाकर इतक्या जोरात ओरडले की चिडून उठलेला दत्ता घाबरून परत बसला. मुक्ता तर बाबांच्या आवाजाने रडकुंडीलाच आली. दोघांच्या चेहऱ्याकडे पाहताना रत्नाकरना आपण खूप मोठी चूक करतोय असं वाटलं. अजूनही निर्णय बदलावा असं वाटून गेलं. मुलांसमोर अखेर त्यांनी विषय काढला होता; पण परिणाम काय होतील याचा अंदाज नव्हता. दत्ता ताडकन उठून निघून चाललेला पाहून ते चिडले.

‘‘मी हे सुखासुखी ठरवलेलं नाही. तुमच्यासाठीच पुन्हा लग्न करतोय.’’ कठोर स्वरात रत्नाकर म्हणाले. ‘‘मला एकट्याला नाही झेपणार तुम्ही दोघं. मुक्ता मोठी होतेय.’’

‘‘बाबा, नका ना करू तुम्ही लग्न. मुक्ताची काळजी करू नका. तिला सांभाळेन मी.’’ दत्ता काकुळतीला येऊन म्हणाला.

‘‘मी लहान नाही कुणी सांभाळायला.’’ मुक्ताने दत्ताकडे रागारागाने पाहिलं. रत्नाकर काहीच बोलेले नाहीत.

‘‘तुम्हाला करायचंच असेल लग्न तर आम्ही हे घर सोडून गेलो की करा.’’ धुसफुसत्या स्वरात दत्ता म्हणाला. त्याच्या मनात भावनांचं तुफान उसळलं होतं. राग, चीड, दु:ख काय नक्की वाटतंय तेच कळेनासं झालं होतं त्याला. तो चिडत होता, विनवणी करत होता, समजावल्यासारखं बोलत होता. रत्नाकरना मुलांना जवळ घेऊन शांतपणे बोलावंसं वाटत होतं; पण ते त्यांना जमत नव्हतं. निर्णय घेऊन अमलात आणण्याची त्यांना सवय होती. आतापर्यंत इतका वाद कुणीही घातला नव्हता त्यांच्याशी. आपल्या निर्णयाचं समर्थन अंगठ्याएवढ्या मुलांना देणं त्यांना जमेना. असा अवघड क्षण आयुष्यात येईल याची कल्पनाही त्यांनी कधी केली नव्हती. मुलांच्या हट्टीपणापुढे त्यांची सहनशक्ती संपली. समजावून सांगितलं तरी दोघांची वयं धड कळण्याची नव्हतीच. दत्ता आणि मुक्ता जेमतेम आठ आणि तेरा वर्षांचे. स्वत:ची भूमिका कितीही समजावून सांगितली तरी ती त्यांच्यापर्यंत पोचणार नाही हे त्यांना कळत होतं.

‘‘हे लग्न मी तुमच्यासाठी करतोय. माझ्यासाठी नाही. सगळं ठरलंय. आता त्यात बदल होणार नाही. लग्नाची नोटीस दिली आहे महिन्याभरापूर्वी. पुढच्या आठवड्यात आहे लग्न. नोंदणी पद्धतीने. मी एकटाच जाऊन येईन. एका दिवसाचाच प्रश्न आहे. एक रात्र तुमच्या सोबतीसाठी शेजारच्या मावशी येतील.’’ कठोर स्वरात ते म्हणाले आणि दत्ताला उठून जायचं नाही बजावता बजावता तेच चपला पायात सरकवून बाहेर पडले.

‘‘मी पळून जाणार आहे बाबांची बायको आली की!’’ शेजारच्या मावशी काही बोलल्या नाहीत. त्या वाचत होत्या ते वर्तमानपत्र त्यांनी त्याच्यासमोर धरलं.

‘‘काय आहे?’’ दत्ताला कळेना.

‘‘जिथे असशील तिथून परत ये. आम्ही तुला ओरडणार नाही. तुझी आई तू गेल्यापासून अंथरुणाला खिळली आहे.’’ वर्तमानपत्रात कुणा पालकाने लिहिलेलं पत्र मावशींनी वाचून दाखवलं. ‘‘अशी अवस्था व्हायला हवी आहे का तुला?’’

‘‘आई अंथरुणाला खिळली आहे त्यातली. इथे बाबांना काही वाटणार नाही मी गेलो तर.’’

‘‘असं कसं? वडील आहेत तुझे ते.’’

‘‘मग आम्ही नको म्हणून सांगितलं होतं त्यांना लग्न. तरी का करतायत ते? हट्टी नुसते.’’

‘‘आता नाही तुला समजणार ते बाळा. तू मोठा झालास की समजेल सारं. तुमची आबाळ व्हायला नको हाच हेतू आहे तुझ्या बाबांचा. आणि त्यांनी तरी का एकट्याने काढायचं आयुष्य?’’

‘‘आम्ही आहोत की आणि आमचं आम्ही सांभाळू ना स्वत:ला. त्यासाठी बाबांनी पुन्हा लग्न कशाला करायला हवं?’’ दत्ताला त्याच्या बाबांनी लग्न करायचं ठरवलंय हेच मान्य नव्हतं आणि त्याला ते मान्य नव्हतं म्हणून मुक्तालाही. दोन दिवस मावशी दोघांचीही समजूत घालत राहिल्या.

रत्नाकर लग्न करून यायच्या दिवशी दत्ता आणि मुक्ता दिवसभर भटकत राहिले. दोघांनाही घरी परत यायचं नव्हतं आणि कुणाच्या घरीही जायचं नव्हतं. मित्रमैत्रिणींना तोंड दाखवायची लाज वाटत होती. त्यांच्या घरी गेलं तर बाबांच्या बायकोबद्दल सर्वांच्या आया प्रश्न विचारणार याची दोघांनाही खात्री होती. दोघं निरुद्देश भटकत राहिले. भुकेलेल्या, कोमेजलेल्या चेहऱ्याने अल्पशा आजारात अचानक गेलेल्या आईच्या आठवणीत रमले.

‘‘आपलीच आई का नेली देवाने? आपण वाईट वागलो का? आई म्हणायची, ‘‘वाईट वागलं की देव शिक्षा करतो.’’ मुक्ताच्या शंकांचं निरसन दत्ता आपल्यापरीने करत होता.

‘‘देव लहान मुलांना नाही करत शिक्षा.’’

‘‘म्हणजे बाबांनाच केली त्याने शिक्षा. आईचं ऐकायचे नाहीत कधी ते.’’ मुक्ताला तिच्या बाबांचा खरंच राग आला. ‘‘आईला नेलं म्हणून बाबांना देवाचा राग आलाय का? म्हणून दुसरी आई आणायचं ठरवलं असेल का त्यांनी आपल्याला?’’ मुक्ताचा गोंधळ उडाला.

‘‘चक्रम आहेस. त्यांनाच हवी होती दुसरी बायको.’’ दत्तानं तिरसटून उत्तर दिलं. दोघांना नवीन आईचं तोंडही बघायचं नव्हतं; पण घर सोडून जायचं कुठे ही मोठी चिंता त्यांना छळत होती. आपोआप पावलं घराच्या दिशेनेच वळली. मुक्ताला बाबांची बायको कशी असेल ते खरं तर बघायची उत्सुकता होती; पण दत्ताच्या रागीट चेहऱ्याकडे तिचं लक्ष गेलं

तसा तिनंही आपला चेहरा गंभीर केला. मुकाट्यानं दोघं घरात शिरले. घरात शांतता होती. बाबा संतापणार याबद्दल दत्ता आणि मुक्ताला खात्री होती; पण समोर आली ती नवीन आई. तिच्याकडे दोघं बघत उभे राहिले. बाजूला बाबा उभे होते. मुक्ता त्यांना जाऊन बिलगली. दत्तानं रागीट कटाक्ष टाकला तशी हळूच ती दत्ताच्या बाजूला परत येऊन उभी राहिली. आता काय करायचं ते दोघांना कळत नव्हतं. बाबांच्या रागाला तोंड द्यायच्या तयारीत दोघांनी पाऊल टाकलं होतं आणि समोर आली ती नवीन आई- तीदेखील हसतमुख.

''भूक लागली असेल ना. मी ताटं घेते.'' नवीन आईच्या हातचं काही खायचं नाही हा दोघांचा निश्चय ढासळला. पोटात कावळे कोकलत होते. दोघं मुकाट्यानं जेवायला बसली.

''मला काकू म्हटलंत तरी चालेल.'' दोघं क्षणभर काहीच बोलली नाहीत. खरं तर या विषयावर त्यांनी खूप चर्चा केली होती. नवीन आई, बाबांची बायको किंवा नुसतंच 'अहो' म्हणायचं का, ते ठरत नव्हतं; पण तो प्रश्न परस्पर सोडवला गेला. दोघांनी माना डोलावल्या. तरी एकमेकांशी बोलताना बाबांची बायकोच म्हणायचं, हेही त्यांनी मनातल्या मनात ठरवून टाकलं. जेवणं झाल्यावर डोळ्यांवर झोप असूनही मुक्ताला राहवलं नाही. ती दत्ताच्या कानात कुजबुजली,

''बरी वाटतेय की बाबांची बायको. सावत्र आई नाही वाटत.''

''लगेच हुरळून जाऊ नकोस. सावत्र आई वेगळी दिसत नाही; पण तिचा जन्म छळ करण्यासाठीच झालेला असतो.'' दत्ताच्या माहितीत आत्तापर्यंत सावत्र आई एकही नव्हती; पण त्यानं वाचलेल्या गोष्टींमधली सावत्र आई मुलांचा छळ करणारीच होती. सिंड्रेलाची आई तर जिवंत उदाहरण. बाबांची बायको तशीच असणार. तिनं तसंच असायला हवं. मुक्ता उगीचच तिच्यावर भाळलीय, ते दत्ताला अजिबात आवडलं नाही.

दमलेले दत्ता आणि मुक्ता गाढझोपले. बाबा येऊन केसांवरून हात फिरवून, थोपटून गेले, तेही त्यांना कळलं नाही. सकाळी जाग आली तेव्हा ते कामावर निघून गेले होते. काही न बोलता दोघांनी आपापलं आटोपलं. उन्हाळ्याची सुटी चालू होती, त्यामुळे अख्खी सुटी बाबांच्या बायकोबरोबर काढायच्या कल्पनेनं दोघांच्या अंगावर काटा आला. काकूंनी दूध समोर ठेवलं.

''मला बिस्किटं पाहिजेत. आमची आई रोज एक अख्खा बिस्किटाचा पुडा द्यायची.'' मुक्ताला रडावंसं वाटत होतं. काकूंनी बिस्किटांचा पुडा समोर ठेवला.

''मला अंडं द्यायची रोज. मी अशक्त आहे म्हणून.'' दत्ता कुरकुरला.

''पण तू माझी बिस्किटं पण खातोस.'' मुक्तानं दुधात बिस्किट बुडवत म्हटलं. काकू हसल्या.

''अंडं उकडते मी. तुमच्या बाबांना विचारलं होतं; पण त्यांना काही सांगता आलं नाही. तुम्हीच सांगा तुमच्या आवडीनिवडी. तुमची आई करायची तसं करायला शिकवा मला. चालेल?'' मुक्ता खुदकन हसली.

''तुम्हाला येत नाही? मोठ्या माणसांना शिकवावं नाही लागत; पण मी शिकवेन तुम्हाला.''

''काकूला कुणी अहो काकू म्हणतं का? मला ए काकूच म्हणायचं.''

''चालेल!'' मुक्ताला नवीन आई आवडायला लागली होती. आईसारखीच होती. दत्ताला त्यांची जवळीक अस्वस्थ करत होती.

''अंडं,'' तो जोरात ओरडला. दोघी दचकल्याच. काकूंनी घाईघाईत उकडलेलं अंडं सोलून त्याच्यासमोर ठेवलं; पण ताटली बाजूला ढकलत, पाय आपटत दत्ता व्हरांड्यात जाऊन बसला. त्याच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहायला लागलं.

''आई म्हणायची, 'दत्ता अगदी बाबांसारखा आहे शीघ्रकोपी.'' मुक्तानं दुसरं बिस्किट दुधात बुडवलं. काकू तिच्या मोहक आविर्भावाकडे पाहत राहिल्या. तिला जवळ घ्यावं असं वाटत असूनही त्यांनी तो मोह टाळला. उगाच घाई करायची नव्हती त्यांना. हळूहळू मुलांना आपली सवय होईल याची त्यांना खात्री होती. त्या उठून व्हरांड्यात गेल्या. कोपऱ्यातल्या बाकड्यावर बसलेला दत्ता त्यांना अगदी केविलवाणा वाटला. एकटक बघत बसला होता समोरच्या झाडांकडे. गुडघे पोटाशी घेऊन बाकड्यावर अस्वस्थपणे पाय वाजवत होता. त्याच्या सैरभैर मनावर फुंकर घालावीशी वाटत होती काकूंना. त्याला वाटतंय तशा त्या वाईट नाहीत, हे सांगावंसं वाटत होतं; पण ही ती वेळ नव्हती हेही जाणून होत्या त्या. त्याच्या बाजूला जाऊन त्या बसल्या. अलगद त्यांनी त्याच्या पाठीवर हात फिरवला. बराच वेळ दत्ता गुडघ्यात डोकं खुपसून रडत राहिला आणि अचानक काकूंचा हात बाजूला ढकलून चालताही झाला. समोरच्या झाडांवर नजर खिळवून काकू तिथेच बसून राहिल्या.

वर्षभरात वरवर पाहता वातावरण निवळलं. मुक्ता काकूंच्या सहवासाला सरावली. सुरुवातीला ती दत्ताला धरून धरून असायची; पण तिला काकू आवडल्या होत्या. दत्ता मात्र काकूंना त्रास द्यायचा, त्यांना नावं ठेवायची संधीच शोधत असायचा. नकळत मुक्ताचं दत्ताशी बोलणं, त्याच्या मागे मागे करणं कमी व्हायला लागलं. आणि त्याच वेगानं दत्ताचं वागणं बदलत गेलं. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून त्याच्याबद्दल सतत काही ना काही तक्रारी यायला लागल्या. घरातही तो सारखा चिडलेलाच असायचा. काकूंना, रत्नाकरना यात बदल कसा घडवायचा ते कळत नव्हतं. त्या दिवशी त्यांच्या चिंतेत अधिकच भर पडली. शाळेतून दत्ताच्या शिक्षकांची चिठ्ठी आली आणि रत्नाकर धास्तावले.

''चूक झाली माझी. वाटलं होतं मुलांना आई मिळेल; पण तो तुला आई मानायलाच तयार नाही.''

''तुम्ही उगाच टोक गाठू नका. त्याला वेळ द्यायला हवा आपण. नकळत्या वयाचे परिणाम आहेत हे. शाळेत जाऊन भेटल्याशिवाय नक्की काय ते समजणार नाही.'' फार वाद न घालता रत्नाकरनी ते मान्य केलं. दोघं शाळेत गेले. प्रगतिपुस्तक सही न करताच दत्तानं परत केलं होतं. सगळ्या विषयांत जेमतेम पास.

''दत्ता हुशार आहे आणि यापूर्वी इतके कमी गुण त्याला कधीच नव्हते. त्यानं प्रगतिपुस्तक तुम्हाला न दाखवताच परत आणून दिलं. म्हणून मुद्दाम बोलावून घेतलं. वेळीच लक्ष घालावं लागेल. मी बोललो आहेच त्याच्याशी. तुम्हीही बोला. घरात काही प्रश्न असतील, बदल झाले असतील तर त्याला समजावून सांगा. बहकण्याचं वय आहे हे.'' दत्ताचे शिक्षक पोटतिडकीनं सांगत होते. रत्नाकर आणि काकूंनी दत्ताशी बोलण्याचं आश्वासन दिलं. दत्ताचे गुण सुधारतील याची शाश्वती दिली.

घरी पोचल्यावर कितीही शांतपणे, समजुतीनं बोलायचं ठरवलेलं असलं तरी रत्नाकरनी तोंडसुख घेतलंच. दत्तानं प्रगतिपुस्तक न दाखवल्याचा, शाळेत शिक्षकांना जाऊन भेटावं लागल्याचा राग त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवत होता.

''मी घेईन त्याचा अभ्यास. लग्नाआधी शिकवत होतेच मी.'' मध्येच काकू म्हणाल्या. ढिम्म बसलेल्या दत्तानं एकदम तोंड उघडलं.

''मला नाही शिकायचं तुमच्याकडून काही.''

''नाही शिकायचं म्हणजे? शिकावं लागेल. ही चाचणी परीक्षा होती. वेळीच जागे व्हा. नाहीतर त्याच वर्गात बसायची वेळ येईल. झाली एवढी नाटकं पुरे झाली.'' रत्नाकरांचा आवाज चढला.

''पण मी यांच्याकडून काही शिकणार नाही.'' दत्ता हेकेखोरपणे म्हणाला.

''का नाही शिकायचं? उगाच राग धरून काहीतरी बोलायचं. नसते उद्योग करत राहायचे. शोभतं का तुला? मुक्ता तुझ्यापेक्षा लहान. तिचं आणि काकूचं कसं जमतंय? तू हेकेखोरपणा सोड दत्ता. त्यातच भलं आहे तुझं...'' बाबा बराच वेळ उपदेश करत राहिले. दत्ता कंटाळत ऐकल्यासारखा बसून राहिला. नाइलाजानं दुसऱ्या दिवसापासून काकूंबरोबर अभ्यासाला बसायला लागला.

अभ्यासात प्रगती झाली तरी दत्ताच्या मनातली काकूंबद्दलची अढी काही जात नव्हती. कधी कुठल्या कारणावरून तो चिडेल, रागावून बसेल त्याचा कुणालाच अंदाज यायचा नाही. क्षुल्लक गोष्टीत त्याचा अपमान व्हायला वेळ लागत नव्हता. काकू जपून वागत असल्या तरी दत्ताचं बिनसायला वेळ लागायचा नाही. त्या दिवशी तेच झालं. दोघं अभ्यास करत बसली होती. मुक्ताला भूक लागली म्हणून तिला लाडू द्यायला त्यांनी डबा उघडला. डबा रिकामा.

''मुक्ता, तू संपवलेस का लाडू?'' काकूंनी विचारलं.

''नाही.'' पुस्तकातलं डोकं वरही न काढता मुक्ता उत्तरली.

''दत्ता?'' दत्तानं दुर्लक्ष केलं. त्यांनी पुन्हा तोच प्रश्न विचारला.

''तुम्ही केलेलं मी काही खात नाही. खोटा आळ घेऊ नका माझ्यावर.'' दत्ताच्या उद्धटपणावर प्रयत्न करूनही काकू शांत राहू शकल्या नाहीत.

''दत्ता, मी आळ घेतलेला नाही. फक्त विचारतेय तुला. आणि माझ्या हातचं खात नसशील तर घरी जेवतोस कशाला?''

''जेवणार, जेवणार, जेवणार!'' दत्तानं पुस्तक टेबलावर आपटलं.

''माझ्या हातचं खायचं नाही असा निर्धार आहे ना तुझा?''

''हे माझ्या बाबांचं घर आहे. इथे कुणीही केलेलं मी खाणार. अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या तीन मूलभूत गरजा असतात. शाळेत शिकलोय मी. गरजेपुरतं खातो. खाऊ नाही खात तुम्ही केलेला.''

''दत्ता, तू लाडू खाल्लेस दोन, दुपारी खेळून आलास तेव्हा. काकू झोपली होती.'' मुक्तानं आठवण करून दिली. दत्ता खवळला. त्यानं मुक्ताच्या पाठीत गुद्दा मारला. ती रडायला लागली. काकूंनी पुढे होऊन मुक्ताला जवळ घेतलं. दत्तानं मुक्ताला ओढलं.

''ती माझी बहीण आहे. तुम्ही नका हात लावू. तुम्ही सावत्रपणा करता.'' काही कळायच्या आत घरात आलेल्या रत्नाकरांची पाच बोटं दत्ताच्या गालावर उमटली. काकू हवालदिल होऊन पाहत राहिल्या.

''तुम्ही मारायला नको होतं.'' त्या कशाबशा म्हणाल्या.

''मग काय हा तमाशा बघत बसायला हवा होता?'' घरात आल्याआल्या होणारी कटकट आता रत्नाकरना सहन होईनाशी झाली होती.

''मी बोलले असते. त्याचा राग माझ्यावर आहे. तुम्ही तो तुमच्यावर ओढवून घेऊ नका.''

''घाला काय घालायचा गोंधळ तो. करायला गेलो एक आणि झालं भलतंच असं झालंय माझं.'' बडबडत रत्नाकर पाय धुवायला गेले. काकू दत्ताच्या मागोमाग बाहेर गेल्या. व्हराड्यातलं बाकडं ही दत्ताची जागा होती. तो तिथेच असेल हे ठाऊक होतं त्यांना. त्याच्या बाजूला बसलेल्या मुक्ताकडे लक्ष गेल्यावर त्यांना अगदी भरून आलं. कधीतरी बोलायचं ते या क्षणाला व्हायला पाहिजे हे त्यांना अगदी आतून आतून जाणवलं. नाहीतर विस्कटलेलं घरकुल सांधणं शक्य नाही, हे त्यांना दिसत होतं.

''बाळांनो, हे बघा, मी तुमची आई नाही हे ठाऊक आहे मला. तुमच्या आईची जागा मला घ्यायची नाही. तुमच्या बाबांशी माझं लग्न झालं तेव्हा मला तुम्हाला आधी भेटायचं होतं; पण तुमच्या बाबांना ती कल्पनाच आवडली नाही. मुक्ता खूप लहान आहे, दत्ताचं वय गोष्टी अर्धवट कळण्याचं आहे, असं वाटत होतं त्यांना. जशी तुमची आई हे जग सोडून गेली तसा माझा नवराही. मी एकटी होते. कुणीतरी तुमच्या बाबांना माझ्याबद्दल सांगितलं. ते मला भेटले तेव्हा त्यांनी तुमच्या दोघांबद्दल आधी सांगितलं. मुलांना आई पाहिजे यावर ते ठाम होते. आणि मीदेखील मुलांच्या बाबतीत सावत्रपणा करणार नाही, असा शब्द दिला. दत्ता, तुझ्या मनातल्या सावत्रपणाच्या कल्पना पुस्तकी आहेत. मला खरंच तुमच्याबद्दल माया वाटते. मुक्ता लहान असून तिला माझ्या मनातली माया जाणवली. तुला का नाही जाणवत बाळा? सतत असा स्वतःवर रागावलेला राहिलास, तर त्या रागापलीकडे उभा असलेला आमच्या मनातला जिव्हाळा तुला दिसणारच नाही. आज तुझ्या बाबांनी हात उगारला. असं व्हायला नको होतं. चुकलंच त्यांचं. लहान मुलांचा तोल गेला तर मोठ्यांनी सावरायचं, स्वतःचा तोल ढळू द्यायचा नाही, हे विसरले ते; पण आता तू तुझ्या वागण्यानं शिक्षा करू नकोस त्यांना. तुझी आई गेली. अचानक गेली. तिचा आजार लक्षात येण्याआधीच व्याधीनं टोक गाठलं होतं. यात चूक कुणाचीच नाही. तिच्या जाण्याची शिक्षा तू स्वतःला नको करून घेऊ.'' बराच वेळ काकू बोलत राहिल्या. दत्ताला आणि मुक्ताला किती समजत होतं त्यातलं तेही त्यांना कळत नव्हतं; पण त्या बोलत राहिल्या. आपलं मन मोकळं करत राहिल्या. मुक्ता त्यांना येऊन बिलगली. दोघी दत्ता काही बोलेल म्हणून वाट पाहत राहिल्या. दत्ताचा चेहरा निर्विकार होता. त्याच्या सवयीप्रमाणे तो समोरच्या झाडांकडे एकटक पाहत होता. बराच वेळ त्या ताटकळत उभ्या राहिल्या. अखेर दत्ताकडे पाठ फिरवीत मुक्ताचा हात धरून त्या पुन्हा घरात शिरल्या.

त्या प्रसंगानं दत्तात विलक्षण बदल झाला. त्यानं रत्नाकरांशी बोलणं जवळजवळ सोडलं. बोलायची वेळ येई तेव्हा त्याच्या देहबोलीतून नकारात्मकता स्पष्ट जाणवायची. रत्नाकरनी त्यानं मन मोकळं करावं, त्याची बाजू समजून घ्यावी म्हणून खूप प्रयत्न केले; पण तो घराबाहेरच

राहायला लागला. जेवण्याखाण्यापुरतं घरात डोकवायचं. बाकी सारा वेळ अभ्यासाचं निमित्त करून बाहेर. आहे ती परिस्थिती प्रत्येकानं अखेर निमूटपणे स्वीकारली. निदान तो घरी परत येतोय यात समाधान मानायला शिकले रत्नाकर आणि काकू. मुक्ता पहिल्यापासून शांत होतीच. त्यात समंजसपणाची भर पडली. ती दत्ताला समजावून सांगायचा प्रयत्न करायची. त्यानं काकूंशी चांगलं वागावं म्हणून विनवायची; पण दत्ता कधी दुर्लक्ष करायचा तर कधी तिच्यावर चिडायचा. पुस्तकात डोकं खुपसून बसायचा. अभ्यासाचं निमित्त करून सगळ्यांशीच बोलणं टाळायचा.

घरापासून दुरावत गेलेला दत्ता स्वतःला अभ्यासात गुंतवत राहिला. त्याला स्वतःला सिद्ध करावंसं वाटत होतं. त्याला कुणाची गरज नाही हे दाखवून द्यायचं होतं. त्याच ध्येयानं तो झपाटला होता. त्याच्या अथक प्रयत्नांना फळही आलं. दहावीत दत्ता केंद्रात पहिला आला. रत्नाकर, काकू आणि मुक्ताला आभाळ ठेंगणं झालं. त्यांच्या आनंदात दत्ता असून नसल्यासारखा सहभागी झाला. त्याच वेळी पुढच्या शिक्षणासाठी बाहेरगावी राहायचंय  हे त्यानं सांगून टाकलं. त्याला या घरापासून, गावापासून, जवळच्यांपासून लांब जायचं होतं. कुणीच फारसा विरोध केला नाही. कोणत्याही महाविद्यालयात सहज प्रवेश मिळेल असेच त्याचे गुण होते.  आणि तसंही त्याचे बेत आधीच ठरले असावेत. तो परवानगी मागत नव्हताच; फक्त सांगत होता. त्या क्षणाला रत्नाकरांना पराभूत झाल्यासारखं वाटलं. 'इतकी गुर्मी असेल तर पुढचं शिक्षणही स्वतःच्या बळावर कर' असं बजावावंसं वाटलं; पण विरत चाललेलं नातं नामशेष करायचं धाडस त्यांना झालं नाही.

पाहता पाहता शिक्षण पूर्ण झालं. दत्ता नोकरीलाही लागला. स्थिरावला. अधूनमधून मुक्तासाठी तो घराची पायरी चढायचा- तेवढंच. घराशी नातं त्यानं जेमतेमच ठेवलं. दर पंधरा दिवसांनी घरून येणाऱ्या फोनवर तो तिघांशी मोजकंच बोलायचा. कधीकधी बोलणं त्याच्याकडून जास्त रेंगाळतंय असं वाटलं की तटकन फोन बंद करायचा. दत्ताच्या नोकरीला वर्ष होण्याच्या दरम्यान मुक्ताचं लग्न ठरलं. लग्नाच्या तयारीत तो शरीरानं उत्साहानं वावरला; पण मनानं फार दूर होता. कितीतरी दिवसांनी तो सलग १५ दिवस घरी राहिला. बाबा आणि काकूंबरोबरचे मुक्ताचे बंध त्याला अस्वस्थ करत राहिले. मुक्ता रत्नाकरांचा निरोप घेताना जितकी गदगदली नसेल तेवढी काकूंना सोडून जायच्या कल्पनेनं गहिवरली. त्या निरोपाच्या क्षणी त्याला जाणवलं, तो एकाकी आहे. सावत्र आई नाकारण्याच्या हट्टापायी त्यानं स्वतःला दूर लोटलंय सर्वांपासून. पार न करता येणारं अंतर पडलं आहे.  ते मिटवणं अवघड आहे. त्या तिघांचं जग वेगळं आहे. त्यांच्या जगात तो असला तरी तिथे त्याला स्थान नाही. तो एकटा आहे, एकाकी आहे.  का असं झालं? स्वतःमुळे? काकूंमुळे? परिस्थितीमुळे? अचानक तो थबकला. विचार करत राहिला. त्याच्या प्रश्नाचं उत्तर त्यालाच मिळालं होतं; पण  उत्तर स्वीकारणं जड जात होतं, नाकारावंसं वाटत होतं. निदान त्या वेळी तरी.

द्विधा मनःस्थितीत तो घरी परतला. काहीतरी करायला हवं होतं; पण नक्की काय करायचं? पुलाखालून इतकं पाणी गेलं होतं की आता खरंच काही फरक पडेल? त्यापेक्षा आहे हे असंच चालू द्यावं? मुक्ताकडे बोलावं? का सरळ जाऊन बाबा आणि काकूंपुढे मन मोकळं करावं? त्याला ठरवता येत नव्हतं. अपराधी मन अनेक शंका निर्माण करत होतं. अखेर त्यानं कागद हातात घेतला.

बाबा आणि काकू,

काकू, आधी मी तुझी माफी मागतो. केलं ना तुझ्या मनासारखं अखेर? तुझा उल्लेख परक्यासारखा केला नाही. 'तू' म्हटलंय. आनंद झाला ना? काकू, मला खरंच माफ कर गं. फार फार चुकलंय माझं. शेजारच्या मावशींनी तू यायच्या दिवशी सांगितलं होतं की बाबांचा निर्णय योग्य होता हे  तुला मोठा झालास की कळेल. ते किती खरं होतं, हे या क्षणी जाणवतंय. खूप वर्षं फुकट घालवली मी. फार वेळ लावला मोठं व्हायला. मुक्ता फार लवकर मोठी झाली. तिला फार पट्कन कळलं सारं आणि तिनं ते स्वीकारलंही लगेच. तू एकदा कळवळून सांगितलं होतंस 'स्वतःवर रागवू नकोस. त्या पलीकडचा जिव्हाळा बघ.' नाही जमलं मला ते. आज मुक्ताचं आणि तुझं नातं पाहताना आता आत काहीतरी तुटल्यासारखं वाटत राहतं. तुम्ही मला कधीच दूर लोटलं नव्हतं. मीच वाहवत गेलो भावनेच्या, रागाच्या भरात. सावत्र आई नाकारता नाकारता मी बाबांना आणि मुक्तालाही माझ्या आयुष्यातून नाकारलं, वजा केलं.  खूप विचार केला. मला हे प्रत्यक्ष सांगायला किंवा फोनवरही नसतं जमलं. ई-मेल तुम्ही वाचत नाही आणि व्हॉट्स ॲपवरून मनातलं कळविणं योग्यं नाही वाटलं. अखेर चक्क पत्र लिहितोय मी. कितीतरी वर्षांनी काळ्यावर पांढरं करतोय. मुक्ताच्या लग्नानंतर सतत मी विचार करतोय, पडलेल्या प्रश्नांची उत्तरं शोधतोय. काही उत्तरं मला सापडली. काही तुमच्यासह शोधेन मी यापुढे.

काकू, माझा राग तुझ्यावर किती होता कुणास ठाऊक! माझा राग आईवर होता. ती आम्हाला अशी सोडून कशी जाऊ शकते, हेच मला कळत नव्हतं त्या वयात. मुक्ताचं वय मोठे सांगतील ते ऐकण्याचं होतं. माझं वय गोष्टींची खातरजमा करण्याचं होतं. आई जितक्या अचानक गेली तितक्याच अचानक बाबांनी लग्नाचा निर्णय घेतला. मागे वळून बघताना लक्षात येतंय, माझा खरा राग बाबांवरही होता. तोही त्यांच्या लग्न करण्यावर नसावाच. त्यांनी आम्हाला दोघांना विश्वासात घेतलं नाही, समजावून सांगितलं नाही याचा. आणि सावत्र आईबद्दल तू म्हणालीस तसं माझ्या मनाभोवती एक चित्र होतं. मी त्यातच गुरफटलो. तुला त्याच रूपात पाहण्याचा किंवा तू तशी असावीस असाच हट्ट धरला. त्याच दृष्टिकोनातून तुझ्याशी वागलो, तुला पाहिलं. मी तुम्हा तिघांनाही खूप त्रास दिलाय. मला माफ कराल? मुक्तानं किती वेळा माझ्याशी बोलायचा प्रयत्न केलाय. ती, तू किती चांगली आहेस हे सतत

मला पटवून द्यायच्या प्रयत्नांत असायची. आणि त्याचाच मला जास्त राग यायचा. माझ्या बरोबरीनं तुला तिनं त्रास द्यावा, नावं ठेवावीत असं वाटायचं मला. तिने तसं केलं नाही त्यामुळे मला तिचाही राग यायचा. तू माझ्याशी नेहमी चांगलीच वागलीस. तेही मला चालायचं नाही; कारण माझ्या वागण्याचं खापर मला तुझ्या सावत्रपणावर फोडता येत नव्हतं. मी त्यामुळे तुला आणखी आणखी त्रास द्यायचो, तुझ्या सहनशक्तीची परीक्षा घ्यायचा प्रयत्न करायचो. शेवटी तुझा नाही पण बाबांचा तोल ढळला. त्यांची माझ्या गालावर उमटलेली बोटं मला खूप काही शिकवून गेली. मी शिक्षणासाठी बाहेर राहायचं ठरवलं तेव्हा मुक्तानं बाबांचीही बाजू मांडली असती तर कदाचित लवकर डोळे उघडले असते. एकत्रच राहिलो असतो आपण; पण आपण सगळेच समजत होतो की माझा राग तुझ्यावर आहे. अगदी मलासुद्धा तसंच तर वाटत होतं; पण माझा खरा राग आई-बाबांवर होता. त्यांचंही यात काही चुकलेलं नाही हे आता जाणवतंय. आईच्या हातात तर काहीच नव्हतं. मृत्यूनं अकाली झडप घातली तिच्यावर. त्यामुळे बाबांची अवस्था दोलायमान झाली असणार. आमच्यासमोर बोलणं अवघड वाटलं असणार त्यांना. सगळं कळतंय आता. खरंतर वेळोवेळी त्यांनी त्यांची बाजू सांगायचा प्रयत्न केला होता, हेही लक्षात येतंय. मीच माझे कान बंद केले. स्वतःला कोषात बंद करून टाकलं. तुम्ही दोघं मला माफ करा. कराल ना? करालच. माझं चुकत असलं तरी इतकी वर्षं सांभाळून घेतलंत मला. मी मात्र माझंच बालपण झाकोळून टाकलं आणि तुमच्या आयुष्यातला आनंद. आता तसं होणार नाही. ते दिवस परत नाही येणार; पण येणारे दिवस मी झाकोळू देणार नाही...

जे जे सुचेल ते ते, तो लिहीत होता. पत्र लिहून पूर्ण झालं आणि पुन्हा पुन्हा दत्ता ते वाचत राहिला. पोस्टानं पाठवायचं, स्वतः जाऊन हातात द्यायचं की बाबा-काकू आणि मुक्ताला समोर बसवून वाचून दाखवायचं? नक्की या पत्राचं काय करायचं, हाच विचार दत्ताच्या मनात बराच वेळ घोळत राहिला.

''या क्षणाची वाट पाहत होते इतकी वर्षं!'' पत्रावर मायेनं हात फिरवीत काकू म्हणाल्या.

''माझ्यावर, त्याच्या आईवर आणि मुक्तावर रागावला होता तर दत्ता. इतकी वर्षं आपण समजत होतो की त्याचा राग तुझ्यावर आहे. तू सावत्र म्हणून तुला तो स्वीकारू शकत नाही; पण तू सोडून सगळ्यांवर रागावलं होतं लेकरू.'' रत्नाकरनी चष्मा अलगद काढला. अश्रूंनी ओल्या झालेल्या चष्म्याच्या काचा ते पुन्हापुन्हा पुसत राहिले.

''ते त्याला आता कळतंय. त्यालाही त्याचा राग माझ्यावरच आहे असं वाटत होतं.'' काकू डोळे पुसत म्हणाल्या. ''मला फार अपराधी वाटायचं. दत्ताच्या आईची मी मनातल्या मनात कितीतरी वेळा क्षमायाचना केली आहे. माझ्यामुळे दत्ता तुम्हाला, मुक्ताला दुरावला असं वाटायचं.'' काकूंना हुंदका फुटला. कितीतरी वेळ दोघं एकमेकांची समजूत घालत राहिले. दत्ताच्या पत्रानं मनावरचं ओझं उतरलं होतं. झाकोळलेलं अवकाश मोकळं झालं होतं. दोघांनाही पुन्हा पुन्हा तेच बोलावंसं वाटत होतं. बऱ्याच वेळानं पत्राची घडी घालत काकूंनी पत्र बाजूला ठेवलं. रत्नाकरांनी पत्र उचललं.

''घे, एकदा वाच परत. वाट चुकलेलं कोकरू घरी परतलंय. संपली अखेर आपली प्रतीक्षा!'' काकूंनी त्या पत्राकडे अतीव मायेने पाहिलं आणि आतापर्यंत दहा वेळा वाचलेलं पत्र पुन्हा वाचायला घेतलं.



mohanajoglekar@gmail.com



नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## 'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकास मिळालेले पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषद अ.स. गोखले स्मृत्यर्थ **'रत्नाकर पुरस्कार' २००९**

मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने **'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २००९**

**'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २०११**

रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्यनगर तर्फे

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०१०**

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०११**

नंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय **'नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार २०१०'**

दिनमार्क पब्लिकेशन तर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१७'**

**३ वर्षांची वर्गणी ₹४५०** | **५ वर्षांची वर्गणी ₹६००**

**'मेहता मराठी ग्रंथजगत' डिजिटल अंक**

**३ वर्षांची वर्गणी ₹३००** | **५ वर्षांची वर्गणी ₹४००**

**वर्गणीदारांना आमची सर्व पुस्तके सवलतीत मिळतील.**

**पोस्टखर्चासह रक्कम मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा पाठवावी.**

**लवकरच वर्गणीदार व्हा व सवलतीचा लाभ घ्या**

| तीन वर्षांना | आमच्या पुस्तकांवर | पाच वर्षांना |
|---|---|---|
| २५% | वर्गणीदारांसाठी सवलत | ३०% |







## नवं कोरं




रानशिवारात फुलणाऱ्या प्रेमाची उत्कट सत्यकथा.

'The Dirty Life' या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

# मातीचे मम अवघे जीवन

क्रिस्टीन किंबल

अनुवाद : मेधा मराठे

पृष्ठसंख्या : २४८। किंमत : ₹२८०

Book Available



कारुण्याला विनोदाचा साज चढवत गुंतवून ठेवणारी कादंबरी

# आंधळ्या बाईचे वंशज

अनीस सलीम

अनुवाद : श्यामल चितळे

पृष्ठसंख्या : २५२। किंमत : ₹२९५

Book Available




गर्वाचं सकारात्मकतेत परिवर्तन करत आणि भोवतालाशी जुळवून घेण्याचा मंत्र देत सामाजिकतेचे नवे संदर्भ पेरणारं लोकप्रिय पुस्तक...

'A New Earth' या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

# अवनी एक नवी

एकहार्ट टोले

अनुवाद : नीलिमा जोशी

पृष्ठसंख्या : २००। किंमत : ₹२४०

Book Available

# तिनका तिनका तिहार




गजाआडच्या महिलांचे काव्यात्मक भावबंध

वर्तिका नंदा, विमल मेहरा

अनुवाद : मंजिरी धामणकर

पृष्ठसंख्या : १४८ । किंमत : ₹१८०

Book Available

# 'साधने'




धैर्य, कल्पकता आणि विश्वासाचा कानमंत्र असणाऱ्या 'The Tools' चा अनुवाद

फिल स्टुट्झ । बॅरी मायकेल्स

अनुवाद : डॉ. जयश्री गोडसे

पृष्ठसंख्या : २०८ । किंमत : ₹२५०

# साहित्य विश्वातला पत्रव्यवहार

वामन देशपांडे



अंतस्थ मनातले भावविश्व अत्यंत तरल पातळीवर प्रकट करणारी पत्रे, हा प्रत्येकाच्या आयुष्यातला काळीजठेवा आहे. अभिजात मराठी साहित्य विश्वातला पत्रव्यवहार हा तर, अत्यंत हवाहवासा वाटणारा शब्दखजिनाच आहे. अशा या जिवाला सुखवणाऱ्या, तसंच काळजाचा ठाव घेणाऱ्या पत्रांमधून लेखक आपले भावविश्व अधिक ताकदीने व्यक्त करीत असतो. वैयक्तिक पत्रे आणि अभिजात साहित्यातून शब्दबद्ध झालेली पत्रे, हा तर एक श्रेष्ठ असा अनमोल ठेवा असतो. सहसा साहित्यिक आणि त्यांच्या साहित्यावर निरतिशय प्रेम करणारा त्यांचा वाचक वर्ग यांच्यामधला हृदयसंवाद जेव्हा पत्रांमधून प्रकट होतो, तेव्हा ती पत्रे तर वाचक अगदी जपून ठेवतो आणि ती साहित्यिकांकडून आलेली पत्रे हा त्या त्या वाचकाचा दुर्मिळ असा आनंदठेवा ठरतो.

श्रेष्ठ साहित्यिकांनी आपल्या प्राणप्रिय वाचकांना जी पत्रे लिहिली, त्यात सर्वांत जास्त जपून ठेवली गेलेली पत्रे ही श्रेष्ठ कथालेखक जी. ए. कुलकर्णी यांची होती. जी. ए. कुलकर्णी यांची पत्रे साहित्य विश्वात अधिक चर्चेचा विषय झाली होती. 'जी.एं.'ची पत्रे प्रदीर्घ असत. त्यातला काही पत्रव्यवहार हा पुस्तकरूपात पुढे प्रसिद्धसुद्धा झाला आणि ही पुस्तके एक अभिजात साहित्य म्हणून वाचकांकडून संग्रहितसुद्धा झाली. काही वाचक माझ्या पाहण्यात आले, की त्यांनी जी. ए. कुलकर्णी यांच्याकडून आलेली पत्रे चंदनाच्या पेटीत ठेवून, जणू त्या चंदनाला जी. एं.च्या पत्रातल्या शाश्वत अभिजात आशयाचा सुगंध अर्पण केला. अभिजात मराठी विश्वात विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जी. ए. कुलकर्णी यांची पत्रे अधिक चर्चेचा विषय ठरली. श्री. पु. भागवत, सुनीता देशपांडे, तसेच कवी ग्रेस आणि चित्रकार सुभाष अवचट यांना लिहिलेली पत्रे म्हणजे जी. ए. कुलकर्णी यांचे नवे साहित्य दालनच होते. 'जीएं'ची पत्रे पुस्तकांच्या रूपात प्रसिद्ध झाली, हे मराठी वाचकांचे भाग्य म्हणावे लागेल.

ह. वि. मोटे हे एक महदाश्चर्य होते. त्यांनी तर मराठी विश्वातल्या दुर्मिळ पत्रांचा फार मोठा खजिना ग्रंथरूपात प्रसिद्ध केला. १ मे १९७२ रोजी हरिभाऊ मोटे यांनी 'विश्रब्ध शारदा' या अपूर्व पत्रव्यवहाराचा दुर्मिळ खजिना असलेल्या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित केला. त्या अपूर्व ग्रंथात हरिभाऊ मोटे यांनी १८१७ ते १९४७ या कालखंडात होऊन गेलेल्या श्रेष्ठ लेखक, तसेच विचारवंत, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातली डोंगराएवढी माणसे यांच्या खासगी पत्रांचे संकलन करून, परिश्रमपूर्वक संपादन केले आणि आपल्या प्रकाशनातर्फे 'विश्रब्ध शारदा' या सार्थ शीर्षकाखाली प्रथम खंडात प्रसिद्ध केले. त्या पहिल्या खंडाला प्रसिद्ध विचारवंत दि. के. बेडेकर यांची मर्मग्राही प्रस्तावना होती. त्यानंतर तीन वर्षांनी, म्हणजे १ मे १९७५ रोजी 'विश्रब्ध शारदे'चा दुसरा खंड प्रसिद्ध झाला. त्यात रंगभूमी, संगीत, चित्रपट आणि चित्रकला या क्षेत्रांतले जे दिग्गज कलावंत होते, त्यांच्या पत्रांचे संकलन करायचे राहून गेले होते, त्या दुर्मिळ पत्रांचे संपादन हरिभाऊंनी केले आणि हा अभिजात दुसरा खंड प्रसिद्ध केला.

साहित्य, संगीत, अभिनय, चित्रपट आणि नाटक या पाचही कला क्षेत्रातले उत्तुंग नाव म्हणजे पु. ल. देशपांडे. त्यांनी या दुसऱ्या खंडाला अत्यंत सुंदर अशी प्रस्तावना लिहिली. हे दोन खंड म्हणजे अप्रतिम असा, पत्रांनी व्यापलेला महाराष्ट्राच्या एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातल्या पूर्वार्धाचा जणू साक्षीभूत सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय तसेच रंगभूमी, चित्रपट आणि चित्रकला यांचा अपूर्व संगमच आहे. पत्रेही इतिहास निर्माण करू शकतात, याचे साक्षात्कारी दर्शन 'विश्रब्ध शारदे'च्या या दोन अप्रतिम खंडांनी घडविले आहे... मूलतः या खंडांतून प्रकाशित झालेली सर्वच पत्रे महाराष्ट्राच्या जडणघडणीचा सव्वाशे वर्षांचा कालखंड अक्षरशः झंकारून टाकतात. ही खुषीपत्रे नाहीत, हे 'विश्रब्ध शारदा'चे दोन्ही खंड वाचताना प्रकर्षाने जाणवते. सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक वास्तवाचे नेमकेपणाने भान देणारी ही जणू बखरच आहे, असे वाटते. पत्रंही किती मूल्यवान असतात, याचे भान देणारा हा पत्रसंग्रह आहे.

ग्रंथरूपात प्रसिद्ध होणारा हा पत्रव्यवहार निदान आपल्यापर्यंत पोहोचतो तरी; परंतु प्रत्येक वाचकाच्या संग्रही असणारा पत्रव्यवहार मात्र अज्ञातच राहतो. त्यांना मुद्रणरूप लाभत नाही, त्यामुळे ही पत्रे सगुण साकार असूनही, निर्गुण निराकारात सहजपणे जातात. मी असे किती तरी वाचक पाहिलेले आहेत, की त्यांच्यापाशी असलेली साहित्य आणि संस्कृतीने भारलेली पत्रे ही केवळ त्यांच्यापाशीच आहेत. पु. ल. देशपांडे हे अत्यंत लाडके असलेले लेखक, त्यांनी तर असंख्य वाचकांना पत्रे पाठवली आहेत. ती सारी पत्रे जी आहेत, त्यांचे योग्य आणि नेमकेपणाने संकलन करून जर ही महत्त्वाची पत्रे एकत्र प्रसिद्ध केली तर एक नवेच पत्रवैभव निर्माण होऊ शकेल. व. पु. काळे यांची पत्रे तर एक अलौकिक ठेवा आहे. 'वपुं'चे अक्षर आणि मांडणी तर विलक्षण वेधक असायची. ज्या भाग्यवान वाचकांकडे 'वपु' आणि 'पुल' यांची पत्रे असतील, त्यांना जाहीर आवाहन करून ही पत्रे जर गोळा केली तर महाराष्ट्राच्या विसाव्या शतकातल्या उत्तरार्धाचा नवा सांस्कृतिक संदर्भ निर्माण होईल. जर १९४७ ते २००० पर्यंतच्या कालखंडाचे एखाद्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ संपादकाकडून संकलन झाले आणि प्रकाशकाने ते प्रकाशित केले, तर महाराष्ट्राच्या वैभवशाली एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाचे कलावैभव वाचकांना नक्कीच अनुभवता येईल... हे पत्रवैभव त्यात इतर महत्त्वाच्या लेखकांची पत्रे एकत्र करून प्रसिद्ध होणे, ही काळाची गरज आहे.

कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे या दोघांमधला प्रेममयी पत्रव्यवहार सुदैवाने प्रसिद्ध झाला आणि साहित्यरत जोडपे कसे एकमेकांच्या सान्निध्यात आले, याचे दर्शन आपल्याला 'कुसुमानिल' मधून घडते. पंडित नेहरूंनी आपल्या मुलीला, म्हणजे इंदिरेला लिहिलेली

पत्रे तर केवळ अद्‌भुतच होती. त्या पत्रांना जागतिक पातळीवर प्रसिद्धी मिळाली. साने गुरुजींची पत्रे तर मराठी वाङ्‌मयातला अनमोल ठेवा ठरली. हे सारे घडले; कारण या पत्रांना प्रसिद्धीचे पंख फुटले म्हणूनच... ग्रंथरूपाने प्रसिद्धी मिळणे हेसुद्धा भाग्यात मात्र असावे लागते.

सत्यात उतरलेली पत्रे जशी लोभसवाणी असतात, तशीच कथानकातून एखादा समर्थ लेखक पत्रमाध्यमातून कथानक उलगडतो तेव्हा एक जाणवते की, 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट...' हे विधान सत्य आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पु. शि. रेगे यांची छोटेखानी कादंबरी स्वरूपात प्रकट झालेली 'सावित्री.' सावित्री हे हवेहवेसे वाटणारे स्वप्नभारले व्यक्तिमत्त्व. तिने आपल्या प्रियकराला लिहिलेल्या अगदी छोट्या छोट्या पत्रांमधून, काव्यात्म पत्रांमधून एक स्वप्न उलगडत जाते. या सावित्रीची उत्कट व्यक्तिरेखा म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानभारल्या स्त्रीचे मनोहारी चित्रण आहे. अत्यंत प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची सावित्री प्रत्येक वाचकाच्या मनात घर करून बसते. एवढी काव्याभारली स्त्री फार क्वचितच मराठी वाङ्‌मयात चितारली गेली असेल. स्वतःविषयी तटस्थ राहून, स्वतःत पूर्णपणे हरवून गेलेली सावित्री, स्वतःला तृप्तपणे विसर्जित करून टाकते. परिपूर्ण स्त्रीचे हे व्यक्तिमत्त्व, स्वतःला विसर्जित करण्यासाठी आतुर झालेली सावित्री, हे एक भारावून टाकणारे व्यक्तिमत्त्व आहे आणि हे सारे तिने आपल्या प्रियकराला लिहिलेल्या काही पत्रांमधून अधोरेखित होत जाते. तिला स्वप्नरंजनाचा मोह आहे. 'सावित्री' ही पत्रात्मक कादंबऱ्यांमधली सर्वश्रेष्ठ कलाकृती आहे.

मराठी साहित्यात पत्रप्रधान साहित्य खूपच कमी आहे; परंतु लेखकांनी लिहिलेली पत्रे मात्र विपुल आहेत. ही सर्व पत्रे जर एक करता आली आणि नवी 'विश्रब्ध शारदा' निर्माण करता आली, तर साहित्यात रममाण झालेल्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिकांचे अंतर्मन वाचकांच्या आनंदाचा नवा विषय होईल. साहित्यातला नवा 'फॉर्म' म्हणून त्याला कदाचित मान्यतासुद्धा मिळेल. एक मात्र निश्चितपणे वाटते की, पत्रे ही अधिक बोलकी असतात आणि या पत्रांमधूनच माणूस समजायला मोठी मदत होते; कारण पत्रांमधून सखोल चिंतन डोकावते. माणूस कळायला मदत होते. म्हणून पत्रे हा मानवी आयुष्याचा अविभाज्य भाग कालपर्यंत होता; परंतु गेल्या पाच-पंचवीस वर्षांत सारे काही बदलून गेले. 'व्हॉटस्ॲप', 'फेसबुक' या नव्या माध्यमांनी अभिजात पत्रसंस्कृती जणू गिळंकृत करून टाकली, ही बोच मात्र जीवघेणी आहे, हे मात्र निश्चित.



९३२४६१५०७७





नवं कोरं

तुकोबा म्हणजे
मराठी माणसाच्या मनातला
एक अभिमानाचा, आत्मसन्मानाचा
आणि आपलेपणाचा हळवा कोपरा.
हा अभिमान, हा आत्मसन्मान,
हा हळवेपणा अबाधित राखणारी कादंबरी.

हेचि दान देगा देवा!

मंजुश्री गोखले

पृष्ठसंख्या : ४४० । किंमत : ₹४५०

Book Available

# पुस्तकांशिवाय घर म्हणजे आत्म्याशिवाय शरीर

नवं कोरं

नाना फडणीस व महादजी शिंदे
यांच्या संयुक्त कार्य-कर्तृत्वाचा परिचय




## नाना आणि महादजी

कुंदन तांबे

पृष्ठसंख्या : १७२ । किंमत : ₹२००

Book Available

दलित साहित्यातील
अभिनव ललित कादंबरीचा
नवा अध्याय



## उकिरडा

ल. सि. जाधव

पृष्ठसंख्या : १७२ । किंमत : ₹२२०

Book Available

वेड्या तरुणाईची
शहाणं करणारी कथा




## वेधुंद

अविनाश लोंढे

पृष्ठसंख्या : १८४ । किंमत : ₹२५०

Book Available

मांसासाठी मरण झेलणाऱ्या
एका बैलाची
कत्तलखान्यातली आपबिती..




## सर्जा

रामचंद्र खाटमोडे

पृष्ठसंख्या : १२४ । किंमत : ₹१५०

Book Available

# पोस्टमन

समीर वेंगुर्लेकर



ज्या काळात केवळ पत्र हेच परगावी राहणाऱ्या माणसाशी संवाद साधायचं माध्यम होतं, त्या काळातील ही कथा..

सकाळच्या पहिल्या डाकेचं टपाल घेऊन पोस्टमन आला आणि गावात येऊन प्रत्येक घरात ज्याचं त्याचं टपाल देऊन गेला. माधवराव या पोस्टमनची आतुरतेनं वाट पाहत घराच्या उंबऱ्यावर उभे राहायचे, की कधीतरी त्यांच्या मुंबईतल्या मुलाचं पत्र येईल आणि कधीतरी तो आपली खुशाली कळवेल.

माधवरावांचा मुलगा मुंबईमध्ये कामानिमित्त गेलेला होता आणि तेथेच स्थायिक झालेला होता. माधवराव गावातल्या घरी एकटेच राहायचे. काही दिवसांपूर्वीच त्यांच्या पत्नीचं निधन झालं होतं. माधवरावांच्या मुलानं त्यांना आपल्यासोबत मुंबईला येण्याबाबत सांगितलं होतं; परंतु माधवरावांचं मन त्यांच्या वाडवडिलार्जित घरातच रमत होतं. तिथे त्यांच्या जुन्या आठवणी नांदत होत्या. माधवरावांचा मुलगा मुंबईला गेल्यापासून जणू तिथलाच झाला होता. ना त्याचं पत्र आलं होतं आणि नाही कोणता निरोप; परंतु कधीतरी आपल्या मुलाचं पत्र येईल आणि त्याची खुशाली कळेल, या आशेवर माधवराव दिवस कंठत होते.

त्यांना कधीतरी वाटायचं की एवढ्या दिवसांत मुलाचं पत्र नाही तर त्याला मुंबईत जाऊन आपण भेटून यावं; त्याची खुशाली समक्षच जाऊन विचारावी; पण माधवरावांकडे मुंबईला जाण्याइतपतही पैसे नव्हते. शिवाय त्यांच्या मुलाचा मुंबईतला पक्का पत्ता माहीत नव्हता आणि मुलानंही कधी सांगितला नव्हता; परंतु माधवरावांची इच्छा दांडगी होती. त्यांना एक दिवस मुंबईला जाण्याची संधी चालून आली. काही करून मुलगा कुठेही असला तरी त्याला भेटायचं त्यांनी ठरवलं; पण हाय रे दुर्दैव! ज्या गाडीनं ते मुंबईला जाणार होते, ती गाडी नेमकी चुकली आणि पुढे काही अंतरावर त्या गाडीचा अपघात झाल्याची बातमीही त्यांना समजली. त्यांच्या गावातून मुंबईला जाणारी ती एकमेव बस होती. माधवरावांना आपण अपघातातून बचावलो, ते सुदैव वाटत होते; पण आपल्या मुलाला भेटता आलं नाही आणि या अपघातात जे जखमी झाले त्यांच्याबद्दल हळहळ वाटत होती.

आजही माधवराव रोजच्याप्रमाणे मुलाच्या पत्राची वाट पाहत घराच्या उंबऱ्यावर उभे होते. पोस्टमन रोजच्याप्रमाणे आला आणि पत्र वाटून निघून गेला. माधवरावांचं टपाल काही आलं नाही, तेव्हा शेजारच्या छोट्याशा किराणा दुकानदाराचा मालक त्यांची टर उडवत म्हणाला, ''काय माधवराव, आज कितवी वेळ?'' माधवरावांना त्याच्या बोलण्याचं वाईट वाटलं नाही; त्याचा स्वभाव त्यांना माहीत होता. ते यावर काहीच न बोलता आतमध्ये जाऊन बसले. अधूनमधून त्यांचा एक जुना मित्र त्यांच्या घरी यायचा. मग माधवरावांच्या आणि त्याच्या गप्पा तास न् तास रंगायच्या. जेव्हा माधवरावांच्या मुलाचा विषय यायचा तेव्हा तो मित्र काहीसा गंभीर व्हायचा आणि म्हणायचा, ''हे बघ माधव, अरे, आता मुलं मोठी झाली. आता त्यांना पंख फुटले. ती थोडीच तुझ्या-माझ्यासाठी राहणार आहेत. ती तर मुक्त आकाशात भरारी घेणार. तेव्हा तू तुझ्या मुलाची काळजी करत राहू नकोस. आपण कसं आनंदी असायला पाहिजे बघ.'' अशा वेळी माधवराव काहीसे गहन विचारात राहायचे; परंतु मनातून मात्र त्यांना एक प्रकारची उणीव जाणवायची.

एक दिवस ते असेच स्वयंपाकघरामध्ये काहीतरी काम करीत होते. त्यांच्या मनात आपल्या मुलाचाच विचार चालू होता. खिडकीतून त्यांना पोस्टमन येताना दिसला; परंतु माधवराव आपल्या कामात एवढे मग्न होते की त्यांनी बाहेर येऊन पाहण्याचे टाळले. शेवटी रोजच्यासारखेच आपण उंबऱ्यावर उभे राहणार आणि निराश होणार. पोस्टमन आला आणि निघूनही गेला; पण या वेळी मात्र त्याची 'पोस्टमन...' अशी हाळी ऐकू आली नाही. माधवराव आपल्या कामात एवढे मग्न होते की त्यांना पोस्टमनची हाळी कशी ऐकू येणार होती; परंतु जवळच्या स्टोव्हचा कधी भडका झाला आणि स्टोव्हचा स्फोट झाला तेच त्यांना कळलं नाही.

माधवरावांनी बाहेर येऊन पाहिलं. पाहतात तर काय, पत्रांचा एक लखोटाच त्यांच्या उंबऱ्यावर ठेवलेला होता. माधवरावांनी आश्चर्यानं तो लखोटा उचलून घेतला आणि तो उघडून त्यांनी पत्रं वाचायला सुरवात केली. पत्रं वाचता वाचता त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या, त्यांचे मन उचंबळून आले. मुलानं मुंबईला गेल्यापासूनची पत्रं त्यांना पाठवली होती, त्यावर पोस्टाची तारीख नमूद केलेली होती. माधवरावांनी मागच्या बाजूला उलटून पाहिलं आणि त्यांना आश्चर्याचा दुसरा धक्का बसला; कारण ती सर्व पत्रं त्या पोस्टमनच्याच नावावर आली होती. त्यावर त्याचा पत्ता दिलेला होता. मुलाला माधवरावांचा, पर्यायानं आपल्या घराचा पत्ताच माहीत नव्हता. त्यामुळे त्यानं ती पत्रं पोस्टमनच्या पत्त्यावर पाठवली होती.

आपल्या नावावर ही सर्व पत्रं येत आहेत, याची पोस्टमनला जराशीही कल्पना नव्हती. तो बिचारा आपलं काम करत असायचा; परंतु एक दिवस सहजच त्यानं आपल्याकडील शिल्लक पत्रं पाहिली असता, त्याला आपली चूक समजली होती आणि त्यानं स्वतः येऊन तो पत्रांचा लखोटा माधवरावांच्या घराच्या उंबऱ्यावर आणून ठेवला होता. माधवरावांचं हृदय भरून आलं. पोस्टमनचे आभार मानावेत म्हणून ते त्याच्या मागे मागे पळत गेले; परंतु पोस्टमन भराभर गावाबाहेर जात होता. माधवरावांनी त्याला हाका मारायला सुरवात केली; परंतु त्यानं मागे वळून पाहिलं नाही. अगदी माधवराव त्याच्या मागे जवळ आले असतानाही त्याला हाक ऐकू आली नाही. तो तसाच न थांबता चालत राहिला. माधवराव त्याच्या दिशेनं पाहत होते. त्यांना त्याची अस्पष्टशी सावली दूरवर गेलेली दिसत होती. उंच आकाशात एक घार उगाचच घिरट्या घालत होती. वातावरण अगदी निःशब्द बनलं होतं; परंतु दूरवरच्या त्यांच्या घराबाहेर मात्र गिधाडांचा थवा येऊन विसावला होता आणि कुत्र्याच्या अपशकुनी रडण्यामुळे वातावरण भेसूर वाटत होतं.

sameervengurlekar@gmail.com



# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व **५० रु.** भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात.
पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.
**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**
या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

## टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून उपलब्ध असलेल्या पुस्तकांपैकी कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

## टी बुक क्लब २७ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर** | जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | ५०० |
| **इंटरव्हेन्शन** | रॉबिन कुक | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३२० |
| **बेअर आयलंड** | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | ३६० |
| **द ब्रोकर** | जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाध्ये | ४८० |
| **द ओडेसा फाइल** | फ्रेडरिक फॉर्सिथ | अनु. अशोक पाथरकर | ३८० |

## टी बुक क्लब २७ मधून प्रकाशित होणारे पुस्तक

| | | |
|---|---|---|
| **ब्लॅक लिस्ट** | ब्रॅड थॉर | अनु. बाळ भागवत |

## टी बुक क्लब २८ मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **सेल** | रॉबिन कुक | अनु. डॉ. अजेय हर्डीकर |
| **शाल वी टेल द प्रेसिडेंट?** | जेफ्री आर्चर | अनु. स्नेहा केतकर |
| **द किल लिस्ट** | फ्रेडरिक फॉर्सिथ | अनु. बाळ भागवत |
| **फुल ब्लॅक** | ब्रॅड थॉर | अनु. बाळ भागवत |
| **मायक्रो** | मायकेल क्रायटन आणि रिचर्ड प्रेस्टन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **मुक्तक** | सायमन टॉएन | अनु. उदय भिडे |

**सभासद फी ₹ ५०.** सभासद व्हा व **५०%** सवलत मिळवा!

नवं कोरं



# हॅमिश मॅक्बेथ रहस्यकथा

मूळ लेखिका : एम.सी.बीटन
अनुवाद : दीपक कुळकर्णी







डेथ ऑफ अ कॅड
डेथ ऑफ अ हसी
डेथ ऑफ अ गॉसिप
डेथ ऑफ अ परफेक्ट वाईफ
डेथ ऑफ ॲन आउटसायडर












*दोन प्रेमी जिवांच्या प्रेमाला पत्ररूपी साक्षीदार असलेली एक मावशी. त्या प्रेमी जिवांच्या आणि मावशीच्या केवळ पत्रव्यवहारातून उलगडलेली ही कथा...*

# आत्मबळ

**गिरिजा कीर**



पत्रातल्या लडिवाळ हाकेनं मला आपलंसं केलंय. मी ते स्वतःशीच मोठ्यानं वाचतेय.....

**प्रिय ताई,**

तुम्हाला ताई म्हणावं एवढी मी मोठी नाही. तशी जवळचीही नाही, पण काही माणसे आपल्याला एकदम आवडून जातात, आपलीच वाटतात; का ते ठाऊक नाही. तुम्ही मला आवडलात. तुमच्या शब्दांमुळे आवडलात. त्यातल्या वात्सल्यामुळे आवडलात. तुमच्या डोळ्यांकडे पाहिल्यावर वाटलं, ही बाई कध्धी खोटं बोलणारच नाही.

ताई, आपल्याला कुणावर तरी खूप खूप प्रेम करावंसं वाटतं. ते माणूस आपलं, आपल्या हक्काचं असावंसं वाटतं. पण तसं कुणी भेटतच नाही हो. सगळे कसे खोटारडे, फसवे असतात बघा. पण तुम्ही तशा नाहीत. तुम्ही एवढं पुष्कळसं प्रेम कसं करू शकता? तुम्ही कुणावर कधी रागावता? नाही ना? निदान माझ्यावर तरी रागावू नका बाई!

मी ना, एक चूक केलीय. म्हणजे, चूक की बरोबर मला नाही ठाऊक. ते तुम्हीच सांगा. ही मोठी माणसं आमच्या प्रत्येक गोष्टीला 'चूकच' म्हणतात. पण नेहमी काय आम्हीच चुकत असतो? मोठी माणसं चुकतच नसतात का हो? कारण तरुण वयात त्यांनी काय केलंय हे आम्हाला कुठं ठाऊकाय? आमचे बाबा तर मला 'गधडी'च म्हणतात.

मी खरंच गधडी आहे का हो? प्रेम करणारी माणसं काय नेहमी गाढव असतात? आता आमच्या आई-बाबांनी प्रेम केलं नाही हा काय आमचा दोष? माझे बाबा प्रेम करणारच कसे? बघावं तेव्हा वसा वसा ओरडतच असतात. आई आपली डोळे टिपत असते. बाबांना वाटतं, मीही असंच 'आदर्श' गृहिणी व्हावं. आय मीन, अंगभर पदर, मोठं कुंकू, मधे भांग, एक वेणी, मान खाली. मला तर वाटतं, संसार नावाच्या तुरुंगात बाबांनी आईला बंदिस्त करून ठेवलंय.

मला असला तुरुंगाधिकारी नवरा नको. मला हसरा, खेळकर, आनंदी आणि थोडासा येडा असा जोडीदार हवा. आता मला काय हवं हे मीच ठरवायचं ना? का तेही या मोठ्या माणसांनी ठरवायचं?

अहो ताई, परवा ना आमच्या बाबांनी चक्क एक स्थळ आणलं. म्हणे, तुला बघायला येणार. बघायला? मी काय सर्कशीतला वाघ आहे? आणि एक यडच्याप आला की 'बघायला!' मी जाम गम्मत केली. त्यानं माझ्याकडं पाहिलं की मी वेडावून दाखवायची. मग त्यानं माझ्याकडे रागानं बघितलं. मी सरळ डोळे चकणे केले. अश्शी मज्जा आली! तुम्ही एकदा हा प्रयोग करून बघाच... सॉरी! आता कशा बघणार तुम्ही? तुम्ही वयानं केवढ्या तरी मोठ्या. शिवाय लग्न वगैरे झालेल्या. मी काहीतरीच खुळ्यासारखं लिहिलं नाही? जाऊ दे. मला ना तुम्ही मैत्रीणच वाटता. लक्षातच राहत नाही, तुम्ही वयस्कर आहात ते. पण यात माझी काय चूक? तुम्ही किती मिळूनमिसळून वागलात त्या दिवशी. अगदी फ्रेंडशिप बँड बांधून घेतलात आमच्याकडून. मग आपण मैत्रिणी झालो ना?

आता एक गुपित सांगू? ताई, माझं ना... माझं ना एका मुलावर जाम प्रेम बसलंय... मी चुकले नाही ना? म्हणजे मी प्रेम करणारच नव्हते, पण ते होऊनच गेलं. आता काय करायचं? आता हे सगळं कसं घडलं ते

**प्रिय नील,**

रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी तुझी पत्रं समोर पसरून मी बसले आहे. नुकताच पाऊस झडझडून गेलाय. बऱ्यापैकी गारवा जाणवतोय. अशा वेळी हलकीशी शाल अंगावर घेऊन मस्त झोप काढायला हवी. पण माझी अवस्था 'संयमी' लोकांसारखी झालीय. म्हणजे ऋषिमुनींची ही प्रातःस्मरणाची वेळ नाही का?

संस्कृतात माणसाला 'भूत' म्हणतात. पण माझी स्थिती मराठीतल्या भुतासारखी झालीय. लेखकाचं मन मोठं वाईट असतं. एखाद्या विचारानं ते पछाडलं की त्यातून सुटका नाही. तो विषय पिंजून काढायचा. त्यातून अनेक प्रश्न. उत्तरं मिळेपर्यंत मनाला स्वस्थता नाही.

खरं तर मी तुझा एवढा विचार का करावा? तू कोण, कुठची, कुणाची कोण? तुझं भूत-वर्तमान मला काहीही ठाऊक नाही. पण तुला प्रथम पाहिली तेव्हाच तू माझ्या मनाला चिकटलीस. तुझा निरागस चेहरा अन् बोलके डोळे माझ्या मनाशी मैत्र जोडून गेले.

मला वाटतं, पूर्वजन्मीचे काही ऋणानुबंध असावेत. त्या संकेतानुसार आपण एकमेकांकडे ओढले जातो. तुलाही तसंच काही वाटलं असावं. नाहीतर वय, परिस्थिती, स्तर हे सगळं क्षणात नजरेआड करून तू माझ्या इतकी निकट आली नसतीस. एक मनाची हाक असते बघ, (पटतंय ना तुला पण?) ती आपल्याला आपोआप ओढून नेते.

खरं तर तुला प्रथम पाहिली तेव्हाच मला तुझ्याशी खूप बोलावंसं वाटलं. अगदी आतड्यानं चौकशी करावीशी वाटली. तुझ्यासंबंधी सारं काही समजून घ्यावंसं वाटलं. तू अशी होस्टेलमध्ये एकटी का राहतेस? वगैरे.

पण हे प्रश्नही फिजूल आहेत. गर्दीत असून, कुटुंबात असून, आपल्या माणसांसोबत असूनही आपण किती एकटे असतो! सोबत असते ती आपल्या मनाची. छळवादी विचारांची! आपलेच विचार किती प्रश्न निर्माण करून आपला छळ करत असतात!

आत्ताच बघ ना, एवढ्या अपरात्री मला तुझा विचार करायची काही गरज आहे? पण कित्येक वेळा आपणच आपले शत्रू असतो. काय करायचं हे आपलं आपल्यालाच ठरवता येत नाही. तुझ्या पहिल्याच

पुढच्या पत्रात सांगते. तोवर उत्तर पाठवा. ताई, तुम्ही असं कधी प्रेम केलंय का हो?

**तुमची**
**नील**

**ता.क.** मी तुम्हाला नुसतं 'जी' म्हणू?
कळवा.

**नी.**

**पत्र नं. २**

**प्रिय जी,**

तुमचं पत्र नाही. एका दृष्टीनं ते बरंच झालं. नाहीतर तुम्ही प्रेमावर मोठ्ठं – (अगदी 'ठ'ला 'ठ'!) व्याख्यान द्याल. त्याचं पावित्र्य, साधनशुचिता, वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद, वगैरे वगैरे.

मला सगळं सगळं एकदम मान्य! पण म्हणजे काय प्रेमच करू नये? अगदी 'लक्ष्मी कौस्तुभ–'च्या ललकारीतच लग्न लावायचं? त्यापेक्षा मला 'सावधान' प्रकार अधिक मान्य. म्हणजे वडीलधाऱ्यांपासून सावधान आणि मांडवात शिरण्याआधी पलायन. चक्क 'बंटी और बबली!'

अहो, आमचं प्रेम असंच जमलं. एकदा बसच्या क्यूमध्ये मी उभी होते, तर माझ्यामागे उभ्या असलेल्या मुलानं माझी ओढणी स्टॉपच्या दांड्याला बांधली. मला ठाऊकच नाही. बस आली. मी पुढे धाव घेतली तर मागे दुपट्टा अडकलेला. जोरात खेचली गेले. वेडीवाकडी आदळतच होते. एवढ्यात बाजूच्या मुलानं सावरलं आणि ज्यानं ओढणी बांधली होती ना, त्याच्या काड्कन कानफटात ठेवून दिली. मी तर घाबरून थरथरतच होते. मग दोघांची फायटिंग झाली. (अगदी तो लांबनाक्या अभिषेक बच्चन करतो ना, तश्शी!) मग मी पळून कशी जाऊ? बस कशी पकडू? मी त्याला चिअरअप् करत होते. त्या टारगट पोराला अभिषेकनं, (होय अहो, याचं नाव अभिषेकच आहे. आहे की नाही गम्मत?) असा बुकलला की यंव! मग स्टॉपवरच्या लोकांनीही त्याला बदडला. मग मी राणी मुखर्जीसारखी त्याच्याजवळ गेले आणि त्याला म्हटलं, (हां, पण माझा आवाज तिच्यासारखा, गळ्यात लोण्याचा गोळा अडकल्यासारखा नाही हं! म्हणजे लतासारखा गोड नाही,पण अगदी वाईटही नाही) 'चल आपण आईस्क्रीम खाऊ!' मी त्याच्या हातावर हळू फुंकर मारली. असा छान हसला तो! तुम्ही काय म्हणाला असतात माहिताय? 'माझ्या अंगावर चांदफुलं उधळल्यागत वाटलं.' (म्हणजे काय कुणास ठाऊक! पण तो असा हसतो ना, तेव्हा कसं छान छान वाटून जातं. अन् खुळ्यागत गिरकी घ्यावीशी वाटते.) तुम्हाला असं कधीतरी वाटलंच असेल की! मला कळवाल?

शप्पथ! मी कुण्णा कुण्णाला सांगणार नाही.

**तुमची प्रेमाळलेली,**
**नीलू**

**पुन्हा :** आता उत्तर पाठवलं नाहीत ना, तर आपली-तुपली कट्टी.

**नी.**

**पत्र नं. ३**

**प्रिय मावशी,**

तुमचं पत्र का नाही? रागावलात? नका ना रागावू! मी अल्लड असेन, पोरकट असेन, पण उद्धट नाही. वाईट तर नाहीच नाही.

तुम्हाला 'जी' म्हटलं ते प्रेमानं. तुम्ही वयानं, अधिकारानं मोठ्या आहात. मान्य! माझ्या फ्रेंड, फिलॉसॉफर ॲण्ड गाईड! मग फ्रेंडशिपमध्ये रागावतात का? तुम्हाला आवडत नसेल तर...

माझे बाबा, माझ्यावर खूप रागावलेत. त्यांचं म्हणणं एकच, 'हे झक मारायचे धंदे तुला सांगितले कुणी?' प्रेम करणं म्हणजे काय झक मारणं? आमच्या बाबांनी आईसाठी अशी फायटिंग न करताच तिनं बिचारीनं त्यांच्या गळ्यात माळ घातली. आता रडतेय. सांगतेय कुणाला!

म्हणजे मी कधी रडणारच नाही अशी गॅरंटी नाही देत. प्रेम करायचं, खच्चून करायचं. मग कधीतरी भांडणं, केव्हातरी रडणं हे होणारच. पण अभि माझे डोळे पुसेल, समजूत घालेल. आणि मी मारली होती तशी हळू फुंकरसुद्धा घालेल.

मावशी, तुमच्या डोळ्यांवर अशी कुणी... आय मीन, तुमच्या डोळ्यांची अशी कुणी पापी घेतली होती का हो?.....

एव्हरी थिंग इज फेअर इन् फ्रेंडशिप. नो रागवारागवी प्लीज!

**तुमची फ्रेंड,**
**नील**

**पत्र क्र.४**

**प्रिय मावशी,**

सप्रेम नमस्कार.

तुम्ही उत्तर पाठवत नसतानाही मी तुम्हाला पत्र का पाठवत राहिले मला कळत नाही. कदाचित, (तुमच्याच शब्दांत सांगते), मनच्या मनचं कुणाला तरी सांगावंसं वाटतं. पण वाट्टेल त्याच्यापुढे नाही सांगता येत. कुणीतरी जवळचं, विश्वासाचं माणूस हवं – आपल्याला समजून घेणारं, धीर देणारं.

तुम्ही तशा आहात. दुसऱ्याला मानसिक बळ देणाऱ्या. मायेचा हात देणाऱ्या. मला द्याल? मी खचलेय. थोडी घाबरलेय. मला घरच्यांनी अगदी वाळीत टाकलंय. एवढी मी चुकले का हो?

चुका कुणाच्या हातून होत नाहीत? आईच्या, बाबांच्या हातून झाल्या नसतील? मग मलाच का असं धारेवर धरतात? केवळ लहान म्हणून?

मला चुकूनही, क्षणभरही वाटत नाही, मी चूक केलीय. आम्ही लग्न करणार आहोत. अभीनं मला वचन दिलंय. शपथा वगैरे सगळं भंपक. आम्ही एकमेकांवर प्रेम करतो. एकमेकांच्या सोबतीनं जगणार आहोत. तो खूप मोठा श्रीमंत नसेल, पण पोटापुरतं मिळवतो ना! आणि मीही नोकरी करतेय.

आम्ही गरिबीतच छान संसार करू. संसार पैशांवर होत असेल; मी नाही म्हणत नाही. पण पैशावर प्रेम नाही विकत घेता येत. पटतं ना तुम्हाला? आणखी एक महत्त्वाची गोष्ट –

ऐकताय ना? मी तुम्हाला म्हणून सांगते. मला दोन महिने उलटलेयत...

**नीलंजना**

**पत्र क्र. ५**

**ती. मावशी,**

असं घडलं, घडून गेलं खरं. हे खूप काही वाईट झालं का? खरं सांगू; मला वाटत नाही काही वाईट झालं म्हणून. प्रेम केल्यावर स्पर्श आलाच. तो अनेक तऱ्हेनं अनुभवायचा असतो. मी अभिला 'नाही' म्हणू शकले नाही. आणि का म्हणू? आपलं माणूस सर्वस्वानं आपलं व्हावं ही उत्कट इच्छा असतेच. हे काही, 'दे दान - सुटे गिरान' नव्हे. हे देणंच, पण सर्वस्वानं. घेणंही पूर्णत्वानं. आम्ही विचार केलाच नाही. भरभरून दिलं-घेतलं.....

मावशी, चुकलं का हो? नक्की काय न् कुठे चुकलं ते सांगाल? 'नाति चरामि!' म्हणून एकमेकांच्या आयुष्यात आलेले स्त्री-पुरुष हेच करतात ना? पण त्यावर सरकारी मुद्रा उमटवलेली असते.

'I here by'....वगैरे म्हणून शपथ घेतलेली असते. एका कागदाच्या चिटोऱ्यावरची शपथ. ती लगेच पवित्र होते. कशी? उत्तर नाही. नाहीतर कुठल्या तरी भटजींनी वाईट गळ्यानं ओरडून,

'शुभमंगल ऽऽऽ' असं ठणकावून सांगितलं आणि परातभर तांदूळ नासवले की झालं सगळं पवित्र. यातून आपण कधीच बाहेर पडणार नाही का? लग्नानंतर पहिल्याच भेटीत कुठल्यातरी अनोळखी पुरुषाच्या मिठीत शिरायचं..... सिंपली हॉरिबल! सवयीनं प्रेम होतं म्हणे! सवयीनं भाकरी करता येते तसं?

मी ॲबॉर्शन वगैरे करून घेणार नाही. अभी बाहेरगावी गेलाय. तो आला की सगळं सांगणारच आहे. मला खात्री आहे, त्याला आनंदच होईल. त्या आदिवासी बायका बघा, पहिली मुलं घेऊन स्वतःच्या दुसऱ्या लग्नाला जातात. त्या आपल्यापेक्षा पुढारलेल्या विचारांच्या. आपल्या मानेभोवती रूढींचं जोखड.

मी खूप बोलले का? माझी बाजू समजावून सांगितली, माझी मतंही. तुमचं मत सांगाल? मी चुकले असेन तर तसंही सांगा. माझा तुमच्यावर विश्वास आहे.

रागावला नाहीत ना? नाहीतर रागवा, माझी चूक दाखवा; पण अबोला धरू नका. मला तुमच्या आधाराची फार फार गरज आहे.

माझ्या जागी तुम्ही असतात तर काय केलं असतंत?.....वाट पाहते.

**तुमची (पत्राची वाट बघणारी),**
**नीलू.**

तुझी पत्रं वाचून होईतो पहाट झाली. पहाटेची झुळूक अंगावरून पुढे गेली, मनावरचं मळभ न पुसता. वुईमेन्स होस्टेलच्या वार्षिक उत्सवात तुला प्रथम पाहिली. तुझे टपोरे भावदर्शी डोळे माझ्याशी संवाद साधून गेले. तू माझी स्वाक्षरी घेतलीस, पत्ता-फोन नंबरसुद्धा! आणि तुझी ही पत्रं; तुझं अल्लड रूप, आनंदी वृत्ती दाखवणारी. तुझ्यातला पोरकटपणा आणि बोलघेवडेपणाबरोबर थोडा उथळपणाही जाणवून देणारी.

मी हेतुतःच उत्तर पाठवलं नाही. तू मला चिकटली आहेस हे पहिल्याच पत्रात मला लक्षात आलं. मी, म्हणजे 'जलदा शिवेश्वर,' तुझ्या डोक्यातही नसावी. मी म्हणजे तुझ्या स्वप्नाळू कल्पनांना पूर्तता देणारी एक काल्पनिक शक्ती! एक मानसिक आधार! असंच ना? मला सांग, ही पत्रं तू मला लिहिली आहेस? ही तर तू तुझी तुलाच लिहिली आहेस. मी एक जवळची नसलेली, पण जवळीक वाटावी अशी; लागेबांधे नसलेली व्यक्ती. पटलं तर गळ्यात पडायचं, नाहीतर अलगद बाजूला करायचं. खरं ना?

नील, कोणतीही गोष्ट घडण्यापूर्वी तू मला सांगितलं किंवा विचारलं नाहीस. तेव्हा फिलॉसॉफर आणि गाईड या शब्दांना अर्थ नाही. फ्रेंडची व्याप्ती किंवा संकोच किती ठरवायचा हे स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असतं. प्रेमाच्या बाबतीत अगदी तसंच असतं बघ. सफल झालं तर उत्कट; विफल ठरलं तर कवडीमोल.

तुझ्या आणि अभीच्या प्रेमाबद्दल बोलणारी मी कोण? कारण प्रेम होत असतं. मात्र लग्नाला एक सामाजिक बंधन असतं. नियमांची एक चौकट असते. त्यामुळेच तुझे आई-वडील भांडूनही एकत्र आहेत. तुम्ही दोघं नुसतंच प्रेम करता. तुझ्या भाषेत म्हणते 'खच्चून'! आणि हे कुठेतरी खच्चून तुटलं, मग?

मग तुझ्या पोटातल्या गर्भाचा बाप कोण? तुमच्यावर मी अविश्वास दाखवत नाही किंवा मला प्रेमाची ॲलर्जीही नाही. तुझ्या वयात मलाही अशाच कल्पनेच्या भराऱ्या मारायला आवडायचं. पण माझी पिढी पंखातलं बळही आजमावत असे.

कोणत्याही परिस्थितीत मी मातृत्व कलंकित मानत नाही. बाळाला जन्म देणं हे एक स्त्री म्हणून तुला मिळालेलं वरदानच आहे. पण तो 'वर' शाप व्हायला नको असेल तर काही संकेत तुला मानावेच लागतील. नील, तू मंगळावर किंवा गुरूवर वस्ती करणार नाहीयेस; मग ज्या इथल्या समाजात जगणार आहेस, वागणार आहेस, व्यवहार करणार आहेस, त्यांचे नियम नकोत पाळायला? निकोप समाजाची ती गरज असते.

सगळं वाईटच होणार असं नाही मी म्हणत. अगं वेडे, मी तुझी फ्रेंड आहे ना? मग विश्वास ठेव, तुझ्या भल्यासाठीच मी हे सांगते आहे. ऐक माझं – तू आणि अभी लवकरात लवकर मला भेटा. मी तुझ्या आई-वडिलांशी बोलेन. त्यांची समजूत काढेन. आहे या स्थितीत ते नकार देणार नाहीतच, पण यदाकदाचित् तसं घडलं तरी आपण आपल्या विचारांशी ठाम असलं पाहिजे.

तू सर्वांत आधी अभिषेकशी बोलून घे. तुम्हा दोघांचा विचार पक्का झाला की मला भेटा. आपण तिघं एकत्र तुझ्या आई-बाबांसमोर जाणं योग्य. तू कच खाऊ नकोस. भीतीनं अधिक गुंता होतो. मन निर्भय ठेव. स्वतःवर विश्वास ठेव.

आपण ताबडतोब लग्न उरकून घेऊ. काळ्या मण्यांनी आपलं भविष्य ठरवणं योग्य नव्हेच; पण जनरूढीचं त्याला सँक्शन आहे. निदान

लोक तुझ्याकडे बोट दाखवून अपशब्द बोलणार नाहीत.

अभिषेकला सख्ख्या नात्यातलं कुणी नाही असं तू एका पत्रात लिहिल्याचं मला आठवतं. मी आहे ना! त्याला माझ्याबद्दल विश्वास दे. माझं-तुझं नातं समजून दे. मी तुझी 'फ्रेंड' असेन अन् त्याची मावशी. त्याच भूमिकेतून तुझ्या घरच्यांशी बोलेन. अभिषेक एव्हाना यायला झाला असेल. आला की कळव. पत्र मिळायला दोन-तीन दिवस तरी जातील, पण फोनवर हे सगळं कसं बोलू? तू फोनवर कळवलंस तरी चालेल. जमलं तर त्याला बोलायला सांग. मला आवडेल.

आता तुला 'तिसरा' चालू असेल. तुझ्यात शारीरिक फरक पडेल. तो हळूहळू जाणवू लागेल. समाजात कुत्सित नजरेचे, विकृत मनोवृत्तीचे लोक अधिक असतात. ते तुला सुखानं जगू देणार नाहीत.

आणि समज, काही नको ते घडलंच; तर मी तुला वाऱ्यावर सोडणार नाही. आपण एकत्र बसून निर्णय घेऊ. तुझ्या प्रेमाचं मोल काय आणि मातृत्वाचं महत्त्व किती, हे तू ठरवायचंस. नुसत्या जन्म देण्यानं मातृत्व सिद्ध होत नाही. मुलाला वाढवणं, घडवणं, दिशा देणं हे महत्त्वाचं. या बाबतीत तू उगाच भावुक होऊ नयेस. पाप-पुण्याच्या कल्पना मी तुझ्या डोक्यात भरवत नाही. लक्षात ठेव, अंतरातल्या परमेश्वराला स्मरून विवेकानं घेतलेला निर्णय नेहमीच शहाणपणाचा ठरतो आणि आमची यडाबाई थोडी शहाणी पण आहे; नाही का?

माझी भूमिका तुला कठोर वाटली तरी समजून घे. आहे त्या स्थितीत मातृत्व जपायचं असं ठरवलंस तरी मी तुला टाकणार नाही.

अभिषेक चांगला मुलगा असेलच. सगळं चांगलं होईलही. पण 'होईल', 'असेल' अशा अधांतरी भविष्यावर आयुष्याचे निर्णय कधीच घ्यायचे नसतात. आयुष्याला जुगाराचं रूप देऊन चालत नाही. (बोअर झालीस?)

तर नीलोबा, आता काळजीत वेळ घालवायचा नाही. झटपट निर्णय घ्यायला हवा. मग आहेच, जन्मभर खच्चून प्रेम, थोडंसं भांडणं आणि अध्येमध्ये रडणंसुद्धा!

मी वाट बघतेय - तुम्हा दोघांची.

**तुला जीव लावणारी**
**तुझी,**
**(थोरली मैत्रीण)**
**जी – (जलदा)**

**प्रिय थोरली मैत्रीण,**

तुम्हाला काय म्हणू तेच कळत नाही. एवढे निश्चित, तुम्ही माझं सर्व काही आहात. माझं श्रद्धास्थान!

अभी काल रात्री आला. उद्या आम्ही (बाहेर) भेटतोय. मी सगळं स्पष्ट सांगेन. तशीच तुमच्या घरी घेऊन येईन. तो 'हो' म्हणेलच. मग तुम्ही दोघं जे ठरवाल ते मला मान्य.

खरं सांगू, खूप भीती वाटते हो! काही विपरीत तर घडणार नाही? खूप काही वाईट...? अशा वेळी मुली काय करतात? मी काय करू? तुम्ही आहात - नक्की. मला तुमची खूप गरज आहे.

**नील**

**प्रिय,**

मी सुखात आहे की दुःखात? प्रश्न सुटलाय का? मी जिंकले का? ठाऊक नाही. काहीच कळत नाही.

'काय म्हणावे या स्थितीला?
झपूर्झा गडे झपूर्झा.'

या ओळींचा अर्थ आज मला कळतोय. सोबत अभिचं पत्र. ते मिळाल्याबरोबर त्याला फोनवर कळवा. लगेच निर्णय घेऊ. त्याला सविस्तर सांगितलंय. पत्रातून तुमच्या लक्षात येईल.

त्याचं पत्र मी वाचलं नाहीय. माझं पत्र त्याच्या पत्राला तो जोडणाराय.

आता भेटू.

**तुमची यडाबाई**
**नील**

**प्रिय मावशी,**

नमस्कार.

माझं पत्र बघून तुम्हाला आश्चर्य वाटेल. होय, तोच मी. अभिषेक! ज्याच्या संदर्भात खूपसं काही तुमच्यापर्यंत पोहोचलंय, ज्यानं तुम्हाला फक्त चिंतेतच टाकलंय तोच मी! म्हणजे सिनेमातला नव्हे, खराखुरा.

प्रथमदर्शनी तुम्हाला वाटेल, काय हा निर्लज्ज मुलगा! करूनसवरून वर सफाईचं पत्र लिहितोय. प्लीज, गैरसमज करून घेऊ नका. एकूण जे कथानक (?) तुमच्यापर्यंत पोचलंय, त्यातून तुमच्या मनापुढे माझी जी धूसर प्रतिमा तयार झाली असेल ती व्हीलनची; खरं ना? अशा वेळी मुलीचा बाप हा न्यायाधीश आणि संबंधित तरुण हा गुन्हेगार असतो.

तुमच्या दृष्टीनं कदाचित मी गुन्हेगार असेनही. मी गुन्हा केला नाही, चूक केलीय. चूक लहानसहान नाही. मी मनावर ताबा ठेवायला हवा होता; कबूल! पण तीन महिने ऑडिटसाठी बाहेर जाणार होतो आणि त्या आधी झालेल्या भेटीत..... तुम्ही समजू शकाल.

आधीच सांगतो, तुमच्याबरोबर मी नीलूच्या आई-वडिलांना भेटायला येईन. कालच परतलो. तुम्हा सर्वांसमोर नीलूला मागणी घालेन. त्यांनी नाही म्हटलं तरी हे लग्न होणारच, असं स्पष्ट सांगेन. पळून जाणं वगैरे स्टंट मी करणार नाही. आता खात्री देतो, नीलूच्या आई-बाबांसमोर तुम्ही 'माझ्या मावशी' असाल. ॲम् आय राईट?

आता एक नाजूक बाब सांगू? हे फक्त तुमच्याच पुढे. वडीलधाऱ्या म्हणून. 'माझ्या' म्हणून.

मुलंच फक्त उतावळी असतात? चूक करतात? संयम पाळत नाहीत? आजच्या मुलींचे कपडे, त्यांचा बोल्डनेस, लाडिक बोलणं मुलांना टेम्प्ट करत नसेल? आम्ही कुणी ऋषिमुनी नव्हे. त्यातून नीलूसारखी गोड छोकरी जन्माची जोडीदारीण म्हणून मिळणार असेल, तर थोडी 'चूक' करायला काय हरकत आहे? त्यातूनही सांगतो मावशी, इनिशिएटिव्ह माझा नाही... (सॉरी, फार मोकळा बोललो का? फक्त माझी बाजू मांडण्यासाठी; जबाबदारी टाळण्यासाठी नव्हे.)

आजकालची मुलं चुकतात, घसरतात, पण सावरतातही. खूप

काही वाईट घडलेलं नाही. तिचा पहिलावहिला अनुभव मी काळवंडू देणार नाही. पत्र मिळताच फोन करा. लगेच संध्याकाळी नीलूच्या घरी भेटू.

रविवारी वैदिक पद्धतीनं देवळात लग्न उरकून घेऊ. पुढे रजिस्टर करूच, पण त्याकरता आता वेळ घालवणं नको. रजिस्टर लग्नानंतर मित्रांना पार्टी देऊ ना! नो लपवाछपवी. ही घाई फक्त नीलूसाठी. पाहा पुन्हा चुकलो; आमच्या दोघांसाठी.

तुमच्या समंजसपणाचा मी अंत बघतोय. पण सगळेच डोक्यात राख घालणारे असतील तर आम्ही आधारासाठी कुणाकडे बघायचं? सो, माय स्वीट मावशी, 'माफ किया बेटा' म्हणा ना! फोनची आणि तुमचीही वाट बघतोय. तर आता भेटतोय.

**तुमचा भाचा,**
**अभी**

पुन्हा : नीलूची 'प्रगती' बाबांना नाही सांगितली तरी चालेल.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'आकाशवेध' या कथासंग्रहातून)**





नवं कोरं
महाराष्ट्र
घडवणाऱ्या
विभूतींचा
जीवन आलेख
डॉ.जयसिंगराव पवार आणि वसुधा पवार यांचे समग्र साहित्य
राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे
आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध
शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?
राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे
राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा
राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे
राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे
शिवछत्रपती : एक मागोवा
मराठेशाहीचे अंतरंग
छत्रपती संभाजी : एक चिकित्सा
मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध
राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास
Book Available

बेस्ट सेलर्स

घराघरांतील
स्वयंपाक रुचकर करणाऱ्या
दहा लाखांहून
अधिक गृहिणींची
प्रेमळ सासू



श्रीमती कमलाबाई ओगले

# रुचिरा

भाग १ व २

₹२२५




₹२७५



# प्लेझर बॉक्स - भाग १

व.पु. काळे



*विजय तेंडुलकर आणि व.पु. काळे हे साहित्याच्या भिन्न वाटांवरचे प्रवासी. खरं तर दोघांचं साहित्य वाचल्यानंतर प्रश्न पडतो, की वास्तवता दोघांच्याही साहित्यात आहे; पण तरीही ते भिन्न वाटेवरचे का वाटतात? कारण अभिव्यक्ती. तेंडुलकर जीवनातील कटुतेला खूप थेटपणे भिडतात आणि हे असंच आहे, असं ठासून सांगू पाहतात; मात्र व.पु. सामान्य माणसातला माणूस शोधू पाहतात आणि आपल्या परीनं त्याची उत्तरं द्यायचा प्रयत्न करतात. लेखक म्हणून या दोघांनाही प्रचंड लोकप्रियता लाभली. 'वपुं'च्या उमेदवारीच्या काळात तेंडुलकरांनी त्यांना लिहिलेलं पत्र 'प्लेझर बॉक्स'मध्ये छापण्याचा प्रांजळपणा 'वपुं'नी लोकप्रियतेच्या शिखरावर असताना दाखवला, हे विशेष. हे पत्र आणि त्या अनुषंगाने 'वपुं'नी व्यक्त केलेले विचार या दोन्ही लेखकांचं माणूस म्हणून असलेलं मोठेपण अधोरेखित करणारे आहेत. शिवाय या पत्रानंतर 'वपुं'नी केलेल्या निवेदनातून वाचकांच्या पत्रांविषयीच्या भावनाही समजतात.*

सत्तावन्न, अठ्ठावन्नच्या सुमारास श्री. विजय तेंडुलकरांचा परिचय झाला. एकूणसाठमध्ये 'हंस'चे अनंतराव अंतरकर प्रथम भेटले. 'हंस', 'मोहिनी'तल्या गोष्टींनी खरी प्रसिद्धी मिळाली.

१ नोव्हेंबर १९६० या दिवशी पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. बासष्टमध्ये आणखी दोन संग्रह बाजारात आले. तरीही पायाखालची वाट स्पष्ट नव्हती. अशाच एका मनःस्थितीत विजय तेंडुलकरांचा 'द्वंद्व' कथासंग्रह वाचनात आला. त्या दिवशी जबरदस्त नैराश्य आलं. स्वतःच्या लेखनावरचा विश्वास उडाला. आपण कधीही लेखक होऊ शकणार नाही, असं वाटत राह्यलं. अगदी याच स्वरूपाचे झटके गंगाधर गाडगीळ यांची 'ज्योक' आणि अरविंद गोखले यांची 'विघ्नहर्ती' या कथा वाचल्यावर, दळवींचं 'बॅरिस्टर', कानेटकरांचं 'हिमालयाची सावली', दुर्गाबाई भागवतांचं 'व्यासपर्व', पुलंचा 'नंदा प्रधान', श्री. ना. पेंडसे यांचं 'रथचक्र' आणि सरदेशमुखांचं 'बखर एका राजाची' वाचून आले. पण आज, मी हे झटके येऊनही, कितीही नाकारलं तरी स्वतःचा लौकिक, कीर्ती थोडीफार मला सावरते.

आजही ज्याला प्रतिभा प्रतिभा म्हणतात ती प्रतिभावंत मंडळी माझ्या हिशोबी वेगळी आहेत. त्यात मी नाही. पण हे आज मान्य करताना मनावर कुठंही ओरखडा येत नाही. बासष्टमध्ये मात्र मी रक्तबंबाळच झालो होतो. त्याच मनःस्थितीत तेंडुलकरांच्या घरी गेलो. ते भेटले नाहीत. मग त्यांना पत्र पाठवलं. इतक्या वर्षांनीही त्या पत्रातले विचार ताजे वाटतात. कोणत्याही नवोदित लेखकाला तेंडुलकरांचे विचार आजही मार्गदर्शक ठरतील. तेंडुलकर लिहितात–

*प्रिय वसंतराव,*
*सप्रेम नमस्कार,*
*तुम्ही स्वतः येऊन गेलात; पण मी नव्हतो. तुमचे पत्र मिळाले. ताबडतोब उत्तर लिहीत आहे. तुम्ही पत्रात काढला आहे हाच सूर शं. ना. नवऱ्यांनी मध्ये मी डोंबिवलीस त्यांच्या घरी गेलो असताना काढला होता. तेव्हा मी स्वतः गोंधळूनही गेलो होतो आणि कळवळलोही होतो. (माझे क्वचित असे होते.) तेव्हा पोटतिडिकीने मी त्यांना म्हटले होते (आता तसे स्वच्छ सगळे आठवत नाही, पण) की, 'आपल्या उणिवांची इतकी खोल डांच कलावंताला असणे याचाच अर्थ त्याचा वाण शंभरकशी आहे, असा आहे. तुमचा सूर तुम्हाला अद्याप सापडला नसेल तर तो सापडेल. उशिरा सापडेल कदाचित, पण पराभव मान्य करू नका. आपल्याला अमुक एक केव्हाही जमणार नाही असे मुळीच म्हणू नका. सूर सापडावा म्हणून धडपडत राहा. स्वतःला छळीत राहा, म्हणजे त्याच्या दिशेने जात राहाल. स्वतःला कायम खुजे लेखू नका. असा complex निर्माण झाला तर तो फार नुकसान करील. स्वतःशी खूप प्रांजळ राहून स्वतःला लिहावेसे वाटते ते कसून लिहिणे, एवढेच खरे, असे काहीतरी ते होते. नकळत अधिकाराचा सूर उमटून गेला असे नंतर वाटले आणि मनाला ते खात राहिले. हे सर्व एवढ्याचसाठी लिहिले की तुमच्या या पत्राला उत्तर लिहिण्याचा वास्तविक पाहता माझा अधिकार नाही. पण उत्तर हवेच असेल तर जे नवऱ्यांना मिळाले तेच असणार.*

*१) मी तुमच्याहून फारसा उंच आहे असे मला वाटत नाही. परंतु माझ्याहून उंच माणसे मात्र मला प्रत्यही सापडतात. फार फार उंच. मला दिपवून टाकण्याइतकी. असलोच तर मीही खुजाच आहे. त्यात असलोच तर एखाद्या अंगुळाने तुमच्याहून कमी खुजा, पण जात तुमचीच. तेव्हा तुमचे खुजेपण दुसऱ्या खुज्या माणसाशी तोलू नका. खरोखरी उंच माणसे शोधा. कमी भरायचेच तर ते तेवढ्याच भारीच्या तुलनेने भरावे असे मला वाटते.*

*२) अनुभवांच्या वैचित्र्याने लेखन सुधारते असा ठोकताळा नाही. घ्याल त्या अनुभवात खोल चला. त्याचे वरवरचे अर्थ टाळा. आपल्याभोवतीच फार जबरदस्त अनुभव वावरत असतात.*

*३) ‘दृष्टिकोन’ ही स्वतंत्रपणे साध्य करण्याची बाब नव्हे. ललित साहित्यात तो अंगचाच असावा लागतो. व. पु. काळे हाच एक दृष्टिकोन. इतर कोणताही काळे, पु. श्री. काळे, बाळासाहेब काळे अगर इतर कोणताही, कोणीही– यापेक्षा तो मूलतः निराळा असणारच. हा दृष्टिकोन– व. पु. काळे नामक...निव्वळ स्वरूपात, लेखनात उतरला पाहिजे, हेच महत्त्वाचे. त्यासाठी शैली, सुबकता, रंजकता यांचा ध्यास सोडला पाहिजे. आपल्यातून खूप आतून लिहिलं पाहिजे, फार लिहिलं पाहिजे, फार फार खरं लिहिलं पाहिजे.*

*४) तुमचे हे पत्र खूप आशादायी आहे. तुम्ही भेटलात की तुमच्याकडून काहीतरी वेगळं लिहिलं जाईल असा दिलासा वाटू लागतो तो उगीच कसा म्हणता येईल? तूर्तची अस्वस्थताच जोपासा. कंटाळा येणे यालाही अर्थ आहे. आणखी कंटाळा येऊ द्या, उबग येऊ द्या; म्हणजे मग जे बाहेर उमलेल ते वेगळं आणि खरं असेल.*

तुमचा,
तेंडुलकर

‘वाचकांचा प्रतिसाद’– तोही एका अनोळखी वाचकाचा प्रतिसाद. या नशेचा अनुभव, निराळ्या भाषेत सांगायचं झाल्यास, ‘पहिला प्याला’ हातात पडला २९।११।६२ रोजी. हा ‘पहिला प्याला’ एका डॉक्टरनेच हातात दिला आणि तेव्हापासून जाणवत गेलं की ‘पहिला प्याला’ हा ‘एकच प्याला’ ठरू शकत नाही. पत्राची ही चटक एवढी का? पत्र म्हणजे हुंकार. फोनवर जेव्हा आपण काही बोलतो तेव्हा पलीकडच्या तीरावरच्या माणसाने ‘हं हं’ करीत राहावं ही अपेक्षा. तो हुंकार थांबला की वाटतं, टेलिफोन मध्येच बंद पडला की काय?

आपला शब्द ‘पल्याड’ पोहोचल्याचं आपल्याला समजणं ही माणसाची गरज ‘अन्न, वस्त्र, निवारा’ या तीन गरजांच्या खालोखाल समजायला हवी.

वाचकांच्या पत्रांचा आनंद एवढ्यासाठीच. अनुकूल, प्रतिकूल, स्तुती, टीका वगैरे तपशिलांचा भाग झाला. प्रतिसाद दिल्याशिवाय ‘क्ष’ व्यक्तीला राहवलं नाही हे महत्त्वाचं.

प्रथम पत्र आलं याचा आनंद आणि पाठोपाठ एक धक्का. आपण जे लिहिलं ते कुठंतरी पोहोचू शकतं? ऐंशी वर्षांचा वयस्कर गृहस्थ संपादकांच्या मार्फत आपल्याला गाठायचा प्रयत्न करतो? नवल आहे.

*एखाद्या कथेला वाचकांचा प्रतिसाद मिळणं वपुं’ना नवीन नव्हतं; पण बहुतेक पत्रांना ते मनापासून उत्तर द्यायचा प्रयत्न करायचे. अशाच एका कथेला प्रतिसाद म्हणून एका भगिनीचं पत्र त्यांना आलं. स्त्री-पुरुष संबंधावर आधारित असलेल्या त्या कथेच्या अनुषंगाने त्या भगिनीने उपस्थित केलेले प्रश्न आणि तिला ‘वपुं’नी दिलेलं उत्तर स्त्री-पुरुष संबंधावर नेमकेपणाने भाष्य करणारं आणि त्यांच्या भाषालालित्याचा प्रत्यय देणारं...*

‘किर्लोस्कर’ दिवाळी अंकात ‘यशस्वी होशील म्हणा’ ही कथा प्रकाशित झाली होती. वाचकांना आवडलेल्या साहित्यात ‘ललित’च्या पाहणीनुसार ही कथा पहिली आली. नोकरी करणाऱ्या विवाहित ‘सुषमा’च्या आयुष्यात तिच्याच ऑफिसातला ‘देवकुळे’साहेब डोकावतो.

भावनात्मक, वैचारिक पातळीवर तारा जुळतात... अशा नेहमीच्या वळणाची ती कथा. दूरदर्शनवर ‘कोंडी’ नाटकात ज्या कथेची निर्मात्याने वाट लावली, ती कथा. त्या कथेवर एका भगिनीने पत्रातून विचारलं, ‘सुषमाच्या वैराण जीवनात केवळ सावली निर्माण करावी या हेतूनं देवकुळ्यांची आणि तिची जवळीक दाखवलीत की असे देवकुळे असतात? प्रत्यक्ष आयुष्यात जर एखादीला असे देवकुळे भेटले तर तिनं काय करावं?’

मी तिला कळवलं,

*प्रिय ललिता,*

*तुमचं पत्र मिळालं.*

*पत्र बोलकं आहे आणि बोलायला लावणारं आहे. पण त्याच वेळेला काय बोलायचं असा संभ्रमही निर्माण करणारं आहे.*

*जसा कथेतला ‘सुषमा’ आणि ‘देवकुळे’ यांची जास्तीची जवळीक हा कथेतला भाग नाजूक आहे, तसा तुमच्या पत्रात तुम्ही विचारलेला प्रश्नही.*

*समाजाने तर नेहमीच भावनाप्रधान आणि भित्र्या माणसांचा छळ केलेला आहे. अर्थात कधीकधी मला वाटतं, स्वतः माणूसच इतका कमकुवत मनाचा असतो, की मळलेली पायवाट सोडायचं धाडस तो करीत नाही.*

*तुम्ही-आम्ही ज्या समाजाला टरकून आहोत, तोच समाज ठणठणीतपणे इतर सुखांमागे पळणाऱ्या माणसाचं कौतुक पण करतो. नाट्य-चित्र क्षेत्रांत वावरणाऱ्या कलावंतांची प्रेमप्रकरणं नुसतीच समाजाकडून बघितली जात नसून, त्या प्रेमप्रकरणांच्या कुतूहलाने, कौतुकाने चविष्ट चर्चाही केल्या जातात.*

*तुमच्या-आमच्यासारखी माणसंसुद्धा जास्तीत जास्त कुणाला घाबरतात?*

*समाजापेक्षाही आपण आपल्याच नात्यातल्या माणसांना घाबरतो. या नात्यात अगदी जवळची म्हणजे पती, पत्नी, मुलंबाळं यांचा विचार आपण प्रथम करतो. आणि हे अत्यंत स्वाभाविक आहे.*

*‘स्वतःचं सगळं ठणठणीत असताना, आणखीन एखादी व्यक्ती आवडायचं कारणच काय?’असल्या प्रश्नांना उत्तरं नसतात.*

*आपोआपच मग असा एखादा तंतू निर्माण झाला, तर तो अखेरपर्यंत चोरीचाच मामला असतो.*

*या वाटेवरची सगळी वळणंच फसवी आणि म्हणूनच की*

काय, तितकीच आकर्षकही.

पण,

तरीही एका अनाकलनीय *tension* व्यतिरिक्त तुमच्या पदरात काहीही पडत नाही. समाजरचना दिवसेंदिवस बदलत आहे. चार भिंतींतच वावरणारी बाई, सर्व जगात फेरफटका करू लागली आहे.

स्त्रियांचा सहवास टाळू म्हणता टळणार नाही इतक्या स्त्रिया संख्येने, सर्वत्र झालेल्या आहेत.

कामानिमित्त परिचय, मग माफक गप्पा, त्यातून मैत्री, शक्य झालं तर *family friendship* आणि पुढे जरा या मैत्रीला वेगळं वळण लागलं की मग...या तऱ्हेच्या चाकोरीतून, पुण्या-मुंबईच्या कचेऱ्यांतून कहाण्या घडतात. जिंकणारे थोडे, होरपळणारे जास्त. आणि जिंकणं म्हणजे तरी काय? मोहच होऊ न देणाऱ्यांना 'जिंकलेलं' म्हणायचं की डावपेच लढवीत, चुकवाचुकवी करीत माफक प्रमाणात प्रेम करत राहणाऱ्यांना, 'जिंकलेलं' म्हणायचं? ट्रिप्स, नाटकं, स्पर्धा, ड्रिंक्स पार्ट्या आणि स्त्री-पुरुष या विषयांभोवती फिरत राहणारी नाटकं, कथा, कादंबऱ्या आणि चित्रपट.

आयुष्य त्यात जास्तीत जास्त *complicate* आणि *complex* होत चाललेलं. लायक माणसांची गळचेपी, नालायकांचे सत्कार, बुद्धिवाद्यांची उपेक्षा आणि स्वार्थी व निर्बुद्ध लोकांची सत्ता या सर्वांतून जे एक तऱ्हेचं *frustration* भावनाप्रधान माणसाला येत असेल, त्यासाठी त्यानं थांबावं कुठं?

भक्तिमार्गाच्या कुबड्या सर्वांनाच सावरत नाहीत. माणसाला पहिला आधार बोलणाऱ्या माणसाचा वाटतो.

त्याला संवाद हवा असतो. माना अगर मानू नका, पण *opposite sex* बरोबर हा संवाद पटकन् जमतो.

त्याबद्दल स्त्रीनं पुरुषाला आणि पुरुषानं स्त्रीला आरोपीच्या पिंजऱ्यात पण उभं करू नये आणि 'माफीचा साक्षीदार' म्हणत मनाचा खोटा मोठेपणा दाखवण्याचाही प्रयत्न करू नये आणि क्षमाही करण्याचा आव आणू नये.

तुम्हाला इच्छा होते, मग मला झाली तर? अशी स्पर्धेची आव्हानात्मक भाषाही काय उपयोगाची?

आयुष्यात असं काहीतरी घडणं हा एक जायबंदी, परावलंबी करून टाकणारा अनुभव असतो. त्यात सापडलेली व्यक्ती जर निगरगट्ट नसेल तर ती फक्त सोसणारी व्यक्ती असते. अशा परिस्थितीत जोडीदारानं फक्त वाट बघायची असते.

किनाऱ्यावर थांबायचं असतं. पोहणारा किंवा बुडणारा दमला तर हात देण्यासाठी.

तसं घडत नाही. म्हणूनच एखाद्या सुषमेला देवकुळे भेटतात. बाकीच्या सुषमा भेटू पाहणाऱ्या देवकुळ्यांना चुकवतात, दोघांचं मन मारून. अशा वेळी एवढंच म्हणायचं,

*It is better to have loved and lost than never to have loved at all!*

किंवा

यह जिंदगी बहोत खुबसूरत है
हमे जीना नही आया
हर बातमे नशा था
हमे पीना नही आया!

पत्रोत्तराची आता मी वाट पाहावी काय?

तुमचा
वपु

एका वाचकाने जीवनात शोधलेला आनंद त्याला 'वपुं'पर्यंत पोचवावासा वाटला आणि तो त्यानं पत्राद्वारे पोचवला. साहित्य माणसाला आधार तर देतंच; शिवाय जीवनातील आनंद शोधायला शिकवतं, हेच या वाचकाच्या पत्रातून दिसतं. 'वपुं'नी त्याच्या या जीवनगाण्याला दिलेली दादही तितकीच उत्कट आणि आनंददायी.

श्री. काळे,

स. न. वि. वि.,

वपु, माझं भेटकार्ड पाहिलंत? तुम्हाला आवडलं का? निश्चितच आवडलं असणार. पण हे मी तुम्हाला का पाठवलं? या चित्रातून जो निरागस सात्त्विक आनंद मिळतो, तोच आनंद, तेच मुलायम समाधान तुमच्या कथा वाचताना, त्यापेक्षा ऐकताना मिळतं.

जो माणूस जीवनाला कंटाळलाय, वैतागलाय त्याला एवढंच विचारावंसं वाटतं, 'राजा, तू कधी लताचं गाणं ऐकलंयस? 'रसिक बलमा' किंवा 'ओ बसंती' डोळे मिटून तंद्रीत ऐकलंयस आणि जर ऐकत नसलास तर ऐक. पुनःपुन्हा ऐकत राहा! तुला जगावंसं वाटेल. आणि असं वाटत असतानाच तू 'वपुं'च्या कथा ऐक. तुला कधीच मरावंसं वाटणार नाही.'

मी दहा वर्षांचा होतो तोपर्यंत माझे बाबा मला रोज गोष्टी सांगायचे आणि असेच गोष्टी सांगता सांगता निघून गेले. माणूस मरतो म्हणजे परत येत नाही हे मला तेव्हा कळलं. नंतर आजोबांनी सांभाळलं. माझ्या आईसकट पाच जणांना गाडीत घालून ओढताना वृद्ध माणूस शांत झाला. तेव्हा मी सतरा वर्षांचा होतो. आजोबांच्या आशीर्वादानं बँकेत नोकरी लागली. तीन वर्षं दीडशे रुपये पगारावर काम केलं. आज तीनशे मिळतात. मी सर्वांत मोठा. दोन बहिणींची लग्नं व्हायची आहेत. भाऊ लहान आहे. एका अंधाऱ्या, ओलसर खोलीत आम्ही राहतो. हे एवढं सांगून बोअर करायचं कारण एवढंच की, अशा काळातही मला धैर्य आलं, उत्साह आला. वर्षानुवर्षं आमच्या घरात कुणी येत नाही, जात नाही. कारकुनाच्या घरात काय मिळणार? माझी करमणूक किंवा उत्साह मग मी वाचून शोधू

लागलो. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, अत्रे, पु. ल., भावे, मोकाशी, शिरीष पै आणि मुख्य म्हणजे व. पु. काळे. वाचता-वाचता तीन वर्षं झाली. या दरम्यान मला जो आनंद मिळाला, आपल्या प्रयत्नांना अर्थ आहे, हे जाणवून ज्यांनी दिलं, त्यांच्याशी मला कृतज्ञ राहिलं पाहिजे. नवीन संक्रमण येत आहे, ते संक्रमण तुम्हाला आम्हाला चांगलं जावं , एवढीच इच्छा.

आपला
श्रीकांत

१८/१/१९७६

प्रिय श्रीकांत,

तुमचं संक्रांतीचं निरागस भेटकार्ड आणि भेटकार्डाहून निरागस, भावदर्शन घडवणारं पत्र मिळालं. नोकरी सांभाळून, आजवर जागरण करीत, इतर मोहांकडे पाठ फिरवीत, लेखणी जी काही राबवली, ती दगदग वाया गेली नाही, हे तुमच्या पत्रात पुन्हा जाणवलं. परमेश्वरानं थोडं प्रतिभेचं देणं दिल्यानं, कीर्ती मिळाली, पैसा मिळाला, आनंद तर नक्कीच मिळाला.

ज्या व्यक्तीला मी पाहिलेलं नाही, भौगोलिकदृष्ट्या जो अनेक मैलांवर आहे त्याला प्रेरणा देणारा मी, त्याच्या आणि माझ्याही नकळत काहीतरी लिहून बसलो आहे याचं ज्ञानच किती चैतन्यदायी आहे, हे आता मी तुम्हाला कसं सांगू?

तुमच्या पत्रात मला कुठेही अतिशयोक्ती वाटली नाही. ज्या लताचा तुम्ही उल्लेख केलात तिचा आवाज मला कैकदा झपाटून गेला आहे. 'रसिक बलमा'मधलं 'मां' आठवा.

परवाचीच हकिगत. कामावरून दमून आलो होतो आणि घरी येताच प्रभा अत्रे यांची कलावती रागातील ध्वनिमुद्रिका ऐकली. त्या क्षणी मी प्रभाताईंना फोन केला. 'आमच्या आयुष्यात तुम्ही फार मोठा आनंद निर्माण केलात,' हे त्यांना कळवल्यावरच मला शांत वाटलं. तशी तुमची भावना Correct perspective म्हणतात तशी समजली. माणसामाणसाचं हे फार छान आहे. इथं दुतर्फा संवाद आहे. ज्या परमेश्वरानं मला ही थोडीफार देणगी दिली, त्याबद्दल काय करायचं?

कधीकधी घरातल्या तसबिरीसमोर उभं राहून मी म्हणतो, 'एकदाच भेट. मी काही मागणार नाही. मला फक्त कडाडून मिठी मारून Thank You म्हणायचं आहे.'

अर्थात माझी ही इच्छा कधीच पुरी होणार नाही हे मला माहीत आहे. पण अमाप असं काही देणाऱ्यानं पडद्यामागे राहावं, हे मला सहनच होत नाही, त्याला काय करणार?

तुम्ही खूप दगदगीचा काळ बघितलात. नुसता बघितलात असं नाही तर त्या सर्व दऱ्या पार करून तुम्ही त्यातून बाहेर पडलात. हे सर्व करीत असताना तुमच्यातला माणूस जागा आहे, जिवंत आहे. इथंच तुम्ही दारिद्र्याचा, भूतकाळाचा पराभव केलेला आहे. तुम्ही अन्य मार्गाने जीवनात आनंद निर्माण केलात. आनंद देणाऱ्याला 'दाद देणारा' कृतज्ञता भाव जोपासलात. ही खूप मोठी मानसिक ताकद कमावलीत, असं माझं प्रांजळ मत आहे. वारंवार होणाऱ्या आघातांनी माणसं कातावतात, चिरचिरी होतात, उदास होतात आणि जगावर रागावलेली असतात किंवा जगाला भिऊन असतात. माणुसकीला ग्रासून टाकणाऱ्या या सर्व पिशाच्चांशी सामना देऊन तुम्ही कणखर मनाने आनंद शोधत आहात. स्वरांतून, शब्दांतून चैतन्य मिळवीत आहात, हे नुसतं कौतुकास्पद नाही, तर भविष्यकाळातल्या यशाची ही नांदी आहे. ही जिगर अशीच ठेवा. सौंदर्य ठायी ठायी भेटत राहील. आनंदाच्या नव्या जागा सापडतील. जग खूप मोठं आहे. माणसंही चांगली भेटतील, तुमच्या आजोबांसारखी आणि बाबांसारखी. तुमच्याजवळ शोधणारी नजर आहे. तेव्हा घरातला अंधारही जाईल आणि ओलही जाईल.

ओल गेली तरी ओलावा जोपासा.

भैय्या, यह दिन भी जायेंगे!

तुमचं पत्र भेटकार्डासह संग्रही ठेवत आहे. हे पत्र मिळाल्याचं कळवा.

तुमच्या घरातील सर्व मंडळींना सा. न. इतरांना सदिच्छा. आशीर्वाद शब्द वापरत नाही, तो तुम्हा सर्वांच्या वतीने त्याच्याकडे मागतो.

तुमचा
वपु

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'प्लेझर बॉक्स - भाग १' या पुस्तकातून)**








नवं कोरं
पेरी मेसन रहस्यकथा
पेरी मेसनचे
चित्तवेधक कारनामे...
मूळ लेखक
अर्ल स्टॅन्ले गार्डनर
अनुवाद : बाळ भागवत । आनंद केतकर । ज्योती आफळे
द केस ऑफ-
द लकी लूझर
द क्रुकेड कँडल
द केअरलेस क्यूपिड
द हाऊलिंग डॉग
द डेम्यूर डिफेन्डन्ट
द आइस-कोल्ड हॅन्ड्स
द काउंटरफिट आय
द डेडली टॉय
द क्रिमसन किस
द हॉन्टेड हसबन्ड

# जे.आर.डी. टाटा यांची पत्रे

संपादन : अरविंद माम्ब्रो
अनुवाद : सुप्रिया वकील



*जे. आर.डी. टाटा हे भारतातील नामवंत आणि कर्तृत्वसंपन्न उद्योजक. भारताच्या औद्योगिक कामगिरीत महत्त्वाचं योगदान देणारे जे.आर.डी. टाटा हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होतं. 'जेआरडी टाटा यांची पत्रे' या पुस्तकात त्यांची जी पत्रं समाविष्ट केली आहेत, त्या पत्रांवरून त्यांचं हे बहुआयामित्व प्रकर्षानं जाणवतं. १९२० ते १९९३ असा जवळ जवळ ५३ वर्षांचा हा पत्रप्रवास आहे. कौटुंबिक, प्रसिद्ध व्यक्तींना लिहिलेली पत्रं आदी नऊ विभागांत विभागलेला हा पत्रसंचय म्हणजे एक प्रेरणादायी आणि मार्गदर्शक दस्तऐवज आहे. आपल्या भावना आणि विचार व्यक्त करण्याचं पत्र हे किती प्रभावी साधन होतं (आणि आहे) हे सिद्ध करणारी ही पत्रं आहेत. या पत्रांतून त्या त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक स्थित्यंतरांची माहिती मिळते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताचं विविधांगी दर्शन ही पत्रं घडवतात. तर अशा महत्त्वपूर्ण पत्रसंचयातील ही काही निवडक पत्रं-*

**वडिलांना**

*जे.आ.डी. टाटांचं हे विद्यार्थिदशेतील पत्र, स्वतःच्या अभ्यासाविषयी वडिलांना माहिती देणारं आणि वडिलांविषयीचा जिव्हाळा व्यक्त करणारं...*

१४० जी. व्हिक्टर ह्युगो
गुरुवार, १ जानेवारी, १९२०

साल मुबारक*, प्रिय पपा,

तुम्हाला माझ्या ख्रिसमस आणि नववर्षाच्या शुभेच्छा याआधीच मिळाल्या असतील, तरीसुद्धा मी या पत्रात पुन्हा तुम्हाला शुभेच्छा देतो. आजच्या दिवशी फक्त तुम्हाला आमच्या शुभेच्छा मिळाल्या नाहीत, त्यामुळे पत्रातून का होईना, पण मी तुम्हाला आनंदमयी आणि आरोग्यसंपन्न जीवनासाठी शुभेच्छा देतो, त्यामुळे मला तुम्ही आमच्यातच असल्यासारखं– निदान जास्त दूर नसल्यासारखं वाटतंय.

आज नव्या वर्षाचा आरंभ झाला आहे. हे वर्ष बऱ्याच गोष्टी घेऊन येईल, अशी आशा आहे. सर्वप्रथम मी आशा करतो की, हे वर्ष आपणा सर्वांना उत्तम आरोग्याचं जाईल आणि विशेषतः तुम्हाला, कारण आत्ता तुम्हाला तुमचं काम व्यवस्थित पार पाडण्यासाठी उत्तम आरोग्याची फार गरज आहे. तसंच हे वर्ष तुम्हाला फ्रान्सला आणेल आणि तेसुद्धा खूप काळासाठी, अशी मी आशा करतो. तिसरं म्हणजे, हे वर्ष तुम्हाला व्यवसायात यश देईल आणि तुमच्या आणि आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंदाचा बहर फुलवेल. या झाल्या प्रमुख गोष्टी. त्यानंतर मी अभ्यासात चांगलं यश मिळावं, अशी आशा करतो. कारण मी जितकी चांगली कामगिरी करेन, तितकं लवकर मी व्यवसायात तुमचा भार हलका करू शकेन. माझी तिमाही परीक्षेतील कामगिरी फारशी चमकदार नव्हती. मी शाळेतून मिळालेली नोट तुम्हाला पत्रासोबत पाठवत आहे. तुम्ही माझे शिक्षक मिस्टर क्युरी आणि सेन्सॉर यांचे शेरे बघा. माझे लॅटिन आणि अंकगणित हे विषय जास्त कमकुवत आहेत. पण पुढच्या तिमाहीमध्ये मी यापेक्षा चांगली कामगिरी करण्याचं वचन देतो. ममी लॅटिनसंदर्भात मिस्टर क्युरी यांना भेटणार आहे आणि मला खासगी शिकवणीची आवश्यकता आहे का, ते बघणार आहे....
प्रिय पपा पुढच्या गुरुवारपर्यंत गुडबाय! या पत्रातून खूप-खूप प्रेम आणि पापे पाठवत आहे.

तुमचा लाडका,
जहांगीर

**ता.क. :** अपार्टमेंट छान सजतं आहे. भोजनगृहात, ग्रंथालयात, दोन्ही दिवाणखान्यांत आणि ममीच्या खोलीत गालिचे अंथरले आहेत. टॉटन लुईसचं एक पेंटिंग भिंतीवर लावलं आहे, खरंच खूप सुंदर दिसतंय ते. आणखी एक पेंटिंग पुढच्या गुरुवारी आणि त्यानंतर दोन आठवड्यांनी आणखी एक पेंटिंग तयार होईल.

* नववर्षाच्या शुभेच्छा! (गुजराती भाषेत).

*जे.आर.डीं.ना त्यांच्या चुकांची जाणीव करून देणारं आणि त्यांना एक चांगला उद्योजक आणि माणूस म्हणून घडविण्यासाठी त्यांच्या वडिलांनी लिहिलेलं हे उपदेशपर पत्र ....*

**वडिलांचे पत्र**

मुंबई
२१ ऑक्टोबर, १९२१
प्रिय जहांगीर,
तुझं २९ सप्टेंबरचं बोनिव्हिलहून पाठवलेलं पत्र मिळालं. तुझं तिथलं तसंच हॅरडेलॉटमधलं वास्तव्य आनंददायी झाल्याचं मला समाधान आहे. संपूर्ण उन्हाळ्यात तू नृत्य आणि इतर मौजमजेत जसा मनापासून रमला होतास; त्याच तळमळीनं, ऊर्जेनं आणि तसाच वेळ देऊन तू इंग्लंडमध्ये अभ्यास करशील, अशी मला आशा आहे. वयाच्या मानानं तुझं हस्ताक्षर अगदी घाणेरडं आहे, याची तुला कल्पना आहे का? तू हस्ताक्षर सुधारायला हवंस. मी तिथून परत आल्यापासून तू फार हलगर्जीपणा करत आहेस, हे कळल्यावर मला फार वाईट वाटलं. तुझी ७०० फ्रँक्स

किमतीची सायकल चोरीला गेली, तुझं सोन्याचं घड्याळ, सोन्याची साखळी आणि सोन्याची पेन्सिल हरवली. हे तुझ्या हलगर्जीपणामुळे होत आहे, असं दिसतंय. माझा मुलगा, जो व्यवसायात मला मदत करण्यासाठी येणार आहे, तो इतका निष्काळजी असू शकतो, याचे क्लेश झाल्यावाचून राहत नाहीत. तुला माहीत आहे, तुझे वडील त्यांच्या कुटुंबाला आरामात ठेवण्यासाठी अशा हवामानात एखाद्या 'निगर'सारखे कष्ट उपसतात. माझ्या मुलांना ज्या भेटवस्तू मिळतात, त्याचं मला काहीच मोल चुकवावं लागत नाही, असं समजू नको. मला त्याची परतफेड करावी लागती– भेटवस्तूंच्या रूपानं – तुम्हाला भेट देणाऱ्या प्रत्येकाला प्रसंग येतो, तेव्हा परतफेड करावी लागते. मला सर्वांत यातना झाल्या, ते तुझ्या वागण्यामुळे, तू तुझ्या वडिलांपासून सगळं लपवून ठेवलंस या गोष्टीमुळे. मी तुझ्यासाठी जे-जे काही करतो– घोडेस्वारी, टेनिस, गोल्फिंग, फेन्सिंग – अशा सगळ्याची तू मला अशी परतफेड करत आहेस? तुला चांगलंच ठाऊक आहे की, तू मला त्याच वेळी हे सगळं सांगितलंस, तर मी प्रत्येक गोष्ट सोडून देऊन माफ करतो. मला तुझ्याकडून परतफेडीदाखल फक्त इतकंच हवं आहे की, तू तुझ्या वडिलांना तुझ्या सगळ्या गुपितांमध्ये सहभागी करून घे आणि त्यांच्यापासून कधीही काही लपवू नकोस. तरच मी तुझा मित्र आणि पिता – दोन्हीही बनेन आणि तुला नेहमीच चांगला सल्ला देईन. आता तू मला याप्रमाणे वागण्याचं वचन द्यायला हवंस. तू आता इंग्लंडमध्ये राहणार, त्यामुळे बिचाऱ्या ममलासुद्धा खूप वाईट वाटत असेल. तुझ्या तिथल्या अल्प वास्तव्यात तू अभ्यासाला वाहून घेशील, अशी आशा करतो. मी मिस्टर ट्रेबलना पत्रानं कळवलं आहे की, माझ्या मुलाला त्याचं लांबडं नाक फोडून घ्यायचं असेल, तर त्याला बॉक्सिंग शिकू द्या.

तुझं वजन तीन किलोंनी वाढलं आहे आणि छातीचा घेर बारा सेंटिमीटरनी वृद्धिंगत झाला आहे, याचा मला फार आनंद झाला. इंग्लंडमधलं हवामान अतिशय फसवं असतं. खुल्यावर कुठलाही व्यायाम केल्यानंतर ताबडतोब कपड्यांत गुरफटून घेत जा. मी तुला दाखवलेले व्यायाम करत आहेस का? रोज एकदा तरी ते करत जा. तू प्रार्थना करतोस?....

विद्यालयात आणि बाहेर प्रत्येकाशी विनयशीलपणे वाग आणि काहीही घडलं, तरी कधीही खोटं बोलू नकोस. तुझ्या तब्येतीची आणि कपड्यांचीही काळजी घे.

'Au revoir mon enfant, je t' embrasse de tout coeur.'

पपा

*जेआरडींच्या आईविषयीच्या उत्कट भावनांचं दर्शन घडविणारं हे पत्र...*

**आईस पत्र***

साउथवोल्ड
५ फेब्रुवारी, १९२२

प्रिय ममा,

तुझं दीर्घ आणि छानसं पत्र मिळालं, त्याबद्दल मनःपूर्वक आभार. पपा या वर्षी फ्रान्सला येऊ शकणार नाहीत, हे कळल्यावर मला अतिशय दुःख झालं. पण हे नक्की आहे का? व्यवसायात वरचेवर इतके बदल सुरू असतात की, त्यांना यावं लागेलही. मात्र ते येणार नसतील, तर ही बातमी दुःखद आहे आणि या दुःखद बातमीचा धक्का किती मोठा बसला असेल, ते मी समजू शकतो. माझ्या या दुःखद मनःस्थितीत मला एकाच विचाराचा दिलासा आहे, तो म्हणजे मी फक्त तुझ्यासोबत प्रवास करणार आहे आणि मला १५ दिवस तुझा संपूर्ण सहवास घडणार आहे! इतके दिवस तू फक्त माझ्या एकट्यासोबत असणं, हा माझ्यासाठी दुर्मिळ योग आहे. मात्र त्याच वेळी माझी खूप इच्छा आहे की, उन्हाळ्याची सुट्टी एकदातरी पपांसमवेत घरी घालवता यावी.

तू या दुःखातून बाहेर आली आहेस आणि ही निष्ठुर बातमी तुझ्या नेहमीच्या ऊर्जेनं पचवली आहेस, याचा मला खूप आनंद झाला. जेव्हा मी तू आयुष्यात भोगलेल्या आणि सहन केलेल्या गोष्टींचा विचार करतो, त्यातून तुला यशस्वीपणे बाहेर पडताना पाहतो; तेव्हा मला तुझा मुलगा असल्याचा आणि मी तुला ममा म्हणू शकतो, याचा किती अभिमान वाटतो, त्याची तुला कल्पनासुद्धा करता येणार नाही. कधी-कधी मला तू तुझ्याविषयी सगळ्या जगाला सांगावं असं वाटतं, तू इतर बायकांपेक्षा किती सरस आहेस, ते त्यांना दाखवावं असं वाटतं– विशेषतः इंग्रज स्त्रियांना– पण त्यांना नाही समजायचं....

वस्तुतः मी रेल्वेचं तिकीट फक्त पेकसपर्यंतच वापरू शकेन, कारण १ जुलैला मी अठरा वर्षांचा होईन आणि त्या तारखेच्या आधी काही दिवस इथले अभ्यासाचे वर्ग संपतील. आता मला तिथे जाऊन लंडनला परत येण्यास ऐंशी फ्रँक्स मोजावे लागतील. ही रक्कम मी शहरात राहिलो, तर माझा जेवढा खर्च होईल, त्यापेक्षा जास्त आहे. त्यामुळे मोठा फायदा तर नाहीच, कदाचित नुकसानच होईल. पण मी तिथे जाणंच जास्त चांगलं, असं तुझं मत असेल, तर तसं मला पुढच्या पत्रात कळव आणि लंडनहून उत्तर येण्याआधी आवश्यकता भासल्यास मी जाईन.

सर्व लहान भावंडं उत्तम आहेत, हे वाचून मला खूप आनंद झाला, कारण त्याच दरम्यान तुलासुद्धा विश्रांती मिळेल. डॉक्टरांना तुझी तब्येत अधिक चांगली झाली आहे, असं वाटलं, याचं मला फार बरं वाटलं; कारण तू हिवाळ्यात इंडेसला जाणार असशील, तर तिथल्या बेकार हवामानाला तोंड देत तिथे काही महिने वास्तव्य करताना तू अगदी निरोगी आणि धडधाकट असणं आवश्यक आहे.

उन्हाळ्यात सिलाला पपांजवळ ठेवण्याचा निर्णय रास्त आहे. तिचा पपांना आधारही होतो, कारण तिच्यामुळे त्यांचं एकाकीपण थोडं दूर होतं आणि ते स्वतःच एप्रिलमध्ये गेले, तर ते दुःखी होणार, याची मला खात्री आहे.

प्रिय ममा, इथल्या छोट्या गोष्टींची काळजी करून स्वतःला त्रास करून घेऊ नकोस. मी अगदी मजेत आहे. मी पुन्हा हॉकी आणि

फुटबॉल खेळायला सुरुवात केली आहे, उद्या मी एका सामन्यात खेळणार आहे.

मला बराच अभ्यास आहे, त्यामुळे इथंच थांबतो.

'आपल्या सर्व मित्रमंडळींना माझ्या शुभेच्छा आणि मॅमरेट तुला... खूप-खूप प्रेम आणि गोड पापे.'

जहांगीर

* हे मूळ पत्र फ्रेंचमध्ये आहे.

*जमशेदपूरच्या कारखान्याची सूत्रे नव्याने हातात घेतल्यानंतर जेआरडींनी त्यांच्या वडिलांना लिहिलेलं पत्र...*

**वडिलांना***

जमशेदपूर

रविवार, १४ मार्च, १९२६

प्रिय पपा,

आम्ही काल रात्री दोन वाजता येथे सुखरूप पोहोचलो. जमशेदपूर अगदी छान आणि अभ्राच्छादित होतं. इथल्या हवेतला कोरडेपणा फारच सुखद आहे.

सकाळी दहा वाजता पीटरसन आणि मी कार्यालयात गेलो. तिथे पीटरसनचं अलेक्झांडर यांच्याशी बोलणं झालं, विशेषतः प्लँटच्या एकत्रीकरणाबाबत आणि सोमवारी टिल्डन स्मिथना तारेनं कळवण्याच्या आकडेवारीबाबत.

त्याची सॉडे यांच्याशी विक्रीसंबंधीच्या सर्व विषयांवर चर्चा झाली. त्यामध्ये कळवण्याइतकं महत्त्वाचं काहीही नाही.

आम्ही 'टेम्पल ॲन्ड पेर्सिवल' ही पाहिलं. दुपारी वामकुक्षीनंतर पीटरसन गोल्फ खेळायला गेला. किसन व कामावरच्या इतर दोघांसमवेत मी टेनिस खेळलो. किसन ठीक दिसतोय आणि नेहमीप्रमाणेच सर्वत्र प्रचंड लोकप्रिय आहे.

तो आणि सॉडे रात्री जेवायला आले होते आणि कोलकत्त्याहून कॅप्टन फोस्टर ऑफ किलबर्नस आले होते.

किसन आणि मी संस्थेच्या विद्यार्थ्यांचा मुख्य सहभाग असलेल्या बंगाली नाटकाला गेलो होतो. मला त्यातला एक शब्दही समजला नाही, त्यामुळे ते अगदी मजेशीर वाटलं.

आज सकाळी पीटरसन आणि 'बिग बग्ज'ची फोस्टर यांच्यासमवेत कोळसा प्रश्नावर बैठक झाली. मला या बैठकीला उपस्थित राहायचं होतं, पण पीटरसननं मला किसनसोबत प्लँटवर पाठवलं होतं.

माझं ब्लास्ट फर्नेस सुपरिन्टेन्डन्ट कीनन यांच्याशी दीर्घ संभाषण झालं. असं म्हणण्यापेक्षा त्यांनी आमच्याशी संभाषण केलं, असं म्हणू या. त्यातले तांत्रिक मुद्दे माझ्या डोक्यावरून गेले. कीनन अतिशय चांगले आहेत. मला वाटतं, ते त्यांच्या प्रिय ब्लास्ट फर्नेसेसच्या बाबतीत झपाटलेले... अगदी वेडे आहेत. ते सर्व विक्रम मोडीत काढणार आहेत. त्यांपैकी काही बाबींत त्यांनी यापूर्वीच नवे विक्रम केले आहेत. नं. 'सी' प्रतिदिन सरासरी ७०० टनांच्या जवळ पोहोचली आहे, शिवाय कोळशाचा खप विक्रमी कमी झाला आहे. अंदाजित उत्पादन प्रतिदिन ४५० टन होतं.

त्यानंतर आम्ही ड्युप्लेक्स आणि शीट मिलमध्ये जाऊन आलो. रविवार असल्यामुळे दोन्ही ठिकाणी काम बंद होतं. 'शीट मिल'मध्ये बरीच खळबळ आहे, कारण काल अकस्मात २५ इंग्रजांना कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मी आज संध्याकाळी किसन, मिस्टर ब्रायन्ट आणि मिसेस टाउनसेन्ड यांच्याशी टेनिस खेळलो. मिसेस टाउनसेन्ड म्हणजे सॉडे यांची भाची. त्या टिनप्लेट कंपनीच्या टाउनसेन्ड यांच्याशी नुकत्याच विवाहबद्ध झाल्या आहेत. माझा त्यांच्याशी तीन वर्षांपूर्वी त्या मिस एडवर्ड्स असतानाच परिचय झाला होता....

**सोमवार**

काल रात्री पत्र लिहीत असताना अचानक माझ्या ध्यानात आलं की, मला आज सकाळी साडेसात वाजता उठून तयार असायला हवं, कारण आज मला किसन नव्या प्लँटवर नेणार होता. मी या प्लँटचं काम यापूर्वी कधी पाहिलेलं नव्हतं.

त्यामुळे मी आज सकाळी सर्व नव्या मिल्स आणि ड्युप्लेक्स प्लँट पाहिला. मला धगधगत्या बेसमेर कन्व्हर्टर्सपेक्षा अधिक विस्मयकारक काहीही असेल, असं वाटत नाही. रात्रीच्या वेळी तर हे दृश्य अतिशय मनोहर दिसत असेल, त्यामुळे मी रात्री जेवण झाल्यानंतर तिथे जाणार आहे. मला वाटतं, त्या झगझगाटी उजेडात मैलभर अंतरावरसुद्धा वाचन करता येईल. एकूणच मी अतिशय प्रभावित झालो, मला खूप अभिमान वाटला आणि माझ्यात प्रचंड उत्साह संचारला आहे.

आणखी एक गोष्ट पाहून मला फार आनंद झाला. ती म्हणजे, कामगार अत्यंत संतुष्ट दिसत आहेत आणि दररोज पाच आणे मिळवणाऱ्या स्त्रियासुद्धा विशेषकरून आनंदी आणि प्रफुल्लित आहेत. मला वाटतं, किसन सगळ्या कामगारांना फार चांगलं समजून घेतो आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाला किसन आवडतो, ते त्याचा आदर करतात. त्याला त्यांची उपस्थिती, शांती आणि समाधान यांचं निश्चितच खूप महत्त्व आहे.

मी आज दुपारी पुन्हा टेनिस खेळणार आहे. आज रात्री क्लबमध्ये आठवडी नृत्याचा कार्यक्रम आहे. पण माझा एकतर झोपण्याचा, नाहीतर ड्युप्लेक्सवर चक्कर मारून येण्याचा विचार आहे.

मी आज पुढच्या रविवारचं मुंबईचं एका सीटचं आरक्षण केलं आहे. पीटरसन बहुधा कोलकत्त्याला जाणार नाही....

माझी तब्येत उत्तम आहे. मला प्लँटमध्ये मैलो न् मैल चालूनसुद्धा अजिबात थकवा येत नाही. मी त्यानंतर सायंकाळी टेनिस खेळतोय.

तुम्ही सर्व जण मुंबईत कुशल असाल, अशी आशा आहे. तुम्ही अजूनही आयुष्य तसंच व्यर्थ घालवत आहात?

'गुड बाय, पपा चेरी, तुम्हाला माझ्याकडून सर्वांत प्रेमपूर्ण पापा.'

जहांगीर

* हे 'आर्काइव्हज़'मध्ये उपलब्ध असलेले; जेआरडींनी वडिलांना लिहिलेले अखेरचे पत्र आहे.

**पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून**

नवी दिल्ली
७ मे, १९४९

प्रिय जहांगीर,

एअर इंडिया इन्टरनॅशनल सर्व्हिसच्या दर्जाबद्दल कौतुकाची पावती देण्यासाठी हे छोटंसं पत्र. आतापर्यंत मी भारत ते इंग्लंड या दरम्यान चार वेळा प्रवास केला आहे. या सेवेचा अधिकाधिक अनुभव घेईन. तशी ती मला जास्त आवडली आहे. माझ्या मते एअर इंडिया इन्टरनॅशनलनं भारताची परदेशात प्रतिष्ठा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. इतर देशांतील भारतीयांनी मला सांगितलं आहे की, आपला राष्ट्रीय ध्वज रेखलेलं विमान परदेशी विमानतळावर ऐटीत उतरतं, तेव्हा त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहतात. परदेशी लोकही बरेच प्रभावित झाले आहेत. त्यामुळे, यासाठी अभिनंदन!

मला वाटतं, तुम्हाला लेडी माउंटबॅटनननी आंब्यांसाठी धन्यवाद द्यायला पाठवलेलं पत्र तुम्हाला मिळालं असेल. तुम्ही पाठवलेले आंबे तिथे खूपच आवडले. मी राणी एलिझाबेथ यांनाही त्यातले थोडे आंबे पाठवले, कारण त्या दिवशी त्यांचा वाढदिवस होता. हे आंबे राजेसाहेबांपर्यंतही पोहोचले, त्यांनी त्याचा मनसोक्त आस्वाद घेतला. ॲट्टली आणि स्टॅफोर्ड क्रिप्स यांनाही तुमचे आंबे पोहोचले. अशा प्रकारे आंबे कुठे-कुठे गेले....

सदैव तुमचाच,
जवाहरलाल

**आचार्य विनोबा भावे* यांच्याकडून**

कटक, ओरिसा
१५ जून, १९५५

श्री. टाटा,

तुम्ही 'संपत्तिदान'ला योगदान दिल्याचं श्री. जयप्रकाश नारायण यांच्याकडून समजलं.

'संपत्तिदान' या संकल्पनेमागचा मुख्य विचार असा आहे की, प्रत्येक जमीनजुमलाधारक माणसानं – मग तो लहान असो वा मोठा – स्वतःला आपल्या संपत्तीचं विश्वस्त मानलं पाहिजे. हा उदात्त विचार आम्हाला गांधीजींनी दिला. मी फक्त त्यांचा अनुयायी आहे. गेली दोन-तीन वर्षं मी भूदान चळवळीच्या निमित्तानं प्रवास करत आहे, या दरम्यान मी हा दृष्टिकोन लोकांना समजावून देत आहे. 'संपत्तिदाना'च्या माध्यमातून आपल्या मिळकतीतला एक षष्ठांश हिस्सा दान करणं, हे या उत्कृष्ट आदर्शाच्या दिशेनं पहिलं पाऊल आहे. जो माणूस या दिशेनं पहिलं पाऊल उचलेल, तो हळूहळू विश्वस्त संकल्पना स्वीकारेल आणि ती संपूर्ण संकल्पना प्रत्यक्षात उतरवेल, अशी मला आशा आहे....

'प्रणाम!'

विनोबा

**डॉ. होमी भाभा यांना**

मुंबई
११ एप्रिल, १९६०

प्रिय होमी,

सी.आय.आर.ची सफर घडवल्याबद्दल आणि हा अत्यंत इंटरेस्टिंग प्रकल्प आम्हाला दाखवण्याची सोय केल्याबद्दल अनेक आभार. मी अणुभट्टी पाहून अतिशय प्रभावित झालो. पुढच्या महिन्यापासून अणुभट्टी कार्यान्वित होण्यात कसल्याही अडचणी येणार नाहीत, अशी आशा करतो. वर्षभरात पुढे कधीतरी सोयीस्कर वेळी या अणुभट्टीचं काम प्रत्यक्ष पाहता येईल, असं गृहीत धरतो.

'पुनश्च आभार!'

सदैव तुमचाच,
जेह

**मिस्टर डेव्हिड रॉकफेलर यांना**

मुंबई
३ एप्रिल, १९९१

प्रिय डेव्हिड,

२५ मार्च रोजी घडलेली माझ्या करिअरमधील एक महत्त्वाची घटना तुम्हाला कळवणं हे मी माझं कर्तव्य समजतो. मी 'टाटा सन्स लिमिटेड' या टाटांच्या सर्वांत जुन्या आणि 'पेरेन्ट कंपनी'च्या अध्यक्षपदाचा राजीनामा संचालक मंडळाकडे देण्याचा निर्णय घेतला आहे. १९२६ मध्ये मी त्याची नियुक्ती केली होती आणि १९३८ मध्ये माझी अध्यक्षपदी निवड झाली होती. तुम्हाला माहीत असेलच की, त्यानंतरच्या काळात मी टाटा समूहातील बहुतेकशा कंपन्यांचं अध्यक्षपद भूषवलं. त्यांपैकी काही कंपन्यांची स्थापना माझ्या अध्यक्षपदाच्या काळातच झाली होती. मी साधारण गेल्या दहा वर्षांत या कंपन्यांच्या प्रमुखपदाची जबाबदारी स्वतःहून सोडून, ती धुरा माझ्या सहकाऱ्यांवर– ज्यांनी त्या कंपन्यांच्या विकास आणि वृद्धीसाठी महत्त्वपूर्ण व्यवस्थापकीय भूमिका बजावली आहे– सोपवली आहे. या बारीकसारीक घटना बहुतेकशा बिझनेसविषयक वृत्तपत्रांत आल्या होत्या....

मी तुम्हाला हे पत्र लिहिण्याचं कारण की, तुम्ही मला 'चेस इंटरनॅशनल ॲडव्हायजरी कमिटी' (IAC)मध्ये सहभागी होण्याचा सन्मान दिल्यापासून, मला आपल्या ठाम निर्णयाची कल्पना आहे की, अशा प्रकारचं सदस्यत्व आपापल्या उद्योग क्षेत्रात नेतृत्वस्थानी असलेल्या व्यक्तींसाठीच राखीव आहे. अगदी आरंभापासूनच मी आयएसीचं सदस्यत्व अतिशय प्रतिष्ठेचं मानलं आहे आणि या सदस्यत्वामुळे तुमच्याशी आणि ज्या लोकांना तुम्ही सदस्यत्व बहाल केलंत, अशा लोकांशी मैत्री करण्याची संधी मला मिळाली, या गोष्टीचा मला अतिशय आनंद आहे.

तथापि, सगळ्या चांगल्या गोष्टींची अखेर व्हावीच लागते. मी टाटा समूहातील अखेरच्या अध्यक्षपदावरून पायउतार झालो

आहे. मला वाटतं, आता 'चेस'नंही मला या जबाबदारीतून मुक्त करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. यासंबंधी मी आपल्याला यापूर्वीही अनेकदा विनंती केली आहे. तुम्हाला भारतीय सदस्य असण्याची आवश्यकता वाटत असेल, तर आताचे टाटा सन्स लिमिटेडचे अध्यक्ष रतन एन. टाटा यांची निवड सुयोग्य ठरेल, असं माझं मत आहे.

ही ताजी घडामोड बाजूला ठेवतो, मी नेहमीप्रमाणे आयएसीच्या २८ ते ३० एप्रिल दरम्यानच्या मीटिंगसाठी येत आहे... सदस्यपदाच्या या २१ वर्षांच्या काळात मला ज्या सुंदर स्मृती लाभल्या, त्याबद्दल आणि तुमच्या व तुमच्या सहकाऱ्यांच्या उबदार स्नेहाबद्दल आभार प्रकट करण्यासाठी आणि निरोप घेण्यासाठी मी तुम्हाला फोन केला असताच.

'तुम्हाला आणि पेगींना मनःपूर्वक शुभेच्छा!'

सदैव तुमचाच,

जेह

**प्रो.ए.के. साहनी* यांना**

मुंबई

१६ ऑगस्ट, १९७८

प्रिय प्रोफेसर साहनी,

तुमचं १७ जुलैचं पत्र २४ जुलै रोजी मिळालं. पत्रोत्तर देण्यास विलंब होत असल्याबद्दल क्षमस्व!

तुमच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानसंपादन प्रक्रियेत योगदान देण्याजोगं माझ्याजवळ फारसं काही आहे, असं मला वाटत नाही. माझ्यासारखंच त्यांनाही माहीत आहे की, एखाद्याच्या करिअरचं यश दोन मुख्य घटकांवर अवलंबून असतं, ते म्हणजे, त्या व्यक्तीला निसर्गदत्त मिळालेल्या क्षमता आणि त्यांचा आयुष्यात करून घेतलेला उपयोग. आपल्या देशातल्या बहुसंख्य लोकांच्या दृष्टीनं जीवन अतिशय खडतर आहे हे निःसंशय. आणि ज्या काही मोजक्या लोकांनी संधींचा पुरेपूर लाभ उठवला आहे, अशांनाच परिपूर्ण आणि उत्तम आयुष्य लाभतं. या लोकांनी आधी शाळेत, मग महाविद्यालयीन शिक्षण घेताना आणि पुढे त्यांच्या कामधंद्याच्या कार्यकालातही त्यांनी बुद्धिमत्ता आणि कार्यक्षमतांचा पूर्ण विकास घडवण्याची संधी टिपली आहे.

आपल्या देशातील तरुणांना भावी आयुष्यामध्ये प्रगती साधण्यासाठी अत्यावश्यक असणारं शिक्षण घेण्याचं सुदैव लाभलं आहे, पण त्यांना उपलब्ध असणाऱ्या मर्यादित वेळातला बहुतेकसा वेळ निष्फळ राजकीय आणि इतर खळबळ माजवणाऱ्या उद्योगांतच फुकट जातोय – आज आपण वृत्तपत्रांत बऱ्याचदा त्याबद्दल वाचतो आहोतच. आपल्या स्वप्नातील भारताच्या जडणघडणीचं शिवधनुष्य पेलण्यासाठी देशातल्या प्रत्येक सुशिक्षित स्त्री-पुरुषाचं समर्पित आणि परिश्रमपूर्वक योगदान गरजेचं आहे, आणि जे लोक त्यांच्यासमोरच्या आव्हान आणि अडथळ्यांना धैर्य आणि निश्चयानं सामोरे जातील, मुख्यत्वे त्यांनाच भौतिक यश लाभेल.

मला माझ्या सुदैवानं तरुणपणी सुयोग्य गोष्टी आणि योजनांना चालना देण्यात, त्या संदर्भात सेवा बजावण्यात सहभागी होण्याच्या अपवादात्मक संधी लाभल्या. मला मिळालेल्या यशाचं कुठलं एक गमक शोधायचं झालं, तर मी म्हणेन की, हे यश एका ठाम विश्वासाखेरीज साध्य होणं शक्य नव्हतं. तो विश्वास म्हणजे, मी जे काही केलं वा करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे आपल्या देशाच्या आणि देशवासीयांच्या गरजा पूर्ण होतील आणि ते त्यांच्या हितासाठीच असेल.

आपला,

जे.आर.डी. टाटा

* बेंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'मधील प्रोफेसर.

**फराह पेसी तवारिया* हीस**

मुंबई

७ एप्रिल, १९८९

प्रिय कु. फराह,

तुझं ६ फेब्रुवारीचं दीर्घ पत्र मिळालं. आभार! मी परदेश दौऱ्यावरून परत आल्यानंतर आत्ताच तुझं पत्र पाहिलं. मी पत्रलेखनाच्या बाबतीत अगदीच कुचकामी ठरलोय, असं वाटतंय आणि तू तर आपण किती चांगला 'काका' निवडलाय, जो आपल्याला बरीच मदत करू शकेल, असा विचार करत असशील!

तुझ्या पत्रातून तू इतक्या लहान वयातच कशाकशाला तोंड दिलं आहेस, किती चिंता-काळज्या झेलल्या आहेस ते समजलं आणि वाईट वाटलं.

काहीही असलं, तरी तू नाउमेद होऊ नकोस; कारण आयुष्यात त्या-त्या वेळी अतिशय गंभीर वाटणाऱ्या काही घटना, नंतर मागे वळून पाहताना तितक्या गंभीर वाटत नाहीत, असा माझा अनुभव आहे. आयुष्याच्या प्रवासात पुढे तुलाही माझ्यासारखंच वाटेल. अशा प्रकारचं नैराश्य आणि मागे फेकणारे तडाखे मीही सोसले आहेत, तरीसुद्धा मी अजून जिवंत आहे आणि आशावादीही आहे!....

तुझा,

जेह 'काका'

* पुण्यातील या मुलीने जेआरडींना आयुष्याला सामोरे जाण्यासंबंधी सल्ला विचारला होता. त्या पत्राला जेआरडींनी दिलेले उत्तर.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'जे.आर.डी. टाटा यांची पत्रे' या पुस्तकातून)**



# स्पीडपोस्ट

मूळ लेखिका - शोभा डे
अनुवाद - अपर्णा वेलणकर



*आई आणि मुलांचं नातं हळुवार असतं. मुलांच्या आईकडून अपेक्षाही असतात; पण व्यावहारिक जग आणि मुलांच्या अपेक्षा यांची सांगड घालताना आईच्या मनाची घुसमट होत असते; कारण ती केवळ आई नसते, तर एक स्वतंत्र व्यक्ती असते. आईपणाचं पक्कं भान असूनही एक व्यक्ती म्हणून जगू पाहणाऱ्या आईचं हे पत्ररूपी मनोगत...*

मुंबई,
एप्रिल ९९

प्रिय आनंदिता,

काल रात्री तू जवळजवळ तासभर रडत होतीस... त्याहूनही जास्त कदाचित. गाडीची दारं ओढून आम्ही बाहेर पडलो आणि आमचे त्रासलेले चेहरे पुन्हा रूबाबदार करून झगमगत्या पार्टीसाठी निघून गेलो, तरीही तुझे हुंदके मला ऐकू येत होते.

माझं मन थाऱ्यावर नव्हतं. आपली कालची संध्याकाळ खरंच वाया गेली. मी अस्वस्थ होते आणि तू दुखावलेली...एकटी. मी घरीच थांबायला हवं होतं, तुला कुशीत घ्यायला हवं होतं. पण तुला काय हवंय याकडे मुळीच लक्ष न देता मी सरळ निघून गेले... आणि गाडीत बसल्यावर मग माझेही डोळे भरून आले.

संध्याकाळी तू इतका हट्ट केलास, रडून रडून धिंगाणा घातलास, याचा अर्थ निश्चित काहीतरी बिघडलं असणार. एरवी मी तयार होऊन बाहेर पडताना किती आनंदाने तू मला 'बाय' करतेस... पण काल तू मला अडवलंस. मी तुझ्याजवळ घरीच थांबावं, तुला कुशीत घ्यावं म्हणून खूप हट्ट केलास, मग रडलीस. मी खूप घाईत होते. तुझ्याशी नीट बोलायलाही मला वेळ नव्हता. तुला नक्की काय होतंय, ममाजवळ राहावंसं का वाटतंय याची साधी चौकशीसुद्धा न करता मी घराबाहेर पडले.

मध्यरात्र उलटून गेल्यावर आम्ही घरी परतलो तेव्हा तू गाढ झोपली होतीस.

-पण 'तुझ्या' खोलीत... एकटीच!

मनातला राग, निराशा व्यक्त करण्याचा एकमेव मार्ग तुझ्याजवळ होता. ममाच्या बेडरूममध्ये ममाजवळ न झोपणं.

अंथरूणावर गुरगुटून झोपलेलं तुला बघताना माझे डोळे भरून आले. स्वत:चाच खूप राग आला पण आता स्वत:वर रागावून काय करणार होते मी? पार्टी कॅन्सल करून थांबावं का तुझ्याजवळ? -असं वाटलंही होतं क्षणभर. पण तो विचार बाजूला टाकून मी पटकन घराबाहेर पडले तेव्हाच माझ्या मनाचं ऐकायला हवं होतं. तुझ्यासाठी थांबले असते मी.. तर? तू बोलत नव्हतीस काहीच, पण तुझ्या टपोऱ्या डोळ्यातून घळाघळा वाहणारं पाणीच सांगत होतं मला, की ममा तू हवीयस.

- आणि तरीही मी गेले.

कुठे?

-पार्टीला.

कुणासाठी?

-'मित्रमैत्रिणी' म्हणवणाऱ्या अशा लोकांसाठी, ज्यांना त्या पार्टीच्या झगमगाटात कदाचित माझी आठवणसुद्धा आली नसती.

'जाऊ नको' म्हणून मला आग्रह करताना तू म्हणतच होतीस,

'काय बिघडेल तू नाही गेलीस तर? हू केअर्स?'

-मी तुला समजावत राहिले, खूप जवळच्या मित्रांची वाढदिवसाची पार्टी आहे... मला आणि डॅडींना जायलाच हवं.

तरीही तू म्हणालीस, हू केअर्स?

- खरं होतं तुझं.

नेहमी भेटणाऱ्या त्याच नव्वद-शंभर माणसांची नेहमीसारखीच पार्टी... बाकी काहीही नव्हतं तिथे. मी नसते गेले, तर कदाचित काहीच नसतं बिघडलं. मी पार्टीला आले म्हणून कुणालाही विशेष आनंद झाल्याचं मला जाणवलं नाही... घरीच थांबले असते तुझ्याजवळ, तर किती खूष झाली असतीस तू!

व्हाय डीड आय लीव्ह यु इन टियर्स ॲन्ड गो?

- का गेले मी तुला एकटी सोडून?

बिकॉज वी ॲडल्टस् आर कॉवर्डस!

भेकड असतो आम्ही मोठी माणसं... भ्याड!

आपल्या आयुष्यात कोणत्या क्षणी नक्की काय महत्त्वाचं आहे हे ठरवताच येत नाही आम्हाला. स्वत:ची खोटी 'इमेज' सांभाळण्याच्या, नको त्या लोकांना खूष करण्याच्या नादात मूर्खासारखे वागतो कधीकधी. कालची रात्र 'तुझी' होती खरं म्हणजे, 'तुझीच' होती. ममाने आपल्याजवळ राहावं एवढंच तुझं मागणं होतं. घरात दुसऱ्या कुणी असा वेडा हट्ट केला असता, तर मी बिलकूल ऐकून घेतलं नसतं. पण तू? तुझ्या डोळ्यात मला दिसत होतं काहीतरी. त्या डोळ्यांनी माझे पाय अडवले. तरीही मी खूप वेळ तुझी समजूत घालत राहिले. डॅडींची घाई

हो चुका ऐश का जल्सा तो मुझे ख़त भेजा
आप की तरह से मेहमान बुलाए कोई
-दाग़ देहलवी

चालली होती. अशावेळी मागे रेंगाळणाऱ्या बायकोला जगातले सगळे नवरे म्हणतात, 'आटप लवकर. वी आर ऑलरेडी लेट'- तुझ्या डॅडींनाही दुसरं काही सुचत नव्हतं. उशीर तर झालाच होता. पण तरीही रडणाऱ्या पिल्लाला एकटं सोडून कशी जाऊ शकते त्याची आई?

–पण मी गेले.

ॲन्ड आय ॲम सॉरी.

खरंच चुकलं माझं.

खोटंखोटं हसून एकमेकांशी त्याहून खोटं बोलणाऱ्या नाटकी लोकांच्या आणखी एका पार्टीला मी पोचले, तेव्हा तिथल्या बेगडी, मूर्ख आनंदाच्या घोळक्यात वावरताना माझ्या डोळ्यासमोर सारखी तूच दिसत होतीस. तू जेवली नसशील, न जेवताच रडत रडत बेडरूममध्ये जाशील.

घरातून निघताना मी तुला म्हटलं, 'जेवून घे राजा.'

तू म्हणालीस, 'मला मुळीच भूक नाहीये.'

–पण गेल्या सहा तासात तू काहीही खाल्लेलं नाहीस हे मला ठाऊक होतं.

'दमलीयस तू आनंदिता. फिनिश युवर फूड ॲन्ड गो टू बेड'- मी पुन्हा सांगितलं.

'पण मला मुळीच झोपायचं नाहीये'- तू कशालाच तयार नव्हतीस. रडून रडून सुजलेले तुझे डोळे थकव्याने मिटायला आले होते.

'पण मम्मा, तू नको ना जाऊस' - तू पुन्हा एकदा म्हणालीस. खूप आग्रहाने, आर्जवाने.

- तरीही मी गेले.

आणि नंतरचा प्रत्येक क्षण चरफडत राहिले. स्वत:लाच छळत, दु:ख देत राहिले.

तुझी अवस्थाही माझ्याहून वेगळी नसणार.

मध्यरात्रीनंतर आम्ही घरी परतलो. मी जवळजवळ धावतच आमच्या बेडरूममध्ये शिरले. तू नेहमीसारखी तिथे झोपली असशील. ममाला माफ केलं असशील असं वाटत होतं मनातून...

..पण तू दिसली नाहीस... तू नव्हतीसच तिथे.

पुन्हा एकदा माझे हातपाय गळले. स्वत:चाच खूप राग आला. मन तर कधीचं अपराधी होऊन बसलं होतं.

'सी... शी इजन्ट हिअर' - मी डॅडींना म्हटलं.

पण डॅडींना खात्री होती. ते म्हणाले,

''इट्स ऑल राईट. उद्या विसरून जाईल ती सगळं. शी विल बी फाईन, शी विल कुल डाऊन.''

- डॅडी म्हणाले ते खरं होतं आणि नव्हतंही.

त्या रात्री तुला सोडून पार्टीला जाण्याचा आमचा निर्णयही तसाच होता. म्हटलं तर बरोबर, म्हटलं तर चूक!

नऊ वर्षांच्या तुझ्या कोवळ्या मनात त्या रात्री कसलं वादळ उठलं असेल? कशाची भीती वाटली असेल?- कोण जाणे! तुलाही ते समजत नव्हतं, सांगता येत नव्हतं. पण तू एकटी राहायला अजिबात तयार नव्हतीस एवढं खरं. मला जाणवत होतं हे सगळं, आणि वाटतही होतं मनापासून की तुझ्याजवळ थांबावं... तुला घट्ट कुशीत घ्यावं... पण मी तसं वागले मात्र नाही.

तुझे हुंदके वाढले, हट्टाला... विरोधाला आणखी धार आली तरी कशाकडेही लक्ष न देता मी साडी नेसले, आरशासमोर क्षणभर उभी राहिले, आणि घाईत असलेल्या डॅडींबरोबर लगेच बाहेर पडले.

–मी जाताना तू डोळे बंद करून घेतले होतेस.

आणि मी?

तुला हे सगळं फार भयानक, क्रूर वाटेल. पण माझ्या पिल्ला, आईबाबा खरोखरच कधीकधी क्रूरपणाने वागतात. त्या रात्री काय झालं हे तू विसरून गेली असशील, कदाचित मला क्षमाही केली असशील; पण तुझा तो चेहरा अजून माझ्या नजरेसमोरून हलत नाही... दु:खाने कळवळलेला, न पेलवणाऱ्या रागाने धुमसणारा आणि नाराज.

–ॲन्ड आय वोन्ट बी एबल टू फरगिव्ह मायसेल्फ!

मी अजूनही तो क्षण विसरू शकले नाही. स्वत:ला माफही करू शकले नाही.

त्या रात्री पार्टीत माझं लक्ष नव्हतं. एकाही मित्र-मैत्रिणीशी मी धड बोलू शकले नाही. अन्नाचा कण माझ्या घशाखाली उतरला नाही. माझं मन मला खात होतं. क्षणोक्षणी बोचत, टोचत होतं. मग मी स्वत:शीच भांडत, चरफडत राहिले- का आलो आपण इथे? व्हॉट द हेल ॲम आय डुईंग हिअर? आत्ता या क्षणी माझं पिल्लू माझ्या जवळ असायला हवं होतं.

आम्ही परत आलो, तेव्हा तू झोपली होतीस. तुझ्या खोलीत. एकटीच, बाई म्हणाल्या, खूप आग्रह करूनही तू जेवली नाहीस. तशीच उपाशी झोपायला गेलीस. खूप उशीरापर्यंत तुझ्या खोलीतून हुंदके ऐकू येत होते.

माझ्या पोटात तुटलं. स्वत:ची चीड आली.

पण आता काय करू शकणार होते मी?

सकाळी उठून तू समोर आलीस, तरीही मला आतून खूप अपराधी वाटत होतं...

आणि तू?

काल रात्री काय झालं ते सगळं विसरली होतीस.

नेहमीसारखीच धावत येऊन माझ्या गळ्यात पडलीस.. मुके घेऊन 'गुडमॉर्निंग' म्हणालीस.

यु नो व्हॉट?

दॅट वॉज द वर्स्ट मोमेन्ट.

त्या अनपेक्षित आणि निर्भर सुखाने मी दचकले. कुणीतरी येऊन खाडकन मुस्कटात मारावी; त्याहीपेक्षा जास्त शिक्षा तुझ्या त्या गोड मिठीने मला दिली होती.

काल रात्रीचं तुला काहीच आठवत नाहीये, तुला कसली शंकासुद्धा येणार नाही हे जाणवल्यावर. मग मी आणखी थोडी कावेबाज लबाडी केली- तुझे आवडते पॅनकेक्स देऊन! दॅट्स हाऊ मदर्स ऑपरेट!

पण किती खुष होतीस तू! आणि पॅनकेक्स मिळाल्यावर तर फारच. माझ्या त्या छोट्या युक्तीने सगळं पुन्हा पहिल्यासारखं झालं.

अर्थात त्या युक्त्या दरवेळी कशा वापरता येणार?

पण प्रयत्न करायला काय हरकत आहे? नं?

तुझी,

**ममा**

........................................

कलकत्ता
मे ९९

प्रिय मुलांनो,

कधीकधी खूप अस्वस्थ, निराश वाटलं, राग आला, तोल सुटला तर सगळ्या आयांनी कसं वागायचं असतं? घरातलं वातावरण बिघडू नये म्हणून सदैव 'शांत' राहायचं? कुणाला काय वाटेल याचा विचार करून मनातला राग मनातच जिरवायचा? आपण अस्वस्थ आहोत, निराश झालो आहोत हे मुलांना कळू नये म्हणून आतून खूप वेदना होत असतानाही चेहऱ्यावर खोटे मुखवटे चढवायचे?

– आपल्या भारतीय संस्कृतीत तरी प्रत्येक आईने, असं आणि असंच वागायचं असतं. मनातला राग, मनातली निराशा मनातच ठेऊन, आतून उसळणाऱ्या सगळ्या कटू भावनांवर झाकण घालून कुटुंबातल्या गृहिणीने सदैव आनंदी, हसतमुख असावं अशी जनरीत आहे. या अपेक्षेचा कधीकधी मला फार त्रास होतो. हे सगळे देखावे खोटे, मूर्खपणाचे वाटतात.

'मी' 'पत्नी' आहे, 'आई' आहे म्हणून मी सदैव शांत, समंजस, हसतमुख असलंच पाहिजे या नुसत्या कल्पनेचाही मला वैताग येतो. घर सांभाळणाऱ्या कोणाही स्त्रीसाठी शारीरिकदृष्ट्या हे अत्यंत त्रासदायक आहे. अशक्यच जवळपास! तुम्हा प्रत्येकाला तुमचं स्वत:चं व्यक्तिमत्त्व आहे, प्रत्येकाचा स्वतंत्र स्वभाव, स्वतंत्र आवडीनिवडी, वेगवेगळे (पण पक्के) विचार आणि त्याहून वेगळ्या गरजा. मी लहान असताना आम्ही भावंडंही अशीच होतो- स्वतंत्र आणि हट्टी. कोणत्याही क्षणी पारा वर चढेल इतका 'काट्या'वरचा स्वभाव असणाऱ्या चार टोकांच्या चार मुलांशी मुकाबला करताना आमच्या आई-बाबांना काय सोसावं लागलं असेल, ते आता मला कळतं. सगळ्यात परीक्षा होती ती माझ्या आईची. सगळ्यांना सांभाळता सांभाळता स्वत:मधली 'दैवी सहनशीलता' पणाला लावून बिचारी पार जेरीला येत असे, आणि तरीही हसतमुखाने सगळं निभावण्यावाचून बिचारीला गत्यंतर नसे. तिलाही राग यायचा. तोल सुटायचा. मग ती गप्प, घुमी होऊन मुकाट्याने आपली कामं आवरत राहायची. आक्रसलेला चेहरा, कपाळावर आठ्यांचं जाळं, ओठ आत मुडपलेले, रागाने धुमसणारे तरीही थकलेले डोळे- अशी आई दिसली, की काय झालंय ते समजून आम्ही एकदम गप्प बसायचो. मग राग निवळेपर्यंत तिच्या वाऱ्यालाही फिरकायचो नाही.

माझ्या आईचा तिच्या आईशी उत्तम संवाद होता. धाकट्या बहिणीशीही तिचं छान जमायचं (पण दुर्दैवाने माझी ती मावशी खूप लवकर गेली.) या दोघी म्हणजे माझ्या आईचा 'सेफ्टी व्हॉल्व्ह' होता. आम्ही मुलांनी सोयिस्कररितीने तोंड फिरवलं, की त्रासलेली आई त्यांच्याकडे जायची. त्या तिघी एकमेकींशी किती भडभडून बोलत, ते मी पाहिलं आहे. जणू नाही झालं बोलणं, तर जगणंच मुश्कील होईल, अशा ओढीने या तीन बायका एकमेकींना भेटत. घराबरोबरच घरातली माणसं सांभाळण्याची कसरत करताना बायकांना खरंच अशा पाठिंब्याची, 'सपोर्ट सिस्टीम'ची गरज असते... खरंच असते.

तुमच्या दोन्ही मावशा परदेशात राहातात. रोज उठून महागडे 'लाँग डिस्टन्स कॉल्स' कसे परवडणार? माय-लेकीमधला संवाद अधुरा सोडून तुमची आजी गेली, त्यालाही आता खूप दिवस झाले. साचून राहिलेल्या गोष्टी बोलाव्याशा वाटल्या, मन मोकळं करावंसं वाटलं तर कुणाकडे जावं? मला कळत नाही. मैत्रिणी? - खूप आहेत. अगदी जवळच्या... जीवाला जीव देणाऱ्या? - मोजक्या तर नक्कीच! पण मुंबईसारख्या शहरात राहाताना आमच्यापैकी प्रत्येकीची अवस्था जवळपास सारखीच. तेच प्रश्न, तशीच घुसमट. शिवाय मिनिटा-मिनिटाचा हिशेब मागणारी 'शेड्यूल्स' आणि आपणच अंगावर ओढवून घेतलेलं चोवीसपैकी पंचवीस तासांचं राक्षसी वेळापत्रक सांभाळताना उडणारी घाई! अशा परिस्थितीत मैत्रीण कितीही जवळची असली, तरी तिचा वेळ घेताना मला अपराधी वाटतं... एखाद्या चुकार क्षणी न राहवून स्वत:च्या वैतागाबद्दल कुणाशी गेलेच बोलायला, तर नंतर वाटतं बसलो असतो गप्प; तरी निवळलाच असता आपला मूड!

'संवाद' तुटल्याचं, तोडावा लागल्याचं दु:ख असलं तरी महानगरीय संस्कृतीमध्ये वावरताना या तुटलेपणाला पर्याय नाही. म्हणून मग होताहोईतो स्वत:च स्वत:ला सांभाळत राहायचं. दरवेळी ही कसरत जमवताना खूप दमछाक होते.

– अशा विचित्र अवस्थेत सापडलेल्या आधुनिक आया जेव्हा खरंच मनातून खचतात, त्रासतात, एकट्या पडतात तेव्हा त्यांनी काय करायचं?

माझ्या काही तरूण मैत्रिणींनी नव्या जमान्यातले नवे उपाय शोधलेले मला दिसतात. कुणीतरी येईल, आपल्याशी बोलेल, मग आपण आपलं मन मोकळं करू ही भावनिक भानगडच या मैत्रिणींनी संपवून टाकलेली आहे. त्या सरळ उठून एखाद्या फिटनेस सेंटरमध्ये जातात आणि तासन्‌तास 'वर्कआऊट' करत बसतात. किंवा मग 'रेकी' वगैरे प्रकारात स्वत:ला गुंतवून घेतात, लठ्ठ पर्सेस घेऊन शॉपिंगला जातात, ब्युटीपार्लरमध्ये जाऊन पेडिक्युअर, मॅनिक्युअरने स्वत:च्या शरीराचे लाड करतात, चेंज म्हणून काहीतरी वेगळाच हेअरकट करून घेतात, असली-नसलेली श्रीमंती अंगाखांद्यावर मिरवतात, उगीचच ढीगभर वस्तू खरेदी करण्याचा सपाटा लावून घराचं म्युझियम करून टाकतात, किंवा मग सरळ उठून प्रवासाला निघून जातात. यातल्या एकातरी गोष्टीचा खरोखरच उपयोग होतो का? कोण जाणे! पण माझ्या त्या तरूण मैत्रिणींना तेवढ्यापुरतं का असेना, तसं 'वाटतं' एवढं खरं.

–माझं हे सगळं आईपणाचं पुराण तुम्हाला त्रासदायक, कंटाळवाणं, भुणभुण लावल्यासारखं किंवा अगदीच रडारडीचं वगैरे वाटत असेल, कधीकधी मी स्वत:च तशी दिसत किंवा वागत असेन, तर तो 'त्या ऑफ दिवसां' मधला एखादा दिवस आहे एवढं समजून घ्या.

काल रात्री मी खूपवेळ जागी होते. माझ्या शेजारी अरूंधती आणि आनंदिता गाढझोपलेल्या. त्यांच्याकडे बघताना एकदम माझा श्वासच अडकला. अचानक आठवलं, गेल्या कित्येक वर्षात मनसोक्त रडायलासुद्धा मला वेळ झालेला नाही. का? का नाही रडले मी? –'सेंटीमेन्टल सिनेमे' बघताना एरवी मी हमसून हमसून रडतही असेन वेड्यासारखी, पण मुळात माझा स्वभाव रडका नाही.

... तरीही?

... का नाही कधी मला रडू फुटलं? डोळ्यांच्या गर्भातले अश्रूंचे कोश सुकून गेले असतील का? कोरडेठाक? टचकन् डोळ्यातून फुटणारा आणि सगळं अस्तित्वच ओलंचिंब करत गालावरून धावणारा टपोरा अश्रू... उरलाच नसेल का आत कुठे?

आनंदाच्या लाटा वाहून आणणारे, दु:खाचे डोंगर आणि वेदनांचे उमाळे धुवून नेणारे अनावर अश्रू... झड धरून आलेला पाऊस फुटून फुटून कोसळत राहावा तशा अश्रूंच्या सरीवर सरी ... थकल्याभागल्या डोळ्यांपुढे तरळणारं धुकं... त्या धुक्यात बुडून, हरवून गेलेली नजर... आणि त्यानंतर मनात उगवणारी प्रसन्नतेची स्वच्छ, सुंदर पहाट!

...यातलं काही मला आठवत नाही.

गेल्या कित्येक वर्षात असा धुंवाधार पाऊस माझ्या गावात कधी आलाच नाही. मी तशीच घुसमटत राहिले... मनावरचं मळभ झाडून पुन्हा धडपडत उभी राहात गेले. का?

–बिकॉज, आय डोन्ट वॉन्ट टू डिस्टर्ब एनी ऑफ यू.

माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले, की अख्खं घर हादरून, बावरून जातं हे मला ठाऊक आहे. ममा रडते आहे, हे बघायची, सोसायची, समजून घ्यायची सवयच आपल्या घराला नाही. मी खचून गेले, नेहमीसारखी बोलेनाशी झाले की काय करावं हे कुणाला सुधरत नाही आणि अख्खं घरच अस्वस्थ होतं. सगळ्यांपासून तुटलेल्या, दुरावलेल्या अशा एकट्या विषण्ण अवस्थेत कधीकधी अरूंधती माझ्यापर्यंत 'पोचू' शकते, पण तिच्या चेहऱ्यावरचं बावरलेपण लपत नाही. ममाचं काहीतरी बिनसलंय हे राधिकाला पटकन जाणवतं, पण काय बोलावं हे कळत नाही. मग तीही माझ्या भोवती भोवती वावरत राहाते. आदित्य आणि रणदीपला बहुतेकदा यातल्या कशाचाच पत्ता नसतो. काय वाट्टेल त्या प्रसंगात माझ्यापाठीशी– अनेकदा माझ्या बरोबरीने – ठाम उभी असलेली अवंतिका अशा खचलेल्या, निराश क्षणी माझी सोबत करील, पण या सगळ्या भावनिक गुंत्यातून मी पटकन माझा पाय सोडवून घ्यावा म्हणून चाललेली घाई तिच्या अस्वस्थ नजरेतून लपता लपत नाही.

..आणि आनंदिता?

ममाच्या चेहऱ्यावरची रेष जरी बदलली, तरी हे छोटं पिल्लू भेदरून जातं.. घाबरलेली नजर विस्फारते... वाटतं, कोणत्याही क्षणी हिला रडू फुटेल. मग आनंदिताला मिठीत घेऊन मीच माझे अश्रू लपवून टाकते. मनातले उमाळे मनातच रिचवलेल्या माझ्या अस्वस्थ चेहऱ्यावर कधी हसू फुटतं, माझं मलाही कळत नाही.

...अशावेळी काय करायचं मी?

व्हॉट डू आय डू व्हेन आय ॲम फिलिंग ऑफुल?

आतून सगळं बिघडलं असलं, निरस...विरस झालं असलं तरी वरवर सगळं उत्तम चालल्याचं नाटक करायचं का? मुलांचा मूड जाऊ नये, घर डिस्टर्ब होऊ नये म्हणून दरवेळी मनामधली अस्वस्थता मनामध्येच लपवत राहायची का?

...की मलाही रागवण्याची, आकांडतांडव करण्याची, रूळावरून गाडी घसरली तरी मन मोकळं करण्यासाठी भडाभडा बोलत राहाण्याची संधी असेल? मुलांना त्रास होऊ नये म्हणून दरवेळी मी माझ्या बऱ्यावाईट भावनांचा कोंडमारा करत राहाणं खरंच इतकं अपरिहार्य आहे का? आणि असं कोंडत कोंडत राहून पुढे काय होईल माझं?

माय गॉड!

हे सगळं इतक्या मोकळेपणाने बोलतेय तुमच्याशी. खरंच वाटत नाहीये मला!

मे बी इट्स अ मिस्टेक

सो व्हॉट?

आईला चुका करण्याचा (सुद्धा) हक्क नाही का?

बाहेर आकाश भरून आलंय...

माझ्या मनासारखंच!

उन्हाळाच्या काहिलीत जळणाऱ्या शहरावर मायेची बरसात करण्यासाठी वळवाच्या पावसाचे काळेकाळे ढग मोठ्या झुंडीने क्षितिजापासून धावत सुटले आहेत. चोहोबाजूंनी बिलगणारा गार वारा.. कडकडीत ऊन कधीचं निवळून गुरगुटी मारलेल्या बाळासारखा निवांत मऊसर लोभस प्रकाश... पहिल्या पावसाच्या झडीने भिजलेले ओले पंख मिटून निष्पर्ण फांद्यांवर निमूट बसलेली कावळ्यांची रांग... आणि शांत, निवांत घर! गेल्या तब्बल वीस मिनिटात फोन सुद्धा वाजलेला नाही. केसांना भरपूर तेल लावून मी निवांत बसलेय. रंग उडालेला जुना कफ्तान बदलून नवे कपडे घालायची सुद्धा इच्छा नाहीये. दुपार होत आली, तरी रोजच्यासारखा बाबांना फोन झालेला नाही. कंटाळा आलाय खूप. काहीच न करता निवांत, एकटं बसून राहावंसं वाटतंय. कोण जाणे काय तुटलंय मनात, पण ....

कदाचित तुम्हालाही जाणवलं असेल काहीतरी विचित्र, विषण्ण.. म्हणून तर माझ्याजवळ कुणी फिरकला नाहीत कधीपासून!

खरं सांगू? असं एकटं एकटं कुढत बसणं मलाही आवडत नाही. वाटतं, पटकन उठावं... तयार व्हावं... आणि मनात साठलेलं सगळं सगळं बोलून टाकावं.

–पण कुणाशी?

नक्की काय वाटतंय मला, कसला राग खदखदतोय आतल्या आत ते शोधून पाहावंसं वाटतं.. कुणाला काय वाटेल याची पर्वा न करता आपली घुसमट बोलून मोकळं होण्याचा स्वार्थीपणा कधीतरी साधावा, असं खरंच खूप वाटतं.

पण हे जमेल मला?

–'बहुदा नाहीच!

त्याऐवजी मी माझा नेहमीचा मार्ग पत्करून माझ्याच मनाची समजूत घालीन.

'नंतर बघू. नंतर कधीतरी बोलू मनातलं..'

हा सगळा गुंता मी 'नंतर' सोडवीन. ('नंतर' म्हणजे?... 'कधीच नाही')

–मी पुन्हा मनातलं सगळं मनातच कोंडून ठेवीन, चेहऱ्यावर पुन्हा नेहमीचं.. इतरांच्या ओळखीचं हसू चिकटवीन आणि जीव एकवटून कामाला भिडेन. अखेरीस यातून काहीही हाती लागणार नाही, हे ठाऊक असूनही वेड्यासारखी कामाचे ढीग उपसत बसेन. काहीच साधलं नाही की स्वत:वरच सूड उगवावा तशा जिद्दीने नवीन कामं उकरून काढीन. साधी दखलसुद्धा घेण्याची गरज नसणाऱ्या फालतू पत्रांना लांबलचक उत्तरं लिहीन. कुठलेतरी शिळेपाके निरोप लिहून पाच-पन्नास फॅक्स पाठवीन... रोजचाच व्यायाम करताना शरीराला जास्तीत जास्त त्रास देईन... कदाचित थोडं बरं वाटेल, पण रागाचा पारा तिथेच गोठून राहील.

संध्याकाळपर्यंत मला माझं उत्तर मिळालेलं असेल. मग वाटेल, का आपण अशा वेड्यासारख्या वागलो?

थोड्यावेळाने माझ्याही नकळत माझा राग आपोआप निवळेल...कारण? असं उघड रागावणं 'माझ्याकडून' अपेक्षित नाही. त्यातून तो राग उगीचच, विनाकारण असेल किंवा किरकोळ कारणावरून प्रचंड भडकाबिडका उडाला असेल तर मुकाट्याने सगळं गिळून टाकण्याशिवाय काय गत्यंतर?

...आता 'माझा' राग उगाचच विनाकारण आहे का गरजेपेक्षा जास्त..., प्रमाणाबाहेर आहे का हे कुणी ठरवायचं?

...पण नाही!

मी मुकाट्याने सगळं गिळून टाकीन, मनातल्या मनात कोंडून ठेवीन (आणि नंतर कदाचित 'वसूल' ही करीन?)

...मग सुंदर नक्षीदार बाटलीतल्या परफ्यूमसारखा किंवा चमकत्या सोनेरी व्हिस्कीसारखा माझा राग हळूहळू उडून जाईल, वाफेच्या ढगांमधून अदृश्य होईल.

...मग मी मनापासून हसेन.

तुम्ही शाळेतून घरी परतल्यावर तुमच्या गंमतीजंमती ऐकेन, तुमच्या ऑफिसमधल्या दिवसभराच्या गोष्टी 'शेअर' करीन... घर गजबजून टाकणाऱ्या अशा उसळत्या गप्पाटप्पांमध्ये मग मीही एखादा लेटेस्ट पी.जे. तुम्हाला ऐकवीन. आपण सगळे गळ्यात गळे घालून खळखळून हसू.

तरीही माझा आतला कोंडमारा संपलेला नसेल. घास अडेल.. श्वास अडकेल. आणि तोच वर्षानुवर्षांचा जुनापुराणा प्रश्न पुन्हा एकदा नव्याने माझ्यासमोर उभा राहील-

जगातल्या प्रत्येक माणसाला रागावण्याचा अधिकार आहे.. मग आयांनाच का नाही?

व्हाय मदर्स आर नॉट अलाऊड टू बी अॅन्ग्री, व्हेन द रेस्ट ऑफ द वर्ल्ड इज?

गुर्रऽऽऽऽऽऽऽ

**ममा**

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'स्पीडपोस्ट' या पुस्तकातून)**


बौद्ध धर्माचा उदय, वैदिक धर्म आणि मुघलांची आक्रमणे यांच्या पार्श्वभूमीवर फुलणारी प्रेमकथा

सार्थ




एस.एल. भैरप्पा
अनुवाद
उमा कुलकर्णी

पृष्ठसंख्या : २७६ । किंमत : ₹२९५

Book Available

नवं कोरं

कबीरांच्या दोह्यांवरील ओशोंचं रसाळ, विस्तृत विवेचन

प्रेमरस...कबीरांचा




ओशो
अनुवाद
प्रज्ञा ओक

पृष्ठसंख्या : १४८ । किंमत : ₹१६०

Book Available

# प्रवास एका लेखकाचा

**व्यंकटेश माडगूळकर**



*व्यंकटेश माडगूळकरांना कारणानिमित्ताने प्रसिद्ध-अप्रसिद्ध व्यक्तींनी लिहिलेली पत्रं त्यांनी त्यांच्या 'प्रवास एका लेखकाचा' या पुस्तकात समाविष्ट केली आहेत. त्या निवडक पत्रांचं हे संकलन...*

*गदिमांनी लहान भावाला दिलेला पत्ररूपी आशीर्वाद-*

माझ्यापाशी वडीलबंधूंकडून आलेलं कार्ड अजून आहे. सुंदर अक्षरांत लिहिलेल्या या कार्डाचा मजकूर असा आहे :

१९-३-५८

अनेक आशीर्वाद,

'बनगरवाडी'ला बक्षीस मिळाल्याचे आज वृत्तपत्रातून प्रकाशित झाले आहे. तुझ्या यशाने माडगूळकरांचे घराणेच उजेडात आले आहे. ईश्वर तुला उदंड आयुष्य देवो. तुझ्या ग्रंथांना जागतिक प्रतिष्ठा लाभो, हे आशीर्वाद.

अण्णा

**एका लेखक घडविणाऱ्या प्रकाशकाने आपल्या लेखकाला त्याच्या साहित्यकृतीविषयी लिहिलेलं हे पत्र...**

'मौज' दिवाळी अंकात 'वावटळ' प्रसिद्ध झाल्यानंतरचं २६.११.६३चं पत्र असं होतं :

मुंबई -२२
२६.११.६३

सप्रेम नमस्कार, वि.वि.

यापूर्वीच तुम्हाला पत्र लिहायचे होते. मधे दहा दिवस मी दिल्लीला गेलो होतो. नंतर कामांत. त्यामध्ये राहून गेले.

'वावटळ' एकंदरीत आवडली वाचकांना, असे दिसते. आमचे (कधीही फारसे वाङ्मय न वाचणारे) घरचे डॉक्टर परवा म्हणाले की, 'वावटळ' उत्कृष्टच आहे. रात्री सहज म्हणून वाचायला घेतली आणि पूर्ण करून मगच झोपलो. ठेववेनाच खाली. त्यांना त्यातले प्रसंग तर आवडलेच, पण निर्मळ अलिप्त वृत्तीही फार आवडली. (त्यांचा दवाखाना तेव्हा जाळला गेला होता!) माधव करंदीकर यांना आजचे रूप चांगले वाटले; पण असेही वाटले की, फार मोठ्या अशा कादंबरीची थीम तुम्ही थोडक्यात केवळ documentary शैलीत आवरलीत, ती पुरेशी भरघोस झाली नाही.

असे कोणी क्वचित म्हणाले, तरी वाचक खूश दिसतात. मला वाटते, नामुष्की येण्याची तुमची भीती तर खोटी ठरली.

पुस्तक लगेच कंपोझला घेत आहे. तत्पूर्वी, त्यात काही भर घालावी, असे वाटते आहे का? म्हणजे थांबतो. पण मग ती भर लवकर लिहून पाठवा. विशेष नसली व प्रुफांतच करता येतील, असे संस्कार करायचे असतील, तरी कळवा. प्रुफे पाठवीनच.

इथे सर्व ठीक. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आपला,
श्री. पु. भागवत

**माडगूळकरांच्या एका कथेविषयी एका साहित्याच्या जाणकार प्रकाशकाने दिलेली ही बोलकी प्रतिक्रिया-**

२८.९.५१

प्रिय व्यंकटेश,

'सर्व्हिस मोटार' ही आत्ताच पोहोचली. पटवर्धन व मी दोघांनी वाचली. कथा अप्रतिम आहे. एकदा मी तुमच्याकडून ऐकलेली असतानाही मी अगदी ढवळून गेलो. पटवर्धनांचे तसेच. १०-१५ मिनिटे काही न करता ती मनात घोळवीत बसलो. कशाकडे लक्षच लागेना. मनःपूर्वक अभिनंदन व आभार. बुक-पोस्ट या वेळी रजिस्टर करून तुम्ही पाठविले, त्यात तुमचा आत्मविश्वास व काळजी नकळत व्यक्त झाली का?

सर्वांना नमस्कार.

कळावे.

आपला
श्री. पु. भागवत

***'वावटळ'च्या निमित्ताने त्या वेळच्या एका नामवंत मासिकाच्या संपादकांनी व्यक्त केलेले पत्ररूपी विचार...***

छप्पन सालच्या ऑक्टोबरआधी हे लेखन माझ्याकडून पुरं झालं

असलं पाहिजे.

माझ्या दफ्तरात मराठीतील आणखी एका नामवंत मासिकाच्या संपादकाचं जिव्हाळ्यानं लिहिलेलं पत्र आहे. पत्रावरची तारीख २.९.५६ अशी होती.

प्रिय श्री. व्यंकटेश,

आपली लघुकादंबरीची वही श्री. चित्रावनी मला दिली होती. लगेच वाचून काढली.

कादंबरी मला अत्यंत हृदयस्पर्शी वाटली. 'बनगरवाडी'पेक्षा या कादंबरीचा पिंडच वेगळा आहे. तथापि, बनगरवाडीप्रमाणेच मराठी साहित्यात तो मानाचे स्थान मिळवून राहील, अशी मला खात्री आहे.

कादंबरी मला विशेष महत्त्वाची वाटली, त्याची कारणे दोन. पहिले कारण असे की, १९४८च्या त्या वावटळीत आमचे गावही सापडले होते. त्यामुळे माणुसकीचा दुष्काळ अवघ्या ४-८ दिवसांत कसा पडला होता, ते मी स्वतः पाहिलेले व अनुभवलेले आहे. आपल्या कादंबरीमधील अनेक घटना वाचताना, प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोर घडलेल्या प्रसंगाचे वृत्तच आपण वाचत आहोत, असे पुनःपुन्हा वाटत होते.

४८ सालानंतर ८ वर्षे उलटली असली, तरी त्याची पुनरावृत्ती घडणारच नाही, असे छातीठोकपणे सांगणे कठीण आहे.

या बाबतीत अधिक स्पष्ट शब्दांतून पत्रातून लिहिणे कठीण आहे. काही सूचक घटना या भागात घडूही लागल्या आहेत. कधी तरी भेटीत अधिक बोलू.

तूर्त मला एवढेच वाटते की, आज ना उद्या ही कादंबरी प्रसिद्ध होण्यास अनुकूल वेळ व वातावरण तयार होईल. आपण सर्व जण महाराष्ट्रीय, त्या वेळी १९४८ सालाकडे objectively पाहण्याइतके जातीय तेढीपासून अलिप्त होऊ. अशा वेळी 'वावटळ'चे प्रकाशन झाले, तर तिच्या अंगभूत गुणांचे खरे मूल्यमापन होईल व केवळ एक उत्तम साहित्याचा नमुना म्हणून नव्हे, तर महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासातील एका अविस्मरणीय क्षणाचे अत्यंत वास्तव, जिवंत व हृदयस्पर्शी चित्रण म्हणून इतिहासकारांकडून तिचे स्वागत होईल, अशी माझी मनोमन खात्री आहे.

दुसरे कारण असे की, १९४८च्या घटनांची एकदा कोठे तरी नोंद होणे जरूर आहे, असे मला वरचेवर वाटत होते. या कादंबरीच्या निमित्ताने (हस्तलिखित स्वरूपात का होईना) अशी नोंद झालेली आहे, ही एक प्रकारे मोठ्याच समाधानाची बाब आहे.

आपल्या अनुभवांची आपण कागदांवर वेळीच नोंद करून फार मोठी कामगिरी बजावली आहे, असे मला वाटते.

कादंबरीच्या प्रसिद्धीकरणाबाबत माझी मित्रत्वाची सूचना अशी आहे की, सध्याची वेळ प्रसिद्धीकरणाचे दृष्टीने उचित नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस आलेल्या अपयशामुळे महाराष्ट्रात पसरलेले नैराश्याचे वातावरण, सत्ताधाऱ्यांची उघडी पडलेली अब्रू, आगामी निवडणुकांत फिरून यश मिळवण्यासाठी हितसंबंधीयांची चाललेली धडपड यांमुळे महाराष्ट्राच्या वातावरणात एक नवाच रंग भरू पाहत आहे.

असो. श्री. चित्राव माझे विचार अधिक स्पष्टपणे सांगतीलच.

आता आपल्या कथेकडे मी डोळे लावून आहे. कामाची सबब आड येणार नाही, असे आपण आश्वासन दिले आहे, त्यावर मी विसंबून आहे.

आपला,<br>(सही)

**एका प्रतिभावंत, लोकप्रिय समकालीन लेखकाने माडगूळकरांना लिहिलेलं हे अभ्यासपूर्ण आणि मैत्र जोपासणारं पत्र...**

प्रिय माडगूळकर,

तुमचे ६ नोव्हेंबरचे पत्र व बनगरवाडीची प्रत मिळाली. आभारी आहे. माझा लेख तुम्हाला आवडला, याचा आनंद वाटला. अर्थात, लेख आवडला की न आवडला, हा वेगळा प्रश्न आहे. मुख्य म्हणजे, तुम्ही काही गैरसमज करून घेतला नाही, त्यामुळे बरे वाटले. आपल्या बरोबरीच्या लेखकावर टीकालेखन करायचे, म्हणजे सुळावरची पोळी आहे. शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड. सुदैवाने मला तसा अनुभव अजून आलेला नाही.

बनगरवाडीवर माझ्या हातून काहीसा अन्याय झाला आहे. ती कादंबरी मला आवडली होती. पण तुमच्या इतर लेखनाविषयी जे लिहिले, तेच तिलाही लागू पडते, म्हणून तिच्याविषयी विस्ताराने लिहिले नाही. ती लघुकथांची मालिका आहे, हे विधान चुकलेले आहे. लांबलेला लेख आवरण्याच्या भानगडीत ते विधान केले गेले. कादंबरी अशी असावी, अगर तशी असावी, असे माझे मत नाही. कादंबरीने आपल्या प्रकृतीनुसार आकार घ्यावा, असे मला वाटते. आणि त्या दृष्टीनेच बनगरवाडीत मला एक दोष आढळला. तुम्ही निवडलेला विषय, त्याची केलेली मांडणी यांमुळे अशी अपेक्षा निर्माण होते की, काही तरी भरदार हाती पडणार. एका गावच्या जीवनाचे अनेक रंगी आणि अनेक ढंगी चित्र आपल्याला वाचायला मिळणार. अनेक माणसांचे कुठेतरी वाहत जाणारे जीवन या कादंबरीत गवसणार. स्टाईनबेकच्या Grapes of wrath सारखे काही वाचायला मिळणार. पण ही अपेक्षा पुरी होत नाही. कादंबरी त्रोटक होते... पण आवरतोच. नाही तर

आणखी एक लेख लिहून व्हायचा.

कामाखाली चिरडून गेलो होतो. आता मात्र आठ दिवस पूर्ण विश्रांती घेणार आहे. एक-एक दिवाळी अंक भाविकपणे वाचून काढणार आहे. तुमचाही तोच उद्योग चाललेला असेल. राम पटवर्धनाच्या मताइतके तुमच्या-आमच्या मताला महत्त्व नाही. तरी माझ्या कथा कशा काय वाटतात, ते जरूर कळवा. तुमच्या मतांची मला फार किंमत वाटते.

नोकरी लागली. आता खूप लिहिणार का? नाचणारीने नाचले पाहिजे, तसे लेखकाने लिहिले पाहिजे.

आपला,
गंगाधर गाडगीळ

**सिद्धहस्त लेखक डॉ. आनंद यादव यांनी उमेदवारीच्या काळात व्यंकटेश माडगूळकरांकडून मार्गदर्शन घेतले होते आणि ते माडगूळकरांच्या साहित्याचे डोळस चाहते होते, हे त्यांच्या पुढील दोन पत्रांवरून दिसून येते.**

सर्वोदय छात्रालय,
रत्नागिरी,
६.१०.५५

स.न.वि.वि.

आपल्याकडे मी 'अस्पृश्यता' या विषयावर लिहिलेली एक ग्रामीण नाटिका पाठवीत आहे. प्रा. पु. ल. देशपांडे यांच्याकडे मी माझी ग्रामीण कविता दिली आहे. त्यांनी ती तुम्हास वाचून दाखविली. मला त्यांनी तुमचा आशीर्वाद व निरोप पत्राने पोहोचता केला. मला फार आनंद झाला. निरोपात आपण सांगितल्याप्रमाणे मी नाटिका पाठवीत आहे.

नाटिका वाचून आपलं मार्गदर्शक मत कळवाल, तर फार बरं होईल.

ग्रामीण भाषांतील शब्दांची ग्रामीण- अशुद्ध रूपे जशीच्या तशी लिहावीत की ती शुद्ध लिहावीत, या बाबतीत माझ्या मनात सारखा गोंधळ उडतो.

ग्रामीण वाङ्मय लिहिणाऱ्या काही लेखकांनी अतिशयोक्तीवजा काही रूपे लिहिलेली आढळतात. उदा. तोंडचा उच्चार वास्तविक 'ताँड' असा होतो. पण 'त्वांड' असा कित्येकांनी लिहिला आहे. 'तोंड', 'गोड', 'मोट' , 'पोट', 'पोर' असे शब्द याच प्रकारांनी लिहिले आहेत. मग ते कसे लिहावेत, हे मला कळत नाही.

आपलं मत शक्यतो लवकर कळेल, तर फार बरं.

मला ग्रामीण कौटुंबिक नाटिका लिहाव्यात, असं वाटतं. लवकरच आपल्याकडे पाठवीन.

आपला,
आनंद यादव

श्री. छत्रपती शाहू हायस्कूल,
बारामती, पुणे.
१६.०१.५६

स.न.वि.वि.

खरोखरच तुमचं यश पाहून अभिनंदन करावंसं वाटतं. मनापासून अभिनंदन करावंसं वाटतं, म्हणून हे पत्र पाठवीत आहे. नाही तर तेही पाठवण्याची गरज नव्हती. शिष्टपणाचं लक्षण म्हणून 'अभिनंदन करणारे' काही लोक असतात; म्हणून असं लिहावं लागलं. लागोपाठ दोन वर्षं तुम्ही पहिलं बक्षीस मिळवलंत, याबद्दल मला खरा आनंद झाला आहे. आनंद होण्याचं दुसरं कारण असं – आजपर्यंत मी तुमच्याशिवाय इतर कुठलाही साहित्यिक संपूर्णतः वाचला नाही. तुम्हाला मात्र मी आतून-बाहेरून (साहित्यिकदृष्ट्या) पाहिलं आहे. माझी ही अभिरुची निश्चितपणे वरच्या दर्जाची आहे, हेही अप्रत्यक्ष सिद्ध झालं. असो.

आपला,
आनंद यादव

**व्यंकटेश माडगूळकर पुणे आकाशवाणीवर कार्यरत होते तेव्हा शंकर पाटलांनी त्यांना लिहिलेलं पत्र...**

१६.०१.५६

प्रिय श्री. व्यंकटेश माडगूळकर,

आपल्या परवाच्या पत्राप्रमाणं आपण दिलेल्या कथाकल्पनेवर 'शिकलेली सून' ही श्रुतिका लिहून आज पाठविली आहे.

श्रुतिका घाईने लिहिली असल्यामुळे आपणास त्यावर थोडा हात फिरवता आल्यास, जरूर तसे करावे.

आपला,
शंकर पाटील

**'बनगरवाडी' ही कादंबरी जर्मनीपर्यंत पोचली होती, हे सांगणारं हे पत्र -**

हायडेलबर्ग युनिव्हर्सिटीच्या लेटरहेडवर, चांगल्या मराठी अक्षरात लिहिलेलं पत्र मला जून चौऱ्याऐंशीत आलं.

श्री. माडगूळकर यांस,

स.न.वि.वि.

काही दिवसांपासून 'बनगरवाडी' जर्मन भाषेत भाषांतर करण्याची माझी कल्पना होती. लवकरच मी भाषांतर संपवीत आहे.

एक लहान प्रकाशक भाषांतर प्रसिद्ध करायला तयार आहे, असे दिसते. हे पुस्तक मराठीतूनच भाषांतर करायला पाहिजे. कारण जर्मन भाषा इंग्रजीतून फार

निराळी आहे. मी धनगरांच्या भोवती खूप वेळ राहिल्यामुळे मला थोडंसं ठाऊक आहे. तुम्ही मला भाषांतर प्रसिद्ध करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती.

'बनगरवाडी'च्या आधारानं मी जर्मनीत मराठी साहित्याची ओळख करू शकणार आहे.

आपला,
गुन्थर सोन्थायमर

**व्यंकटेश माडगूळकरांची उमेदवारीच्या काळातील व्यस्तता आणि मराठी साहित्यात झालेली यशस्वी रुजवात याकडे लक्ष वेधणारं आणि अर्थातच एकमेकांबद्दलचा जिव्हाळा प्रकट करणारं हे पत्र...**

माटुंगा
१८.९.५०

प्रिय व्यंकटेश,

तुझं पत्र गेल्याच आठवड्यात मिळालं. मी तुला पुस्तकं पाठवली, तेव्हाही एक पत्रही टाकलं होतं. पण पत्रावर, पुणे-३ असं चुकीनं लिहिल्यामुळं बहुधा ते तुला मिळालं नसावं. तुझ्या पत्रात उल्लेख केलेलं ग.रां.चं पत्र मला मिळालं नाही.

यंदा किती डझन दिवाळी अंकांत आहेस? गावाकडच्या गप्पांना कसा काय रिस्पॉन्स मिळतो आहे?

आता माझं एक काम कर – 'माझ्या आयुष्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग' या विषयावर अगदी 'लाइट' असा २० ते २४ ओळींचा मजकूर माझ्या पत्त्यावर पाठवून दे. एका दिवाळी अंकासाठी हवा आहे. मी त्यांना तुझ्या वतीनं शब्द दिला आहे.

ग.रां.ना नमस्कार कळव. त्यांची दोन पुस्तकं माझ्याजवळ आहेत; अजून वाचली नाहीत. त्यांना घाई नसेल, तर सावकाश वाचीन

म्हणतो.

और कुछ हालहवाल सुनाओ.

कथासंग्रह प्रसिद्ध झाला काय?

तुझा
सदू रेगा

ही दोन पुस्तकं म्हणजे – फिलिपिनो लेखक कार्लो बुलोसान याचं 'लाफ्टर वुईथ माय फादर' आणि जॉन स्टाईनबेकचा 'रेड पोनी' हा सुंदर चित्रांनी सजवलेला कथासंग्रह. प्रभात रस्त्यावरच्या 'मोहनतारा' पत्त्यावरचं पत्र आहे. तेव्हा ग. रा. कामत मौज, सत्यकथा सोडून चित्रपटात काम करावं, या इराद्यानं पुण्याला आले होते आणि काही महिने माझ्याकडे राहिले होते.

'लाइट' म्हणून रेग्यांनी लिहायला सांगितलेल्या मजकुराबद्दल मी 'एक प्रसंग' नावाची गंभीर कथा लिहिली. ती 'वीणा'त प्रसिद्ध झाली.

**माडगूळकरांच्या आणखी एका कथेला एका समीक्षकाची मिळालेली ही पत्ररूपी दाद...**

१४३/१४६ भवानी पेठ,
सातारा शहर
१८ मे १९५३

प्रिय श्री. माडगूळकर

लिहीन लिहीन म्हणता आठ दिवस उशीर झाला. आठ दिवसांपूर्वी 'सत्यकथा' अंकातील 'या दत्तारामाचे काय झाले?' ही तुमची कथा वाचली. कथा अतिशय आवडली. त्यातही विशेष म्हणजे, तुमची निवेदनपद्धती. प्रत्येक पात्र लेखकाचा आधार न घेता वाचकांच्या डोळ्यांसमोर ठसठशीतपणे उभे राहते, हे या निवेदनाचे पहिले वैशिष्ट्य. निर्मळ मराठी भाषा आणि नेमक्या उपमा– ही नंतरची. दत्ताराम करीत असलेला बत्तीसारखा आवाज वाचल्याबरोबर मनाला पटला. 'त्याची कलती मान, पायाकडे बघणे, लाजणे आणि हसत-हसत खांद्याला कान घासणे' समोर दिसू लागते. कुटलेल्या पानाचा तांबूस लगदा, मांजराच्या पोरासारखा बारीक आवाज... सर्व वाचून निरीक्षणाविषयी हेवा वाटतो.

एकच उणीव मला वाटली. शेवटच्या परिच्छेदातील तपशिलाने, रमाबाईच्या व्यक्तित्वात मूळचे जे कारुण्य आहे, ते थोडे नाटकी होते व त्याची धार किंचित कमी होते. तुम्हाला काय वाटते, ते कळवावे.

हा सर्व विचार झाल्यानंतर एकच विचार मनात घोळत राहिला. तुमची अकृत्रिम, समर्थ भाषा. त्याबद्दल अजूनही तुमचा हेवा वाटत आहे. अशी भाषा ज्या शुद्ध मराठी रक्तातून येते, ते रक्त माझ्या धमन्यांतून कधी खेळेल, हा प्रश्न उभा राहतो. इंग्रजी व संस्कृतची पुटे कधी जातील, कोण जाणे. असो.

गोष्ट आवडली. आनंद झाला, तो व्यक्त केला. श्री. कामतांना नमस्कार सांगावा.

कळावे.

तुमचा स्नेहांकित,
स. शि. भावे

**व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांविषयीची एका वाचकाची ही प्रतिक्रिया...**

मुंबई –७
२९.११.५५

स.न.वि.वि.

आपली व माझी ओळख नसताना पत्र धाडले आहे, याबद्दल क्षमस्व. 'मौज'च्या दिवाळी अंकातील आपली कथा मला अतिशय आवडली. झोपून उठल्यानंतर कधी-कधी अनुभवास येणारा उत्साह आणि आत्मतृप्ती यांचे वर्णन जितके

साधे व सरळ, तेवढेच बहारदार आहे. स्वयंपाकघरातील दुधी भोपळा व जंगल जिमवर मुलांप्रमाणे लोंबकळणारे डाव आणि पळ्या यांची चित्रे मजेदार आहेत.

गोष्ट वाचल्यानंतर मनावर कुठली भावना तरंगत राहिली, हे निश्चितपणे सांगता येत नाही, हे खरे. पण ती भावना दुःखदायक होती, यात शंका नाही. मी आपल्या कथांची नियमित वाचक आहेच. 'जांभळाचे दिवस' फार सुंदर आहेत. त्या गोष्टीचा शेवट एकदम झट्कन केल्याची तक्रार एका वर्तमानपत्रात वाचली. पण मला तर 'जांभळाचे दिवस फार लवकर संपले,' ही हुरहूर लावणारी शेवटची ओळ फार आवडली. गोष्ट तिथेच संपली, हे आवडले.

या वर्षीच्या दिवाळी अंकापासून आपण आपल्या कथांचे 'पॅटर्न' बदललेले दिसते. तेदेखील आपल्या लेखणीला शोभून दिसते. 'अनवाणी'देखील उल्लेखनीय आहे.

आ. एक वाचक,
पद्मा लोकूर

**'माणदेशी माणसं'ची पावलं मराठी साहित्यात नुकतीच पडली होती, त्या वेळचा एक अभिप्राय...**

श्री. व्यं. दि. माडगूळकर यांसी,

स.न.वि.वि.

आपल्या 'माणदेशी माणसं'ची नुकतीच अकस्मात भेट झाली. भलीबुरी आहेत बिचारी. मराठी वाङ्मयप्रांतात अजरामर होतील. या माणसांनी वाचकांच्या अपेक्षा खूपच वाढवून ठेवल्या आहेत. त्या उत्तरोत्तर पुऱ्या होत राहतील, अशी उमेद आहे. कळावे, लोभ असावा, ही विनंती,

आपला
ग. खं. पवार

**कथांप्रमाणेच नाट्यलेखनातही आपल्या लेखणीचा स्वतंत्र ठसा माडगूळकरांनी उमटवला होता, याची साक्ष देणारं हे पत्र.**

पुणे
३.३.१९५६

सादर प्रणाम,

काल 'बिनबिया'च्या झाडाचा कलाविलास पाहून आपणास धन्यवाद देण्यासाठी हे पत्र लिहीत आहे. वरील नाट्यकृतीनं तुम्ही अस्सल (म्हणजे अभिजात) मराठी जीवन फारच प्रभावीपणे ठसवले आहे. नाट्य इतके यशस्वी करणाऱ्या कलावंतांना स्वतंत्रपणे धन्यवाद! अतिशय आनंद वाटला.

आपला,
गं. भा. निरंतर

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'प्रवास एका लेखकाचा' या पुस्तकातून)**





नवं कोरं

लाल फितीची मजबूत
प्रशासकीय चौकट भेदू पाहणाऱ्या
झुंजार अधिकाऱ्याची संघर्षगाथा

रेड टेप

अभिजित कुलकर्णी

पृष्ठसंख्या : २६८ । किंमत : ₹३४०

Book Available

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनीअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ, कोल्हापूर - ४१६०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.०० (शनिवार बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४
Email : mehtabooksellers@gmail.com

Mehta eBooks
Save Tree Books, Read eBooks

**950+ Marathi Titles available as e-Book**

on

GET IT ON Google Play & amazon

e Book

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर -
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks साठी खालील लिंक्सचा वापर करा

**play.google.com/store/books**
**www.amazon.in/b?node=15513892031**

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**



गोष्टी अशा सुरस
वाचनासाठी लागेल चुरस...
नवं कोरं
चहा साखरेचा नाताळ
जेन जॉली । रॉबर्ट इंगपेन
रेडिओ रेस्क्यू !
जेन जॉली । रॉबर्ट इंगपेन
कांगारू देशीच्या गोष्टी
(४ पुस्तके)
एकूण पृष्ठसंख्या : १२८
संचाची किंमत : ₹२८०
अनुवाद
मालविका
आमडेकर
नववर्षाची अनपेक्षित भेट !
ख्रिस्तोफर चेंग । दी वू
रात्रीचे राक्षस
नीना पौलोस । चेरिल वेस्टनबर्ग
गंमत कोडी
गंमत कोडी
(भाग १ ते ५)
घनश्याम देशमुख
एकूण पृष्ठसंख्या : १६०
संचाची किंमत : ₹२२५
चरित्र मालिका
(२१ पुस्तके)
रा.वा.शेवडे गुरुजी
एकूण पृष्ठसंख्या : १२६४
संचाची किंमत : ₹२०८०
समादचा वाळवंटातील व रानातील फेरफटका
पृष्ठसंख्या : ४० । किंमत : ₹८०
शिकारी बनला शिकार
पृष्ठसंख्या : ६४ । किंमत : ₹७०
मोहम्मद उमर । अनुवाद - लीना सोहोनी

# अमृतवेल

**वि.स. खांडेकर**

भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना
कवटाळून बसण्यासाठी मनुष्य
जन्माला आलेला नाही. मानवाचे
मन [illegible] फुलपाखराच्या सारखे [illegible]
[illegible] पाहून [illegible] नाही
[illegible] मानवाच्या [illegible]
[illegible] आहे. त्याने
स्वप्ने पाहावं, ते फुलवावे,
ते सत्यसृष्टीत उतरावे म्हणून
धडपडणे, त्या धडपडीतला
अनेकदा पराभव आला दैवाने
ते स्वप्न भंग पावले, तरी
त्याच्या तुकड्यांवरून [illegible]
पावलांनी [illegible] [illegible]
जाणे, हा मानवी मनाचा
धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाचा
अर्थ [illegible] तो [illegible]!

वि. स. खांडेकर

*'अमृतवेल' ही वि. स. खांडेकरांची गाजलेली कादंबरी. या कादंबरीतील नायिका नंदा हिचा प्रियकर शेखर अपघातात मरण पावला आहे. नियतीच्या या आघातानं ती कोलमडून गेली आहे. तिच्या मनात भावनांचं काहूर उठलंय. शेखरच्या स्मृतींनी तिला वेढलंय, मृत्यूनं शेखरलाच का न्यावं, असा प्रश्न तिला पडलाय... अशा वेळेला ती निर्णय घेते आत्महत्या करण्याचा...पण वडिलांचं वात्सल्य, आईची सहनशक्ती, तिच्या मृत बहिणीच्या मुलाविषयीची ओढ तिला जीवनाकडे खेचून आणते. जीवन-मृत्यूच्या सीमेवरील नंदाच्या मनातील हे द्वंद्व ती व्यक्त करते वडिलांना लिहिलेल्या पत्रातून. जीवनाचा तळ ढवळून काढणारा या पत्रातील आशय खास खांडेकरी शैलीत...*

दादांनी नंदाच्या पत्रातली पहिली ओळ पुन्हा वाचली–

'तीर्थरूप दादांच्या चरणी–'

दादा चमकले. कॉलेजच्या सहलीसाठी किंवा नात्यातल्या लग्नाकरिता नंदा क्वचित बाहेरगावी जाई, तेव्हा तिच्याकडून येणाऱ्या पत्रात, 'ती. दादांना सप्रेम नमस्कार' असा मायना असे. आज तो बदलला होता. 'तीर्थरूप दादांच्या चरणी' हे शब्द नंदा नकळत लिहून गेली होती. दादांना वाटले,

दुःख माणसाला अंतर्मुख करते, हेच खरे! ते दुसऱ्या माणसाशी असलेले आपले नाते अधिक स्पष्ट करते, अधिक दृढकरते. त्याशिवाय का नंदाने हा मायना लिहिला असेल?

दादा अधीरपणाने वाचू लागले–

तीर्थरूप दादांच्या चरणी नंदाचा शिरसाष्टांग नमस्कार,

दादा, मला क्षमा करा. तुमच्या लाडक्या नंदाला तुम्ही क्षमा कराल ना? मघाशी खोटं बोलले मी तुमच्याशी, ते सारखं मनात डाचतंय! म्हणून जेवून खोलीत आल्यावर लगेच हे पत्र लिहायला बसलेय! शिवाय खरं सांगू, हल्ली स्वस्थ झोपच येत नाही मला. अंथरुणावर पडले, की मन भरकटू लागतं. धुळीच्या वावटळीत सापडतं. खोलीत काळोख झाला, की नाही नाही ती चित्रं दिसू लागतात. मग दोरी तुटलेल्या पतंगासारखी स्थिती होते माझ्या मनाची! आठवणींची गिधाडं आपल्या अधाशी पंखांचा फडफडाट करीत मला वेढून टाकतात आणि आपली क्रूर नखं माझ्या काळजात खुपसून–

जाऊ दे ते. संध्याकाळी मी कुठल्याही मैत्रिणीकडे गेले नव्हते. दासबाबूंच्या घरीही गेले नव्हते. मी आणि शेखरनं ज्या-ज्या जागी गुजगोष्टी केल्या होत्या, तिथं तिथं मी वेड्यासारखी भटकत होते. भूतकाळाच्या भुयारात पुन्हा पुन्हा डोकावून पाहत होते.

कलासागरात बुडून गेलेल्या असंख्य रंगीबेरंगी कागदी होड्या! त्यांतील एखादी तरी पुन्हा वर तरंगत येईल, अशी वेडी आशा उराशी धरून मी फीरफीर फिरले. भटक भटक भटकले. एखाद्या समाधीचं दर्शन घ्यावं, तशी आम्हा दोघांच्या भेटीगाठीची प्रत्येक जागा मी पाहिली. आसवांच्या फुलांनी त्या प्रत्येक समाधीची पूजा बांधली; पण मन थाऱ्यावर येईना! मुंबईच्या कधीही न संपणाऱ्या लांब-रुंद रस्त्यांतून माणसं मुंग्यांसारखी फिरत होती. ही सारी काळी-गोरी, भली-बुरी, गरीब-श्रीमंत, लहान-मोठी माणसं जिवंत आहेत; आणि माझा शेखर मात्र? ती माणसं पाहून मनात येई, देव किती निर्दय आहे! किती कृपण आहे! लाखो लोकांत एखाद्याच्या वाट्याला येणारा हा विषाचा प्याला त्यानं मला का प्यायला लावला? मृत्यूचं हे काळंकुट्ट कोडं मला कोण उकलून दाखवील?

हळहळत, चरफडत, तडफडत मी आजचा सूर्यास्त पाहिला! लाल, गुलाबी, केशरी रंगाची नदी पश्चिम क्षितिजावर दुथडी भरून वाहत होती. गत वर्षी असाच झगमगता सूर्यास्त आम्ही दोघांनी डोळे भरून पाहिला होता. तो पाहूनही आम्ही अतृप्तच राहिलो होतो. त्या वेळी नैर्ऋत्येकडल्या लालभडक रंगानं मोहून गेलेला शेखर म्हणाला होता,

"नंदा, तुझ्या संगतीनं माझ्यासारख्या गद्य माणसालासुद्धा काव्य सुचायला लागलंय हं! समोर पाहा ना जरा- कुंकवाचा केवढा मोठा करंडा सूर्याचा पाय लागून लवंडला आहे. त्यातलं सारं कुंकू आभाळात पसरलं आहे."

शेखरच्या या बोलण्याचं मला मोठं कौतुक वाटलं तेव्हा!

मी थट्टेनं त्याला म्हणाले,

"नवकवी होण्याची लक्षणं दिसताहेत हं ही!"

आज ते सारं-सारं आठवलं. त्याचं ते बोलणं ही पुढल्या

> काफ़ी है मिरे दिलकी तसल्ली को यही बात
> आप आ न सके आप का पैग़ाम तो आया
> -शकील बदायुनी

अशुभाची पूर्वसूचना होती, की काय, देव जाणे!

काळोख पडला, तरी माझी भ्रमंती सुरूच होती. त्या भ्रमिष्ट मनःस्थितीतच मी समुद्रावर गेले. तिथे वाळूत बसून शेखरनं आणि मी भावी सुखाचे कुतुबमिनार उभारले होते; पण ते बिचारे सारे वाळूचे मिनार ठरले! दुर्दैवाच्या एका अजस्र लाटेनं ते उद्ध्वस्त होऊन धुळीला मिळाले!

अंधार दाटत होता. गर्दी हळूहळू विरळ होत होती. ध्यानीमनी नसलेल्या घरातल्या बिळातून एखादा नाग फुत्कारत बाहेर यावा, तसा त्या अंधारातल्या एकान्तातून आत्महत्येचा विचार माझ्या मनात डोकावू लागला. वाटलं, हृदयात पेटलेला वणवा समोरच्या अथांग पाण्यात विझवून टाकावा. मृत्यूच्या यक्षप्रश्नाचं उत्तर मृत्यूखेरीज दुसरं कोण देऊ शकेल?

मी बसले होते, ती जागा हळूहळू निर्मनुष्य झाली. जवळपास कुणी नाही, असं पाहून मी पाण्यात पाऊल टाकलं. गौरीहर पुजून बोहल्याकडे जाणाऱ्या वधूसारखी मी मृत्यूला माळ घालण्याकरिता पुढं जाऊ लागले.

पाणी गुडघ्यांवर आलं. आणखी थोडं पुढं गेलं, की–

माझे पाय लटपटू लागले. काळजातली धडधड नगाऱ्याच्या आवाजासारखी वाटू लागली; पण मन सुन्न होतं. मस्तक बधिर होतं. एखाद्या कळसूत्री बाहुलीसारखी मी एकेक पाऊल पुढं टाकीत होते. मृत्यूच्या मिठीत तरी तडफडणाऱ्या मनाला विसावा मिळेल, या आशेनं!

त्याच क्षणी तुमची आठवण झाली मला. काळ्याकुट्ट आकाशात वीज चमकावी, तशी! तुमची माया डोळ्यांपुढं मूर्तिमंत उभी राहिली. मी इन्टरच्या वर्गात होते, तेव्हा विषमज्वर झाला होता मला. जवळजवळ आशा सोडली होती डॉक्टरांनी. तुम्ही मात्र माझ्या पाठीवरनं हात फिरवत रात्रभर बसून होता. तुमच्या हातात त्या रात्री संजीवनीचं सामर्थ्य संचारलं असावं. त्या जिवावरल्या दुखण्यातून मी उठले. तुमचा तो वत्सल हात मृत्यूच्या त्या महाद्वारात एकदम माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला. पुढं जायचं नाही, असा इशारा देत!

काही क्षण तशीच पाण्यात उभी होते मी! मिलिंदचा तान्हेपणीचा सायीसारखा, मऊ मधासारखा गोड पापा मला आठवला. 'मिलिंदला सांभाळ.' हे आक्काचे शेवटचे शब्द कानांत घुमू लागले, माईची अबोल करुण मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहिली. अक्का गेल्यापासनं ती कष्टीच आहे. मनात आलं, तिचं दुःख आपण हलकं करायचं, की त्या दुःखात भर घालायची?

मी मृत्यूचं दार किलकिलं केलं होतं. ते हळूच लावून घेतलं. त्याच्याकडे पाठ फिरवली. भित्रेपणामुळं असेल, तुम्हा सर्वांच्या मायेमुळं असेल, जगण्याची इच्छा हीच माणसाची सर्वांत प्रबळ प्रेरणा असल्यामुळे असेल, मी जीवनाला सामोरं जायचं ठरविलं. मग त्याची मुद्रा कितीही उग्र असो, त्याची दृष्टी कितीही क्रूर असो, त्याचा स्पर्श कितीही काटेरी असो! कॉलेजात असताना माझ्या स्वाक्षरीच्या वहीत नेहरूंनी लिहिलं होतं, 'Live dangerously!' तो संदेश घोकीत मी मृत्यूचा निरोप घेतला.

पण–

परवा बसमध्ये एक पाठमोरा तरुण मी पाहिला. हुबेहूब शेखरसारखा दिसत होता तो. तो भास एखाद्या सुरीसारखा माझं काळीज कापीत गेला. खरंच, दादा, हे असं किती दिवस चालायचं? पाच महिने होऊन गेले, तरी माझं दुःख पहिल्या दिवसाइतकं ओलं आहे. माणसानं मागचं सारं विसरून जायला हवं, हे मला कळतं- मन गुंतवायला हवं मी कशात तरी! सारखा विचार करतेय– मानवी जीवन हा केवळ लहरी नियतीच्या तालावर चालणारा एक क्रूर खेळ आहे का... या विश्वसंसाराला काही अर्थ आहे, की नाही... प्रीतीचा अर्थ काय... काही केल्या या प्रश्नांची उत्तरं सापडत नाहीत! काय करू मी? नोकरीत मन गुंतविल्यानं ही टोचणी कमी होईल, का पीएच.डी.च्या अभ्यासात–

दादा, तुम्ही मला मुलासारखं वाढविलंत. नंदा हाच माझा आनंद, असं नेहमी म्हणत आलात. तुम्ही मला निर्भय बनवलं. विचार करायला शिकवलं. बुद्धीच्या निकषावर माणसानं प्रत्येक गोष्ट घासून पाहायला हवी, असं लहानपणापासून तुम्ही माझ्या मनावर बिंबवलं; पण आकाशातल्या कुऱ्हाडीच्या या पहिल्याच घावानं मी अशी घायाळ झाले. माझी मलाच खंत वाटते याची. असं का व्हावं? गेले तीन-चार महिने मी या प्रश्नाचा विचार करीत आहे. मला वाटतं, पुस्तकांच्या विशाल, सुंदर पण स्वप्नाळू जगात मी वाढले. सुखवस्तू पांढरपेशांच्या टीचभर जगात मी वावरले. आई-बापानी मायेच्या उबदार शालीत सदैव गुंडाळून ठेवल्यामुळं बाहेरच्या ऊन-पावसाची, वादळ-वाऱ्याची आणि हात-पाय गारठवून टाकणाऱ्या थंडीची ओळखच झाली नाही मला! मग त्यांच्याशी झगडण्याचं बळ अंगी कसं यावं? ज्या जगात मी वाढले, ते अंगठीवरल्या खड्याएवढं! त्या खड्यात जे जीवन प्रतिबिंबित झालं, ते मी पाहिलं. ते सारं परीटघडीचं! कुठं डाग नाही, की कुठं सुरकुती नाही! पुष्करिणीसारख्या या शांत जगात मी लहानाची मोठी झाले, प्रीतीचं, द्वेषाचं, शौर्याचं, क्रौर्याचं, जीवनाचं, मृत्यूचं सारं तांडव मी पाहिलं, ते शेक्सपिअरच्या नाटकांत, महाभारतातल्या पात्रांत! 'रोमिओ अँड ज्यूलिएट' मी वाचलं, तेव्हा अक्काच्या लग्नाची आठवण झाली मला. त्या लग्नात प्रेम हा शब्द एकदासुद्धा कुणी उच्चारला नव्हता. तिथं होता हुंडा, तिथं होते मानपान, तिथं होते रुसवेफुगवे!

हे सारं मनात आलं म्हणजे वाटतं, खोट्या सुरक्षितपणाची ही जन्मजात कवचकुंडलं दूर फेकून द्यावीत. या अफाट जगातल्या असंख्य माणसांतलं एक माणूस म्हणून जगावं. जो पेला ओठांना लागेल, त्यातल्या पेयाचे घुटके हसतमुखानं घ्यावेत. आपल्या वाट्याला जे जीवन येईल, ते दोन्ही बाहू

पसरून कवळावं!

माई फारशी शिकलेली नाही. तिनं शेक्सपिअर वाचलेला नाही; पण तिच्यापाशी दुःख पचविण्याची शक्ती आहे. कारण देवावर तिची खरीखुरी श्रद्धा आहे. अक्का गेली, तेव्हा मिलिंदाला पोटाशी धरून ती दोनच शब्द बोलली,

'देवाची इच्छा!'

काळजाच्या फुटलेल्या धरणाला या दोन शब्दांनी बांध घातला तिनं! तिची ती श्रद्धा माझ्यापाशी नाही. त्यामुळं जिवाच्या आकान्ताच्या वेळी माणसाला आवश्यक असणाऱ्या श्रद्धेच्या आधाराला मी पारखी झाले आहे. ही माझी एकटीच्याच दुर्दैवाची कहाणी नाही! आमच्या पिढीचं दारुण दुःख आहे हे! आमच्या मनातली रिकामी पडलेली देवाची जागा कशी भरून काढायची, हा आमच्यापुढला खरा प्रश्न आहे!

पत्र खूप लांबलं. तुमच्याशी हे सारं नीट बोलता येईल, असं वाटेना, म्हणून लिहीत बसले. हे सारं लिहिल्यामुळं किती हलकं वाटतंय, म्हणून सांगू? माझी कसलीही काळजी करू नका तुम्ही आता. उद्या दासबाबूंच्याकडे जायचं आणि पीएच.डी. च्या विषयासंबंधी त्यांचा सल्ला घ्यायचा, असं मी ठरवलंय. मग दोन-तीन वर्षांनी आपल्या दारावर पाटी लागेल– डॉ. अलकनंदा देशपांडे, एम. ए., पीएच.डी. ती पाटी वाचून मिलिंद म्हणेल,

''मावशी, तू डॉक्टर झालीस ना? मला औषध दे की मग! मात्र ते अगदी गोड गोड हवं हं!''

तुमची
नंदा

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'अमृतवेल' या पुस्तकातून)**

नवं कोरं




फसवून परदेशी दत्तक दिल्या गेलेल्या आपल्या तान्ह्याच्या भेटीसाठी शर्थीचा संघर्ष करणाऱ्या एका सामान्य मातेच्या अंतरंगातील उलघालीचे हृदयस्पर्शी चित्रण

कुंती

रजनीकुमार पंड्या । अनुवाद : प्रा. सुधीर कौठाळकर

पृष्ठसंख्या : ५२४ । किंमत : ₹५५०

Book Available



विश्वासघातकी मित्र व व्यभिचारी पत्नीच्या फसवणुकीने व्यथित होऊन सूडाने पेटून उठलेल्या पतीची विलक्षण सूडकथा

व्हेण्डट्टा

मेरी कॉरेली । अनुवाद : सुरेश गुप्ते

पृष्ठसंख्या : २१६ । किंमत : ₹२४०

Book Available

# राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे

डॉ. जयसिंगराव पवार



*राजर्षी शाहू महाराज हे एक अष्टपैलू आणि द्रष्टे व्यक्तिमत्त्व. त्यांच्या या अष्टपैलुत्वावर आणि द्रष्टेपणावर प्रकाश टाकणारी ही काही पत्रं. त्या त्या पत्राचं महत्त्व आणि त्या पत्राची पार्श्वभूमी लेखक जयसिंगराव पवार यांनी पत्राच्या आधी नमूद केली आहे.*

**जी.सी.आय.ई. पदवी मिळाल्यावर शाहू महाराजांनी दाजीराव विचारे यांना पाठविलेले खासगी पत्र**

**१२ डिसेंबर १९११**

कोल्हापूर संस्थानचे चीफ इंजिनिअर दाजीराव अमृतराव विचारे यांना शाहू महाराजांनी दिल्लीहून धाडलेले हे पत्र अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. १२ डिसेंबर १९११ रोजी दिल्लीत पंचम जॉर्ज बादशहाच्या राज्यारोहणानिमित्त खास दरबार भरविला जाणार होता. त्या दरबारास महाराजांना पाचारण केले गेले होते. मुख्य समारंभाच्या आदल्या दिवशी म्हणजे ११ डिसेंबर १९११ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्याकडून महाराजांना ब्रिटिश साम्राज्यातील G.C.I.E[१] ही मोठ्या सन्मानाची पदवी मिळाल्याचे पत्र मिळाले. हे पत्र म्हणजे महाराजांच्या राजनिष्ठेचे जसे प्रतीक होते, तसे ते ब्रिटिशांना महाराजांविषयी व त्यांच्या कार्याविषयी वाटणाऱ्या विश्वासाचेही द्योतक होते.

कारोनेशन दरबार<br>
कोल्हापूर कॅम्प,<br>
दिल्ली

**श्री**

चि. वि. राजश्री विचारेसाहेब यांसी –

आशीर्वाद विशेष –

पत्र लिहिण्यास कारण की, आज मला G.C.I.E. हा किताब मिळाला. परमेश्वराने किताब, मान, महाराज वगैरे पदव्या दिल्या होत्या; परंतु, हल्ली मिळालेल्या पदवीची किंमत आमचे स्नेही मंडळींनी फार समजली पाहिजे. कारण, आपणास माहीतच आहे की, आम्हाला आमचे स्नेही मंडळींनी जवळजवळ कारागृहवास दाखविण्याचा प्रयत्न केला. तो साधणे जरी शक्य नव्हते तरी आम्हावर शेण उडविलेच. आम्हास आई-बाप वगैरे कोणी नाही; तरी त्या 'जगन्नियंत्या परमेश्वराने काळजी वाहून आमचे अंगावरचे शेण पुसून काढून कुंकवाचा टिळा लावला. तरी आपण (जे लोक आमचेबरोबर एका नावेत बसले होते.) त्या परमेश्वराची, सातवे एडवर्ड बादशहाची व पंचम जॉर्ज बादशहाची अनन्यभावे प्रार्थना केली पाहिजे. कारण त्यांनी न्याय तो न्याय व अन्याय तो अन्याय ठरवून आमचा डाग धुऊन काढला. याबद्दल परमेश्वराचे आम्ही मानू तितके उपकार थोडेच होणार आहेत. आमचे झालेले हाल पाहून आमचे मित्रमंडळींचे डोळे अद्याप निवाले नाहीत. तो महाराज ढोंग करतो; तो लुच्चा आहे वगैरे विशेषणे आम्हाला सुरू आहेत. करिता आता याचेपुढे आपण मला सोडू नये व नोकर हे नाते विसरून माझेशी वागावे, हीच विनंती आहे. कळावे हे आशीर्वाद.

**शाहू छत्रपती**<br>
(मोडी सही)

**शाहू महाराजांचे डॉ. कृष्णाबाई केळवकर यांना पत्र**

**८ फेबुवारी १९१९**

कृष्णाबाई केळवकर या कोल्हापूर संस्थानातील पहिल्या एतद्देशीय स्त्री-शिक्षणाधिकारी रखमाबाई केळवकर यांच्या कन्या. शाहू महाराजांच्या उत्तेजनाने त्यांनी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजात व युरोपात उच्च वैद्यकीय शिक्षण घेतले आणि त्या कोल्हापूरच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये डॉक्टर म्हणून रुजू झाल्या. मराठा समाजातील वैद्यकीय क्षेत्रात इतके उच्च शिक्षण घेतलेली अशी स्त्री त्या काळात अपवादात्मक होती. शाहू महाराजांना त्याचे खास कौतुक होते. त्यांनी कृष्णाबाईंसाठी हॉस्पिटलमध्ये स्वतंत्र स्त्री विभाग करून त्यावर त्यांची मुख्याधिकारी म्हणून नेमणूक केली होती.

या पत्राची पार्श्वभूमी अशी दिसते की, कृष्णाबाईंनी हॉस्पिटलच्या संदर्भात अनेक अडचणी तक्रार स्वरूपात महाराजांना सादर केल्या होत्या. त्यास समजावणीच्या स्वरूपात महाराजांनी पाठविलेले हे उत्तर आहे. त्यामध्ये कृष्णाबाईंविषयीचा जिव्हाळा, त्यांच्या शिक्षणाविषयीचे कौतुक व त्यांच्या कामाविषयीचा विश्वास अशा अनेक बाबी महाराजांनी वडीलकीच्या नात्याने व्यक्त केल्या आहेत.

आणखी एका महत्त्वाच्या बाबीवर हे पत्र प्रकाश टाकते. ती म्हणजे महाराजांनी कोल्हापूरच्या या सरकारी हॉस्पिटलमध्ये अनाथ मुलांचा एक खास विभाग सुरू करून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी दरबार सर्जन डॉ. टेंगशे व आपल्या राणीसाहेब लक्ष्मीबाई यांच्यावर सोपविली होती. प्रिन्स शिवाजींच्या आकस्मिक निधनाने राणीसाहेबांवर जो क्रूर आघात झाला होता; त्याचे दुःख विसरण्यासाठी महाराजांनी ही योजना केली होती. या संदर्भात त्यांनी पत्रात म्हटले आहे -

कोल्हापूर
८ फेब्रुवारी, १९१९

प्रिय डॉ. कु. केळवकर,

तुमच्या सेवेची दरबारला गरज आहे. तुम्हास गमवणे दरबारला दुःखप्रद आहे. तुम्ही सेवेतून मुक्त व्हावे, अशी दरबारची कधीही इच्छा असणार नाही. दरबारला तुमच्या गुणवत्तेची पूर्ण जाणीव आहे. एका स्त्री डॉक्टरने हे समजून घेतले पाहिजे की, ती एक स्त्री डॉक्टर आहे; कोणी एक जनावरांची डॉक्टर नाही. म्हणूनच लोकांनी जनावरांप्रमाणे एका विशिष्ट डॉक्टरकडेच जावे, अशी अपेक्षा तिने ठेवू नये. ते मनुष्यप्राणी आहेत. त्यांना जिथे चांगले वाटेल तिथेच ते जाणार. आपणास हवे असल्यास न्याय – वैद्यकीय – प्रकरणे (Medico Legal Case) आपल्याकडे पाठविली जातील. या संदर्भातील तुमच्या इच्छा आम्हास कळवाव्यात. परंतु, त्यामुळे तुम्हास वारंवार कोर्टात जावे लागेल. जर तुम्ही तुमचे हे काम तुमच्या पुरुष मदतनिसावर सोपविणार असाल, तर सध्याची जास्त सोयीची व कमी खर्चाची व्यवस्था बरी नाही काय? जर तुमचे मदतनीस सर्व केसेस घेण्यास तयार असतील, तर संपूर्ण न्याय-वैद्यकीय-विभाग (Medico Legal Cases) तुमच्याच ताब्यात दिला जाईल.

डॉ. टेंगशे यांच्यावर कामाचा अतिरिक्त बोजा असल्याने त्यांनाही त्यात आनंदच वाटेल. ब्रिटिश मुलखात मी अशा प्रकारे एक स्त्री डॉक्टर संपूर्ण हॉस्पिटलची प्रमुख असल्याचे पाहिलेले नाही. अगदी इंदूरमध्ये डॉ. तांबे असतानासुद्धा असे चित्र नव्हते. दरबारचा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे, हे यावरून तुमच्या लक्षात येईल. नर्सेसच्या बाबतीत बोलायचे, तर तुमच्याकडील नर्सेसची संख्या कमी करण्यात आलेली नाही आणि डॉ. टेंगशे यांना अधिक नर्सेस दिल्याबद्दल तुम्ही वाईट वाटून घेऊ नये. तसेच तुम्हालाही आणखी एक असिस्टंट डॉक्टर दिला गेल्यास डॉ. टेंगशे यांनाही काही वाटण्याचे कारण नाही.

अनाथ मुलांच्या संदर्भात सांगायचे, तर आमच्या कुटुंबातील त्या दुःखद घटनेपासून माझ्या पत्नीस ज्यामध्ये रस असेल, अशी ही एकमेव गोष्ट आहे. डॉ. टेंगशे माझ्या पत्नीस पित्याप्रमाणे वाटतात. म्हणूनच (हॉस्पिटलमधील) अनाथ मुलांचा ताबा माझी पत्नी व डॉ. टेंगशे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला आहे. माझ्या पत्नीकडे या अनाथ मुलांचे संगोपनाचे काम सोपवून मी तिच्या दुःखी मनाला विरंगुळा मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहे, असे मला वाटते.

स्त्रिया या जात्याच हुशार असल्यामुळे, दोन स्त्रिया, अगदी बहिणी बहिणी असल्या, तरी जास्त काळ एकत्र काम करू शकत नाहीत, ही अगदी जुनी म्हण आहे. म्हणूनच मला असे वाटते की, डॉ. टेंगशे यांच्याशी असलेल्या पितृतुल्य नात्यामुळे हे अनाथालय चांगल्या प्रकारे चालविणे माझ्या पत्नीस जास्त सोपे होईल आणि त्यात तिला आनंदही वाटेल. तुमच्याकडील काही नर्सेस कमी केल्या गेल्या असतील, तर ते आम्हास कळवावे. डॉ. सिंक्लिअर व डॉ. सैन यांच्या काळातील नर्सेसची संख्या आम्हास कळवावी. तसेच तुमच्याकडे असणाऱ्या आंतररुग्ण व बाह्यरुग्ण यांची संख्याही आम्हास कळवावी.

आपला
**शाहू छत्रपती**
(डॉ. प्रल्हाद केळवकर संग्रह)

**अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या 'संदेश'ला शाहू महाराजांकडून अर्थसाहाय्य**

**३१ जानेवारी १९२०**

शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या अनेक वृत्तपत्रांच्या स्थापनेस प्रेरणा दिली, अनेक तरुण पत्रकारांना अर्थसाहाय्य दिले. असे साहाय्य केवळ बहुजन समाजातील वृत्तपत्रांनाच दिले असे नाही, तर सामाजिक न्यायाची बाजू निर्भीडपणे मांडणारे 'सुधारक' व 'संदेश' यांसारख्या ब्राह्मणी वृत्तपत्रांनाही त्यांनी मदत केली.

प्रस्तुतचे पत्र अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या 'संदेश'ला अर्थसाहाय्य देण्याच्या संदर्भातील आहे. हे साहाय्य कोल्हटकरांनी न मागताच महाराजांनी आपणहून दिलेले आहे. त्यातील 'लोन' पुढे महाराजांनी कधीच परत मागितले नाही. एवढेच नव्हे, तर कालांतराने 'संदेश' जेव्हा कोल्हापूर दरबारावर टीका करू लागला; तेव्हा त्यास दिलेल्या 'लोन'ची प्रॉमिसरी नोट फाडून टाकण्याचा आदेश त्यांनी दिला. हेतू हा की, सूड उगविण्याच्या बुद्धीने पैसे वसूल करण्याची दुर्बुद्धी आपणास होऊ नये.

कोल्हापूर
ता. ३१-१-१९२०

Confidential

रा. रा. रामचंद्र अण्णाजी प्रभावलकर
यांसी
सप्रेम लोभाची वृद्धी व्हावी, हे वि. वि.

आपण मि. कोल्हटकर 'संदेश'चे एडिटर यांची गाठ घ्यावी. त्यांना ४००० रु. लोन देणेची माझी इच्छा आहे. तरी वकिलामार्फत त्याची तजवीज करावी. तसे झाले म्हणजे मी रा. ब. सबनीस दिवाण साहेब यांना रकमेची तजवीज करणेस सांगतो.

क.लो. करावा ही विनंती.

आ.
**शाहू छत्रपती**
(मोडी सही)

(कोल्हापूर पुरालेखागार, शाहू दप्तर, कागद क्र. प्र. ११३५१)

**'मूकनायक'चा स्पेशल अंक : डॉ. बाबासाहेबांचे पत्र**

**१३ जून १९२०**

अस्पृश्य समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारास वाचा फोडण्यासाठी व अस्पृश्य वर्गास जागे करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० साली 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. बाबासाहेबांच्या या वृत्तपत्रास शाहू महाराजांचा उदार आश्रय मिळाला. तत्पूर्वीच माणगाव व नागपूर परिषदांच्या निमित्ताने हे दोन नेते एकमेकांजवळ आले होते.

त्यांच्या ठिकाणी परस्परांविषयी आदर उत्पन्न झाला होता. या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांनी महाराजांच्या वाढदिवसानिमित्त (२६ जून १९२०) 'मूकनायक'चा 'स्पेशल अंक' काढण्याचे योजिले. त्यासाठी आपण स्वतः कोल्हापुरास येत आहोत, असे बाबासाहेबांनी महाराजांना लिहिले आहे. पत्रातील काही शब्द अस्पष्ट झाले असल्याने ते कंसात टाकले आहेत.

मूकनायक अंक
परळ, मुंबई
१३-६-१९२०

श्रीमन्महाराज शाहू छत्रपती, करवीर
हुजुरांचे सेवेशी –

माणगावच्या व नागपूरच्या सभेत पास झालेल्या ठरावास अनुसरून ता. २६ जूनचा दिवस आपला वाढदिवस म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येणार आहे. त्याच दिवशी आपुल्या आश्रयाखाली निघत असलेल्या 'मूकनायक'चा स्पेशल अंक काढण्याचे नियोजित झाले आहे. त्यात हुजुरांचा फोटो तसेच आपल्या कारकिर्दीतील (कार्याची) उज्ज्वल साग्र रूपरेखा देण्यात येणार आहे. यास्तव (कुल) अमदानीची इत्थंभूत हकिगत मिळण्याबद्दल मी एक वेळा विनंती केली होती. पण, अद्यापि हाती आलेली (नाही).

याबद्दल दिलगिरी वाटते. दिवस अगदी थोडे उरले (आहेत). तेव्हा मी स्वतः येऊन अवश्य असलेली माहिती गोळा करण्याचे ठरविले आहे. या उद्देशास्तव मी आज संध्याकाळी (कोल्हापूरला) येण्याकरिता निघत आहे. मंगळवारी संध्याकाळी पोहोचेन. हुजुरांच्या दर्शनाचा लाभ होईलच.

आपला कृपाभिलाषी
**भीमराव आंबेडकर**
(माणगाव परिषद विशेषांक)

**डॉ. आंबेडकरांविषयी सर पीज यांना शाहू महाराजांची विनंती**

**२३ जून १९२०**

१९२०च्या जुलै महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्चविद्याभ्यासासाठी इंग्लंडला गेले. विद्याभ्यासाबरोबर तेथील पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन हिंदुस्थानातील ब्राह्मणेतर अथवा मागासवर्गीय चळवळीबद्दल त्यांचे अनुकूल मत करणे, हाही उद्देश ते बाळगून होते. त्या दृष्टीने शाहू महाराजांनी त्यांचा परिचय इंग्लंडमधील एक पुढारी व आपले मित्र सर अल्फ्रेड पीज यांना या पत्राद्वारा करून दिला आहे. हिंदुस्थानातील ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर समाज यांमधील फरक, ब्राह्मण ब्यूरॉक्रसीचे दुटप्पी वर्तन याविषयीची वस्तुस्थिती डॉ. आंबेडकर आपणासमोर मांडतील, असेही महाराजांनी पीजना लिहिले आहे.

**(मराठी अनुवाद)**

छत्रपती महाराजा : कोल्हापूर
जय भवानी
कोल्हापूर
२३ जून १९२०

प्रिय मित्र अल्फ्रेड पीज,

माझे मित्र डॉ. आंबेडकर यांची आपणास ओळख करून द्यावी, म्हणून मी हे पत्र लिहीत आहे. डॉ. आंबेडकर हे महार या अस्पृश्य समाजातील आहेत. ते न्यू यॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठाचे पीएच.डी. असून, सध्या मुंबईच्या सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स यामध्ये प्रोफेसर आहेत. इंग्लंडच्या इन्स ऑफ कोर्टमध्ये आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये अभ्यास करण्यासाठी ते इंग्लंडला येत आहेत. ते आपणास मागासवर्गीय समाज व ब्राह्मण नोकरशाही यांच्यामधील फरक स्पष्ट करतीलच.

तसेच स्वतःला लोकशाहीवादी म्हणवून घेणारे ब्राह्मण नोकरशहा मागासवर्गीयांना सहानुभूती दाखविणाऱ्यांना कसा त्रास देतात, तेही ते आपणास सांगतील. हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्यकर्त्यांना आपले म्हणणे पटवून देण्यात ब्राह्मणेतर मंडळी अयशस्वी ठरली आहेत. पण (इंग्लंडमधील) ब्रिटिश लोकांना आपल्याबद्दल सहानुभूती वाटेल, अशी त्यांना आशा वाटते. म्हणून मी आपणास विनंती करू इच्छितो की, आपण डॉ. आंबेडकरांचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे आणि त्यांना आपल्या परीने शक्य होईल तेवढी मदत करावी.

तसदीबद्दल क्षमा असावी.

आपला,
**शाहू छत्रपती**

(श्री. विजय सुरवाडे संग्रह)

**शाहूराजांचे एक आगळे दर्शन : लठ्ठ्यांना पत्र**

**२७ जुलै, १९२०**

सत्यशोधक कार्यकर्ते अण्णासाहेब बाबाजी लठ्ठे यांच्यावर १९१४ साली कोल्हापुरात 'डांबर प्रकरणा'त बालंट आल्यावर दरबारातील कारस्थानी लोकांच्या तडाख्यातून आपला बचाव करण्यासाठी त्यांना संस्थानातून परागंदा व्हावे लागले होते. असे झाले, तरी लठ्ठ्यांच्या मनातील शाहू महाराजांविषयी आदरभावना नष्ट झाली नव्हती. तसेच त्यांचे बहुजनाच्या उद्धाराच्या चळवळीतील कार्य सातत्याने निष्ठेने चालूच राहिले होते.

कालांतराने महाराजांच्या ध्यानात आले की, लठ्ठ्यांना आपल्या राज्यात नाहक मनस्ताप सहन करावा लागला, तेव्हा त्यांनी त्यांच्याकडे 'बिनशर्त माफीपत्र' पाठवून त्यांची माफी मागितली. आपल्या चुकीबद्दल निर्मळ पश्चात्ताप व्यक्त करून खुल्या दिलाने लठ्ठ्यांची माफी मागणाऱ्या या राजाचे एक आगळे दर्शन हे पत्र घडवून जाते. पत्रात लठ्ठ्यांची उदात्त विचारसरणी, कडवी देशभक्ती आणि गरीब व निराश्रित लोकांच्या साहाय्यास धावून जाण्याची वृत्ती, या गुणांचा त्यांनी मुक्तकंठाने गौरव केला आहे.

**(मराठी अनुवाद)**

छत्रपती महाराजा : कोल्हापूर

जय भवानी

हुबळी

२७ जुलै, १९२०

प्रिय श्री लठ्ठे,

तुम्ही मला निःसंकोचपणे माफ केले आहे, अशी आशा मनाशी बाळगून मी तुम्हास कोल्हापूर येथे झालेल्या त्रासाबद्दल खेद व्यक्त करतो. सोवनी, करमरकर, म्हैस्कर, चिप्रीकर, पाटील व कल्लाप्पा आणि इतरांनी माझी दिशाभूल केली. पण, तुमच्या कृतीमुळे मला माझीच लाज वाटू लागली. म्हणूनच ही निरपेक्षपणे दिलगिरी व्यक्त करीत आहे. तुम्ही माझा स्वीकार केलात व आपली मैत्री पूर्ववत राहिली, तर मी आपला उपकृत राहीन. एखादा ब्राह्मण कशा प्रकारे एखाद्या व्यक्तीची त्याच्याच नातेवाइकांसोबत किंवा मित्रांसोबत भांडणे लावून देऊ शकतो, याचेच हे उदाहरण आहे. इथून पुढे आमच्या या तथाकथित मित्रांच्या सूचनांपासून सावध राहण्याची आम्ही काळजी घेऊ व गैरसमज टाळण्याचा प्रयत्न करू.

तुमचे उदात्त व महान विचार, तुमचे जाज्वल्य देशप्रेम, देशहितासाठी सर्वस्व वाहण्याची तुमची तयारी व गोरगरिबांना मदत करण्याची तुमची कळकळ या गोष्टी लक्षात घेऊन कोणास आपल्या चुकीचा कबुलीजबाब तुम्हांस द्यावासा वाटणार नाही?

आपला,

**शाहू छत्रपती**

(श्री. मद्दण्णाकृत स्व. अण्णासाहेब लठ्ठे : जीवन व कार्य)

**मनाचा मोठेपणा दाखविणारे लठ्ठ्यांचे शाहू महाराजांना पत्र**

**२८ जुलै १९२०**

हुबळीहून शाहू महाराजांनी बेळगाव मुक्कामी असणाऱ्या अण्णासाहेब लठ्ठ्यांना जे माफीपत्र पाठविले होते, त्यास त्यांनी तत्परतेने उत्तर पाठविले. हे उत्तराचे पत्र वाचल्यानंतर लठ्ठ्यांच्या मनाची तयारी व मोठेपणा पाहून विस्मय वाटतो. या पत्रातून लठ्ठ्यांची करवीर गादीविषयीची श्रद्धा, महाराजांविषयीची आदरबुद्धी, कृतज्ञता, गतकाळातील कटू गोष्टींकडे पाहण्याची तटस्थ वृत्ती ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये नजरेत भरतात.

मूळ पत्र इंग्रजीत असून, त्याचा शोध कोल्हापूर पुरालेखागारात घेतला; पण, तेथे ते मिळू शकले नाही. म्हणून श्री. यशवंत दादा मद्दण्णा यांच्या 'स्वर्गीय अण्णासाहेब लठ्ठे : जीवन व कार्य' या पुस्तकात त्यांनी या पत्राचा दिलेला मराठी भावार्थ या ठिकाणी दिलेला आहे.

बेळगाव,

२८-७-१९२०

महाराजांच्या अनुग्रहार्थ सादर –

मला हे कबूल केले पाहिजे की, आपल्या कालच्या पत्रातील औदार्याने ओथंबलेले शब्द मला वाचवले नाहीत. मी कित्येक दिवसांपूर्वीच त्या १९१४ सालच्या दुर्दैवी घटना साफ विसरून परत त्यापूर्वीच्या सुखद घटनास्मृती तेवढ्याच तेवत ठेवाव्यात असे ठरविले होते. आपण ख्यातनाम छत्रपतींच्या घराण्याचे आज वारस आहात. या मातीनेच मला आत्यंतिक प्रक्षोभाच्या व मोहाच्या क्षणी सावरले. वस्तुतः आपण कालच्या पत्रात मला गुदमरून टाकणारी प्रेमभावना व्यक्त केली आहे. त्याची काहीच आवश्यकता नसावी. तथापि, महाराजांनी या पत्रामध्ये जो संपूर्ण विश्वास व्यक्त केला आहे, त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. त्या औदार्याला जरी मी पात्र नसलो आणि जरी तसे आपण मला लिहावे हे आवडत नसले, तरी एका गोष्टीचा मला अभिमान व आनंद वाटतो की, शेवटी माझी निष्ठा महाराजांच्या पूर्ण लक्षात आली आहे.

आपल्या पत्राचे उत्तर म्हणून मी एवढेच आपल्याला सांगू इच्छितो की, आपण ज्या प्रेमाचा वर्षाव केला आहे, त्याला पात्र ठरून आपल्या 'कोल्हापूर' गादीची मनोभावे सेवा करण्याकरिता माझी थोडीशी ताकद आहे ती मी जरूर वापरीन. १९१४ साली ज्या दुर्दैवी घटना घडल्या त्या संदर्भात माझे महाराजांशी मतभेद नव्हते किंवा त्याबद्दल मी महाराजांवर कधी टीका केली नाही, असे भासविण्याचा मी प्रयत्न करणार नाही. पण, महाराजांना मनापासून आश्वासन देऊ इच्छितो की, सर्व सुखदुःखे अढळ अशा नियमांचे निकाल असतात. म्हणून माणसाने जाज्वल्य अशा निष्ठेची कास धरावी, हे मी ठरवून टाकले आहे. मैत्रीच्या भावनेत समानतेचा भाग येतो. आपण मला मित्र मानत आहात; पण तुमच्याशी मैत्री करण्याइतपत मी मोठा समजत नाही. महाराजांना मी विनंती करतो की, केव्हाही सेवेचा हुकूम करावा. ती सेवा तितक्याच निष्ठेने महाराजांच्या चरणी रुजू होईल. हे पत्र मनामध्ये कोणताच संकोच न ठेवता लिहिले आहे.

आपला विश्वासू

**अ. बा. ल**

(श्री. मद्दण्णाकृत स्व. अण्णासाहेब लठ्ठे : जीवन व कार्य)

**शाहू महाराजांचे श्रीधरपंत टिळकांना पत्र**

**३० जुलै, १९२०**

लोकमान्य टिळकांच्या शेवटच्या आजारात शाहू महाराजांनी त्यांचे पुत्र श्रीधरपंत यांना पाठविलेले हे इतिहासप्रसिद्ध पत्र. असे पत्र उघडपणे लिहिणे म्हणजे ब्रिटिश साम्राज्य सत्तेचा आपणहून रोष ओढवून घेणे होते. पण, त्याची पर्वा न करता महाराजांनी लोकमान्यांविषयी वाटणाऱ्या अंतरीच्या प्रेमापोटी हा धोका पत्करला होता.

**छत्रपती महाराजा : कोल्हापूर**

**जय भवानी**

स्टेशन बंगला
कोल्हापूर
३०-७-२०

राजेश्री श्रीधरपंत टिळक यांसी :

सप्रेम लोभाची वृद्धी असावी ही वि.वि.

लोकमान्यांची तब्येत बिघडली आहे, असे ऐकलेपासून मनास अतिशय वाईट वाटते. त्यांची तब्येत कशी काय आहे, हे आपण रोजच्या रोज तारेने कळवावे. माझे मते त्यांनी गरम हवेत राहावे. मिरजेच्या माझ्या बंगल्यात राहावे व तेथे आल्यावर व्हेल व वॉन्लेससारख्या चतुर डॉक्टरांची मदत होईल व तब्येतीस बरे वाटेल, असे मला वाटते. मी आपणाकडे मि. तोफखाने, मि. विचारे व पोंक्षे यांना पाठविले आहे. कळावे. बहुत काय लिहिणे. लोभ करावा. ही विनंती.

**शाहू छत्रपती**
(मोडी सही)

(श्री. जयंतराव टिळक संग्रह)

**ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्ष, ब्रिटिश सरकारचे तटस्थतेचे धोरण आणि सत्यशोधक जलसे यासंबंधी विचार व्यक्त करणारे शाहू महाराजांचे मि. ॲडम यांना पत्र**

**२० ऑगस्ट, १९२०**

मुंबई सरकारचे एक राजनैतिक अधिकारी मि. ॲडम यांना शाहू महाराजांनी लिहिलेल्या पत्राची ही एक प्रत. ती ठिकठिकाणी खुद्द महाराजांनी स्वतः दुरुस्त केल्याचे दिसून येते. या सुमारास महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ शिगेला पोहोचली होती आणि तिच्या प्रेरणास्थानी असणाऱ्या महाराजांविरुद्ध ब्राह्मणी नेते व वृत्तपत्रे यांनी मोठी आक्रमक आघाडी उभारली होती. याच वेळी कौन्सिलांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली होती आणि ठिकठिकाणच्या सत्यशोधक जलशांनी धमाल उडवून दिली होती. नुकताच लो. टिळकांचा स्वर्गवास घडून आला होता. अशा घटनांनी महाराष्ट्राचे समाजकारण व राजकारण खालपासून वरपर्यंत ढवळून निघाले होते.

प्रस्तुत पत्रास ही पार्श्वभूमी लाभलेली आहे. पत्रात ब्राह्मण मंडळी ब्राह्मणेतर लोकांचा स्वाभिमान दुखावणारी कृत्ये सतत करीत असता ब्रिटिश सरकार मात्र हात बांधून स्वस्थ बसते आहे, याबद्दल महाराजांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. कदाचित व्हिक्टोरिया राणीने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्यकर्ते तसे वागत असावेत, असे उपरोधपूर्ण उद्गारही त्यांनी काढले आहेत. पत्राच्या शेवटी सत्यशोधक जलशांसंबंधी त्यांनी मांडलेले विचार महत्त्वाचे आहेत. आपला सत्यशोधक समाजाच्या जलशांशी काहीही संबंध नसला, तरी सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांचे आपण चाहते आहोत व या तत्त्वांचा प्रसार सर्वत्र व्हावा, असे आपणास वाटते, हे त्यांनी खुलेपणाने स्पष्ट केले आहे.

**(मराठी अनुवाद)**

रायबाग कॅम्प
२० ऑगस्ट १९२०

प्रिय मि. ॲडम,

मी आपणास मुंबईच्या 'संदेश'मध्ये प्रसिद्ध झालेल्या चित्राची प्रत पाठवीत आहे. या चित्रात टिळकांना श्रीकृष्णाच्या रूपात देवत्व बहाल केले आहे आणि त्यांच्यासमोर अर्जुनरूपी हिंदुस्थान दीनवाणापणे नतमस्तक झाल्याचे दाखवले आहे. सर्वांना हे माहीतच आहे की, श्रीकृष्ण व अर्जुन हे क्षत्रिय असून, सध्याचे क्षत्रिय मराठे हे त्यांचे वंशज आहेत. क्षत्रियाने ब्राह्मणापुढे लीनपणे नतमस्तक होणे, ही कल्पना म्हणजे क्षत्रिय मराठ्यांच्या भावनांचा घोर अपमान आहे. ब्राह्मणांना त्यांच्या नायकास अगदी आकाशाएवढे महान बनविले तरी कोणाची हरकत नाही. पण, अशा प्रकारे लढवय्या क्षत्रिय समाजाची अशी माकडचेष्टा त्यांनी करण्याचे कारण नाही. हे चित्र म्हणजे अनादी कालापासून वर्षानुवर्षे ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांना ज्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीत अडकवून ठेवले आहे, त्याची त्यांना जाणीव करून देण्याचा हा ब्राह्मणांचा ताजा कावेबाज प्रयत्न आहे. अशा चित्रांचा धिक्कार केला पाहिजे.

ब्रिटिशनिष्ठ प्रजाजन व मवाळवादी लोक यांच्या दृष्टीने टिळक म्हणजे भयंकर वाईट अपराध (Heinous Offences) करणारे समजले जातात. अशा टिळकांचे दैवतीकरण करणे आणि त्यांना श्रीकृष्ण बनवणे, ही श्रीकृष्णाची बदनामी आहे. येशू ख्रिस्त किंवा पैगंबर यांची भूमिका नाटकात केल्यामुळे होणाऱ्या बदनामीपेक्षा ही बदनामी फारच वाईट आहे.

टिळकांच्या अंत्ययात्रेच्या वेळी त्यांच्या पुण्या-मुंबईच्या स्वयंसेवकांकडून घडलेल्या अतिरेकी कृत्यांची माहिती सर्वांना आहेच. टिळकांप्रति श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्यांनी केवळ ब्राह्मणेतरांनाच नव्हे, तर युरोपियन सैनिकांना व स्त्रियांनासुद्धा त्यांच्या टोप्या, फेटे व हॅट काढायला लावल्या. हे सर्व एवढ्यासाठीच की, लोकांच्या मनावर ठसावे की,

हिंदुस्थानावर ब्रिटिशांचे राज्य नसून टिळकांचे राज्य आहे. एकीकडे हुबळीत त्यांच्या राजकीय परिषद होत असताना लिंगायत समाजात देव मानले गेलेले तीन नंदी तोडले व काही ब्राह्मणेतरांची दुकाने जाळली. ब्राह्मण नेहमीच बहुजन समाजावर असलेल्या त्यांच्या सामाजिक व राजकीय श्रेष्ठत्वाचा ठसा उमटवण्याची एकही संधी सोडत नाहीत, हे पाहून उच्चवर्णीय क्षत्रिय मराठा समाजाच्या मनात तीव्र क्षोभ उसळत आहे.

आमच्या कुलदैवतांच्या पूजे-अर्चेसंबंधीचा खासगी आदेश चोरून त्यांच्या 'लोकसंग्रह' पत्राने खोडसाळपणे प्रसिद्ध केला आहे. यामागे त्यांचा उद्देश केवळ भांडण उकरून काढणे आणि आम्हाला क्षती पोहोचविणे हाच आहे. ब्राह्मणेतरांना मुद्दाम त्रास देण्याच्या ब्राह्मणांच्या खोडसाळपणाबाबत सरकार मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत आहे, असे ब्राह्मणेतरांना वाटते. सरकारचे हे धोरण त्यांच्या सामाजिक व धार्मिक बाबींत हस्तक्षेप न करण्याच्या धोरणाशी सुसंगत आहे की महान सम्राज्ञी व्हिक्टोरिया हिच्या विविध समाजांत समतोल राखण्याच्या धोरणाशी धरून आहे, हे मला माहीत नाही.

नुकतेच पुण्यात गव्हर्नरसाहेबांना (?) भेटण्यास मी गेलो असता मि. मॉंटगोमेरी यांना मी जे पत्र दिले आहे, त्यात मला ज्या परिस्थितीत हा आदेश जारी करावा लागला, त्याची माहिती दिली आहे. त्याची एक प्रत या पत्रासोबत जोडत आहे. ब्राह्मण समाजाने व त्यांच्या नेत्यांनी माझ्या आदेशावर जो जोरदार हल्ला चढवला आहे, त्याच्या पार्श्वभूमीबाबत माझ्या पुण्याच्या भेटीत मी गव्हर्नरसाहेबांशी काही बोललो नाही.

मिरजेच्या राजेसाहेबांनी एकाऐवजी दोन सद्‌गुरू निर्माण केले आणि त्यांचा आश्रित वर्ग प्रत्येक मराठ्यास, अगदी मराठा राजांनाही, शूद्र लेखतो. शूद्र म्हणजे हीन कुळात जन्मलेले, कोणतीही प्रतिष्ठा नसलेले, केवळ ब्राह्मणांची सेवा करण्यासाठी जन्मलेले लोक असा त्याचा अर्थ आहे. यामुळे मराठ्यांच्या भावना नक्कीच दुखावल्या जातात. परंतु याबाबत मराठे अथवा त्यांचे राजे यांपैकी कोणीच ब्रिटिश सरकारकडे तक्रार करीत नाहीत. आम्ही मि. मॉंटगोमेरीशी झालेल्या मुलाखतीच्या वेळी त्यांना दिलेले पत्र कृपया आपण वाचावे. कारण, मला हे गव्हर्नरसाहेबांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, आमच्या देवघरातील देवांच्या पूजे-अर्चेसंबंधी आम्ही काढलेल्या खासगी हुकुमावर ब्राह्मण कसे रान उठवत आहेत, हे अत्यंत निषेधार्ह आहे. हे आदेश आमच्या स्टेट गॅझेटमध्ये छापलेले नाहीत. ते आमच्या खासगी खात्याच्या धार्मिक विभागापुरते मर्यादित होते.

अशा प्रकारे ब्राह्मण लोक ब्राह्मणेतरांच्या भावनांचा उर्मटपणे उपहास करत असता ब्राह्मणांनीच रचलेल्या ग्रंथांत ब्राह्मणांच्या उत्पत्तीविषयी टिप्पणी करून ब्राह्मणेतरांनी त्याचे प्रत्युत्तर केले, तर त्यात अनैसर्गिक असे काय आहे? हे सरळच दिसून येते की, ब्राह्मणांच्या या कावेबाज युक्त्यांमुळे ब्राह्मणेतरांची अस्मिता दुखावली जाते. तेव्हा त्यांच्या मनात सुडाची भावना वाढीस लागल्यास नवल ते काय? तथापि, ही गोष्ट इष्ट नाही. दोहोंपैकी कोणाही पक्षाला औचित्याची सीमा पार करू देता कामा नये.

सत्यसमाज जलशांमुळे ब्राह्मण माझा द्वेष करू लागले आहेत. त्या जलशांशी माझा काही संबंध नाही. पण, त्यांची तत्त्वे मला आवडतात. आणि त्या तत्त्वांचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे, अशी माझी इच्छा आहे. ब्राह्मणांना हे जलशे अश्लील वाटतात; पण अशा अश्लील गोष्टी त्यांच्या पुराणांतून व कीर्तनांतून रोजच शिकवल्या जातात. मला गव्हर्नरसाहेबांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, अशा अश्लील गोष्टी धर्माच्या नावाखाली ब्राह्मण शिकवतात आणि जर त्या पुराणांत व कीर्तनांत चालत असतील, तर जलशांत त्या चालण्याला काय हरकत आहे? निदान त्यांच्या धर्मातील बीभत्सपणा लोकांना तरी कळून चुकेल! अर्थात, मी हे मान्य करतो की, जलशावाल्यांना माझी पूर्ण सहानुभूती आहे. होऊ घातलेल्या निवडणुकांत सत्यशोधक जलसेवाले ब्राह्मणेतरांना मदत करीत आहेत; जसे कीर्तनकार ब्राह्मणांसाठी करीत असतात.

कृपया, आपण हे पत्र गव्हर्नरसाहेबांना दाखवावे ही विनंती.

आपला,

**शाहू छत्रपती**

(कोल्हापूर पुरालेखागार, शाहू दप्तर, कागद क्र. १२३१४)

**निवडणूक लढवून कौन्सिलात जा**

**१० सप्टेंबर १९२०**

नरसिंगपूरचे वतनदार पाटील लक्ष्मण रामचंद्र ऊर्फ बाळा पाटील यांना शाहू महाराजांचे पत्र. मॉंटफर्ड सुधारणांच्या पार्श्वभूमीवर कायदेमंडळाच्या निवडणुका लढवून खालसा मुलखातील बहुजन समाजातील पुढाऱ्यांनी त्याचा लाभ उठवावा आणि लोकसेवेची संधी साधावी, यासाठी महाराजांनी महाराष्ट्रात मोठी आघाडी उघडली होती. प्रस्तुत पत्रात बाळा पाटलांनी मुंबई कौन्सिलची निवडणूक लढवावी, असे महाराज त्यांना आग्रहाने लिहितात. खालसा मुलखातील मराठा पुढाऱ्यांशी महाराजांचे किती जिव्हाळ्याचे संबंध होते, यावर हे पत्र प्रकाश टाकते.

**छत्रपती महाराजा : कोल्हापूर**

जय भवानी

स्टेशन बंगला कोल्हापूर

ता. १०-९-२० इ.

**श्री**

राजमान्य राजे श्री लक्ष्मण रामचंद्र ऊर्फ बाळा पाटील

राहणार नरसिंगपूर ता. वाळवे यांसी :-
सप्रेम लोभाची वृद्धी असावी ही वि. वि.
तुमच्यासारख्या लोकांनी या वेळी स्वार्थत्याग करून लोकसेवा केली पाहिजे. तुम्ही वतनदार पाटील असून शेतकरी आहात व तुम्ही स्वतः घरी शेतकी केली आहे. सबब आपण स्वार्थत्याग करून इलेक्शनला उभे राहिले पाहिजे. तुम्ही आज बरीच वर्षे लोकल बोर्डचे मेंबर या नात्याने सार्वजनिक काम करीत असल्याने कौन्सिलमध्ये निवडून येण्यास विशेष लायक आहा, तेव्हा लोकसेवा करण्याचा हा जो प्रसंग आला आहे, तो टाळता उपयोगी नाही. कळावे. लोभाची वृद्धी असावी ही विनंती.

**शाहू छत्रपती**
(मोडी सही)

( श्री. विजय सुरवाडे संग्रह)

## महाराजांचा इंदुमती राणीसाहेबांस उपदेश

१ ऑक्टोबर १९२०

शाहू महाराजांनी आपली धाकटी स्नुषा, इंदुमती राणीसाहेब, यांना पुणे मुक्कामाहून पाठविलेले हे एक दुर्मिळ पत्र. युवराज प्रिन्स शिवाजी महाराजांचे १९१८ मध्ये अपघाती निधन झाल्यावर महाराजांवर दुःखाचा डोंगरच कोसळला. त्यातून सावरून महाराजांनी आपल्या तरुण विधवा सुनेस आपल्या मुलीप्रमाणे वाढविले. शिक्षण दिले. संस्कार घडवले. एक सुसंस्कारित आदर्श स्त्री व स्वावलंबी व कणखर व्यक्ती म्हणून इंदुमतीदेवींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, म्हणून महाराजांनी जातीने हर प्रयत्न केले. आपण कोल्हापूरच्या बाहेर गेल्यावर मागे आपल्या सुनेने राजपरिवाराशी कसे वागावे, याविषयी बारीकसारीक सूचना महाराजांनी या पत्रात लिहिल्या आहेत. या पत्रातून महाराजांच्या पित्याच्या हृदयाचे एक हळुवार दर्शन घडून जाते. या वेळी इंदुमतीदेवींचे वय अवघे १४ वर्षांचे होते.

छत्रपती महाराजा
कोल्हापूर
जय भवानी

कोल्हापूर लॉज,
पुणे
१-१०-२०

चि. इंदुमती राणीसाहेब यांसी सप्रेम लोभाची वृद्धी असावी. एक दिवस रायबागेस राहून आज सकाळी पुण्यास आलो. येथे २/४ दिवस काम आहे. बहुतेक आज चि. सौ. संपन्न ताराबाईराणीसाहेब महाराज आपल्या सासूस भेटण्यास रुकडीस जातील. रोजचे रोज सदूला रुकडीस पाठवून सासूबाईंचा समाचार आणवीत जावा. त्यांना ताप येत असल्यास, तब्येतीस बरे वाटत नसल्यास रोज सकाळी ६ वाजता रुकडीस जाऊन ९ वाजता परत यावे. अभ्यास चुकवू नये. सबंध सोनतळीस तुझ्याशिवाय कोणीच नाही. सर्व जोखीम तुजवर आहे. मामाही नाहीत व सौ. सेनापती अक्कासाहेब (सेनापती साहेबांचे कुटुंब) ही नाहीत.
सौ. सेनापती अक्कासाहेबांस व मामास सासूप्रमाणे मानले पाहिजे, अशी इच्छा आहे. त्यांनी धमकाविले तरी तू धमकावून घेतले पाहिजे, असे मी तुला नेहमी सांगत आहे व तूही त्याप्रमाणे वागत आहेस, याबद्दल मला आनंद वाटत आहे. अशीच तुला परमेश्वर सद्बुद्धी देवो व हल्ली तू माझे आज्ञेत वागत आहेस त्यापेक्षा अधिक आज्ञेत वागण्याची बुद्धी देवो. सौ. सेनापती अक्कासाहेब व मामा यांना तुझ्या खुशालीचे पत्र शेडबाळास लिहीत जा. घोड्यावर बसताना अगर गाडीत बसताना दंगा करून कोणास पाडू नको. जेवतेवेळी सर्व मुलींना बरोबर घेऊन जेवीत जा. सर्व मुलींनी चहा घेतल्यानंतर तू चहा घेत जा. जेवतेवेळी सर्व मुलींचा समाचार घेत जा. सर्व मुलींनी व नोकर लोकांनी तुझ्यावर प्रेम करावे, अशा रीतीने त्यांना वागवीत जा....
कळावे सप्रेम लोभाची वृद्धी असावी.

**शाहू छत्रपती**
(मोडी सही)

(श्री शहाजी छत्रपती म्युझियम, कोल्हापूर)

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे' या पुस्तकातून)**



ख़त का ये जवाब आया कि क़ासिद गया जी से
सर एक तरफ़ लोटे है और एक तरफ़ धड़
-वलीउल्लाह मुहिब

# ‘नाथ हा माझा’

कांचन घाणेकर



*कांचन घाणेकर आणि काशिनाथ घाणेकर यांची प्रेमकहाणी जगावेगळी. काशिनाथ घाणेकरांना समर्पित झालेल्या कांचनताईंनी काशिनाथ घाणेकरांचं लिहिलेलं चरित्र 'नाथ हा माझा' खूप गाजलं. या चरित्रात काशिनाथ घाणेकरांना मान्यवरांनी लिहिलेली पत्रे, स्वतः कांचनताईंनी लिहिलेली पत्रे, काशिनाथ यांनी कांचनताईंना आणि इतरांना लिहिलेली पत्रं आहेत. काशिनाथ यांचं निधन झाल्यानंतर दोन वर्षांनी कांचनताईंनी त्यांना लिहिलेलं पत्र या चरित्राच्या शेवटी उद्‌धृत केलं आहे. कोणत्याही सहृदय माणसाच्या मनाला पीळ पाडणारं आणि काशिनाथ घाणेकरांविषयी त्यांच्या समर्पित, अत्युत्कट भावना व्यक्त करणारं...*

॥ श्री ॥

२ मार्च, १९८८

माझेच प्रिय कॅश,

दोन वर्षं झाली तुम्हाला जाऊन. तुम्ही बऱ्याच दिवसांसाठी बाहेरगावी निघालात की, तुम्हाला पत्रं लिहायचं असं आपलं ठरलेलं असायचं. मला पत्र लिहायचा कंटाळा असूनही मी आज तुम्हाला पत्र लिहायला घेतलं आहे. कारण तुमच्या माघारी काय काय घडलं हे वाचायला तुम्हालाही उत्सुकता असणार. खरं म्हणजे पत्ता काय लिहावा म्हणून खोळंबले होते. आणि मग लक्षात आलं अरे, नुसतं डॉ. काशिनाथ घाणेकर असं लिहिलं तरी ते पत्र तुमच्यापर्यंत पोहोचेल.

तुमची ती बातमी २ मार्च १९८६ रोजीची. पण तुम्हाला माहीत आहे का तुमचा देह मुंबईत प्रभादेवीला पोहोचला ३ मार्च रोजी– दुपारी सत्तावीस तासांनी. एरवी तुमची वाट पाहण्यात मी वर्षांनुवर्षं घालविली. पण तुमच्या प्रतीक्षेचा हा दीड दिवस आणि एक रात्र युगायुगासारखे भासले. आत्तीनं तर तुम्हाला विमानानंच आणायला सांगितले होते. पण त्या सोपस्कारापेक्षा ॲम्ब्युलन्सनं तुम्ही लवकर याल, असं सर्वांना वाटलं. ॲम्ब्युलन्समुळे तुमची वैद्यकीय व्यवसायाशी अखेरपर्यंत साथ राहिली. कायद्याच्या चौकटीतून बाहेर पडायलाच तुम्हाला त्या दिवशी संध्याकाळ झाली. तुम्ही स्वतः तिथे हजर असतात आणि तुम्हाला कुणी असं ताटकळत ठेवलं असतं तर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत तुम्ही सर्वांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडलं असतं. तुमच्या आत्म्यानं स्वतंत्र झाल्याचा आनंद भोगला; पण तुमच्या नश्वर देहाला किती यातना भोगाव्या लागल्या, याची तुम्हाला कल्पना तरी आहे का?

धर्माचा भाऊ म्हणून श्री. दाजी भाटवडेकर यांनी दिवसभराच्या धडपडीनंतर तुमचा देह ताब्यात घेतला. पण मुंबईपर्यंत तुमच्या देहाला साथ करण्याचं मानसिक बळ त्यांच्यामध्ये राहिलं नाही आणि त्यांनी अर्ध्या वाटेमधूनच तुमच्या ॲम्ब्युलन्समधून उतरून लालित्य संस्थेच्या बसचा आसरा घेतला. त्यांचे ॲम्ब्युलन्समध्ये राहिलेले सामान मात्र तुम्हालाच आणावे लागले. दाजींना ते आपले सामान प्रभादेवीला येऊन गिरगावात आपल्या घरी घेऊन जाणंही शक्य नव्हतं, इतका त्यांच्यावर सगळा ताण पडला होता. म्हणून दोनदा त्यांनी फोन करून *(आपल्याकडे)* 'त्यांचे सामान तेवढे कुणाकरवी तरी पाठवून देता का' असे विचारले. पण डॉक्टरांच्या दुखवट्यामुळे आम्हा कुणाचीच मनःस्थिती ठीक नाही, तरी तुमचे सामान तुम्हालाच न्यावे लागेल, असे जास्तीत जास्त नम्र आवाजात तारू व नीलमनं दाजींना सांगितलं आणि त्यांचं सामान त्यांनीच नेण्याची व्यवस्था करावी अशी कळवळून विनंती केली. दाजींनी तिसऱ्यांदा फोन केला नाही हे बरं झालं. नाहीतर फटकळ तारूकडून त्यांची फट म्हणता ब्रह्महत्या घडली असती. बिचाऱ्या दाजींना केवळ सामान नेण्यासाठी गिरगावातून प्रभादेवीला यावं लागलं.

तुमची बातमी समजल्यावर नाशिकहून घाणेकर मंडळी, कोल्हापूरहून मदन फोन करून विचारीत होते की, आम्ही अमरावतीला जाऊन डॉक्टरांना आणू का? पण ही मंडळी अमरावतीला जाऊन मग तिथून त्यांनी तुम्हाला आणायचं म्हणजे आणखी दीड दिवस गेला असता. शिवाय ज्या 'ललित्य'नं तुम्हाला जपून नेलं होतं तेच तुम्हाला तसंच जपून परत आणतील, याची खात्री होती.

तुम्ही ज्यांची सदैव आस्था बाळगली त्या पडद्यामागच्या कामगारांनी मात्र तुम्हाला सोबत करून घरी आणलं. तुम्हाला पाहण्यासाठी किती गर्दी लोकांनी केली. मला तर आपल्या लग्नाच्या वेळेची आठवण झाली. घरात तशीच तुडुंब गर्दी होती. तुमच्या एकसष्ठीला असं सर्वांना बोलवायचं ठरवलं होतं. पण तुमची नेहमीची घाई नडली आणि आधीच सर्वांना यावं लागलं. तुमच्या अचेतन देहालाही सामोरं जाताना मंगळसूत्र व कुंकू याशिवाय जाण्याचं मनाला धाडस होत नव्हतं.

पण तुम्हाला बघून मला किती धक्का बसला म्हणून सांगू? त्या धक्क्यानं मला रडूही फुटत नव्हतं. तुमच्या देखण्या राजसरूपाचं काय होऊन बसलं होतं? माझी मामी तर विचारीत

होती म्हणे की, हे नक्की डॉक्टरच आहेत ना? आणखी दुसऱ्या कुणाला तरी आणलेलं नाही ना? इतका तुमचा चेहरा बदलून गेला होता. तुमच्या मुखी गंगोदक घालण्यासाठी रेश्माला जेव्हा तुमच्याजवळ आणलं तेव्हा तिनंसुद्धा तुम्हाला ओळखलं नाही.

दिल्लीहून विठ्ठलराव गाडगीळ, वसंत साठे, पी. नरसिंह राव इत्यादींनी प्रत्यक्ष अथवा संदेशाद्वारा तुम्हाला श्रद्धांजली वाहिली, तर तुमच्या आवडत्या सुशीलकुमार शिंदेंनी प्रत्यक्ष येऊन तुमची शेवटची भेट घेतली. मला विशेष वाटले ते ज्यांचे दर्शन दुर्मिळ अशा ज्येष्ठ साहित्यिक विश्राम बेडेकरांनीही येऊन तुम्हाला डोळे भरून पाहून घेतले. सौ. इरावतीबाईंनी तर आपले पती श्री. माधव भिडे यांच्यासह येऊन तुम्हाला श्रद्धांजली वाहिली. चोवीस वर्षांच्या अखंड सहवासानंतर तुमच्यापासून विभक्त झालेल्या इरावतीबाईंना एक परकी स्त्री म्हणून तुमच्या देहाजवळ बसताना काय वाटले असेल? कुठलीही कटुता न ठेवता त्या आल्या, हे पाहून सर्वच भारावले.

दौऱ्याची बस बिघडल्यावर कितीदा तरी तुम्ही नाटकाचे सामान वाहून नेणाऱ्या ट्रकने प्रवास केला आहे. तुमच्या अनंताच्या प्रवासासाठी बॅकस्टेजच्या गफूरबाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कुठलीही अपेक्षा न ठेवता दारात ट्रक आणून उभा केला, तर शिवाजी मंदिरमधील वृंदावनचे दादा नायक यांनी तो फुलांनी सुशोभित करून दिला. सर्व घाणेकर बंधूंनी तर तुमच्याइतकीच माझ्यावरही मायेची सावली धरली. त्या सर्वांनी सगळीच जबाबदारी उचलली. मुलासारख्या असणाऱ्या लहान भावाला खांदा द्यावा लागणे, यासारखे भयानक दुःख त्या सर्वांनी कसे पचविले ते त्यांचे त्यांनाच माहीत, पण घाणेकर बंधू सर्वच जबाबदारी उचलताहेत हे कळल्यावर नाट्यव्यावसायिकांनी घेतलेल्या शोकसभेचे वर्तमानपत्रातील जाहिरातीचे बिल तब्बल वर्षाने त्यांच्याकडे पाठविण्यात आले. आणि पुन्हा 'चुकून' ते बिल पाठविण्यात आल्याबद्दल दिलगिरीही व्यक्त करण्यात आली. मला माहीत आहे की, तुम्हाला कुणाचे पैसे देणे बाकी ठेवलेलं आवडत नाही. तुम्ही कुणाचे तसे देणे ठेवलेही नव्हते. फक्त प्रकाश फोटो-दादारचे उदय मिटवाबकर यांनी मात्र, ''डॉक्टर जाऊन आमचे किती नुकसान झाले आहे हे तुम्हाला कळायचे नाही.'' असे म्हणत त्यांचे फोटो-बिलाचे पैसे घेण्याचे नाकारले. तर तुमचे प्रिय जॉकी चव्हाण आणि त्यांचे चिरंजीव चंदू चव्हाण हे मात्र तुम्ही त्यांना दिलेले पैसे मी त्याच वेळेला मागीन असे वाटून सांत्वनाचे दोन शब्द सांगण्यासाठीही त्यांनी मला भेटण्याचे टाळले.

सर्वांत दुःख वाटतंय तुमच्याबरोबर काम करणाऱ्या छोट्या कलावंतांचं, जे डॉ. काशिनाथ घाणेकर नाटकात आहेत म्हणजे आपला 'हाऊसफुल्ल' दौरा होणार आणि आपण चांगली मिळकत घेऊन घरी जाणार या आनंदात होते, त्यांचा मात्र फार मोठा अपेक्षाभंग झाला असणार. 'ललित्य' या संस्थेचेही दौरा रद्द झाल्यामुळे नुकसान झालेच. आजवर तुमच्यामुळे काही नाट्य संस्थांचे आधीमधी नुकसान झाले होते. पण त्याच्या चौपट तुम्ही त्यांना मिळवूनही दिले. पण आता...? तुम्ही ज्या ज्या संस्थांमध्ये पाऊल ठेवले, त्या त्या संस्था यशाच्या शिखरावर पोहोचल्या आणि आर्थिकदृष्ट्या मजबूतही झाल्या. अपवाद फक्त 'ललित्य–' कुठलाही नियम किंवा सिद्धान्त अपवादानेच सिद्ध होतो. तुम्हाला येथवर आणण्याचा सर्व खर्च किती झाला माहीत आहे ?३००० रुपये. आणि तुम्ही चारुकाकांबरोबर नेमके तेवढेच पैसे पाठविले होते. आपला एवढाही खर्च निर्मात्याला करावा लागू नये, असं तर तुम्हाला वाटत नव्हतं ना? मी तेच पैसे डिसा यांना देणार होते. पण मघाशीच सांगितलं त्याप्रमाणे सगळ्या घाणेकर बंधूंनी ती सगळी जबाबदारी उचलली. म्हणून मी आता ते तुम्ही पाठविलेले पैसे आणि तुमच्या वडिलांनी तुमच्या नावे पोस्टात ठेवलेले तेवढेच पैसे असे दोन्ही मिळून पैसे रेश्माच्या नावे ठेवले आहेत.

सुशीलकुमार शिंदे, सूर्यकांत जोग अशांसारखी उच्च सरकारी पातळीवरील मंडळी हजर असूनही केवळ एक डेथ सर्टिफिकेटचा कागदाचा तुकडा नसल्यामुळे मंत्राग्नीसाठी तुम्हाला ताटकळावं लागलं आणि श्रद्धांजलीची भाषणं करायची नाहीत असं तुम्ही सांगूनही ठेवलं असलं तरी परवानगी मिळेपर्यंत वेळ काढण्यासाठी नाइलाजानं श्रद्धांजलीची सभा घ्यावी लागली.

''मला आयुष्यभर शिव्या घालणाऱ्यांनी, मी मेल्यावर, मी फार चांगला होतो हे गळा काढून सांगावं, हे मला अजिबात नको.'' असं तुम्ही म्हणायचे. पण सगळीच माणसं तशी नाहीत हं. अगदी आपल्या रक्ताचं कुणी तरी जावं तशी मंडळी तळमळत होती, हळहळत होती. तुमच्याशी फारशी जवळीक नसलेल्या निळू फुले यांची प्रतिक्रिया खूपच बोलकी होती. ते म्हणाले–

''हा माणूस जिवंत होता तेव्हा आम्हाला सतत त्याच्याबद्दल काळजी वाटायची. वाटायचं या कलंदर माणसाचं कसं होणार? पण आज मात्र कसलीच चिंता वाटत नाही. वाटतंय सारं काही शांत झालंय.''

तुमच्या इच्छेप्रमाणे एकही गोष्ट घडली नाही. तुम्हाला नेत्रदान करायचे होते; पण तुम्ही अमरावतीमध्ये आणि मी मुंबईत; काय करू शकणार होते? आता माझे नेत्रदान करून मी ती उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करणार आहे. तुमची इच्छा होती तरी तुम्ही दिलेल्या परवानगीनुसार मी तुमचा देह मेडिकल कॉलेजला देऊ दिला नाही– आधीच तुमच्या शरीराची इतकी विटंबना झाली होती, त्यात पुन्हा ही चिरफाड करण्याची कल्पना मला असह्य होत होती. तुम्हाला तुमचा अंत्यसंस्कार विद्युतदाहिनीत करून हवा होता; पण गेली कित्येक महिने ती विद्युतदाहिनी बंदच आहे. आपल्या भाऊसाहेबांच्याकडून बाँड लिहून घेतल्यावरच पारंपरिक पद्धतीनं तुमचा अंतिम संस्कार करण्याची परवानगी मिळाली. तुमच्या सांगण्याप्रमाणे तेराव्या दिवसाच्या जेवणावळी घातल्या नाहीत. तेच पैसे वरळीच्या अंध मुलांच्या आनंद संस्थेला दिले. हे ऐकून मात्र तुम्हाला नक्कीच समाधान वाटलं असणार.

'लालित्य'संस्थेचे रवींद्र डिसा व आशू यांना मी भेटायला खूप आतुर होते. कारण अमरावतीला प्रत्यक्ष काय घडले ते ऐकायला मी

उत्सुक होते. पण वाटेत खूप उशीर झाल्यामुळे फक्त दाजी तेवढे नाशिकला उतरून मुंबईला आले आणि दौऱ्याची बस तिथूनच पुण्याला गेली. पुढे दोन दिवसांनी डिसा व आशू भेटायला आले. तोवर इथून तिथून सर्व माहिती मिळाली होतीच. डेथ सर्टिफिकेट अमरावतीहूनच येताना का आणले नाही असे विचारता त्या दोघांनी सांगितले की, अजूनपर्यंत त्यांच्या घरी यापूर्वी कुणाचाही मृत्यू न झाल्यामुळे अशा वेळी डेथ सर्टिफिकेट लागते याची त्यांना माहिती नव्हती. डिसा व आशू यांनी तुमची फार हेळसांड केली, असा पुण्याच्या श्रद्धांजली सभेतही त्यांच्यावर आरोप झाला. पण अशी हेळसांड झाली असती तर तुम्ही तिथे क्षणभरही थांबला नसता, याची मला खात्री आहे. डिसांनी वेळोवेळी केलेली तुमची सेवा तुम्ही मला सांगितलेली होती.

पण एक विचारू, प्रकृती बिघडल्याचे तुमचे तुम्हालाही लक्षात आले नाही का? कारण अशोक समेळ तर सांगत होते की एकदा रत्नागिरीला असताना रात्री दोन वाजता तुम्हाला अस्वस्थ वाटायला लागले होते तेव्हा तुम्ही समेळना उठवून, त्यांना बरोबर घेऊन तेवढ्या रात्री डॉक्टरकडे गेला होतात; मग अमरावतीमध्येच तुम्हाला डॉक्टरकडे जावं, असं का नाही वाटलं? की काळसर्पानं तुम्हाला आपल्या विळख्यातून हालचालच करू दिली नाही?

अमरावतीला पोहोचेपर्यंत तुम्ही डायरियानं हैराण झाला होतात. पण विदर्भाचा दौरा तुम्ही बऱ्याच वर्षांनी करत होतात. काशिनाथ घाणेकरमुळे तो दौरा रद्द झाला असा समज होऊ नये म्हणून तुम्ही त्या परिस्थितीमध्येही रंगभूमीवर उभे राहिला होतात. हा सगळा दौरा दारू व सिगारेट याशिवाय करण्याचा तुमचा निश्चय झाला होता. किती उशिरा घेतलात हा निर्णय. तुमचा आवाज बसला होता. त्यामुळे वाक्यं कळत नाहीत, असा प्रेक्षकांनी गिल्ला करताच, ब्राँकायटीस, सिगारेट यांनी जर्जर झालेली तुमची फुफ्फुसं आणि हृदयही हा ताण सोसू शकणार नाहीत, हे माहीत असूनही तुम्ही तर सरळ सरळ हाराकिरी केलीत. न पेलवणारा टिपेचा सूर लावलात. प्रेक्षक शांत झाले. पण मृत्यूचा धोका माहीत असूनही तुम्ही हे वीर मरण पत्करलं.

तुमच्यावर तुमच्या चाहत्यांनी केलेल्या अमर्याद प्रेमाची, तुमच्या अफाट लोकप्रियतेची किंमत तुम्हाला कधी ना कधी तरी द्यावी लागली असतीच. पण ती इतकी जबर, आयुष्याचे मोल देऊन द्यावी लागेल, असं वाटलं नव्हतं. रणजित देसाई म्हणाले, ''डॉक्टरला खऱ्या कलावंताचं मरण आलं. सर्वांना हवाहवासा असताना तो गेला. त्याच्या आयुष्याचं सोनं झालं. एखाद्या नटसम्राटासारखा त्याला मृत्यू आला.''

''काशिनाथ घाणेकर लिव्हर खराब होऊन मेला, असं कुणाला ऐकायला मिळणार नाही.'' असे तुम्ही अहंकाराने गर्जायचे. पण तो अहंकार अस्थानी ठरला नाही. तुमचे शब्द तुम्ही खरे करून दाखविलेत. अमरावतीचा आदल्या दिवशीचा प्रयोग हाऊसफुल्ल होता. दुसऱ्या दिवशीचा नागपूरचा प्रयोग हाऊसफुल्ल होता. नागपूरच्या प्रवासाला जाण्यासाठी सामानाची आवराआवर करून, स्नान वगैरे करून शुचिर्भूत होऊन तुम्ही कपडे बदलत असताना, अचानक न परतीच्या वाटेला निघून गेलात. तुमच्या पोस्टमार्टमचा रिपोर्ट होता–'लंग्ज कंजेस्टेड.'

वरळीच्या आपल्या बिल्डिंगमधील डॉ. जोशी यांनी त्याची तुम्हाला कल्पना दिली होती. पण आम्हाला कुणाला कळू न देता केवळ ब्लडप्रेशर नॉर्मल आहे, एवढ्या निदानावर तुम्ही दौऱ्यावर गेलात. गेल्या तीन वर्षांत ज्याची तुम्हाला फारशी निकड भासली नव्हती ते जाण्याच्या आदल्या दिवशीच व्हावे, असे तुम्हाला तीव्रतेने वाटत होते. तुम्ही जयूचा मेहुणा शरद टिंबले यांच्या मागे लागला होतात की, ब्लॉक कांचनच्या नावावर करू या. ब्लॉक ट्रान्सफरचे काम इतक्या जलद होऊ शकत नाही हे कळल्यावर मात्र तुमचा नाइलाज झाला. पण 'गेल्या तीन वर्षांत तुमची व इरावतीबाईंच्या नावाची न बदललेली दारावरची पाटी बदलून त्या ठिकाणी आपल्या व कांचनच्या नावाची पाटी लागली पाहिजे, तेही तुम्ही दौऱ्यावरून परत येण्यापूर्वी 'असा दम शाली आणि तिच्या नवऱ्याला– शरदला– भरून गेला होतात. आणखी एक विचित्र कामगिरी त्या दोघांवर सोपविताना तुम्ही त्यांना सांगितले होतं की, बेडरूमच्या कॉटवर तुम्ही निजलेले सर्वांना दिसता, म्हणून बेडरूमला काळा रंग लावून घ्यायला तुम्ही त्यांना सांगितले होते. 'ही कसली विचित्र गोष्ट' असे म्हणत वरळीच्या मंडळींनी केवळ दारावरची पाटी बदलली.

रवींद्र डिसा व आशू यांनी तुमची हेळसांड केली याबद्दल सर्वांत अधिक आकांडतांडव किरण भोगले यांनी केले असे ऐकले. तुम्ही त्यांची वाट पाहताय तेव्हा भेटण्याचे तर राहोच; पण साधे फोन करून काही कळविण्याचे सौजन्यही भोगले यांनी दाखविले नाही. तुम्हाला वाचायला दिलेले त्यांचे स्क्रिप्ट मी चारुकाकांच्याकडून परत पाठविले तेव्हा किरण भोगले यांनी चारुकाका यांना सांगितले की, डॉक्टरना त्या नाटकात भूमिका देण्याचा आमचा विचारच नव्हता. मग नाटकाचे स्क्रिप्ट तरी किरण भोगले यांनी तुम्हाला कशाला दिले होते? नुसते वाचायला दिले होते का? बाकी सर्व तुम्ही तुमच्या कल्पनेनेच ठरवून मला सांगितले होते का? आणि किरण भोगले यांच्या फोनची तरी प्रतीक्षा तुम्ही का करीत होतात?

तुमच्या माघारी मात्र मच्छिंद्र कांबळीसारखी तुमची नव्याने जोडलेली मित्रमंडळी जमेल त्या वेळी माझी आठवणीने चौकशी करतात, तर तुम्ही असेपर्यंत 'अहो वहिनी' म्हणणारी काही अति उत्साही मंडळी आता नुसती 'अगं, कांचनताई' म्हणायला लागली आहेत. डॉक्टर निळूभाऊ आपटे तर डॉक्टर आणि तुमचे मित्र या दुहेरी नात्यानं आमच्याकडे लक्ष पुरवितात, तर बी. वाय. पाध्ये आणि त्यांच्या कुटुंबीयांनी जुने ऋणानुबंध असल्यासारखे अगत्य आपुलकी दाखविली. दिलीप पाध्ये तर तुमचा चाहता आणि भक्तही. तुमच्या स्मृतीमध्ये तो अजून जगतोय. आपल्या दिलीपची जागा आता त्यानं घरात घेतली आहे. तुमचा वयानं सर्वांत छोटा मित्र किशोर जाधव, आपल्या बॉसच्या *(म्हणजे तुमच्या)*

आठवणीत हरवून जातो. बाळासाहेब कुडतडकरांना तर तुम्ही 'माझ्या कांचनला अंतर देऊ नकोस,' असं सांगितलं होतं. बाळकाका आजही तो शब्द त्याच निष्ठेनं पाळतात. ते मला आपल्या मित्राची नुसती पत्नी न समजता, आपली मुलगी समजून माझं हित जपतात.

दीनानाथ नाट्यमंदिराचे तुमचे आवडते आणि तुमचे चाहते आर्टिस्ट जाधव यांनी मुंबई महानगरपालिकेत प्रयत्न करून तुमचे छायाचित्र दीनानाथ नाट्यमंदिरमध्ये लावले. खरं म्हणजे पार्ले हे सतीश दुभाषींचे; दत्ता भटांचे पण दीनानाथ मंगेशकरांच्या तैलचित्रानंतर दीनानाथ नाट्यगृहात नटाचे छायाचित्र लागण्याचा पहिला मान तुम्हाला मिळाला.

श्री. वामनराव महाडिकांनी मुंबईतील एखाद्या रस्त्याला अथवा चौकाला तुमचे नाव देण्याची कल्पना मांडली आणि आत्तीने त्यासाठी पुढाकार घेतला. मुंबईचे महापौर, पालिका आयुक्त श्री. छगन भुजबळ यांचे साहाय्य घेऊन ती कल्पना प्रत्यक्षात उतरवली. प्रभादेवीच्या रवींद्र नाट्यमंदिर आणि सिद्धिविनायकाजवळील चौकाला तुमचे नाव देण्याचे मुंबई महानगरपालिकेने मान्य केले. ''काशिनाथच्या नावाला साजेसा कार्यक्रम झाला पाहिजे.'' असा आत्तीने आग्रह धरला आणि तुम्ही गेल्यापासून बरोबर नऊ महिने बारा दिवसांनी पुन्हा एकदा तुमचे बारसे समारंभपूर्वक साजरे झाले. श्रीमान लालचंद हिराचंद यांच्यासारख्या वयोवृद्धापासून ते नव्या दमाचे कलावंत सचिन, महेश कोठारे यांच्यापर्यंत सर्वांनी कृतज्ञतापूर्वक या समारंभाला हजेरी लावली.

ही तर सगळी तुमची जवळची मंडळी होती. पण निव्वळ तुमच्यावर तुम्ही नट म्हणून प्रेम करणाऱ्यांनीही मला ओळखदेख नसतानाही खूप साहाय्य केले. रोजची शेकड्यांनी डेथ सर्टिफिकेट्स देणारी महिला ऑफिसर तुमचे डेथ सर्टिफिकेट हातात घेऊन कितीतरी वेळ रडत होती– तुमचे सौभाग्य मिरविणे हे जसे भाग्याचे होते तसेच तुमची विधवा म्हणूनही तितकाच आदर मला अनोळखी लोकांच्याकडूनही मिळतो. कमीत कमी वेळात आणि त्रास न देता माझी कामे करून दिली जातात. मी काशिनाथ घाणेकरांची पत्नी आहे, हे समजताच आजही मंडळी आसन सोडून उभी राहतात. तुमच्या अवेळी जाण्यानं हळहळतात, हळुवार होतात.

प्रभाकर पणशीकरांनी तुम्ही हयात नसतानाही तुमच्या मैत्रीचं इमान राखलं. तुमचा पहिला स्मृतिदिन भव्य रीतीनं साजरा करण्याची कल्पना मांडली. सर्व कलावंतांचा उत्स्फूर्त सहभाग राहिला. विभाकर बिवलकर, गिरीश दाबके, प्रमोद पवार, नीलम प्रभू आणि बाळासाहेब कुडतडकरांनी अथक परिश्रमांनी तुमचा जीवनपट साकार केला.

बाबांचा कार्यक्रम म्हणजे बाबा नाटकात काम करणार आणि बाबा भेटणार, असं वाटून मोठ्या उत्सुकतेनं आलेल्या रेश्माला तुम्ही कुठेच दिसला नाहीत म्हणून ती खूपच हिरमुसली आणि घरी आल्यावर बाबा नाटकात नसतील तर मला कधीही नाटकाला न्यायचं नाही, असं डोळ्यांत पाणी आणून तिनं सांगितलं. ही एका छोट्या मुलीचीच प्रतिक्रिया नव्हती, तर त्या कार्यक्रमाला आलेला प्रत्येक जण म्हणत होता की, अजून काही वर्षं तरी काशिनाथच्या भूमिका कुणी करू नयेत. कोल्हापूरच्या आपल्या बाबांच्या पत्नी सरलामावशींनी तर दुसऱ्या दिवशी मुद्दाम फोन करून मला सांगितलं की, डॉक्टरांबरोबरचं तुझं लग्न मला पसंत नव्हतं; पण काल सारं ऐकलं, पाहिले आणि वाटलं, तू एका फार मनस्वी माणसावर प्रेम केलं आहेस. मी माझे आधीचे शब्द मागे घेते. आता डॉक्टरांचा मृत्यू म्हणशील तर ती गोष्ट काही आपल्या हातातील नाही.

मोठ्या वयाची माणसं, 'मरण कल्पनेशी थांबे तर्क जाणत्याचा' असे म्हणून गप्प राहू शकतात; पण छोट्या रेश्माची कशी समजूत घालायची? तुम्ही कुठे गेलात म्हणून सांगायचे? खोपोलीला तुम्हाला सोडून आल्यापासून तुम्ही नाटकाच्या दौऱ्यावर गेला आहात असे तिला वाटत होते. पण आठ-दहा दिवसांत परत येणारे बाबा, आता कसे येत नाहीत? आपल्या मुलीला न भेटणारे हे असले कसले बाबा– असं ती विचारीत राहते. आता मात्र मी तिला सांगितलंय की, तुझे बाबा समुद्राच्या पलीकडे खूप खूप दूर कॉलेजमध्ये शिकायला गेले आहेत. तू मोठी झालीस की ते परत येणार आहेत. तुमच्यासारखेच तुमच्या रेश्मालाही म्हातारपण आवडत नाही. ती विचारते बाबा आता आहेत तसेच परत आल्यावर असतील ना? की त्यांचे केस पांढरे होतील? ते म्हातारे होतील? मी तिला सांगते आम्ही सगळे म्हातारे होऊ; पण तुझे बाबा कधीच म्हातारे होणार नाहीत.

काही जणांच्या मते तिला सर्व आत्ताच सांगून टाकावे. पण जिला खरे वडील माहीत नाहीत, जिची आई तिच्यापासून दूर आहे आणि आता तिचे बाबाही कधीच परत येणार नाहीत असं कळलं तर त्या एवढ्याशा जिवाच्या मनाची काय अवस्था होईल? किती अत्याचार करायचे तिच्यावर? थोडी मोठी झाली, समज आली की तिला आपोआप कळेलच आणि खरं सांगू तिला अज्ञानात ठेवण्यात माझाही स्वार्थ आहे. तुम्ही आता कधीच येणार नाही ही गोष्ट स्वीकारणं अजून मलाही कठीण जातंय. त्यामुळे तुम्ही कधी तरी येणार आहात, अशा समजुतीनं माझा रेश्माशी चाललेला संवाद मलाही समाधान देतो. एकाकीपणाची जाणीव थोडी तरी बोथट होते.

रेश्माचे तुटून पडल्यासारखे प्रेम करणे, माझ्यावर सत्ता गाजवणे, तिच्या सवयी तिचं मधूनच चमकावणारं एखादं वाक्य, खाण्या-जेवणाच्या सवयी, सुक्या बाजाराच्या वासानं तिनं नाक चिमटीत धरणं, हे सर्व पाहिलं की वाटतं, तिच्या शरीरात तुमच्या आत्म्यानं प्रवेश तर केला नसेल? लहान मुलं पोलिसांना घाबरतात. पण गाडीतून जाताना एखादा पोलिस पाहिला की, रेश्मा त्यांना हाक मारते, ''ओ पोलिस हवालदार, सलाम.'' तुम्हाला पोलिस खात्याचं असलेलं आकर्षण आठवून, रेश्माचं हे वागणं पाहिलं की दचकायला होतं. आत्तीनं तर तिचं नाव 'मिनी घाणेकर'

ठेवलंय. माझ्यासारखीच तीही तुम्हाला पत्र लिहायला बसते आणि मग काहीसं आठवल्यासारखं विचारते ''बाबांना इंग्लिश येतं ना? मला मराठी फक्त 'अआईई'च येतं. मग पत्र इंग्लिशमध्ये लिहिलं तर चालेल ना?'' कुणावर ती चिडली तर सांगते, ''माझे बाबा दातांचे डॉक्टर आहेत. तुमचे दातच पाडतील.'' तर मलाही 'तुझं नाव बाबांना सांगेन' म्हणून दम देते. तुमच्या खोलीत दुसऱ्या कुणी गेलेलं तिला आवडत नाही. तुमच्या कॉटवर कुणी झोपलेलं तिला पसंत नसत. बाबा आल्यावर बघून काय म्हणतील म्हणून तुमची खोली स्वच्छ करत राहते. वरळीच्या घरात बेडरूममध्ये असाल म्हणून शोधीत राहते.

तुमच्याबरोबर चिपळूणला जाणं कधी जमलं नाही. पण मध्यंतरी परशुरामभाऊ व कुमुदवहिनी यांच्याबरोबर जाण्याचा योग आला. काही कारणामुळे जाताना मी एस.टी.नं गेले होते. तुमच्याशी लग्न झाल्यावर चैत्रातील हळदीकुंकवासाठी इरावतीबाईही अशाच एस.टी.नं पुण्याहून चिपळूणला एकट्याच गेल्या होत्या, त्याची आठवण झाली. घरात ड्रायव्हर गाडी असतानाही परशुरामभाऊ स्वतः मला न्यायला भर दुपारचे एस. टी. स्टँडवर येऊन उभे होते. सासरी जायचं म्हणून खूप दडपण आलं होतं. पण तुम्ही सांगितलं होतं तसे बापूसाहेब देवमाणूस तर विद्यावहिनी आईसारख्या वाटल्या. रत्नाकरची छोटी सायली कधी येऊन चिकटली ते समजलंसुद्धा नाही. रत्नाकरचा विक्रमही आता दोन-एक वर्षांत कॉलेजला जाईल. त्या वेळी तुम्ही सांगितल्याप्रमाणे त्याला पैसे देणार आहे. तुमच्या अपेक्षेप्रमाणे आणि इच्छेप्रमाणे तो मेडिकलला जाईल असं वाटतंय. विक्रमचे पैसे तुम्हाला त्याला नव्वद साली द्यायचे होते. 'ते तू त्याला दे 'असं तुम्ही मला सांगितलं होतं. तेव्हा मी म्हणालेही होते, ''नव्वद साल किती दूर आहे. तुम्हीच ते पैसे विक्रमला द्या.'' तर त्या वेळी तुम्ही एकदम गप्प झाला होतात. त्याचं कारण आज कळतंय.

चिपळूणकरांनी मोठ्या श्रद्धापूर्वक तुमचं संभाजीच्या वेषातील तैलचित्र नव्या नाट्यगृहात विराजमान केलंय आणि हे नाट्यगृह काशिनाथ घाणेकरांच्या कल्पनेतून साकारलं आहे म्हणून अभिमानपूर्वक सांगतात. तुमच्या मित्रमंडळींनी, तुमच्या चाहत्यांनी एकत्र येऊन तुमच्या नावे ट्रस्टची स्थापना केली आहे. श्री. लालचंद हिराचंद यांनी त्याचं अध्यक्षपदही भूषविलं आहे. या ट्रस्टतर्फे दर वर्षी तुमच्यासारखे एकट्याच्या खांद्यावर सबंध नाटक पेलून नेणाऱ्या कलावंताला मानचिन्ह दिलं जाणार आहे. तुमचा अधिक ओढा लक्षात घेऊन बॅक स्टेज वर्कर्स आणि अगदी दुय्यम भूमिका करणाऱ्या कलावंतांचाही सन्मान केला जातो. या कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक मदत, त्यांच्यासाठी मोफत वैद्यकीय सेवा, कोकणामध्ये वैद्यकीय शिबिरं अशा तऱ्हेचे उपक्रम करण्याचे डॉ. रवी बापट व डॉ. निळूभाऊ आपटे यांनी ठरविलं आहे. तुमच्या नावे दिल्या जाणाऱ्या मानचिन्हांची प्रतिकृती घडविली आहे कल्पक मोहन वाघ यांनी. त्यांनीच फार पूर्वी टिपलेल्या तुमच्या देखण्या छायाचित्रावरून. चारुदत्त सरपोतदार यांचे कष्ट तर शब्दांत न मावणारे. दाजी पणशीकर, अरविंद चित्रे, तरंगिणी पणशीकर अशांसारख्या कितीतरी जणांचे कसलीही अपेक्षा नसताना केले सहाय्य या ट्रस्टला लाभत आहे.

भारतीय विद्या भवनाच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा तुम्ही कॉलेजमध्ये असताना गाजवल्या होत्या. त्याच स्पर्धेमध्ये आता उत्कृष्ट नटाचे पारितोषिक तुमच्या नावे दिले जाते. ते विजेत्याला देण्यासाठी मला बोलाविले होते. त्या समारंभाच्या निमित्तानं मी कितीतरी वर्षांनी भारतीय विद्या भवनामध्ये पाऊल ठेवलं होतं. तुमचे 'रायगड ' आणि तुम्हालाही मी प्रथम इथेच पाहिले होते. रंगपटात जाताच संभाजीच्या वेषातील तुम्ही माझ्यासमोर येणार असं वाटत होतं आणि त्यापाठोपाठ 'आता तरी ओळख झाली का? चहा घेणार का?' हे शब्दही येतील, अशी वेडी आशा वाटत होती.

तुम्हाला तुमच्या कपाटाला कुणी हात लावलेलं आवडायचं नाही. त्यामुळे तुम्ही नसताना ते उघडणं जड जात होतं. माझ्यावर केवढं तरी दडपण आल्यासारखं वाटत होतं. कपाट उघडल्यावर मला तर वाटलं होतं त्यात तुमच्या सख्यांची पत्रं असणार आणि म्हणूनच तुम्ही कपाटाला हात लावू देत नसाल. पण तिथे दुसऱ्या-तिसऱ्या कुणाचीही पत्रं नव्हती. होती ती फक्त माझी जपून ठेवलेली जुनी पत्रं. डॉ. काशिनाथ घाणेकरांच्या कपाटातील तिजोरी मात्र माझ्या अपेक्षेप्रमाणेच निघाली. त्यात होती तुमच्या वेगवेगळ्या नाटककारांनी त्यांच्या सह्या करून तुम्हाला दिलेली,तुम्ही काम केलेल्या नाटकांची पुस्तकं आणि बक्षीस मिळालेली चांदीची नटराजाची मूर्ती. आणखीही एक होतं. ते म्हणजे निरनिराळ्या ज्योतिष्यांनी लिहून दिलेले तुमच्या भविष्याचे कागद. तुम्ही म्हणाला होतात तसं जवळजवळ प्रत्येक ज्योतिष्यानं सत्तर साली तुम्हाला पुत्रयोग असल्याचं लिहून दिलं होतं. सत्तर सालीच आपलं लग्न करायचं चाललं होतं ना? पण... तसं झालं असतं तर काही वेगळं चित्र तयार झालं असतं का? बाकी मी दुसरं काही जाणत नाही. पण निदान तुमचा सहवास तरी तब्बल बारा वर्ष अधिक लाभला असता. पण तपश्चर्येशिवाय अनमोल गोष्टी कुठल्या लाभायला?

एक गोष्ट मात्र या सर्व भविष्यनिदानावरून लक्षात आली ती म्हणजे प्रत्येकानंच तुमची आयुर्मर्यादा अठ्ठावन्न वर्षांच्या आसपास वर्तवली होती. मग ही मृत्यूची टांगती तलवार घेऊनच तुम्ही वावरत होतात? आणि अठ्ठावन्नऐवजी अठ्ठ्याहत्तर वर्षं जगणार असं म्हणत राहिलात. आठ आकडा तुम्हाला अशुभ आहे असं म्हणत होतात. त्यामुळेच 'इथे ओशाळला मृत्यू' हे नाटक आपल्याला लाभलं नाही. त्या वेळीच आपण आजारी पडलो असं तुम्ही सांगत होतात. मग 'तुझे आहे तुजपाशी'ही आठ अक्षरीच आहे, हे कसं तुमच्या लक्षात आलं नाही?

तुमच्या वाटेनं तुमच्या ताईही काही महिन्यांच्या अवधीत तुमच्या पाठोपाठ निघून गेल्या. आयुष्याची संध्याकाळ भावंडांच्या सहवासात घालवायची म्हणून नायजेरिया कायमचा सोडून आलेले

परशुरामभाऊ आणि कुमुदवहिनी आपण भारतात परत कशासाठी आलो म्हणून भांबावलेले आहेत. स्वतःपेक्षा लहान वयाच्या भावाचं वर्षश्राद्ध पार पाडताना पहाडासारखे परशुरामभाऊ ढासळून गेले होते. तुम्हाला आठवतं- एकदा जेवणाच्या टेबलावर सासू-सुनांच्या भांडणाचा विषय चालला होता. तुमचं जेवण आटपून तुम्ही हॉलमध्ये सिगारेट ओढत बसला होतात. तुम्हाला ऐकू जाईल अशा आवाजात माझा भाऊ मदन म्हणाला होता, ''कांचनताई, तुमचं आपलं बरं आहे बघा, डॉक्टरनी तुम्हाला सासू वगैरे काही त्रासाची भानगड ठेवली नाही.'' हे ऐकून बसल्या जागेवरूनच तुम्ही ओरडला होतात– ''थँक्यू, थँक्यू मदन.'' पण वात्रट मदननं हळूच म्हटलेलं नंतरचं वाक्य मात्र तुम्ही ऐकलं नव्हतं. तो म्हणाला होता, ''पण नाही तरी सासू आणि नवरा या दोघांची भूमिका डॉक्टर एकटेच पार पाडत असतात.'' मदनच्या बोलण्यावर मी हसले. पण मनात मात्र म्हणाले, ''नाही रे बाबा! सासूच काय पण सवतही मला नाही.''

पण तुमच्याशी कायदेशीर फारकत घेतली असूनही, चार वर्षांच्या अवधीनंतरही इरावतीबाईंनी आता सवतीचं नातं प्रस्थापित करण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न चालविला आहे; तेही तुम्ही नसताना. तुमच्या बाबतीत इरावतीबाईंनी कधी काळी माझ्याबरोबर कौतुकास्पद भागीदारी पत्करली होती, त्याचं आज श्री. माधव भिडे यांच्या सौभाग्यवती झाल्यावरही त्यांना विस्मरण झालेलं नाही आणि म्हणूनच तुम्ही नसलात तरी तुमच्या प्रॉपर्टीमध्ये माझ्याशी भागीदारी पत्करण्याची त्यांनी तयारी चालविली आहे. त्यासाठी जरूर पडली तर त्या माझं तुमच्याशी झालेलं लग्नही बेकायदा ठरविण्याचा प्रयत्न करणार आहेत. केवळ पैशासाठी माझं लग्न बेकायदा ठरविण्याचा इरावतीबाई प्रयत्न करणार, हे ऐकून तर मी सुन्नच झाले आहे. ''इरावतीसारखी सज्जन, सुशील बाई, असं काही म्हणू शकते, करू शकते यावर माझा अजून विश्वास बसत नाही.'' असं फार मोठा धक्का बसलेली आत्ती म्हणते.

आत्तीला मी वैतागून म्हणालेही, ''तुला कायदेशीर लग्न हवं म्हणून आयुष्याची महत्त्वाची बारा वर्षं मी कापरासारखी जाळून काढली. पण इतकं करून आणि ते लग्न कायदेशीर ठरूनही आज इरावतीबाई माझं लग्न जर बेकायदा ठरवणार असतील, तर या सर्वांची जरुरीच काय होती? मग मी त्याच वेळी माझ्या डॉक्टरांच्याकडे गेले असते तर माझ्या डॉक्टरांचा मला सहवास तरी अधिक लाभला असता.''

आत्तीनं मला समजावीत सांगितलं, ''इरावती पैशांसाठी तुझे कायदेशीर लग्नही आज बेकायदा ठरवण्याची भाषा बोलते, जर तू तशीच काशिनाथबरोबर राहिली असतीस तर आज काशिनाथ नसताना इरावतीनं तुला रस्त्यावर आणलं असतं. तुझे जाहीर धिंडवडे काढले असते. तुला मानही वर करता आली नसती. पण आज तुझी मान ताठ आहे. काशिनाथची पत्नी म्हणून, त्याची एकमेव वारस म्हणून अधिकार तुझ्याजवळ आहेत. आणि मुख्य म्हणजे आभाळाएवढं मोठं काशिनाथाचं नाव तुझ्याजवळ आहे. जे आता कितीही रुपयांचे मोल दिलं तरी इरावतीला परत कधीच मिळू शकणार नाही. पैशानं इरावती तुझ्याहून अधिक श्रीमंत असेल, पण काशिनाथच्या नावाची तुझ्याजवळ असलेली श्रीमंती त्याहून अधिक आहे.'' आत्तीच्या या शब्दांनी मला खूप धीर दिला आहे. माझ्या अधिकारांसाठी लढता यावं म्हणून बळही दिलं आहे.

काय गंमत आहे नाही? कधी काळी इरावतीबाई दाता होत्या आणि मी याचक आणि आज मी दाता आणि...

तुमचा काटकसरी स्वभाव बघून मी नेहमी वैतागून म्हणायची की, ''आता जर हे पैसे खर्च करायचे नाहीत तर त्या पैशाचा उपयोग कधी व्हायचा?'' त्यावर तुम्ही म्हणायचे, ''माझ्यानंतर तुला त्या पैशांचा उपयोग होईल.'' ते ऐकून मी हसून म्हणायची, ''तुमच्यानंतर म्हणजे, माझ्या म्हातारपणी मी अंथरुणाला खिळेन त्या वेळी औषधोपचारासाठीच त्या पैशांचा मला उपयोग व्हायचा.''

कुठलीही अट न घालता इरावतीबाईंनी तुमच्यापासून घटस्फोट मागितला होता. पण आता मात्र मी एकटी आहे बघून त्या अटी घालायला लागल्या आहेत. कुठलाही संबंध नसताना. पण मला वाटतं माझीच बत्तिशी वठली असावी. कारण इरावतीबाईंच्या कोर्टकचेऱ्यातून सुटून, त्यांच्या सगळ्या भानगडी निस्तरेपर्यंत मी म्हातारी होऊन अंथरुणावर खिळलेली असेन.

माझी बायको माझ्याच पैशांवर जगली पाहिजे असं म्हणणाऱ्या एका स्वाभिमानी खऱ्या पुरुषाशी माझं लग्न झालेलं आहे, याचा मला अभिमान आहे. यापुढे तुमची पत्नी म्हणून, तुमची वारस म्हणून तुमच्या रेशमाचं संगोपन करणं, पुस्तकरूपानं तुमचं चरित्र लिहिणं, तुमचा चरित्रपट तयार करणं आणि मुंबईतील एखाद्या नाट्यगृहाला तुमचं नाव दिलेलं पाहणं, हे माझ्या आयुष्याचं ध्येय आहे. त्यासाठीच तुम्ही रक्त आणि घाम गाळून मिळविलेला पैसा खर्ची पडावा, असं वाटतं. इरावतीबाई ते ध्येय कितपत पुरं करू देतात, ते पाहायचं.

आता मात्र यापुढे मी तुम्हाला पत्र लिहिणार नाही. कारण तुम्हाला पत्र लिहायचं म्हणजे तुमच्याजवळच्या असणाऱ्या, तुम्हाला प्रिय असणाऱ्यांची कृष्णकृत्यं तुम्हाला कळवीत राहायचं आणि तुमच्या मनाला क्लेष द्यायचे. आणि मला तरी वाटतं भविष्यात याच्याशिवाय निराळं काही लिहिता येईल असं वाटत नाही. पूर्वी काही मंडळींशी तुम्ही जे वागत होतात ते पाहून मला वाईट वाटायचं. तुमचा राग यायचा. तुमचं चुकतंय असं वाटायचं. पण आता मात्र त्यांचे सर्व व्यवहार पाहिले, अनुभवले की वाटतं तुम्ही त्यांच्याशी वागत होतात तेच बरोबर होतं.

तुम्हाला सांगण्यासारखी, आवडण्यासारखी एक सुखद कोवळी घटना मात्र घडली आहे. यंदाच्या इंदूर येथे भरलेल्या नाट्यसंमेलनामध्ये त्याचा एक भाग म्हणून अनेक कर्तृत्ववान नाटककार, कलावंतांच्या नावे वृक्षारोपण केलं गेलं. प्रख्यात समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या हस्ते तुमच्या नावाचं 'गुलमोहराचं' रोपटं लावलं गेलं. या वर्षीच्या नाट्यसंमेलनाचे

अध्यक्ष कोण होते माहीत आहे? तुमचे वडीलबंधू श्री. चित्तरंजन कोल्हटकर. मला खात्री आहे तुम्ही इथे त्या वेळी असतात तर आपण नक्की त्या संमेलनाला गेलो असतो. माझी खूप दिवसांची इच्छा होती की, एकदा तुमच्याबरोबर इंदूर-देवास पाहायला जायचं. विशेषतः मांडूगड– राणी रूपमती आणि बाजबहाद्दरचा मांडूगड. तिथे शिव-पार्वती यांचं एक अवर्णनीय संकेतस्थल आहे म्हणे. ते तुमच्या संगतीनं पाहायचं होतं. ठीक आहे. आता नाही तर पुढच्या जन्मी पाहू. आपण हिंदू आहोत. आपण पुनर्जन्म घेणारच.

तुम्ही इथून गेल्यापासून परमेश्वराजवळ मी एकच प्रार्थना करते की पुढच्या जन्मी तरी आम्हाला सुरुवातीपासून एकत्र येऊ दे. दीर्घ काळ एकत्र राहू दे. एक दिवस उलटला की, आयुष्य एक दिवसानं कमी झाल्याचा आनंद होतो. तुम्ही मात्र लवकर जन्म घेऊ नका हं. नाहीतर पुन्हा तीच जीवघेणी ओढाताण आपल्या वाट्याला येईल.

मला माहीत आहे तुम्ही माझी वाट पाहताय. इथून गेल्यावर तुम्हीच तर माझा निरोप घ्यायला स्वप्नात आला होतात. आपल्या वरळीच्या घराखालीच तुम्ही नाटकाचं सामान भरलेल्या गाडीजवळ उभे होतात. मला जवळ घेत *(त्या वेळी कुणी बघत नाही ना म्हणून मी आजूबाजूला पाहिलं होतं.)* म्हणालात, ''मला उशीर झालाय. मी पुढे जातो. तू नंतर ये. मी तुझी वाट पाहतोय.'' मी तुम्हाला विचारलंही, ''तुम्ही या गाडीत बसणार कुठे? किती सामान आहे?'' तुम्ही नाक फुगवीत म्हणालात, ''माझ्यासाठी आत स्पेशल खुर्ची ठेवलेली आहे.'' काय गंमत आहे नाही? तुम्ही माझी वाट बघताय आणि मी तुमची वाट बघते आहे. जीवनमृत्यूचा हा लपंडावच म्हणायचा.

आभाळ धरणीचं मीलन होत नाही म्हणतात. पण कधीतरी इंद्रधनूनं या मीलनाचं तोरण अल्पकाळ बांधलं जातं. तीन वर्षांच्या विवाहबंधनानं काशिनाथ घाणेकर नावाचं एक असंच मोहक देखणं इंद्रधनुष्य माझ्या आयुष्यावर उमटलं आणि अल्पकाळात अंतर्धानही पावलं. इंद्रधनुष्य मावळल्यावर वर्षा होत नाही म्हणतात. माझ्याही आयुष्यातील सौख्याची, आनंदाची बरसात संपली आहे.

उर्दू कवी बहादूरशहा जफरचा एक शेर आहे–

उम्रे दराजसे माँग के लाए थे चार दिन।
दो आरजूमें कट गये, दो इंतजारमे।

माझ्या बाबतीत हा शेर तंतोतंत लागू पडतो नाही? तुम्ही लाभावेत ही तळमळ मनात घेऊन अर्धं आयुष्य उलटलं आणि आता तुमची प्रतीक्षा करण्यात उरलेलं आयुष्य सरणार.

तुम्हाला पाठविलेल्या पत्रातून मी तुम्हाला, मला आवडणारी दुसऱ्यांची एखादी कविता लिहून पाठवायची. आज मात्र मी माझीच कविता तुम्हाला पाठवते आहे. किती वर्षांनी कविता शब्दांतून उमटली. निमित्त तुम्ही जाण्याचं. वेदनेतून कविता स्फुरते म्हणतात.

माझ्या विसाव्याची तीन ठिकाणं आहेत
एक दार बंद केलेली खोली....
दुसरं रात्रीचा अंधार...
आणि तिसरी माझी उशी...
हे तिघे माझे जिवलग आहेत.
कारण तिघेही–
अबोल आहेत.
तटस्थ आहेत.
निर्विकार आहेत.
यातील कुणीही मला–
सहानुभूती दाखवीत नाही.
मला गोंजारीत नाही.
माझी कीव करीत नाही.
पण माझं दुःख पोरकं मात्र नाही.
आईनं बाळाला जसं छातीशी कवटाळावं
तसं मी त्याला काळजाशी धरलं आहे.
कारण–
मी स्वतःहून स्वीकारलेलं हे सतीचं वाण आहे.
सांभाळा......

तुमचीच,
**कांचन.**

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'नाथ हा माझा' या पुस्तकातून)**



ख़त लिखा यार ने रक़ीबों को
जिंदगी ने दिया जवाब मुझे
-लाला माधव राम जौहर

# तुरुंगातील पत्रे

मूळ लेखक : अर्न्स्ट टोलर
अनुवाद : वि. स. खांडेकर



**टॉलरच्या मनातील भोग आणि त्यागाचं द्वंद्व अधोरेखित करणारी पत्रं**

*अर्न्स्ट टोलर हा एक देशभक्त. जर्मन (ज्यू )असलेला; समाजवादी विचारधारेची कास धरल्यामुळे जर्मनीतील तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी त्याला तुरुंगात टाकलं. तुरुंगवास भोगत असताना त्यानं अनेक लोकांना लिहिलेल्या पत्रांचा संग्रह 'लेटर्स फ्रॉम प्रिझन' या नावाने प्रकाशित करण्यात आला. वि. स. खांडेकरांच्या हातात हे पत्रसंग्रहरूपी पुस्तक पडलं आणि ती पत्रं त्यांच्या अंतःकरणाला स्पर्शून गेली. म्हणून त्यांनी त्यातील काही पत्रांचा अनुवाद केला. 'तुरुंगातील पत्रे' हे पुस्तक त्यातून सिद्ध झालं. या पत्रांविषयीचा वि.स. खांडेकर यांचा अभिप्राय त्यांच्याच शब्दांत-*

*'एकेका पुस्तकाने कल्पना आणि भावना फुलविण्याचे सामर्थ्य या पत्रांत होते. जीवनमंदिराच्या प्रत्येक कोपऱ्यावर प्रकाश टाकण्याची शक्ती त्यांच्यात होती. आजच्या जगातल्या आणि जीवनातल्या अनेक कटू प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे या पुस्तकात दिलेली होती. कला आणि क्रांती यांचा संगम किती मनोहर होऊ शकतो, याचा विरळ असलेला अनुभव ही पत्रं वाचताना मी घेतला.' खांडेकरांच्या या अनुभवाचा अंशतः अनुभव घेऊ यात या निवडक पत्रांमधून...*

प्रिय महाशय,

जर्मनीतल्या बुद्धिजीवी पुढाऱ्यांच्या साहाय्यानं माझी तुरुंगातून मुक्तता करण्याचे तुमचे बेत वाचून मला क्षणभर गहिवर आला. पण तुमचा हा विचार तुम्ही सोडून द्यावा, अशी मी तुम्हाला अंतःकरणपूर्वक विनंती करतो. क्षणिक भावनेला बळी पडून तुरुंगात राहण्यातच एक प्रकारचं भूषण आहे, अशा अहंकाराला वश होऊन मी हे लिहिलं नाही. माझी इच्छा असती, तर दोन वर्षांपूर्वीच मी कारागृहातून बाहेर पडलो असतो. बव्हेरियन सरकारनं मला माफी देण्याचं निश्चित केलं आहे, असं त्या वेळी सरकारी वकिलांच्या बोलण्यात आलं होतं. माझ्या 'ट्रान्स्फिग्युरेशन' या नाटकाला मिळालेलं प्रचंड यश त्या माफीच्या मुळाशी होतं. तो वकील त्या वेळी म्हणाला होता, ''दोन-तीन आठवड्यांत तुम्ही स्वतंत्र व्हाल!''

पण असली माफी स्वीकारण्याची माझी इच्छा नाही, असं मी त्याच क्षणी त्याला सांगितलं. आमच्या निरपराधी अनुयायांना आणि स्वयंसेवकांना जोपर्यंत तुरुंगात डांबून ठेवण्यात येत आहे, तोपर्यंत मी स्वतंत्र होऊ इच्छित नाही, असं मी चक्क बजावलं त्याला. दोन वर्षांत राजकीय परिस्थितीत बराच बदल झाला आहे हे खरं; पण माझ्या त्या वेळच्या विचारसरणीत अजून रेसभरही अंतर पडलेलं नाही. माझा तुरुंगवास ही एक वैयक्तिक दुःखाची गोष्ट आहे, असं मी कधीच मानलं नाही. आपल्या देशातल्या विरोधी राजकीय शक्तीच्या संग्रामाचं चित्र आहे हे! हा सत्ताधारक आणि क्रांतिकारक यांच्या बळाबळांचा सामना आहे. मला पटणाऱ्या ध्येयाकरिता मी नेहमी लढत आलो आहे. त्या ध्येयासाठी बुद्धी आणि विवेक यांच्याशिवाय इतर कुठल्याही गोष्टींचा त्याग करायला मी आनंदानं सिद्ध होऊन राहिलो आहे.

मी तुरुंगात पहिलं पाऊल टाकल्याला जवळजवळ तीन वर्षं होत आली. काळ हा अनेक वेळा माणसाला अकल्पित बळ देतो. माझंही तसंच झालं आहे. माझ्या वाट्याचा भोग हसतमुखानं आणि स्वतंत्र मनुष्याला शोभणाऱ्या धैर्यशाली वृत्तीनं भोगण्याइतकं माझं मन आता खंबीर झालं आहे आणि म्हणून आज तुरुंगात असूनही मी स्वतंत्र आहे. माझं हे स्वातंत्र्य दगडी भिंतींना, लोखंडी गजांना किंवा त्यांच्यासारखीच मनं असलेल्या सत्ताधाऱ्यांना कधीही हिरावून नेता येणार नाही.

तथापि एक गोष्ट– अंऽहं– एक नव्हे, दोन गोष्टी तुमच्या हातून होऊ शकल्या, तर मला थोडं बरं वाटेल.

जर्मनीतल्या बुद्धिजीवी पुढाऱ्यांना माझा कैवार घेण्याची आवश्यकता खरोखरच भासत असेल, कर्तव्य म्हणून ते माझं वकीलपत्र घेणार असतील, कृतज्ञतेपेक्षा दुसऱ्या कुठल्याही भावनेची माझ्यापासून त्यांना अपेक्षा नसेल, तर माझ्या पुढील दोन इच्छा त्यांनी लक्षात घ्याव्यात.

पहिली- रात्री नऊ वाजल्यानंतर माझ्या स्वतःच्या खर्चानं मेणबत्ती जळत ठेवण्याची परवानगी मला हवी आहे. संध्याकाळी आणि रात्रीच्या पहिल्या प्रहरातच मला माझ्या लेखनाला लागणारी प्रसन्नता मिळते.

दुसरी– मशिनरेकर्सच्या तालमी सुरू होतील, तेव्हा दोन-तीन आठवड्यांची रजा मला मिळावी. माझ्यासारखा राजकीय कैदी ही रजा का मागतो याचं कारण स्वतःच्या कलाकृतीपासून सर्वस्वी दूर राहताना कलावंताला किती यातना होतात, याचं वर्णन मीच कशाला करायला हवं?

नाट्यप्रयोगाच्या वेळी स्वतःचं प्रदर्शन करण्याची माझी मुळीच इच्छा नाही. पहिला खेळ लागायच्या आदल्या दिवशी संपेल अशा बेतानं मला रजा मिळाली तरी चालेल. फक्त

तालमीच्या वेळी मी हजर राहू शकलो तरी– तुम्हाला कदाचित हसू येईल हे वाचून; पण कलावंताचं मन हे आईच्या हृदयासारखं असतं!

प्रिय टेसा,

प्रिय व्यक्तीच्या दोन शब्दांसाठी मनुष्य किती व्याकूळ होतो, प्रत्येक उजाडणाऱ्या दिवसाचं तो किती उत्कंठेनं स्वागत करतो, याची आता मला पुरी पुरी कल्पना येऊन चुकली आहे. तुरुंगात असा एक क्षण येतो की– तेव्हाची माझ्या मनाची अधीर स्थिती– एका क्षणात अनुभवावी लागणारी ती विलक्षण आंदोलनं– आणि ज्याच्यासाठी जीव डोळ्यांत गोळा झालेला असतो, ते प्रिय व्यक्तीचं परिचित अक्षर दृष्टीला न पडल्यामुळं येणारी शून्यता आणि उदासीनता – माझ्या आवडत्या मित्रांनी तरी माझा असा अंत पाहू नये असं मला वाटतं. टेसा, माझं मन थोडं विकल झालं आहे. मी तुम्हा सर्वांशी यापेक्षाही वाईट रीतीनं वागलो असेन. म्हणून काही तुम्ही– शोभतं का हे तुम्हाला?

तुरुंगात तिसऱ्यांदा वसंत ऋतूचं दर्शन होत आहे. माझ्या रक्तातल्या कणाकणानं नाचत-नाचत वसंताच्या आगमनाची ही वर्दी मला द्यायला हवी होती! पण –

माझ्या खिडकीचा हा लोखंडी गज– त्याची मला मुळीच भीती वाटत नाही. तो बिचारा काय करणार आहे माझं? पण हा दुसरा लोखंडी गज – माझा आत्मा आणि बाहेरचं जग यांच्यामधला हा अवजड अडसर – तो मला पुन्हा दूर करता येईल का? माझा आत्मा आणि बाहेरचं जीवन यांच्यामध्ये उभी राहू पाहणारी ही भिंत– ती कधी काळी ढासळून पडेल का?

बीरचं 'सामाजिक संघर्षाचा इतिहास' हे पुस्तक मी नुकतंच वाचलं. ते वाचून–

मानवतेच्या इतिहासात त्याच त्याच झगड्यांची पुनरावृत्ती होत असते, नाही? तोच उदात्त ध्येयवाद, कोमल कल्पना आणि कठोर व्यवहार यांच्यात आढळून येणारं तेच दोन ध्रुवांचं अंतर, ध्येयामागून धावणाऱ्यांच्या हातून घडणारा तोच निष्फळ पराक्रम, अफाट बहुजन समाज आणि मूठभर बुद्धिमंत यांच्या गरजांत आढळून येणारा तोच विसंवाद, क्रांतिकारकांना कुंठित करून सोडणारे तेच सामाजिक चक्रव्यूह – क्रांतीमागून तिची प्रतिक्रिया यावी, त्या प्रतिक्रियेचा कंटाळा आला की पुन्हा क्रांतीची कास धरावी, असंच का जगाचं रहाटगाडगं चालायचं आहे?

विचार करून माझं मन कसं सुन्न होतं. पुन्हा मूळ जागीच परत यायचं असेल, तर कुठला प्रवासी –

अशा वेळी घरच्या ओढीनं मी अगदी व्याकूळ होऊन जातो. त्या घराचं नाव – अनंत शून्यता.

प्रिय हेन्री बारबस,

माझ्या ट्रान्स्फिग्युरेशन नाटकाचं तुम्ही फ्रेंचमध्ये भाषांतर करीत आहा, असं मी आत्ताच वर्तमानपत्रात वाचलं. ज्याच्याविषयी मला अत्यंत आदर वाटत आला आहे, अशा तुमच्यासारख्या समाजवादाच्या पहिल्या कट्टर पुरस्कर्त्यानं माझ्या कृतीचं असं कौतुक केलेलं पाहून मनाला होणारा आनंद शब्दांनी व्यक्त करायला मी असमर्थ आहे. मी तुमचा फार फार आभारी आहे, एवढंच म्हणतो.

१९१७ मध्ये हे नाटक मी लिहिलं ते काही केवळ माझ्या कलात्मक शक्तीचा आविष्कार करण्याकरता नाही. एखाद्या प्रचारात्मक प्रबंधावर जशी मेहनत घ्यावी, तसे श्रम मी हे नाटक लिहिताना केले. हे नाटक म्हणजे माझी युद्धविरोधी मोहीमच होती. या नाटकानंच एका प्रचंड संपाला स्फूर्ती दिली. पोलिसांची नजर चुकवून तरुणांनी त्याची किती पारायणं केली असतील याची गणतीच करता येणार नाही. त्या पारायणांनीच क्रांतीचं दैनंदिन कार्य करणारे अनेक सोबती मला मिळवून दिले.

आज जर्मनीत क्रांतिवाद पराभूत झालेला दिसत आहे. रानटीपणा, नीतीचा नाश, आत्म्याचा अधःपात, असत्याची चलती, ढोंग आणि लोभ यांचा विजय – आजच्या जर्मनीत दुर्दैवानं ही दृश्यं सर्वत्र दिसत आहेत. पण त्यामुळे समाजवाद मागं पडला, असं मानायला मी मुळीच तयार नाही. क्रांतिकारकांना सत्ताधारी तुरुंगात टाकू शकतात. पण ज्या ध्येयाकरिता त्यांनी आपलं रक्त सांडलेलं असतं, ते कुणालाही तुरुंगाच्या भिंतीआड डांबून ठेवता येत नाही. ते ध्येय स्वतंत्रच राहतं. क्रांतिकारकांच्या रक्ताच्या थेंबथेंबागणिक त्याचं सामर्थ्य वाढत असतं.

प्रिय,

तुझ्या पूर्वीच्या घराच्या पत्त्यावर मी एक पत्र पाठविलं होतं. पण 'मालक दुसरीकडे राहायला गेला आहे. नवा पत्ता माहीत नाही' असा छाप घेऊन ते माझ्याकडेच परत आलं. त्या पत्रासोबत मी तुला एक चित्र पाठविलं होतं. ते चित्र फार बोलकं होतं. माझा संदेश त्या चित्रानं तुला सांगितला असता. योगायोग किती चमत्कारिक असतात! परवाचीच गोष्ट. मी तुझी जुनी पत्रं चाळीत असताना तुझी ती चिठ्ठी मला मिळाली! चिठ्ठी कसली? कोमल बंधनांवर घाव घालणारी कुऱ्हाडच वाटली ती मला! मी समाजवादाकडे पाठ फिरवू शकत नाही म्हणून माझ्याशी कुठलाही संबंध ठेवायचा नाही, असं तू ठरविलं आहेस हे त्या चिठ्ठीतले शब्द वाचताच–

तुझ्यासारख्या माझ्या बालमित्रानं– ख्रिस्ताचा सात्त्विक संदेश जगाला सांगण्याकरिता धर्मोपदेशक झालेल्या माणसानं– इतकं कठोर व्हावं याचं मला आश्चर्य वाटतं. सहृदयता हाच धर्माचा आत्मा आहे! नाही?

आणि ज्याच्या तत्त्वनिष्ठेवर रागावून तू असा दूरदूर जात आहेस, त्या तुझ्या मित्राच्या मनाची तुला थोडी तरी कल्पना आहे का? दोन वर्षं – तुरुंगातली दोन वर्षं – चार क्रूर दगडी

भिंतींच्या आत कंठलेली दोन वर्षं – आजारीपणामुळे ज्यांनी एकमेकांपासून अलग राहायला हवं अशा असंख्य माणसांच्या कोंडवाड्यात काढलेली दोन वर्षं – या नीरस कंटाळवाण्या जिण्याचं चित्र तुझ्या डोळ्यांपुढं कधी तरी उभं राहतं काय? माझी समाजवादावरली श्रद्धा हा तुझ्या दृष्टीनं माझा घोर अपराध आहे. पण ध्येयनिष्ठा हा कधीही मनुष्याचा गुन्हा होऊ शकत नाही. माझ्या या ध्येयनिष्ठेच्या मागं काय आहे, ती कशानं प्रेरित झाली आहे, हे तू कधी तरी पाहिलं आहेस का? शांत चित्तानं आत थोडंसं डोकावून बघ, म्हणजे या निष्ठेच्या मागं कटुता, बंडखोरपणा आणि निराशा यांनी काठोकाठ भरलेलं मानवतेचं अनेक शतकांचं आयुष्य उभं आहे असं तुला दिसून येईल. हे सारं कळत असूनही तू माझा संबंध सोडणार असशील तर –

तर हाच माझा तुला शेवटचा नमस्कार.

प्रिय महाशय,

आज स्वतःविषयी विशेष असं मला काहीच लिहायचं नाही. पाच जुलै रोजी माझ्या बंदिवासाला तीन वर्षं पुरी होतात. काळपुरुष एक एक पायरी चढत आहे आणि माझ्या जीवनातला उत्साह एकेका पायरीनं ओसरत आहे. मात्र मनाच्या उमेदीबरोबरच त्याचे असह्य असे अनेक विशेषही तुरुंगात लोप पावू लागतात यात संशय नाही.

तत्त्व, प्रमेयं आणि वाद यांचा खूप काथ्याकूट करून राजकीयदृष्ट्या अर्थशून्य असलेल्या जीवनक्रमात काही तरी विलक्षण अर्थ भरला आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न अगदी चिडखोर माणसंसुद्धा इथं हळूहळू सोडून देतात.

हल्लीची वर्तमानपत्रं पाहिलीत का? त्यात उजव्या गटाच्या पुरस्कर्त्यांनी माझ्यावर हल्ला चढविला आहे. तो निदान मला समजू शकतो. पण डाव्या गटाच्या काही मंडळींनी अतिरेकाच्या नि अभिनिवेशाच्या भरात तोच प्रयोग माझ्यावर करावा याचं –

अशा वेळी शांत राहणं मोठं कठीण आहे.

प्रिय टेसा,

तुझं पत्र हातात पडल्यापासून मी जणू काही संगीताच्या मधुलहरींवर तरंगत आहे. माझ्याशी सहज बोलणारा प्रत्येक मनुष्य गात आहे असं मला वाटतं. जुडग्यातल्या किल्ल्यांची खळखळ कानावर पडली, तरी ती मधुर घंटानादाप्रमाणं भासते. किंबहुना लोखंडी गजाच्या जाळीचं मधुर स्वरलहरीत रूपांतर होत आहे, अशी कल्पना मधूनच माझ्या मनात आल्यावाचून राहत नाही.

माझं हे काव्य पाहून तू मनात थोडीशी कचरशील. पण माझ्या या उद्‌गारात भय वाटण्यासारखं काहीच नाही. किती तरी आठवडे – छे! महिने – मी इतक्या रुक्षपणानं काढले आहेत, इतका काळ मी नाजूक काव्यमय संवेदनेशी वैर केलं आहे की, आज सारी बंधनं दूर झुगारून माझ्या भावनांना स्वच्छंद नृत्य करण्याची परवानगी दिल्यावाचून मला राहवतच नाही.

या पत्राबरोबर मी फुलं पाठवीत आहे. तुरुंगाच्या अंगणातले कोमल तृणांकुर आणि रानफुलं आहेत ही. त्यातलं प्रत्येक तुझं स्वागतगीत गात तुझ्याकडे येत आहे. तू जर्मनीत पाऊल टाकल्याबरोबर जणू काही तू माझ्याजवळच आहेस आणि तुझं सान्निध्य एखाद्या जादूच्या कांडीप्रमाणं माझा दुबळेपणा पार घालवून टाकीत आहे असं मला वाटावं, ही किती नवलाची गोष्ट आहे! मात्र ती तशी आहे खरी!

मी गव्हर्नरकडे ताबडतोब विनंतीपत्र पाठविलं आहे. तुझ्या भेटीची कदाचित परवानगी मिळणार नाही. हा विचार – छे! तो विचार करायलासुद्धा माझं मन तयार नाही. आपल्याला खूपखूप बोलायचं आहे. खरं ना? माझ्या दृष्टिकोनाशी समरस होणारी, सर्व गोष्टींचा नीट विचार करून माझ्या परिस्थितीची असह्यता सौम्य करणारी आणि माझं लेखन व जीवन यशस्वी व्हावं अशा रीतीनं मला उपदेश व मार्गदर्शन करणारी जगात एकच व्यक्ती आहे. तिचं नाव – तुला ते सांगायलाच हवं का?

तू कदाचित..... हा विचार..... छे! ते शक्य नाही. तू येणार – अगदी खास येणार –

प्रिय टेसा,

मला भेटण्याची परवानगी तुला नाकारण्यात आली आहे ही सरकारी वार्ता नुकतीच माझ्या कानावर पडली. काय लिहू? ओठ घट्ट आवळून.....या जगात माणसानं फुलासारखं कोमल होऊन चालत नाही. त्यानं वज्रासारखं कठोर झालं पाहिजे.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'तुरुंगातील पत्रे' या पुस्तकातून)**



किसी को भेज के ख़त हाए ये कैसा अज़ाब आया
कि हर इक पूछता है नामा-बर आया जवाब आया
-अहसन मारहरवी

# दिनविशेष

**१६ ऑक्टोबर - जागतिक अन्न दिवस**
'रुचिरा भाग १ व २, चला जाणून घेऊ या - शाकाहार, मेक्सिकन कुकिंग, अन्नपुराण : आयुर्वेदिक-आधुनिक, केक्स, मायक्रोवेव्ह ओव्हन, आहार आणि आरोग्य, आजचा मेनू' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १८५५/-**
**सवलत किंमत : रु. १२१९/-**
*१६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबरपर्यंत*

**१७ ऑक्टोबर - इंटरनॅशनल डे फॉर इरॅडिकेशन ऑफ पॉव्हर्टी**
'वुई आर पुअर बट सो मेनी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. २९५/-**
**सवलत किंमत : रु. २०९/-**
*१७ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबरपर्यंत*

**२० ऑक्टोबर - गौरी केळकर यांचा जन्मदिन**
'तरीही जिवंत मी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु.२५०/-**
**सवलत किंमत : रु.१७९/-**
*२० ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबरपर्यंत*

**२१ ऑक्टोबर - शुभदा विद्वांस यांचा जन्मदिन**
'तुला आठवताना..., 'व्हाय मेन डोन्ट लिसन अँण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स, चिंता सोडा, मजेत जगा, मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा, 'स' सुखाचा, तो आणि ती' या ७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १६२५/-**
**सवलत किंमत : रु. ९९९/-**
*२१ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबरपर्यंत*

**२१ ऑक्टोबर - आल्फ्रेड नोबेल यांचा जन्मदिन**
'नोबेल ललना - भाग १ व २' या पुस्तकांवर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ३००/-**
**सवलत किंमत : रु. १९९/-**
*२१ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबरपर्यंत*

**२३ ऑक्टोबर - अशोक पाध्ये यांचा जन्मदिन**
अशोक पाध्ये **अनुवादित २०** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ७३८०/-**
**सवलत किंमत : रु. ४०६९/-**
*२३ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबरपर्यंत*

**२३ ऑक्टोबर - मायकेल क्रायटन यांचा जन्मदिन**
'नेक्स्ट, पायरेट लॅटिट्यूड्स, प्रे, स्टेट ऑफ फिअर' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १४००/-**
**सवलत किंमत : रु. ८४९/-**
२३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबरपर्यंत

**२४ ऑक्टोबर - सई साने यांचा जन्मदिन**
'आरोग्यासाठी योग' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. १३०/-**
**सवलत किंमत : रु.९०/-**
२४ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबरपर्यंत

**२६ ऑक्टोबर - मंजूषा आमडेकर यांचा जन्मदिन**
**संच - १** मंजूषा आमडेकर लिखित व अनुवादित **६१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. ४९९९/-**
**सवलत किंमत : रु. ३०१९/-**
*२६ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबरपर्यंत*

**संच - २** शेक्सपिअरच्या २२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. १५००/-**
**सवलत किंमत : रु. ११९९/-**
*२६ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबरपर्यंत*

**२७ ऑक्टोबर - श्रीया भागवत यांचा जन्मदिन**
'कॉन-टिकी' या पुस्तकावर विशेष सवलत.
**मूळ किंमत : रु. २९५/-**
**सवलत किंमत : रु.२०९/-**
*२७ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबरपर्यंत*

**२९ ऑक्टोबर - ली चाइल्ड यांचा जन्मदिन**
'नथिंग टू लूज','वन शॉट' या पुस्तकांवर विशेष सवलत.
**मूळ किंमत : रु. ६९०/-**
**सवलत किंमत : रु. ३९९/-**
*२९ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत*
**२९ ऑक्टोबर - मैत्रेयी जोशी यांचा जन्मदिन**
'डिनायल अ मेमॉइर ऑफ टेरर, गोष्ट एका करानाची, गर्नसी वाचक मंडळ, ब्लू बर्ड' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ११२५/-**
**सवलत किंमत : रु. ७७९ /-**
*२९ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबरपर्यंत*
**३० ऑक्टोबर - सुधीर राशिंगकर यांचा जन्मदिन**
'कहाणी मॅकडोनल्ड्सची' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. ४९५/-**
**सवलत किंमत : रु. ३०९/-**
*३० ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत*

**२ नोव्हेंबर - कविता भालेराव यांचा जन्मदिन**
तंत्रज्ञानाची मुळाक्षरे - भाग १ व २ या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. ३००/-**
**सवलत किंमत : रु. १९९/-**
*२ नोव्हेंबर ते ३ नोव्हेंबरपर्यंत*

**२ नोव्हेंबर - अरुण शौरी यांचा जन्मदिन**
अरुण शौरी लिखित ७ अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. २७२५/-**
**सवलत किंमत : रु.१५२९/-**
*२ नोव्हेंबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत*

**५ नोव्हेंबर - अपर्णा नायगांवकर यांचा जन्मदिन**
'घाचर घोचर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. १५०/-**
**सवलत किंमत : रु.९९/-**
*५नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबरपर्यंत*

**५ नोव्हेंबर - मंजूषा मुळे यांचा जन्मदिन**
'चिकन सूप' मालिकेतील ३ पुस्तकांवर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. ७२०/-**
**सवलत किंमत : रु. ५०९/-**
*५ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबरपर्यंत*

**६ नोव्हेंबर - इंटरनॅशनल डे फॉर प्रिव्हेन्टिंग द एक्स्प्लॉयटेशन ऑफ द एन्व्हायर्नमेंट इन वॉर अँन्ड आर्म्ड कॉन्फ्लिक्ट**
'इनसाइड द गॅस चेंबर्स, लेनिनग्राडचा वेढा, २६/११ : मुंबईवरील हल्ला' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ७७०/-**
**सवलत किंमत : ४९९/-**
*६ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबरपर्यंत*

**६ नोव्हेंबर - श्याम भुर्के यांचा जन्मदिन**
श्याम भुर्के लिखित १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १९००/-**
**सवलत किंमत : रु. ११८९/-**
*६ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबरपर्यंत*

**६ नोव्हेंबर - संजय ढोले यांचा जन्मदिन**
संजय ढोले लिखित ४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ८३०/-**
**सवलत किंमत : रु. ४९९/-**
*६ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबरपर्यंत*

**७ नोव्हेंबर - डॉ. रत्नावली दातार यांचा जन्मदिन**
डॉ. रत्नावली दातार लिखित ३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ३००/-**
**सवलत किंमत : रु. १९९/-**
*७ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबरपर्यंत*

**७ नोव्हेंबर - इन्फन्ट प्रोटेक्शन डे**
'गर्भसंस्कार, हसत-खेळत बालसंगोपन, सुखद बालसंगोपन, पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ९५५/-**
**सवलत किंमत : रु. ६३९/-**
*७ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबरपर्यंत*

**७ नोव्हेंबर - वर्ल्ड कॅन्सर अवेअरनेस डे**
'Cancer Care & Mysteries & Yoga, कॅन्सर रोखू या, इट्स नॉट अबाउट द बाइक' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ७७०/-**
**सवलत किंमत : रु. ४९९/-**
*७ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबरपर्यंत*

**१० नोव्हेंबर - वर्ल्ड सायन्स डे फॉर पीस अँन्ड डेव्हलपमेंट**
**संच १** 'प्रेमाचा रेणू, संकरित, कल्पित-अकल्पित, अंतरिक्षाच्या अंतरंगात, पर्यावरण प्रदूषण, ज्ञानदीप, वसुंधरा, दृष्टिभ्रम, खिडकीलाही डोळे असतात, गोलमाल, विज्ञान प्रपंच, विज्ञान विशेष, विज्ञान नवलाई, गार्डिआन' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ३०४५/-**
**सवलत किंमत : १७६९/-**
*१० नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत*

**संच २** 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट, जॉर्जेस सीक्रेट की टू द युनिव्हिर्स, जॉर्ज अॅण्ड द बिग बँग' या ३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १४८५/-**
**सवलत किंमत : रु. ८५९/-**
*१० नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत*

**संच ३-** १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १५००/-**
**सवलत किंमत : रु.८६९/-**
*१० नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत*

**संच ४-** एकूण ५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ९००/-**
**सवलत किंमत : रु. ५३९/-**
*१० नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत*

**१० नोव्हेंबर - मंजिरी धामणकर यांचा जन्मदिन**
'तिनका तिनका तिहार' या पुस्तकावर विशेष सवलत
**पुस्तकाची मूळ किंमत : रु. १८०/-**

**सवलत किंमत : रु. ११९/-**
*१० नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबरपर्यंत*

**११ नोव्हेंबर - राष्ट्रीय शिक्षण दिवस**
'स्टोन्स इन्टू स्कूल्स, थ्री कप्स ऑफ टी, टू सर विथ लव्ह, अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ११७५/-**
**सवलत किंमत : रु. ७४०/-**
*११ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबरपर्यंत*

**११ नोव्हेंबर - सुरेखा शहा यांचा जन्मदिन**
'थेंबभर पाणी अनंत आकाश' या पुस्तकावर विशेष सवलत
**पुस्तकाची मूळ किंमत : रु.२८०/-**
**सवलत किंमत : रु. १६९/-**
*११ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत*

**११ नोव्हेंबर - अनंत भोयर यांचा जन्मदिन**
'हराळी, आभाळझुंज' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ५४०/-**
**सवलत किंमत : रु.३२९/-**
*११ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत*

**११ नोव्हेंबर - विभाकर शेंडे यांचा जन्मदिन**
'द पार्टनर','द लास्ट ज्यूरर' या पुस्तकांवर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. ७२०/-**
**सवलत किंमत : रु. ४३९/-**
*११ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत*

**१२ नोव्हेंबर - ख्रिस्तोफर रिच यांचा जन्मदिवस**
'रुल्स ऑफ डिसेप्शन' या पुस्तकावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ४८०/-**
**सवलत किंमत : रु. २९९/-**
*१२ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबरपर्यंत*

**१४ नोव्हेंबर - बालदिन**
**संच १** - बालसाहित्यातील **१७१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ९६०५/-**
**सवलत किंमत : रु. ५४७९/-**
*१४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबरपर्यंत*

**संच - २** बालसाहित्यातील **२३** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु.३८६०/-**
**सवलत किंमत : रु.२२०९/-**
*१४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबरपर्यंत*

**१४ नोव्हेंबर - वर्ल्ड डायबेटीस डे**
'चला जाणून घेऊ या! -मधुमेह, मधुमेह : एक आव्हान' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. २५०/-**
**सवलत किंमत : रु. १५९/-**
*१४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबरपर्यंत*

**१५ नोव्हेंबर -संजय राऊत यांचा जन्मदिन**
'एकवचनी भाग १-२' या पुस्तकांवर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ८९५/-**
**सवलत किंमत : रु. ६०९/-**
*१५ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबरपर्यंत*

**१७ नोव्हेंबर -रत्नाकर मतकरी यांचा जन्मदिन**
रत्नाकर मतकरी लिखित १५ पुस्तकांवर विशेष सवलत.
**मूळ किंमत : रु.२२२५ /-**
**सवलत किंमत : रु. १५५९/-**
*१७ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबरपर्यंत*

**१७ नोव्हेंबर - मोहना जोगळेकर यांचा जन्मदिवस**
'रिक्त' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. २५०/-**
**सवलत किंमत : रु.१७५/-**
*१७ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबरपर्यंत*

**१९ नोव्हेंबर - इंटरनॅशनल मेन्स डे**
**संच १**- 'धीरुभाईझम, इमॅजिनिंग इंडिया, जे. आर. डी. टाटा एक चतुरस्त्र माणूस, की-नोट जे. आर. डी. टाटा,माझी जीवनयात्रा, मायकेल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी, नारायण मूर्ती : मूल्य जपणारं एक अद्वितीय आयुष्य, रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व, स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ, टाटा एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती, तेलसम्राट, माझी वाटचाल' या पुस्तक संचावर सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ३७०५/-**
**सवलत किंमत : रु. २५१९/-**
*१९ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबरपर्यंत*

**संच २**- 'आधुनिक भारताचे प्रेषित : स्वामी विवेकानंद, अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम, बंदा रुपाया!, छावा, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, एकलव्य, क्रांतिसूर्य, लेनिनग्राडचा वेढा, राधेय, महाभारतातील पितृवंदना, मृत्युंजय, नेताजी, पावनखिंड, राजा रवी वर्मा, संभाजी,' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ३८९५/-**
**सवलत किंमत : रु. २६२९/-**
*१९ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबरपर्यंत*

**संच - ३** 'अदम्य जिद्द, अमरगीत : बाबा आमटे यांचे जीवनचरित्र, मॅस्वी कान्हेरे, नाथ हा माझा, पितृऋण, टर्निंग पॉइंट्स, योध्दा शास्त्रज्ञ राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत : रु. १२६०/-**
**सवलत किंमत : रु. ८४९/-**
*१९ नोव्हेंबर ते  २२ नोव्हेंबरपर्यंत*

**संच ४** 'अमेरिकी राष्ट्रपती, कॅलिस्टो, चिकन सूप फॉर द फादर्स सोल १ व २, मी कधीही माफी मागणार नाही, मी तिरस्कार करणार नाही, थेंबभर पाणी अनंत आकाश, तो एक पाकिस्तानी ' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. २५२०/-**
**सवलत किंमत : रु. १६९९/-**
*१९ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबरपर्यंत*

**संच ५** 'हाच माझा मार्ग, प्लेइंग इट माय वे, सिक्स मशिन' या पुस्तक संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. १८२५/-**
**सवलत किंमत : रु. १२३० /-**
*१९ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबरपर्यंत*

**२० नोव्हेंबर - उषा महाजन यांचा जन्मदिवस**
उषा महाजन अनुवादित **१२** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. २५७५/-**
**सवलत किंमत : रु. १५७९/-**
*२० नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबरपर्यंत*

**२१ नोव्हेंबर - मंजुश्री गोखले यांचा जन्मदिवस**
मंजुश्री गोखले लिखित **५** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १५६५/-**
**सवलत किंमत : रु. ११३९/-**
*२१ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबरपर्यंत*

**२२ नोव्हेंबर - अमोल कपोले यांचा जन्मदिवस**
'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकावर विशेष सवलत.
**मूळ किंमत : रु. ५०० /-**
**सवलत किंमत : रु.३४०/-**
*२२ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबरपर्यंत*

**२४ नोव्हेंबर - डेल कार्नेगी यांचा जन्मदिवस**
डेल कार्नेगी लिखित **३** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ६००/-**
**सवलत किंमत : रु. ३९९/-**
*२४ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरपर्यंत*

**२४ नोव्हेंबर - अरुंधती रॉय यांचा जन्मदिवस**
'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज,' या पुस्तकावर विशेष सवलत.
**मूळ किंमत : रु.३९५/-**
**सवलत किंमत : रु.२८०/-**
*२४ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबरपर्यंत*

**२४ नोव्हेंबर - सुधीर गाडगीळ यांचा जन्मदिवस**
सुधीर गाडगीळ लिखित '**लाइफ स्टाइल**' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. १५०/-**
**सवलत किंमत : रु. ९९/-**
*२४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबरपर्यंत*

**२५ नोव्हेंबर - इंटरनॅशनल डे फॉर इलिमिनेशन ऑफ व्हॉइलन्स अगेन्स्ट वुमन**
**संच १** 'ॲज आय सी-स्त्रियांचे सक्षमीकरण, परवाना, मयादा : इराकची कन्या, नॉट विदाऊट माय डॉटर, बारबाला, एका मातेचा लढा, मी झारा गहरमानी, अरुणाची गोष्ट, काहूर, एकाकी बंड, डायरी ऑफ ॲन फ्रँक, साम्राज्य बुरख्यामागचे, काबुलीवाल्याची बंगाली बायको, स्पाय प्रिन्सेस, ब्लास्फेमी, हिरॉईन ऑफ द डेझर्ट, माय नेम इज सलमा, तरीही जिवंत मी, वेदनेची फुले, भोगले जे दु:ख त्याला..., डिनायल-अ मेमॉइर ऑफ टेरर' या २१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ४५८५/-**
**सवलत किंमत : रु. ३०४९/-**
*२५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरपर्यंत*

**संच २** 'चिकन सूप फॉर द मदर्स सोल, भाग २ व ३, चिकन सूप फॉर द सोल इंडियन मदर्स, चिकन सूप फॉर द सोल इंडियन वुमन, चिकन सूप फॉर द वुमन्स सोल, चिकन सूप फॉर द वुमन्स सोल भाग २ व ३' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १७३५/-**
**सवलत किंमत : रु. ११५९/-**
*२५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरपर्यंत*

**२६ नोव्हेंबर - वीणा देव यांचा जन्मदिवस**
वीणा देव लिखित 'स्वान्सीतील दिवस' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. ३९५/-**
**सवलत किंमत : रु. २५९/-**
*२६ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबरपर्यंत*

**२८ नोव्हेंबर - विश्वास पाटील यांचा जन्मदिवस**
विश्वास पाटील लिखित **५** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. २१९५/-**
**सवलत किंमत : रु. १६७९/-**
*२८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत*

**२८ नोव्हेंबर - किम्बर्ली किर्बर्जर यांचा जन्मदिवस**
'चिकन सूप मालिकेतील ३ पुस्तकांवर सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. ५५५/-**
**सवलत किंमत : रु. ३३९/-**
*२८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत*

**३० नोव्हेंबर - आनंद यादव यांचा जन्मदिवस**
आनंद यादव लिखित **३३** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ५८६५/-**
**सवलत किंमत : रु. ४२६९/-**
*३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबरपर्यंत*

**३० नोव्हेंबर - योजना यादव यांचा जन्मदिवस**
'मरी मरी जाय सरीर' या पुस्तकावर विशेष सवलत.
**मूळ किंमत : रु.१४०/-**
**सवलत किंमत : रु. ९९/-**
*३० नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत*

**३० नोव्हेंबर - संजीव परळीकर यांचा जन्मदिवस**
'पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र, पुढाकार घ्या : प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे सूत्र, झटपट व्यक्तिमत्त्वाचा विकास, चार शब्द द्यावे-घ्यावे, चार जबरदस्त फंडे, याला जीवन ऐसे नाव, केल्याने होत आहे रे..., विक्रीकौशल्य शिका' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ७९५/-**
**सवलत किंमत : रु. ४९९/-**
*३० नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत*

**३ डिसेंबर - वर्ल्ड डिसअॅबलिटी डे**
'चाकाची खुर्ची, द पेशंट, इट्स नॉट अबाऊट द बाइक, एक लढा असाही, वेदनेची फुले, ...तरीही जिवंत मी, लाइफ विदाउट लिमिट्स' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. १६५०/-**
**सवलत किंमत : रु. ११४९/-**
*३ डिसेंबर ते ६ डिसेंबरपर्यंत*

**५ डिसेंबर - विनिता जोगळेकर यांचा जन्मदिन**
विनिता जोगळेकर यांच्या ४ अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. ७३०/-**
**सवलत किंमत : रु. ५१९/-**
*५ डिसेंबर ते ६ डिसेंबरपर्यंत*

**६ डिसेंबर - उज्ज्वला गोखले यांचा जन्मदिन**
उज्ज्वला गोखले यांच्याा ५ अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत : रु. १२७०/-**
**सवलत किंमत : रु.७८९/-**
*६ डिसेंबर ते ७ डिसेंबरपर्यंत*

**७ डिसेंबर - इंडियन आर्मी फोर्स फ्लॅग डे**
'एका सैनिकाचा मृत्यू, परमवीरचक्र' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ४७०/-**
**सवलत किंमत : रु. २७९/-**
*७ डिसेंबर ते ८ डिसेंबरपर्यंत*

**९ डिसेंबर - इंटरनॅशनल अँटी करप्शन डे**
'अण्णा हजारे भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा, लढा लोकपालचा, Be the change -भ्रष्टाचाराशी लढा, रेड टेप' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ८३०/-**
**सवलत किंमत : रु. ४९९/-**
*९ डिसेंबर ते ११ डिसेंबरपर्यंत*

**११ डिसेंबर - ओशो यांचा जन्मदिवस**
ओशो लिखित **३० अनुवादित** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत : रु. ४८०५/-**
**सवलत किंमत : रु. ३१९९/-**
*११ डिसेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत*

**१२ डिसेंबर - नीता गद्रे यांचा जन्मदिवस**
'जस्ट मॅरीड, प्लीज एक्सक्यूज' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. २५०/-**
**सवलत किंमत : रु.१४९/-**
*१२ डिसेंबर ते १३ डिसेंबरपर्यंत*

**१५ डिसेंबर -सुरेश पाटील यांचा जन्मदिवस**
'दाह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत : रु. ४९५/-**
**सवलत किंमत : रु.३३९/-**
*१५ डिसेंबर ते १६ डिसेंबरपर्यंत*

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन
यानिमित्त तसेच दिनविशेषावर
आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**


**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२

**Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**



‘पॉपाय’चा जन्मदाता एल्झि सेगार म्हणजे विसाव्या शतकात कार्टून कलेला नवा आयाम देणारं नाव. त्याची प्रेम व्यक्त करण्याची पद्धतही त्याच्या चित्रांसारखीच हटके होती. त्यानं ‘शिकागो हेराल्ड’ला रुजू झाल्यावर कंपनीच्या लेटरहेडवर आपल्या प्रेयसीला लिहिलेलं हे नितांतसुंदर पत्र.



CHICAGO HERALD
Over 200,000 Daily

GEE!! I WISH MYRT WAS HERE

CHESTER, ILL.
OCT 8 — 16

DEAREST MYRTLE:—
I SURE AM THINKING OF YOU, AND I'M DOGGONE LONESOME. THINK I'LL JUMP OFF THE CLIFF AND END IT ALL. "LOVE SICK EH"? ALL I GOTTA DO DOWN HERE IS SHAKE HANDS AND TELL 'EM HOW I MAKE A COMIC. HOPE YOU'RE WELL, ALSO HOPE YOU'RE THINKING OF ME.
GOO BI
LOTSALOVE
YOUR "LIL" BOOB
DICK

किसी ना-ख़्वांदा बूढ़े की तरह ख़त उस का पढ़ता हूँ
कि सौ सौ बार इक इक लफ़्ज़ से उँगली गुज़रती है

-अतहर नफ़ीस

कोई पुराना ख़त कुछ भूली-बिसरी याद
ज़ख़्मों पर वो लम्हे मरहम होते हैं

-अंजुम इरफ़ानी

ले के ख़त उन का किया ज़ब्त बहुत कुछ लेकिन
थरथराते हुए हाथों ने भरम खोलदिया

-जिगर मुरादाबादी


मेहता
पब्लिशिंग
हाउस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२,
२४४६०३१३, २४४६३०४८
Email: mmgj@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com